महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद आश्वासन समिती

अहवाल क्रमांक २०९

(२०२४-२०२५)

सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल

(दिनांक १० जुलै, २०२६ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

२०२६

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद आश्वासन समिती

(२०२४-२०२५)

अहवाल क्रमांक २०९

सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल

(दिनांक १० जुलै, २०२६ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

अनुक्रमणिका

अनु. क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
१	**प्रस्तावना :**	सात
	विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या	
	मंत्रालयीन विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्रासोबतची सहपत्रे.....	
२	**परिशिष्टे**	
	परिशिष्ट एक.– सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीने समितीच्या कार्यकालात आश्वासने वगळण्याबाबत घेतलेले निर्णय तसेच संसदीय कार्य विभागाचे दिनांक १८ सप्टेंबर,२०१५ रोजीचे शासन परिपत्रक, मा. मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे परिपत्रक व संसदीय कार्य विभागाचे दिनांक २१ जून,२०२३ रोजीचे शासन परिपत्रक.	
	परिशिष्ट दोन.– सन २०११ पहिले (अर्थसंकल्पीय) ते २०२५ तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत त्यांचे क्रमांक व विभाग.	
	परिशिष्ट तीन.– सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील, तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनातर्फे करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय दर्शविणारे विवरण.	
	परिशिष्ट चार.–सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्ततेसाठी विभागाने काढलेले शासन आदेश, निर्णय, परिपत्रक किंवा पत्रक व प्रत्येक कागदपत्रे/दस्तऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या प्रत्येक कागदपत्राच्या शिरोभागी नमूद केलेले आहे.	
	परिशिष्ट पाच.–सन २०२६ चे दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात आश्वासन पूर्ततेची विवरणपत्रे विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतरची प्रलंबित आश्वासनांची अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी.	
	परिशिष्ट सहा.– सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त.	

प्रस्तावना

मी, आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा २०९ वा अहवाल सभागृहास सादर करीत आहे. हा अहवाल मुख्यत्वे **सन २०११ पहिले (अर्थसंकल्पीय) ते २०२५ तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील आश्वानांसंबंधीचा अहवाल** शासनातर्फे देण्यात आलेली आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधी समितीला सादर केलेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा आहे. समितीने माहे जून, २०२५ ते एप्रिल, २०२६ पर्यंत झालेल्या बैठकांमध्ये **सन सन २०११ पहिले (अर्थसंकल्पीय) ते २०२५ तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील** आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत प्रलंबित असलेल्या आश्वासनांवर सचिवांची साक्ष आयोजित करुन विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या विवरणपत्रांच्या छाननीचे काम एकूण ०३ बैठकांमध्ये पूर्ण केलेले आहे.

तसेच **२०२४-२०२५** या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीने प्रलंबित आश्वासनांवर खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागांच्या अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

अ.क्र.	विभागाचे नाव	साक्षीचा वार व दिनांक
(१)	सहकार, पणन व वस्त्रोद्योगत (सहकार) विभागांची साक्ष	दिनांक ४ जून, २०२५
(२)	महसूल व वन (वने) विभागाची साक्ष.	दिनांक १३ ऑगस्ट, २०२५
(३)	महसूल व वन (महसूल) विभागाची साक्ष.	दिनांक २२ एप्रिल, २०२६

उपरोक्त मंत्रालयीन विभागांच्या यथास्थिती अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २००६ पासूनच्या प्रलंबित आश्वासनांपैकी बहुतांश आश्वासने कालबाह्य झाली होती. काही आश्वासनांची विभागांकडून पूर्तता करण्यात आली होती. तथापि, त्याबाबतीत संसदीय कार्य विभाग किंवा विधानमंडळ सचिवालयास विभागांकडून कळविण्यात आले नव्हते. परिणामी, विभागांकडील प्रलंबित आश्वासनांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत होते. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या माध्यमातून प्रलंबित आश्वासनांचा पाठपुरावा करण्याची योजना आश्वासन समितीने हाती घेतल्यानंतर दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या आश्वासनांकडे विभागांचे लक्ष वेधण्यात आले व त्यायोगे एकप्रकारे विभागांमध्ये जागृती व सतर्कता निर्माण होऊन सभागृहात शासनाकडून देण्यात आलेली आश्वासने जनतेच्या प्रश्नांशी निगडीत असल्याने त्यांना वेळीच न्याय देणे कसे आवश्यक आहे याची शासनाच्या सर्व विभागांना जाणीव झाली.

विभागाकडे प्रलंबित असलेली आश्वासने विभागाने कार्यवाही करुन ९० दिवसांच्या आत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास सादर करावयाची असतात. तथापि, वर्षानुवर्षे विभागाकडून या आश्वासनांवर

कार्यवाही होत नाही. सदर आश्वासनांबाबत शासनाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांच्या साक्षी घेण्यात आल्या तरीसुध्दा सदर आश्वासनांची पूर्तता विभागाकडून झाल्याचे दिसून आले नाही. तसेच उपरोक्त साक्षींच्या अनुषंगाने विभागाकडून कोणतीच सद्य:स्थिती प्राप्त न झाल्यामुळे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी मा.समिती प्रमुख, विधान परिषद आश्वासन समिती यांनी या संदर्भात मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना अर्धशासकीय पत्र पाठवून याबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतरही याबाबत पुनश्च दिनांक १ मार्च,२०२१ रोजी मा.समिती प्रमुख, विधानपरिषद आश्वासन समिती यांनी प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना विनंती केल्यानुसार मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना अर्ध शासकीय पत्र पाठवून समितीची नाराजी व्यक्त केली आहे. प्रलंबित आश्वासनांच्या विषयांची समितीने छाननी करुन त्यावरील कार्यवाही प्रलंबित का राहिली याबाबत ही समितीच्या बैठकींमध्ये विचारणा करण्यात आली. समितीने यासंबंधी पाठपुरावा केल्यामुळे प्रलंबित आश्वासनांचा विहित वेळेत निपटारा करण्यात किंबहुना, कार्यवाहीस वेळ लागणार असल्यास त्याबाबत विहित कालावधीत कार्यवाही पूर्ण करण्यास विभागांना भाग पाडण्यात समितीला यश आले, हे नमूद करण्यास समितीला आनंद वाटतो.

समितीच्या एकूण कामकाजात समितीवरील सदस्यांनी बैठकींना उपस्थित राहून व कामकाजात अभ्यासपूर्ण भाग घेऊन समितीच्या कामकाजाला न्याय दिल्यानेच प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करणे समितीला शक्य झाले. तसेच, शासनाचे मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी समितीला वेळोवेळी उत्तम प्रतिसाद देऊन व स्वत: लक्ष घालून प्रलंबित आश्वासनांचा तातडीने निपटारा करण्यास समितीला प्रत्यक्ष सहभागाने सहकार्य दिले त्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. अशाप्रकारे प्रशासन व कार्यकारी संस्थेच्या सहकार्यातून खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासन प्रणाली नांदू शकेल असा मला विश्वास आहे.

परिशिष्ट एक:-- सन २०२३-२०२४ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीने समितीच्या कार्यकालात आश्वासने वगळण्याबाबत घेतलेले निर्णय तसेच संसदीय कार्य विभागाचे दिनांक १८ सप्टेंबर,२०१५ रोजीचे शासन परिपत्रक, मा. मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे परिपत्रक व संसदीय कार्य विभागाचे दिनांक २१ जून,२०२३ रोजीचे शासन परिपत्रक

परिशिष्ट दोन-- सन २०११ पहिले (अर्थसंकल्पीय) ते २०२५ तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत त्यांचे क्रमांक व विभाग.

परिशिष्ट तीन :-- सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील, तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनातर्फे करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय दर्शविणारे विवरण.

परिशिष्ट चार:-- सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्ततेसाठी विभागाने काढलेले शासन आदेश, निर्णय, परिपत्रक किंवा पत्रक व प्रत्येक कागदपत्रे/दस्तऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या प्रत्येक कागदपत्राच्या शिरोभागी नमूद केलेले आहे.

परिशिष्ट पाच:-- सन २०२६ चे दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात आश्वासन पूर्ततेची विवरणपत्रे विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतरची प्रलंबित आश्वासनांची अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी.

परिशिष्ट सहा:-- सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त.

समितीने उक्त अहवालाच्या प्रारुपावर बुधवार दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत विचारविनिमय करुन संमत केला.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : जुलै,२०२६

प्रविण दरेकर,
समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती.

अहवाल

हा अहवाल **सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात आश्वासनांसंबंधीचा अहवाल)** अधिवेशनात देण्यात आलेली आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मंत्रालयीन विभागांकडून समितीला सादर करण्यात आलेल्या विवरणपत्रांवर समितीने केलेल्या छाननी संबंधीचा आहे.

१. **सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) या कालावधीतील अधिवेशनातील एकूण ११८ आश्वासनांसंबंधीचा अहवाल क्रमांक २०९** तयार करण्यात आला आहे. ती आश्वासने पुढीलप्रमाणे:-

सन २०११चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात आश्वासनांसंबंधीचा अहवाल या कालावधीत सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व आश्वासनांची संख्या

अ.क्र.	सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचा दिनांक	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)	(४)
सन २०११ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक २२ मार्च, २०११	१९२	०१
		एकूण	०१
सन २०१२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक २० एप्रिल, २०१२	७८२	०१
		एकूण	०१
सन २०१२ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन			
१.	दिनांक १६ जुलै, २०१२	१६१	०१
		एकूण	०१
सन २०१४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन			
१.	दिनांक १६ डिसेंबर, २०१४	४४०	०१
		एकूण	०१
सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन			
१.	दिनांक १६ डिसेंबर, २०१६	१९०, १९४	०२
		एकूण	०२

सन २०१७ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक ३० मार्च, २०१७	१४९	०१
		एकूण	०१
सन २०१७ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन			
१.	दिनांक १८ डिसेंबर, २०१७	१०४	०१
		एकूण	०१
सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक २८ मार्च, २०१८	४९२	०१
		एकूण	०१
सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक १० जुलै, २०२०	७७	०१
		एकूण	०१
सन २०२१ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन			
१.	दिनांक ६ जुलै, २०२१	१	०१
		एकूण	०१
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन			
१.	दिनांक २८ डिसेंबर, २०२१	२६, २७	०२
		एकूण	०२
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक २२ मार्च, २०२२	३१, ४७	०२
		एकूण	०२
सन २०२२ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन			
१.	दिनांक २२ ऑगस्ट, २०२२	२१	०१
		एकूण	०१
सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन			
१.	दिनांक २० डिसेंबर, २०२२	५, २२	०२
२.	दिनांक २१ डिसेंबर, २०२२	५५	०१
३.	दिनांक २७ डिसेंबर, २०२२	६९, ७०, ७१, ९६	०४
४.	दिनांक ३० डिसेंबर, २०२२	१२५	०१
		एकूण	०८
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन			
१.	दिनांक २ मार्च, २०२३	१६, २१, २८,	०३
२.	दिनांक ९ मार्च, २०२३	११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४	०६
३.	दिनांक १६ मार्च, २०२३	२६६	०१
४.	दिनांक १७ मार्च, २०२३	२८८, ३१९	०२

४.	दिनांक २० मार्च, २०२३	३३१	०१
५.	दिनांक २३ मार्च, २०२३	३४५, ३९८	०२
		एकूण	१६
		सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन	
१.	दिनांक २० जुलै, २०२३	४९,	०१
२.	दिनांक २१ जुलै, २०२३	५६, ५७, ५८,	०३
३.	दिनांक २७ जुलै, २०२३	१८४, १८५,	०२
४.	दिनांक २८ जुलै, २०२३	१८६, १८७, १८८, १८९, २०२, २०३	०६
५.	दिनांक ३ ऑगस्ट, २०२३	२४८, २६८, २७४	०३
		एकूण	१५
		सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन	
१.	दिनांक ११ डिसेंबर, २०२३	३९, ४०, ४१	०३
२.	दिनांक १३ डिसेंबर, २०२३	९९	०१
३.	दिनांक १५ डिसेंबर, २०२३	१५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १७५	०७
४.	दिनांक १८ डिसेंबर, २०२३	१९१, १९२, १९५,	०३
		एकूण	१४
		सन २०२४ चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	
१.	दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४	१३	०१
		एकूण	०१
		सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन	
१.	दिनांक ९ जुलै, २०२४	११०, १११, ११२, १२१, १२२, १२३, १२६	०७
२.	दिनांक १२ जुलै, २०२४	१७८	०१
		एकूण	०८
		सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन	
१.	दिनांक १८ डिसेंबर, २०२४	१३	०१
		एकूण	०१
		सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	
१	दिनांक ६ मार्च, २०२५	३०, ३२	०२
२	दिनांक १० मार्च, २०२५	४९, ५०	०२
३	दिनांक १७ मार्च, २०२५	९२, १०६	०२
४	दिनांक १८ मार्च, २०२५	१५२	०१
५	दिनांक २४ मार्च, २०२५	२२४, २२८, २४४, २५३, २५४, २५८	०६

४.	दिनांक २० मार्च, २०२३	३३१	०१
५.	दिनांक २३ मार्च, २०२३	३४५, ३९८	०२
		एकूण	१६
		सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन	
१.	दिनांक २० जुलै, २०२३	४९,	०१
२.	दिनांक २१ जुलै, २०२३	५६, ५७, ५८,	०३
३.	दिनांक २७ जुलै, २०२३	१८४, १८५,	०२
४.	दिनांक २८ जुलै, २०२३	१८६, १८७, १८८, १८९, २०२, २०३	०६
५.	दिनांक ३ ऑगस्ट, २०२३	२४८, २६८, २७४	०३
		एकूण	१५
		सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन	
१.	दिनांक ११ डिसेंबर, २०२३	३९, ४०, ४१	०३
२.	दिनांक १३ डिसेंबर, २०२३	९९	०१
३.	दिनांक १५ डिसेंबर, २०२३	१५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १७५	०७
४.	दिनांक १८ डिसेंबर, २०२३	१९१, १९२, १९५,	०३
		एकूण	१४
		सन २०२४ चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	
१.	दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४	१३	०१
		एकूण	०१
		सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन	
१.	दिनांक ९ जुलै, २०२४	११०, १११, ११२, १२१, १२२, १२३, १२६	०७
२.	दिनांक १२ जुलै, २०२४	१७८	०१
		एकूण	०८
		सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन	
१.	दिनांक १८ डिसेंबर, २०२४	१३	०१
		एकूण	०१
		सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	
१	दिनांक ६ मार्च, २०२५	३०, ३२	०२
२	दिनांक १० मार्च, २०२५	४९, ५०	०२
३	दिनांक १७ मार्च, २०२५	९२, १०६	०२
४	दिनांक १८ मार्च, २०२५	१५२	०१
५	दिनांक २४ मार्च, २०२५	२२४, २३८, २४४, २५३, २५४, २५८	०६

६	दिनांक २५ मार्च, २०२५	२७०, २७१	०२
		एकूण	१५
		सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन	
१	दिनांक १ जुलै,२०२५	१,५,	०२
२	दिनांक ७ जुलै,२०२५	८४,८५,८६	०३
३	दिनांक ८ जुलै,२०२५	१२८,१३४	०२
४	दिनांक १० जुलै,२०२५	२१०, २११	०२
५	दिनांक १५ जुलै,२०२५	२९८,२९९,३००,३०१,३०२,३१२	०६
६	दिनांक १८ जुलै,२०२५	४३७	०१
		एकूण	१६
		सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन	
१	दिनांक १८ जुलै,२०२५	१९, ३४, ३६, ३९	०४
२	दिनांक १८ जुलै,२०२५	५२, ६३, १०४, १०५	०४
		एकूण	०८
		एकूण	११८

१.१ सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन कालावधीतील एकूण ३५ आश्वासने मा.मंत्री/राज्यमंत्री यांनी केलेल्या विनंतीनुसार, विधानपरिषद आश्वासन समितीने समितीच्या बैठकीमध्ये विचारविनिमय करुन वगळली आहेत.

१.२ सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनामधील आश्वासनांच्यापूर्ततेबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधात हा अहवाल तयार करत असताना उपरोक्त कालावधीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे समितीने विचारात घेतली आहेत.

२.१ सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनामधील आश्वासनांच्या कार्यवाहीचे विवरणपत्र मंत्रालयीन विभागांकडून विहित मुदतीत म्हणजे ९० दिवसांच्या आत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले नाही

२.२ आश्वासनांची पूर्तता जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीत शासनाने केली पाहिजे व त्या कालावधीत आश्वासनांची पूर्तता करता येत नसल्यास त्यासाठी होणाऱ्या समर्थनीय विलंबाची कारणे समितीस कळविण्याबाबत तसेच विलंब टाळण्याच्या दृष्टीने घ्यावयाच्या दक्षतेबाबत समितीने मागील अहवालांमध्ये प्रत्येक वेळी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. आश्वासन पूर्ततेच्या सर्वसाधारण विलंबाबाबत तत्कालिन माननीय पीठासीन अधिकारी यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २००२ रोजी तत्कालिन माननीय

संसदीय कार्यमंत्री, राज्यमंत्री, मा. समिती प्रमुख, आश्वासन समिती, विधानपरिषद/विधानसभा तसेच प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग यांची याबाबत एकत्रित बैठक बोलाविली होती. याबाबत मुख्य सचिव यांनी अधिक लक्ष घालण्याबाबत या सचिवालयाकडून दिनांक १६ सप्टेंबर, २००२ रोजी अर्धशासकीय पत्र पाठविण्यात आले होते. तसेच त्या-त्या विभागासही कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन मुख्य सचिवांनीही मंत्रालयीन सर्व विभागांच्या अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना पत्र पाठवून त्यांच्या संबंधीत विभागांकडील प्रलंबित आश्वासनांचा त्वरीत निपटारा करण्याचे निदेश दिले होते. अशा रितीने विधानमंडळ सचिवालय व राज्याच्या मुख्य सचिवांनी पाठपुरावा केल्यामुळे बऱ्याच विभागांकडून प्रलंबित आश्वासने शून्यावर आणण्याचा किंबहुना काही विभागांकडून निम्मेअधिक प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करण्याचा निश्चित प्रयत्न झाला. तथापि, तरीही अद्याप अनेक विभागांकडून विहित मुदतीत आश्वासनांची पूर्तता केली जात नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. **पुन्हा एकदा समिती सर्व मंत्रालयीन विभागांचे लक्ष वेधून अशी शिफारस करते की, आश्वासनांवरील कार्यवाहीची पूर्तता विहित मुदतीत म्हणजे ९० दिवसांच्या आत करण्याची दक्षता घेण्याचे काटेकोर पालन सर्व मंत्रालयीन विभागांकडून करण्यात यावे. तसेच जर सदर आश्वासनांवरील कार्यवाहीची पूर्तता ९० दिवसांच्या आत करता येत नसेल तर त्यासाठी होणाऱ्या समर्थनिय विलंबाची कारणे तपशीलासह नमूद करण्यात यावीत.**

२.३ सन २०१५-२०१६ च्या आश्वासन समितीने दिलेल्या निदेशानुसार आश्वासनांची पुर्तता विहित मुदतीत व परिपूर्णपणे करण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याच्या सूचना संसदीय कार्य विभागाकडून दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये तसेच मा. मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सचिवांना कळविण्यात आल्या आहेत.

२.४ सन २०२३-२०२४ च्या आश्वासन समितीने आयोजित केलेल्या बैठकीमध्ये सदर आश्वासने प्रलंबित राहण्यामागे आश्वासन हस्तांतरणासंदर्भात अन्य विभागांकडून आलेल्या नस्त्यांवर हस्तांतरणासंदर्भात त्वरीत निर्णय घेण्यात न येणे हे एक प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले आहे. विधानपरिषद आश्वासन समितीने या संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त केली असून याप्रकरणी हस्तांतरणासाठी आलेल्या आश्वासनांच्या नस्त्यांवर विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने त्वरीत निर्णय घेऊन यासंदर्भातील आश्वासनांची एकही नस्ती प्रलंबित न ठेवण्याच्या सूचना संसदीय कार्य विभाकडून दिनांक २१ जून,२०२३ रोजीच्या शासन परित्रकान्वये सर्व विभागीय सचिवांना कळविण्यात आल्या आहेत.

२.५ शासकीय कार्यवाहीच्या विवरणपत्रांबाबतची सहपत्रे:-

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासनांसंबंधीच्या कार्यवाहीची विवरणपत्रे पाठविताना आश्वासनासोबत मंत्रालयीन विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सहपत्रे जोडलेली असतात. सदरहू सहपत्रे अहवालाच्या **परिशिष्ट (४)** मध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

परिशिष्ट - एक

सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या वर्षात खालीलप्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले आहेत.
तसेच संसदीय कार्य विभागाचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजीचे शासन परिपत्रक,
मा. मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ६ नोव्हेंबर २०१५ रोजीचे परिपत्रक व
संसदीय कार्य विभागाचे दिनांक २१ जून, २०२३ रोजीचे शासन परिपत्रक

परिशिष्ट एक

सन २०२३-२०२४ या वर्षात खालील प्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले आहेत.

अ.क्र.	सन / आश्वासन क्रमांक	विभागाचे नाव	समितीचा निर्णय
(१)	(२)	(३)	(५)
१	२०१० चे दुसरे (पावसाळी) आश्वासन क्रमांक ९२	गृहनिर्माण	मान्य
२	२०१४ चे पाचवे (हिवाळी) आश्वासन क्रमांक २४१	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
३	२०१४ चे पाचवे (हिवाळी) आश्वासन क्रमांक ५२६	गृहनिर्माण	अमान्य
४	२०१६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) २४८	गृह	मान्य
५	२०१६ चे पाचवे (हिवाळी) आश्वासन क्रमांक १९० व १९४	महसूल	अमान्य
६	२०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) २०५	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
७	२०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) २२९	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
८	२०१७ चे तिस-या (पावसाळी) आश्वासन क्रमांक ३०४	गृहनिर्माण	अमान्य
९	२०१७ चे चौथे (हिवाळी) आश्वासन क्रमांक १८१	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
१०	२०१७ चे चौथे (हिवाळी) आश्वासन क्रमांक १७९	सार्वजनिक बांधकाम	अमान्य
११	२०१७ चे चौथे (हिवाळी) आश्वासन क्रमांक २३०	गृहनिर्माण	मान्य
१२	२०१८ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) ५	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
१३	२०१८ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) २०९ व २१०	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
१४	२०१८ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) ४८०	गृहनिर्माण	मान्य
१५	२०१८ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) ३८१	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
१६	२०१८ चे दुसरे (पावसाळी) आश्वासन क्रमांक ८	उच्च व तंत्रशिक्षण	अमान्य
१७	२०१९ चे चौथे (हिवाळी) आश्वासन क्रमांक १८	गृहनिर्माण	अमान्य
१८	२०२१ चे दुसरे पावसाळी आश्वासन क्रमांक ३	गृहनिर्माण	मान्य
१९	२०२२ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) ५९	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य

२०	२०२२ चे तिसऱ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक १	सामान्य प्रशासन	मान्य
२१	२०२२ चे तिसऱ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक २	सामान्य प्रशासन	मान्य
२२	२०२२ चे तिसऱ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक ५	वने	मान्य
२३	२०२२ चे तिसऱ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक ६२	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
२४	२०२२ चे तिसऱ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक १२६	उच्च व तंत्रशिक्षण	अमान्य
२५	२०२३ चे तिसऱ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक १३७	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
२६	२०२४ चे दुसऱ्या (अर्थसंकल्पीय) आश्वासन क्रमांक १३	महसूल	मान्य
२७	२०२४ चे दुसऱ्या(पावसाळी) आश्वासन क्रमांक २२	सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री	अमान्य
२८	२०२४ चे तिसऱ्या (पावसाळी) आश्वासन क्रमांक ७५ व ७६	गृहनिर्माण	अमान्य
२९	२०२४ चे तिसऱ्या (पावसाळी) आश्वासन क्रमांक ६४	नगरविकास	अमान्य

परिशिष्ट एक

सन २०२४-२०२५ या वर्षात खालील प्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले आहेत.

अ.क्र.	सन / आश्वासन क्रमांक	विभागाचे नाव	बैठकीचा दिनांक	समितीचा निर्णय
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१)	२०१६ च्या पाचवे (हिवाळी) आश्वासन क्रमांक १९० व १९४	महसूल	२२ एप्रिल,२०२६	अमान्य
२)	२०१७ च्या चौथ्या (हिवाळी) आश्वासन क्रमांक १०४	मदत व पुनर्वसन	२२ एप्रिल,२०२६	मान्य
३)	२०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) आश्वासन क्रमांक २६८	महसूल	२२ एप्रिल,२०२६	मान्य
४)	२०२३ चे तिसरे (हिवाळी) आश्वासन क्रमांक १५२	महसूल	२२ एप्रिल,२०२६	मान्य
५)	२०२४ चे दुसरे (अर्थसंकल्पीय) आश्वासन क्रमांक १३	महसूल	२२ एप्रिल,२०२६	मान्य
६)	२०२५ चे दुसरे (पावसाळी) आश्वासन क्रमांक १२८	महसूल	२२ एप्रिल,२०२६	मान्य

महाराष्ट्र विधानसभेच्या सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेची परिपूर्ण माहिती विधानसभा आश्वासन समितीस देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : विसआ-२०१५/प्र.क्र.३०/सहा
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ६ नोव्हेंबर, २०१५

वाचा :- १) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - एलईजी - १०९८/ प्र.क्र.५१/९८/पाच, दिनांक २ डिसेंबर, १९९८.
२) शासन शुद्धिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - एलईजी - १०९८/ प्र.क्र.५१/९८/पाच, दिनांक १ जानेवारी, २०००.
३) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विउसू - २००६/प्र.क्र.५२७/चार, दिनांक ५ एप्रिल, २००६.
४) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विसआ - २००८/प्र.क्र.९/सहा, दिनांक १४ ऑक्टोबर, २००८.
५) शासन पत्र, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विपआ - २०१२/प्र.क्र.४/चार, दिनांक ३० जानेवारी, २०१३.
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - शाकाप २०१३/प्र.क्र.२/१८ (र.व.का.), दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३.
७) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विपआ - २०१५/प्र.क्र.६१/चार, दिनांक १८ सप्टेंबर, २०१५.
८) शासन शुद्धिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विपआ - २०१५/प्र.क्र.६१/चार, दिनांक २३ सप्टेंबर, २०१५.
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र क्र. ४१०५१/विसआस/ड-१४, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५.

-: शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समिती ही महाराष्ट्र विधानसभा नियम २२६ अन्वये गठीत करण्यात आलेली एक महत्त्वाची समिती असून, शासनाच्यावतीने सभागृहात दिलेली आश्वासने, वचने व हमी यांची पूर्तता विहीत मुदतीत व परिपूर्णपणे झाली आहे किंवा नाही, याबाबतची तपासणी करण्यासाठी प्रस्तुत समितीची स्थापना करण्यात आली आहे.

२. विधानमंडळाच्या सभागृहात शासनाच्यावतीने मा. मंत्री, तसेच, मा. राज्यमंत्री महोदयांनी दिलेली आश्वासने, वचने व हमी यांची पूर्तता ९० दिवसांच्या विहीत मुदतीत व परिपूर्णपणे करणे, ही शासनाची वैधानिक जबाबदारी आहे. मंत्रालयीन विभागांकडून पूर्तता झालेल्या आश्वासनांच्या विवरणपत्रांचे वाचन करताना आश्वासन समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, आश्वासन पूर्ततेच्या विवरणपत्रामध्ये देण्यात येणाऱ्या माहितीमध्ये, नेमके कोणते आश्वासन शासनाच्यावतीने देण्यात आले आहे, त्यावर विभागाने काय कार्यवाही केली आहे याबाबत मूळ विषयाच्या अनुषंगाने सुसंगत, सर्व समावेशक व परिपूर्ण माहिती दिली जात नाही व त्यासंदर्भात आवश्यक तेथे, संबंधित आश्वासनांचे कार्यवृत्त सोबत जोडले जात नाही. त्यामुळे, संबंधित आश्वासनांची पूर्तता शासनाने कशाप्रकारे आणि किती कालावधीत केली आहे याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती समितीस उपलब्ध होत नाही. सदरहू बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्यामुळे, समितीचे कामकाज सुरळीतपणे पूर्ण होण्यास विलंब होतो. ही बाब महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने त्यांच्या पूर्वोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक ९ येथील अर्धशासकीय पत्राद्वारे माझ्या निदर्शनास आणली आहे.

३. आश्वासन पूर्ततेची कार्यवाही विहीत वेळेतच व परिपूर्णपणे करण्याबाबतच्या सूचना यापूर्वी उपरोक्त संदर्भाधीन शासन आदेशान्वये व पत्रान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. तथापि, त्यांचे अनुपालन केले जात नसल्यामुळे, पूर्वोक्त परिच्छेदांत उल्लेखिलेली वस्तुस्थिती उद्भवली आहे. महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहाच्या विविध समित्या यांचे महत्त्व अनन्यसाधारण असून, त्यांना त्यांचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी, त्यांना आवश्यक असलेली माहिती परिपूर्णपणे व अद्ययावत स्वरुपात आणि विहीत मुदतीतच देणे ही सर्वच मंत्रालयीन विभागांची जबाबदारी आहे. यास्तव, सर्व मंत्रालयीन विभागांना **पुन्हा असे निदेश** देण्यात येत आहेत की, आश्वासन समितीला यापुढे सादर केल्या जाणाऱ्या आश्वासन पूर्ततेच्या विवरणपत्रातील **माहिती परिपूर्ण,अद्ययावत आणि आश्वासनाच्या पूर्ततेच्या दृष्टीने नेमकी कोणती कार्यवाही केली आहे, याबाबतची माहिती दर्शविणारी राहील व आवश्यक तेथे संबंधित आश्वासनांचे कार्यवृत्त जोडण्यात येईल, याबाबत सर्व विभागांनी यापुढे दक्षता घ्यावी,** जेणेकरुन आश्वासन समितीला आवश्यक ती माहिती विनाविलंब मिळेल व त्यांचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले जाईल.

४. उक्त निदेशांचे काटेकोरपणे पालन होण्याच्या दृष्टीने सर्व विभागीय सचिवांनी व्यक्तिश: लक्ष द्यावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१५११०४१६५१५६२११५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Swadheen S Kshatriya

Digitally signed by Swadheen S Kshatriya
DN: c=IN, o=All India Service, ou=Chief Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Swadheen S Kshatriya
Date: 2015.11.06 18:44:35 +05'30'

(स्वा.शि.क्षत्रिय)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(३) प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,(ड-१३ व ड-१४ शाखा), विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
(४) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(५) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(६) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(७) निवडनस्ती

प्रतिलिपी,

(१) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
(२) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-४०० ०३२.

मंत्रालयीन विभागांनी अन्य विभागांकडून आश्वासनांच्या हस्तांतर प्रस्तावित करण्यात आलेल्या नस्त्यांवर सर्व प्राथम्याने निर्णय घेण्याची कार्यवाही करुन नस्ती मूळ विभागास परत करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : विपआ -२०२३/प्र.क्र.३९/चार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : - २१.०६.२०२३

वाचा :- शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. काकाप १८१९/प्र.क्र.२४/१८ (र.व.का.) दि. २०.०५.२०१९ व दि. ०७.०९.२०१९.

-: शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानपरिषद व विधानसभा या उभय सभागृहामध्ये शासनाच्यावतीने मा.मंत्री तसेच, मा.राज्यमंत्री महोदयांकडून देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता ९० दिवसांच्या कालवधीत करणे, ही शासनाची वैधानिक जबाबदारी आहे. तथापि, काही मंत्रालयीन विभागांकडे ९० दिवसांनंतरही बरीच आश्वासने प्रलंबित आहेत. विधानपरिषद आश्वासन समितीने नुकत्याच आयोजित केलेल्या बैठकीमध्ये सदर आश्वासने प्रलंबित राहण्यामागे आश्वासनांच्या हस्तांतरणाबाबत विभागांतर्गत कार्यासनात होत असलेली टोलवाटोलवी व विभागात आश्वासन हस्तांतरणासंदर्भात अन्य विभागांकडून आलेल्या नस्त्यांवर हस्तांतरणासंदर्भात त्वरीत निर्णय घेण्यात न येणे हे एक प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले आहे. विधानपरिषद आश्वासन समितीने या संदर्भात नाराजी व्यक्त केली असून हस्तांतरणासाठी आलेल्या आश्वासनांच्या नस्त्यांवर विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने त्वरीत निर्णय घेऊन यासंदर्भातील आश्वासनांची एकही नस्ती प्रलंबित न ठेवण्याच्या सूचना देण्याचे निर्देश शासनास दिले आहेत. यास्तव, या संदर्भात सर्व विभागांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहे.

अ). मंत्रालयीन विभागाच्या सचिवांनी त्यांच्या विभागात अन्य विभागाकडून आश्वासन हस्तांतरणासंदर्भात आलेल्या प्रलंबित सर्व प्रकरणांची/नस्त्यांची यादी करून तात्काळ आढावा घ्यावा.

ब). मंत्रालयीन विभागांनी ज्या आश्वासनांचे हस्तांतरण मान्य आहेत अशी सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढून १५ दिवसात हस्तांतरण मान्य असल्याचे नमूद करुन सदर सर्व नस्त्या हस्तांतरण प्रस्तावित करणा-या मूळ विभागास परत कराव्यात.

क) मंत्रालयीन विभागांनी ज्या आश्वासनांचे हस्तांतरण अमान्य आहेत अशा प्रकरणी हस्तांतरण अमान्य करत असल्याचे त्या समर्थनार्थ सुस्पष्ट अभिप्राय नोंदवून सदर प्रकरणे/ नस्त्या १५ दिवसात हस्तांतरित करणा-या मूळ विभागाकडे परत कराव्यात.

ड) वरीलप्रमाणे मंत्रालयीन विभागांच्या सचिवांनी स्वत: लक्ष घालून त्यांच्या विभागात अन्य विभागाकडून आश्वासन हस्तांतरणासंदर्भात आलेल्या सर्व प्रकरणी हस्तांतर मान्य अथवा अमान्य असा निर्णय घेऊन पुढील १५ दिवसांत सर्व प्रकरणे निकाली काढावीत व विभागात आश्वासन हस्तांतरणासंदर्भातील अन्य विभागाची एकही नस्ती निर्णयाविना प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

इ) तसेच मंत्रालयीन विभागाच्या सचिवांनी त्यांच्या विभागातून अन्य विभागाकडे आश्वासन हस्तांतरणासंदर्भात प्रस्तावित करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची यादी करून त्याचाही आढावा घ्यावा. व अन्य विभागाकडे हस्तांतरणासंदर्भात प्रस्तावित करण्यात आलेली प्रकरणे १५ दिवसापेक्षा अधिक कालावधीची असल्यास संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून त्यांच्याकडून या संदर्भातील हस्तांतरण मान्य केल्याचे अथवा अमान्य केल्याचे अभिप्राय १५ दिवसात प्राप्त करून घ्यावेत. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित विभागाकडून हस्तांतरणा संदर्भात निर्णय प्राप्त होत नसल्यास वरील बाब संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभाग, रचना व कार्य यांच्या निदर्शनास आणावी व सामान्य प्रशासन विभाग, रचना व कार्य यांचा हस्तांतरणासंदर्भात अधिनिर्णय प्राप्त करून घेऊन तसे संसदीय कार्य विभागास कळवावे.

२. यास्तव, सर्व मंत्रालयीन विभाग व विभागाच्या सचिवांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून पुढील कार्यवाही करावी.

H 3170.pdf - 4 a

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०६२११७५३३८५९१५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SATISH BABAN WAGHOLE

Digitally signed by SATISH BABAN WAGHOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5dac44efe01e14dc122835b1fb4cee6e20ddaeed3b6b8a4414f638ef4e63e93e, pseudonym=133E07D6A59E5697DD852542 1A4E33A9A5EACEF, serialNumber=4C1735DC74D982FD392B01D4C40FE989C2B0CAA52814EA95C856B28E1379DC21, cn=SATISH BABAN WAGHOLE
Date: 2023.06.22 14:30:44 +05'30'

(सतीश वाघोले)

सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सर्व प्रशासकीय विभाग मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) प्रधान सचिव/ सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (ड-१३/ड-१४ शाखा),

विधानभवन, मुंबई-४०० ०३२.

४) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

५) मा.मंत्री / संसदीय कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

६) सर्व सह/उप सचिव, प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

७) निवड नस्ती.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत....

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : विपआ-२०१२/प्र.क्र.४३/चार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१५

वाचा :- १) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - एलईजी-१०९८/प्र.क्र.५१/९८/पाच, दि.२ डिसेंबर, १९९८
२) शासन शुद्धिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - एलईजी-१०९८/प्र.क्र.५१/९८/ पाच, दि.१ जानेवारी, २०००
३) शासन पत्र, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विउसू-२००६/प्र.क्र.५२७/चार, दि.५ एप्रिल, २००६
४) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विसआ-२००८/प्र.क्र.९/सहा, दि.१४ ऑक्टोबर, २००८
५) शासन पत्र, संसदीय कार्य विभाग, क्रमांक - विपआ-२०१२/प्र.क्र.४/चार, दि.३० जानेवारी, २०१३
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - शाकाप २०१३/प्र.क्र.२/१८ (र.व का.), दि.२६ फेब्रुवारी, २०१३

-: शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानपरिषद व विधानसभा या उभय सभागृहामध्ये शासनाच्यावतीने मा.मंत्री तसेच, मा.राज्यमंत्री महोदयांकडून देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता ९० दिवसांच्या कालावधीत करणे, ही शासनाची वैधानिक जबाबदारी आहे. तथापि, आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी होत असलेल्या विलंबाबाबत सभागृहात यापूर्वी अनेक वेळा नापसंती व्यक्त करण्यात आली असून, त्याअनुषंगाने आश्वासन समित्यांनीदेखील त्यांच्या अहवालामध्ये वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे व प्रलंबित आश्वासनांची विहीत मुदतीत पूर्तता होण्याबाबत शिफारस केली आहे. त्याअनुषंगाने, सर्व विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना उक्त संदर्भाधीन अनुक्रमांक (१) ते (५) येथील शासन निर्णय, शासन शुद्धिपत्रक तसेच, शासन पत्रांद्वारे देण्यात आलेल्या आहेत. तथापि, अद्यापही प्रलंबित आश्वासनांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या पाहता, आश्वासनांचा निपटारा विहीत कालावधीत होत नाही, असे विधानपरिषद आश्वासन समितीच्या निदर्शनास आले असून, सदर आश्वासने प्रलंबित राहण्यामागे आश्वासनांच्या विभागांतर्गत हस्तांतरणाबाबत टोलवाटोलवी हे एक प्रमुख कारण आहे. एखादे आश्वासन मंत्रालयीन विभागास चिन्हांकित करण्यात आल्यानंतर, सदर आश्वासन त्या विभागाशी संबंधित नसल्यास, अशा आश्वासनांचे हस्तांतर मूळ विभाग दुसऱ्या विभागाकडे वेळेवर करीत नाही. तसेच, मूळ विभागाकडून

अन्य संबंधित विभागांकडे अशा आश्वासनांचे हस्तांतर प्रस्तावित केले असल्यास, अशा आश्वासनांचे हस्तांतरण मान्य केल्याबाबत किंवा नाकारल्याबाबत संबंधित विभाग **त्वरीत** मूळ विभागास कळवित नाही. त्यामुळे, अशी आश्वासने कार्यवाहीशिवाय प्रलंबित राहतात. संबंधित आश्वासनांचे हस्तांतरण स्विकारल्याबाबत अथवा नाकारल्याबाबत अन्य विभागाकडून मूळ विभागाला सत्वर कळविणे गरजेचे असते. यावरून असे दिसून येते की, आश्वासनांच्या हस्तांतरणाबाबत सामान्य प्रशासन विभाग / रचना व कार्य शाखा यांचेकडून ज्या सूचना वेळोवेळी दिलेल्या आहेत, त्यांचे अनुपालन योग्यप्रकारे संबंधित विभागाकडून केले जात नाही.

२. उक्त कारणास्तव बरीच आश्वासने प्रलंबित असल्यामुळे, अशा आश्वासनांचा निपटारा कशाप्रकारे करता येईल, याबाबत माननीय विधानपरिषद आश्वासन समिती प्रमुखांनी आश्वासन समितीच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे **निदेश** दिले आहेत :-

अ) ज्या विभागाच्या मंत्री महोदयांकडून आश्वासन देण्यात येते, त्या आश्वासनाची पूर्तता करण्याची जबाबदारी त्या त्या विभागाची असते. आश्वासनाचा विषय मूळ विभागाशी संबंधित नसेल किंवा मूळ विभाग त्याची पूर्तता करू शकत नसेल, तर आश्वासनाचा विषय किंवा त्याचा काही भाग ज्या विभागाशी संबंधित आहे त्या संबंधित विभागाशी समन्वय साधून व आवश्यकतेनुसार, दोन्ही विभागांनी एकत्रित बैठक घेऊन, आश्वासनांच्या हस्तांतरणाबाबत **त्वरीत** कार्यवाही करावी. जर दोन्ही विभागांमध्ये आश्वासनांच्या हस्तांतरणाबाबत निर्णय झाला नाही, तर ज्या मूळ विभागास आश्वासन चिन्हांकित करण्यात आले आहे, त्या विभागाने सामान्य प्रशासन विभाग / रचना व कार्य यांचेकडून, त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार,अधिनिर्णय घेऊन कार्यवाही करावी व आश्वासन हस्तांतरणाबाबत संसदीय कार्य विभागास उचित नोंद घेण्याकरिता कळवावे.

ब) सभागृहामध्ये शासनाकडून देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर, सदर विवरणपत्रातील आश्वासन पूर्ततेच्या माहितीबाबत आश्वासन समितीकडून छाननी केली जाते आणि जर संबंधित आश्वासनाची पूर्तता परिपूर्णपणे झाली नसेल, तर आश्वासन समितीकडून त्याअनुषंगाने सद्य:स्थितीदर्शक माहिती पाठविण्याबाबत विभागाला निर्देशित केले जाते. संबंधित विभागांच्या सचिव महोदयांना सद्य:स्थितीदर्शक माहितीसह साक्षीसाठी आमंत्रित केले जाते. अशा साक्षीच्या अनुषंगाने विभागाकडून समितीला पाठवावयाची माहिती २ ते ३ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक असूनदेखील सदरहू माहिती समितीला बैठकीच्या अगोदरच्या दिवशी किंवा बैठकीच्या दिवशी सकाळी उपलब्ध करून दिली जाते. सबब, संबंधित विभागाने त्यांची माहिती यापुढे बैठकीपूर्वी किमान २ ते ३ दिवस अगोदर समितीकडे निश्चितपणे पाठवावी.

क) सभागृहाच्या कामकाजामध्ये काही वेळेस "शासनाकडून माहिती पटलावर ठेवण्यात येईल" किंवा "यासंबंधीची माहिती आता उपलब्ध नसून, सदर माहिती नंतर पटलावर ठेवण्यात येईल", अशा स्वरूपाची आश्वासने दिली जातात. अशा वेळेस सदर माहिती सभागृहाच्या

पटलावर ठेवण्यात आल्यानंतर, त्याबाबत आश्वासन पूर्ततेची माहिती विहीत विवरणपत्रामध्ये विभागाकडून सादर करताना, सभागृहाच्या पटलावर जी माहिती ठेवण्यात आली आहे, त्याची प्रत प्रस्तुत विवरणपत्रासोबत जोडली जात नाही. तरी, अशा माहितीची प्रतदेखील आश्वासन पूर्ततेच्या विवरणपत्रासोबत जोडावी.

३. उक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, सर्व मंत्रालयीन विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, आश्वासन समितीने दिलेल्या उक्त निदेशांचे तसेच, सामान्य प्रशासन विभागाने हस्तांतरणाबाबत दिलेल्या सूचनांचे अनुपालन सर्व विभागांनी कृपया काटेकोरपणे करावे व त्यानुसार आश्वासन पूर्ततेची कार्यवाही **त्वरीत** करावी. तसेच, त्यांनी आश्वासन समितीने मागितलेली माहिती विहीत मुदतीतच आश्वासन समितीला पाठविण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१५०९१९१२०२१७६८१५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Suhas Anantrao Deshpande

Digitally signed by Suhas Anantrao Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=602b3053d2d5715af6e36bc14492171797f6535d24cfb21b4c91e4cd563032bf, serialNumber=ab1c94477a634b6c4766f36e49fb2e268a6755445ea2fac5d7b3a8d9684f3ec3, cn=Suhas Anantrao Deshpande
Date: 2015.09.19 12:06:31 +05'30'

(सु. अ. देशपांडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (ड-१३/ड-१४ शाखा), विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
४) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५) सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) निवड नस्ती.

परिशिष्ट - दोन

(अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१ पहावा)

सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात आश्वासनांसंबंधीचा अधिवेशनातील शासनातर्फे देण्यात आलेल्या प्रलंबित आश्वासनांवरील क्रमांक व विभागनिहाय विवरण

परिशिष्ट दोन

अहवाल क्रमांक २०९ मधील सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विभागनिहाय आश्वासने

सन २०११ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१९२
सन २०१२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	७८२
सन २०१२ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१६१
सन २०१४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	४४०
सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१९०, १९४
सन २०१७ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	सहकार, पणन व वस्त्रोद्योगत (सहकार) विभाग	१४९
सन २०१७ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१०४
सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	४९२
सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	७७
सन २०२१ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	२६, २७
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	३१
२.	सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभाग	४७

सन २०२२ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	२१
सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	५, २२, ५५, ६९, ७०, ७१, ९६, १२५
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१६ २१, २८, २८८, ३१९, ३३१, ३४५, ३९८
२.	सहकार, पणन व वस्त्रोद्योगत (सहकार) विभाग	११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, २६६
सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	५६, ५७, ५८, १८४, १८५, १८७, १८८, १८९ २०२, २०३, २४८, २६८,
२.	सहकार, पणन व वस्त्रोद्योगत (सहकार) विभाग	४९, १८६, २७४
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७
२.	सहकार, पणन व वस्त्रोद्योगत (सहकार) विभाग	३९, ४०, ४१, ९९, १७५, १९१, १९२, १९५,
सन २०२४ चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	१३
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन		
१.	महसूल व वन विभाग	११०, १११, ११२, १२१, १२२, १२३, १२६
२.	सहकार, पणन व वस्त्रोद्योगत (सहकार) विभाग	१७८
सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन		
	महसूल व वन विभाग	१३
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन		
	महसूल व वन विभाग	३०, ३२, ४९, ५०, ९२, १०६, १५२, २२४, २३८, २४४, २५३, २५४, २५८, २७०, २७१
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन		
	महसूल व वन विभाग	१, ५, ८४, ८५, ८६, १२८, १३४, २१०, २११, २९८, २९९, ३००, ३०१, ३०२, ३१२, ४३७
	सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन	
	महसूल व वन विभाग	१९, ३४, ३६, ३९, ५२, ६३, १०४, १०५

परिशिष्ट - तीन

(आश्वासनांसंबधीचे विवरण)

सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय.

सन २०११ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०११ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	१९२	०१

महसूल व वन विभाग

१९२ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड क्रमांक १५८, क्रमांक ०७, दिनांक २२ मार्च २०११.

(२) **विषय.—**सन २०१०-२०११ च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री प्रकाश सोळंके :** निश्चितपणे या संदर्भात कोकणातील जे जे आमदार या विषयाशी संबंधित आहेत. त्यांची अधिवेशन संपण्यापूर्वी शासनस्तरावर एक बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**सदर आश्वासन वगळण्याबाबत दिनांक २३ जून २०२५ रोजी मा. समिती प्रमुख विधानपरिषद यांना विनंती करण्यात आलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**प्रलंबित ठेवण्यात यावे. कायदा आणल्यानंतर आश्वासनाची पूर्तता होईल.

सन २०१२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	७८२	०१

७८२ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद कामकाज खंड क्रमांक १६१, क्रमांक २४, दिनांक २० एप्रिल २०१२.

(२) **विषय.—**उद्योग पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार. सर्वश्री श्री. विनोद तावडे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. २५९ अन्वये प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—मा. महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात :** या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील त्याप्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल."

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्य:स्थिती.—**सन २०१२ च्या पहिल्या अधिवेशनात देण्यात आलेल्या सदर आश्वासनासंबंधीच्या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता महसूल (खुद्द) विभागाशी संबंधित एकूण १२ मुदद्े आहेत. सदर मुद्देनिहाय विभागामार्फत केलेल्या आश्वासन पुर्ततेची कार्यवाही खालीलप्रमाणे :—

(१) कुर्ला मुलुंड खोत जमीन अधिकाऱ्यांनी परस्पर विकणे :—

मुंबई उपनगर जिल्ह्यातील कुर्ला तालुक्यातील गावे ही खोताच्या मालकीची होती. कालांतराने शासनामध्ये आणि खोतांमध्ये समझोता करार होऊन कुर्ल्यातील जमिनींचे ३ परिशिष्टात विभागणी केलेली आहे.

(अ) खोताच्या मालकीच्या जमिनी

(ब) शासनाच्या मालकीच्या जमिनी

(क) मुंबई महसूल कायदा, १८७९ मधील कलम ३७(२) व द सालसेट इस्टेट लॅण्ड रेव्हेन्यु एक्झामशन (ॲबॉलिशन) कायदा १९५१ मधील कलम ४ प्रमाणे चौकशीसाठी जमिनी.

उक्तप्रमाणे परिशिष्ट-अ, ब व क प्रमाणे कार्यवाही होऊन गाव अभिलेखात नोंदी झाल्या असून परिशिष्ट क मधील जमिनींबाबत चौकशी होऊन त्या मिळकती परिशिष्ट अ व ब मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. सबब कुर्ला मुलुंड खोत जमीन अधिकाऱ्यांनी परस्पर विकणे अशी बाब संबंधित अभिलेख पाहता दिसून आलेली नाही **(शासन पत्र क्र. विपआ-२६२१/४२२/प्र.क्र. १९/ज-३, १६/९/२०२१)** दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

(२) अंधेरी येथे मे. आकृती बिल्डरला तेलगल्ली गुंदवली येथील कोट्यवधी रुपयांची जमीन देणे.

अंधेरी येथे मे. आकृती बिल्डरला तेलगल्ली गुंदवली येथील जमीन महसूल विभागामार्फत दिलेली नाही. सदर जमिनीवर शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात आलेली आहे. **(शासन पत्र क्र. विपआ-२६२१/४२२/प्र.क्र. १९/ज-३, दि. १६.०९.२०२१)** दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

(३) जुहू येथील सर्वे क्र. ३२० हा भूखंड पोलीसांसाठी राखीव ठेवलेला असताना भूखंड अधिकाऱ्यांच्या सोसायटीला काम देण्यात येणे.

तहसीलदार, अंधेरी यांच्या अहवालानुसार मौजे जुहू या महसुली गावात स. नं. ३२० असा सर्वे नंबर अस्तित्त्वात नाही. तसेच नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांच्या अहवालानुसार मौजे जुहू या महसुली गावातील न.भू.मा.क्र. ३२० हा विठ्ठल नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेच्या नावे आहे. **(शासन पत्र क्र. विपआ-२६२१/४२२/ प्र.क्र. १९/ज-३, १६.०९.२०२१)** दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

(४) बोरिवली येथील वळणई आदिवासी जमीन घोटाळा प्रकरण

मौजे वळणई, ता. बोरिवली येथील स.क्र. २३/५/, २३/१२, ६४ पै या मिळकती पूर्वी श्री. परशुराम बाबुराव वनगे व इतर १० यांच्या नावे होत्या तथापि, श्री. वनगे यांचे "मल्हारकोळी" जातीचे प्रमाणपत्र जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द केल्याने स. क्र. २३/५, २३/१२, ६४ पै च्या गा.न.नं. ७/१२ उताऱ्यातील इतर हक्क सदरातील "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ अ ला अधीन" हा शेरा फेरफार क्र. ११००, दिनांक २ जुलै २००७ अन्वये कमी करण्यात आला आहे. त्यामुळे सदर मिळकती या आदिवासी खातेदारांच्या असल्याचे निष्पन्न होत नाही. **(शासन पत्र क्र. विपआ-२६२१/४२२/प्र.क्र. १९/ज-३, १६.०९.२०२१)** दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

(५) मागाठाणे येथील आदिवासींच्या मालकीच्या जमिनीवर आय.सी. मोदी यांनी इमारतींचे बांधकाम सुरू केलेले असणे.

मौजे मागाठाणे, ता. बोरिवली येथील स.नं. ११० व स.नं. १११/१ या मिळकतीच्या गा.न.नं. ७/१२ उताऱ्यात कब्जेदार श्री. पांडुरंग मंगळ्या चावरे व इतर १७ व्यक्तींची नावे दाखल आहेत. वरील दोन्ही मिळकतीच्या विकासासाठी श्री. वाय. सी. मोदी यांना श्री. बाबु मंगळ्या चावरे व इतर यांच्या नावे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून बिनशेती परवानगी आदेश प्राप्त झालेले आहेत.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २२ डिसेंबर १९९९ व दिनांक १४ जानेवारी २००३ रोजीच्या आदेशान्वये मौजे मागाठाणे, ता. बोरिवली येथील स. नं. ११० व स. नं. १११/१ या मिळकतीस श्री. वाय. सी. मोदी यांना विक्री परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच धारकाने आम्ही कोणत्याही अनुसूचित जमातीचे नाही, सदर विधानात तफावत निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील असे जबाबाबत नमूद केले आहे. त्यामुळे उक्त मिळकतीच्या अधिकार अभिलेखात आदिवासी खातेदाराचे नाव कमी करून बिगर आदिवासी खातेदाराचे नाव दाखल झालेले नाही, असे स्पष्टपणे दिसून येते. **(शासन पत्र क्र. विपआ-२६२१/४२२/प्र.क्र. १९/ज-३, १६.०९.२०२१)** दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

(६) मागाठाणे, बोरिवली येथील आदिवासींची जमीन खोट्या दस्तऐवजाच्या आधारे हडप केलेली असणे.

मौजे मागाठाणे, ता. बोरिवली येथील सर्वे नं. १०८/१/क या मिळकतीशी संबंधित न.भू.क्र. १७५/ब/ब व १७५/ब/२ च्या अनुक्रमे ७/१२ उताऱ्यातत व मिळकत पत्रिकेत श्री. दत्तात्रय बावीशे व इतर ८ यांची नावे धारक म्हणून दाखल असून विषयांकित जमिनीच्या अधिकार अभलेखात आदिवासी खातेदाराचे नाव कमी करून बिगर आदिवासी खातेदाराचे नाव दाखल झालेले नसल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अहवालावरून दिसून येते. **(शासन पत्र क्र. विपआ-२६२१/४२२/प्र.क्र. १९/ज-३, दिनांक १६ सप्टेंबर २०२१).**

(७) आदिवासी वाडी जमीन (मीरा रोड) महाजनवाडी क्र. ७७ ही आदिवासींची जमीन हडप करणेबाबत.

मौजे मिरा, ता. जि. ठाणे येथील स.नं. ७७ पैकी ०-७५-०० हे. आर (नवीन गाव मौजे महाजनवाडी स.नं. १/२) ही जमीन मुळची सरकारी (महाराष्ट्र शासनाची गुरचरण) होती. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक १४ मे १९५२ च्या आदेशान्वये अटी व शर्तीवर एकलव्य आदिवासी सहकारी घर बांधकाम संस्था मर्या., यांना प्रदान करण्यात आली होती. मंडळ अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरहू जमिनीवर शर्तभंग झाल्यामुळे सन १९९८ पासून एकूण २७ प्लॉटपैकी २० प्लॉट सरकार जमी करणेबाबत आदेश पारित करण्यात आले असून उर्वरित ७ प्लॉटबाबत शर्तभंगाची कार्यवाही पूर्ण करून संपूर्ण जमीन ०-७५-०० हे.आर ही जमिनीच्या अधिकार अभिलेखात महाराष्ट्र शासनाचे नावे दाखल करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, ठाणे यांना निर्देश देण्यात आले आहेत.

मौजे मिरा, ता. जि. ठाणे येथील स. नं. ७७ पैकी नवीन मौजे महाजनवाडी येथील स.नं. १/४ क्षेत्र ०-१०-३० आर जमीन जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश दिनांक २७ नोव्हेंबर १९४७ अन्वये कैवल्यधाम ग्रामसेवा समिती, बोरीवली यांना महसूल मुक्त प्रदानाने (विनामुल्य) आदिवासी शाळा व दवाखान्यासाठी, मंजूर केली होती. तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडील दिनांक १ जुलै १९९७ रोजीच्या आदेशान्वये उपरोक्त जमिनीचा ७/१२ च्या इतर हक्कात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ अ व नविन अविभाज्य शर्त अशी नोंद असलेचे दिसून येते. सद्यस्थितीत जमिनीवर शाळा व दवाखाना यांचे बांधकाम निदर्शनास आले आहे. **(शासन पत्र क्र. विपआ-२७२१/UOR १३/प्र. क्र. ७०/ज-४, दिनांक ११ फेब्रुवारी २०२२. दिनांक ११ फेब्रुवारी २०२२.)**

(८) ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी लोकांनी शासकीय कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करून लाटणे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६अ नुसार आदिवासी खातेदारांच्या जमिनी बिगर आदिवासी खातेदारांकडे हस्तांतरीत करण्यास शासनाच्या पूर्वमान्यतेने व जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वमंजूरीने परवानगी देता येते. त्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तांकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ तयार करण्यात आले असून त्यातील नियम ४अ(१) नुसार खऱ्याखुऱ्या कृषीतर प्रयोजनासाठी (Bonafide non-agriculture

purpose) आदिवासी खातेदारांच्या जमिनी बिगर आदिवासी खातेदारांकडे हस्तांतरीत करण्यास मंजूरी दिली जाते. **(शासन पत्र क्र. विपआ-२७२१/UOR13/प्र.क्र.७०/ज-४, दिनांक ११ फेब्रुवारी २०२२)** ११ फेब्रुवारी २०२२.

(९) हिरानंदानी बिल्डरला मौजे कावेसर व मौजे कोळशेत येथील ८४ एकराचा शासकीय भूखंड अनधिक-तपणे देण्यात येणे.

नवनगर वसाहत प्रकल्पात समाविष्ट होणाऱ्या शासकीय जमिनी विकासकास मंजूर करण्याचे शासनाचे धोरण आहे. सदर धोरणानुसार मौजे कोलशेत, ता. जि. ठाणे येथील १,३३,०९०-०० चौ. मी. जमीन व मौजे कावेसर, ता. जि. ठाणे येथील १,९५,११५.०० चौ. मी. जमीन अनुक्रमे महसूल व वन विभाग, शासन ज्ञापण, दिनांक १७ ऑगस्ट २०१० व दिनांक १७ ऑक्टोबर २०१० तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दिनांक ६ सप्टेंबर २०१० व दिनांक ६ सप्टेंबर २०१० रोजीच्या आदेशान्वये प्रचलित बाजारभावाने येणारी किंमत आकारून कब्जेहक्काने मे. रोमा बिल्डर्स प्रा. लि. यांना मंजूर करण्यात आली आहे. **(शासन पत्र क्र. विपआ-२७२१/UOR13/प्र.क्र.७०/ज-४, दिनांक ११ फेब्रुवारी २०२२)** ११ फेब्रुवारी २०२२.

(१०) मौजे केज येथील गायरान जमीन सर्वे नं. ३०/१ क्षेत्र ४३ हे. ४६ आर पैकी ६ हे. क्षेत्राची अनधिकृतरित्या विल्हेवाट लावणे.

जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १८ मार्च २०११ रोजीच्या आदेशान्वये श्री. किसन अमृता लांडगे यांचे शासकीय गायरान जमीन स. नं. ३०/१ मधील २.०० हे. आर. वरील अतिक्रमण शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ अन्वये नियमित केले आहे. तसेच, यापुर्वी तहसीलदार, केज यांनी पारित केलेल्या बेकायदेशीर आदेशाविरुद्ध पोलीस स्टेशन केज येथे गु. र. क्र. १८८/२००० या प्रमाणे गुन्हा नोंद झाला असून यापुर्वीचा फेर के. ३३७१ रद्द करण्यात आला आहे. तसेच दिनांक १ एप्रिल १९७८ ते दिनांक १९ एप्रिल १९९० या कालावधीत झालेली व दिनांक १४ एप्रिल १९९० रोजी अस्तित्त्वात असलेल्या अतिक्रमणांबाबतच्या नोंदवहीमध्ये सदरच्या अतिक्रमाणाची नोंद असून त्यानुसार फेर क्र. ७५०४, दिनांक २६ एप्रिल २०११ रोजी मंजुर झाला आहे. सद्यस्थितीत सदर स. नं. ३०/१ मधील ४३.३६ हे. आर जमिनीच्या २.०० हे. आर. या क्षेत्राच्या सदरी ७/१२ मालकी हक्कामध्ये श्री. किसन अमृता लांडगे या एकाच व्यक्तीचे नाव समाविष्ट आहे. **(शासन पत्र क्र. विपआ-२०२०/प्र.क्र.९१/ज-७अ, दिनांक २ जून २०२२)** २ जून २०२२.

(११) हिरानंदानी बिल्डरच्या मौजे कोळशेत येथील २४ एकर जागेच्या १०० कोटी रुपयांचे बनावट दस्त प्रकरण.

मौजे कोलशेत ता. जि. ठाणे येथील स.न.१७७/३,१८०/२,१८१/२ व १९३/६ क्षेत्र१४८८० चौ.मी. ही मिळकत सह दुय्यम निबंधक ठाणे क्र. १ यांचे कार्यालयातील दस्त क्र. १०१७८ दिनांक २२ नोव्हेंबर २००१ अन्वये मे. रोमा बिल्डर्स प्रा. लि. यांनी श्री. माणिकचंद मिश्रीमल व इतर दोन यांचेकडून विकसन कराराने घेतलेली आहे. दस्तातील तीनही पक्षकारांनी कबुली जबाब दिला असून ओळखदाराची सही घेवून तत्कालिन नोंदणी अधिकारी यांनी दस्तऐवजाची नोंदणी अधिनियमातील तरतुदीनसुार पुर्ण केलेली आहे.

दस्तऐवजातील लिहून देणार पक्षकार श्री. मोहनलाल रुपचंद यांनी दिलेल्या विकसन करार व कुलमुखत्यारपत्रामध्ये केलेल्या सह्या या बनावट असल्याचा अहवाल Forgery Detection Pvt. bureau यांनी तक्रारदार श्री. राजेंद्र जैन यांना दिनांक २९ एप्रिल २००९ रोजी दिला आहे. सदर अहवालाची मुळ प्रत सह. जिल्हा निबंधक वर्ग-१ ठाणे शहर कार्यालयाने सदर ब्युरोकडे मागणी केली असता, त्यांचा सदरचा अहवाल हा गोपनीय असल्याने त्यांचेकडील ग्राहक श्री. जैन यांचेकडे संपर्क साधावा, असे दिनांक १२ मे २०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. श्री. राजेंद्र जैन यांना सह जिल्हा निबंधक वर्ग १, ठाणे शहर यांनी दिनांक ११ ऑगस्ट २०१० अन्वये दस्त क्र. १०१७८/२००१ वर खोट्या सह्या झालेल्या आहेत म्हणून अहवालाची मुळ प्रत सादर करण्यास कळविले आहे. तथापि, त्यांनी अद्यापर्यंतद मुळ प्रत सादर केलेली नाही. नोंदणी अधिनियम कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यासाठी पक्षकाराने पुरावे देवून फसवणूक झाल्याबाबत सिद्ध करणे आवश्यक आहे. सन २०११ पासून पक्षकारांना कळवूनही त्यांनी अद्यापपर्यंत संपर्क साधला नसल्याने गुन्हा दाखल करण्यात पक्षकारांना स्वारस्य नसल्याचे दिसून येत असून कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नाही.

तथापि संबंधित पक्षकार यांनी संबंधितांविरुद्ध कासारवडवली ता. जि. ठाणे या पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १७९/२००९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. **(शासन पत्र क्र. विपआ-२०१९/प्र.क्र.४७/म १ (धोरण), दिनांक १० सप्टेंबर २०२४)** १० सप्टेंबर २०२४

(१२) खटाव, जि. सातारा येथे विनापरवाना मुरुम व गौण खनिज उत्खनन यामध्ये साडे तीन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होणे.

अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नसल्याचे जिल्हाधिकारी तथा -जिल्हा दंडाधिकारी, सातारा यांनी शासनास कळविले आहे . **(शासन पत्र क्र. विपआ-७८२/०२२५/प्र.क्र.६५/ख-२, दिनांक ९ जून २०२५)** ९ जून २०२५

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०१२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन	१६१	०१

महसूल व वन विभाग

१६१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद कामकाज खंड १६२, क्रमांक ६, दिनांक १६ जुलै २०१२.

(२) **विषय.—**महाराष्ट्र देवस्थानच्या जमिनीमध्ये इनामी वर्ग तीनच्या जमिनी असल्यामुळे त्या विकता येत नाहीत परंतु कोल्हापूर शहरातील मौजे मोरेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील गट क्र.३२ व ४५ या साडेसात एकरच्या जमिनीविक्रीबाबत..

(३) **आश्वासन.—मा. मंत्री प्रकाश सोळंके :** १. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या जमिनीची वार्षिक भाडेपट्टा पद्धती नव्याने ठरविणे. २. कोल्हापूर येथील देवस्थान ईनाम जमिनींची विनापरवानगी विक्री होणे.

याबाबतीत आपल्या बरोबर बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान जमिनी संबंधीचा मूळ विषय विधी व न्याय विभागाशी संबंधित आहे. तथापि या देवस्थानाच्या जमिनीच्या वार्षिक भाडेपट्टा महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात येतो. या ठिकाणी सदर धोरणात नमूद वार्षिक भाडेपट्टा आकारणीच्या पध्दती नव्याने ठरवावयाच्या मागणीचा संबंधित विषय असून सदर बाब ही धोरणात्मक स्वरुपाची आहे. यास्तव, विधि व न्याय विभागाने या विषयाचे हस्तांतरण अमान्य केले. तद्नंतर हा विषय सामान्य प्रशासन विभागाच्या अभिमताने महसूल व वन विभागाच्या ज-१अ या कार्यासनाकडे दि. ०४/०२/२०२१ रोजी प्राप्त झाला असून, प्रस्तावित धोरणाचा अभ्यास करून नवीन धोरणाचा मसुदा तयार करण्याविषयी उचित कार्यवाही सुरू आहे. दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली आहे. तसेच दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती यांच्या कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली आहे. कार्यवाही सुरू आहे.

(२) तसेच कोल्हापूर येथील देवस्थान इनाम जमिनीच्या विनापरवानगी विक्री संबंधीच्या अहवालानुषंगाने बैठक घेण्याकरिता दिनांक व वेळ देण्यासंदर्भात मा. मंत्री महसूल यांना विनंती करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**सदर आश्वासन मान्य करण्यात यावे.

सन २०१४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१४ चे पाचवे(हिवाळी) अधिवेशन	४४०	०१

महसूल व वन विभाग

४४० (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १७८, क्रमांक १२, दिनांक १४ डिसेंबर २०२५.

(२) **विषय.—**भूदान चळवळीतून मिळालेल्या जमिनीचा व शासकीय जमिनीचा होत असलेला गैरव्यवहार.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री श्री एकनाथ खडसे :** या प्रकरणी अनियमितता झालेली आहे किंवा दुरुपयोग झालेला आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल वर या प्रकरणी तेथील विभागीय आयुक्तांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल.... या प्रकरणी अनियमितता किंवा दुरुपयोग झाल्याचे आढळून आले तर संबंधितांवर कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**सदर आश्वासनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सदर आश्वासन क्र. ४४० वगळण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, याबाबत मा. मंत्री (महसूल) यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत.

त्यानुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयाकडून दिनांक १५ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये सुधारित माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ११ऑगस्ट २०२५ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयाकडून सुधारित अहवाल पात्र झाला आहे. तथापि, सदर अहवाल परिपूर्ण नसल्याने दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये सुधारित अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी शासनास अहवाल सादर करण्यात आला असून सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे नमूद आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**मान्य वगळण्यात यावे.

सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१६ चे पाचवे(हिवाळी) अधिवेशन	१९०, १९४	०२

१९० (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद कामकाज खंड १७९ क्रमांक ०९ , दिनांक १६ डिसेंबर २०१६.

(२) **विषय.—**चेंबूर, मुंबई येथील सर्व्हे क्र. ८० व सर्व्हे क्र. ८३, हिस्सा क्र. ७, बोर्ला व्हिलेज, आर. के. स्टुडिओच्या बाजूला, चेंबूर, मुंबई येथील साधारण दोन एकर २१ गुंठे जमीन (अंदाजे ८१८१ चौ. मीटर) जागेचे मूल्यांकन कमी दाखविण्याबाबत. (ॲड. रामहरी रुपनवर).

चेंबूर, मुंबई येथील सर्व्हे क्र. ८० व सर्व्हे क्र. ८३ हिस्सा क्र. ७ बोर्ला व्हिलेज येथील जमिनीच्या खरेदी विक्रीबाबत (ॲड. निरंजन डावखरे).

(३) **आश्वासन.—मा. उप सभापती :** दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**बैठक आयोजित करण्यात आलेली नाही. तथापि मौजे बोरला सर्व्हे नं. ८०, सर्व्हे नं. ८३, हिस्सा नं. ७, सि.टी.एस. नं. ६६७ यांचे ७/१२ प्रमाणे क्षेत्र २ एकर २१ गुंठे व प्रॉपर्टी कार्ड प्रमाणे क्षेत्र १०,२२१.२० चौ.मीटर या मिळकतींमधील दिनांक १९ एप्रिल २०१२ रोजी सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र. ३ येथे नोंदणीकृत करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणपत्र दस्तऐवज क्र. ३०३४/२०१२ यावर कमी मुद्रांक शुल्क वसूल केले असल्याच्या अनुषंगाने या दस्तासंबंधीत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ५३ (अ) प्रमाणे पुर्नरक्षण प्रकरण सुरू करण्यात येवून सुनावणीअंती महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ५३(अ) नुसार ६ वर्षांची कालमर्यादा संपुष्टात आल्याने पुनरिक्षण करता येत नसल्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी दिनांक ६ जून २०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**स्टॅम्प ड्युटी संदर्भात आयजीआर मुंबई यांची स्वतंत्र विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी. आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

१९४ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद कामकाज खंड १७९, क्रमांक ०९, दिनांक १६ डिसेंबर.

(२) **विषय.—**चेंबूर, मुंबई येथील सर्व्हे क्र.८० व सर्व्हे क्र.८३, हिस्सा क्र.७, बोर्ला व्हिलेज येथील जमिनीच्या खरेदी विक्रीबाबत (ॲड.निरंजन डावखरे)

(३) **आश्वासन.—मा. उप सभापती :** दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**बैठक आयोजित करण्यात आलेली नाही. तथापि मौजे बोरला सर्व्हे नं. ८०, सर्व्हे नं. ८३, हिस्सा नं. ७, सि.टी.एस. नं. ६६७ यांचे ७/१२ प्रमाणे क्षेत्र २ एकर २१ गुंठे व प्रॉपर्टी कार्ड प्रमाणे क्षेत्र १०,२२१.२० चौ.मीटर या मिळकतींमधील दिनांक १९ एप्रिल २०१२ रोजी सह दुय्यम निबंधक, कुर्ला क्र. ३ येथे नोंदणीकृत करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणपत्र दस्तऐवज क्र. ३०३४/२०१२ यावर कमी मुद्रांक शुल्क वसूल केले असल्याच्या अनुषंगाने या दस्तासंबंधीत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ५३ (अ) प्रमाणे पुर्नरक्षण प्रकरण सुरू करण्यात येवून सुनावणीअंती महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ५३(अ) नुसार ६ वर्षांची कालमर्यादा संपुष्टात आल्याने पुनरिक्षण करता येत नसल्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी दिनांक ६ जून २०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**स्टॅम्प ड्युटी संदर्भात आयजीआर मुंबई यांची स्वतंत्र विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी. आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०१७ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१७ चे पहिले(अर्थसंकल्पीय) अधिवेशन	१४९	०१

महसूल व वन विभाग

१४९ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १८० क्रमांक १५ , दिनांक ३० मार्च २०१७.

(२) **विषय.—**मा. श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला मुद्दा. उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक सहाय्य करणेबाबत

(३) **आश्वासन.—मा. मंत्री / श्री. सुभाष देशमुख :** सहकार मंत्री ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या मार्च, २०१७ अखेर सीआरएआर ९ टक्के पेक्षा कमी असेल केवळ अशा बँकांना सीआरएआर ची पुर्तता करण्यासाठी संभाव्य आर्थिक सहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्य:स्थिती.—**सदर आश्वासन वगळणेबाबत समिती प्रमुख, विधानमंडळ सचिवालय यांना दि. १३.११.२०१९ च्या पत्राने कळविण्यात आले आहे. धाराशिव जि.म.स. बँकेचा सीआरएआर सध्या ९% पेक्षा कमी असल्यामुळे या बँकेस शासकीय अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**वगळण्यात यावे.

सन २०१७ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१७ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन	१०४	०१

महसूल व वन विभाग

१०४ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १८३ क्रमांक ०६ , दिनांक १८ डिसेंबर २०१७.

(२) **विषय.—**मुंबई महानगरपालिकेच्या जागा खाजगी संस्थांच्या घशात घालण्याचा कट आयुक्त व सत्ताधारी यांच्या संगनमताने होणे.

सर्वश्री अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. यांनी उपस्थिती केलेली लक्षवेधी सुचना क्र.११८.

(३) **आश्वासन.—मा. राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील :** लीज संपल्यावर याबाबत विचार करता येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**द क्रिकेट क्लब ऑफ इंडिया लि. या संस्थेस भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या मिळकतीच्या भाडेपट्ट्याची मुदत दि. ३१.१.२०३६ रोजी संपुष्टात येणार आहे. यास्तव सद्यःस्थितीत सदर आश्यासनावर कार्यवाही करणे अपेक्षित नाही.

सदर आश्वासन वगळण्याची विनंती मा. समिती प्रमुख, विधानपरिषद आश्वासन समिती यांना दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**वगळण्यात यावे.

सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	४९२	०१

महसूल व वन विभाग

४९२ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड क्रमांक १८४ क्रमांक २२ , दिनांक २८ मार्च २०१८.

(२) **विषय.—**राज्य सरकारकडून पारदर्शक कारभाराच्या बाबतीत घोषणा होऊन सुध्दा प्रत्यक्षात त्या अनुषंगाने राज्य कारभार होत नसणे. या विषयावर मा. सर्वश्री धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव.

चर्चेचा मुद्दा- श्री. प्रविण दरेकर (वि.प.स.) "मुंबईतील सरकारच्या खूप जागा वेगवेगळ्या लोकांनी बळकावल्या आहेत. हा विषय सरकार खूप गांभीर्याने घेत आहे."

(३) **आश्वासन.—मा. मंत्री / श्री. चंद्रकांत पाटील : मा. मंत्री / श्री. चंद्रकांत पाटील** "यासाठी सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांच्यासारख्या अनेकांची मदत घेऊन विभागाच्या माहितीच्या आधारे हे सर्व विषय मार्गी लावण्यात येतील."

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** शासन पत्र, दिनांक ३ मार्च २०२५ अन्वये तत्का. मा. मंत्री (महसूल) यांना दिलेली यादी विभागास उपलब्ध करून देण्याची विनंती सन्मा. विधानपरिषद सदस्य यांना करण्यात आली होती. तथापि, अद्याप यादी प्राप्त झालेली नाही. याबाबत अमुस (महसूल) यांच्या निर्देशानुसार शासन पत्र दिनांक १५ एप्रिल २०२६ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून अनधिकृत कब्ज्यात असलेल्या शासकीय जमिनींची माहिती मागविण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी. आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२० चे दुसरे(अर्थसंकल्पीय) अधिवेशन	७७	०१

महसूल व वन विभाग

७७ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड क्रमांक १९२ क्रमांक १० , दिनांक १० जुलै २०२०.

(२) **विषय.—**घरोशी (ता. माणगाव, जि. रायगड) या गावाजवळ मे. चेतक एंटरप्रायजेस लि. खडीक्रशर प्रकल्प सुरू केल्यामुळे खडी क्रशरमुळे गावातील घरांना हादरे बसून तडे बसत असल्यामुळे होत असलेले नुकसान. श्री. सुरजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

(३) **आश्वासन.—मा. मंत्री महसूल :** उत्खनन कोठे करावेत यासंबंधी अंतर तसेच इको सेन्सेटिव्ह झोनसंबंधी काही निकष आहेत. सदर निकष पुन्हा तपासून पाहिले जातील. तसेच सदर निकषामध्ये सदर उत्खनन बसत असल्यास ते बंद करण्यासंबंधी निर्णय घेऊ.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**मौजे घरोशी येथे सुरू असलेली खाण व क्रशर पासून गावाचे अंतर सुमारे ९५० मिटर आहे. तसेच आंब्रेवाडी या गावाचे अंतर १२०० मिटर आहे. पळसगाव बु. गावाचे अंतर २५०० मिटर आहे, खर्डी बु. गावाचे अंतर ३२०० मिटर आहे. तसेच तेळ्याची वाडी ३००० मिटर अंतरावर आहे.

धुळीमुळे नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण न होण्यासाठी सदर कंपनीने रस्त्यावर व आजुबाजूच्या परिसरामध्ये पाणी मारले जाते त्यामुळे धुळ उडत नाही. तसेच रस्त्यावर सांडलेल्या खडीमुळे कोणताही अपघात होऊ नये म्हणून रस्त्यावर पडलेली खडी साफ केली जाते.

भारत सरकार राजपत्र, दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप अधिसूचनेचे अवलोकन केले असता, महाराष्ट्र राज्यामध्ये समाविष्ट होणारे पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) मध्ये येणारे राज्यनिहाय मानचित्र नकाशा देण्यात आलेला होता. सदरहू नकाशामध्ये बाहेरील सिमांकन बिंदू क्रमांक ५३ व ५४ च्या मध्ये येणारे क्षेत्राचे बिंदूवार सदर नकाशामध्ये पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) क्षेत्राची राज्यनिहाय सिमा लाईन व मुख्य सिमांकन बिंदूची अक्षांश व रेखांश पाहता त्यामध्ये पूर्ण पश्चिम घाट राज्यनिहाय बिंदूवार सीमा आहेत. ५३ चे अक्षांश पाहता ७३.३६८८ व रेखांश पाहता १८.२६४१ तसेच बिंदू ५४ चे अक्षांश पाहता ७३.४३७८ व रेखांश पाहता १८.१२७२ असे स्पष्ट नमूद केलेले आहे.

वर नमूद सिमांकन पाहता ५३ व ५४ बिंदू जोडणी रेखा ही घरोशी गावाच्या हद्दीमध्ये जात आहे. ५३ व ५४ हे बिंदू घरोशी गावातून जाणाऱ्या रेषेबाहेर आहे.

मे. चेतक एंजरप्रायजेस लि. यांची सुरू असलेली डबर खाण वच क्रशर सिमांकन केलेल्या रेषेबाहेर आहे. त्यामुळे सदरची खाण ही परि-संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर आहे. त्यामुळे परि-संवेदनशील क्षेत्र मधील तरतुदी लागू होत नाहीत.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—**आश्वासन मान्य करण्यात येत आहे.

सन २०२१ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२१ चे दुसरे(पावसाळी) अधिवेशन	१,	०१

महसूल व वन (वन) विभाग

१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड क्रमांक १९६, क्रमांक ०१, दिनांक १२ जुलै २०२१ .

(२) **विषय.—**चांदोली प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळण्याबाबत.

मा. श्री. गोपिचंद पडळकर व इतर, वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्रमांक ५०१९.

(३) **आश्वासन.—मा. मुख्यमंत्री / श्री. उद्धव ठाकरे :** कागदपत्र प्राप्त होताच निर्वाहभत्ता अदा करण्याची कार्यवाही करणे शक्य होईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**दि. १३.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे. तद्नंतर दि. ११.०१.२०२२, ०८.०५.२०२३, ३०.०५.२०२५ व दि. ०६.०८.२०२५ रोजी स्मरणपत्रे पाठविली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** आश्वासन वगळण्यात यावे.

सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२१ चे तिसरे(हिवाळी) अधिवेशन	२६, २७,	०२

२६ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १९४ क्रमांक ०५ , दिनांक २८ डिसेंबर २०२१.

(२) **विषय.—**राज्यात वृक्ष लागवडीसाठी शासन कोट्यवधी रूपये खर्च करीत असताना राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड सुरू असणे. श्री. अरुण लाड, मा.वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५५.

(३) **आश्वासन.—मा. राज्यमंत्री/ श्री. दत्तात्रय भरणे. :** यामध्ये जे दोषी असतील त्यांची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल सांगलीप्रमाणे राज्यातील इतर भागातील वृक्ष लागवडीची देखील चौकशी करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेवर तत्कालीन मा. राज्यमंत्री श्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभेच्या सन्माननीय १६ सदस्यांची तदर्थ समिती दि. १०.०३.२०२१ रोजी गठीत करण्यात आली होती. तद्नंतर दि. ०४.०८.२०२३ रोजी सदर तदर्थ समितीचे पुनर्गठीत करून सदस्य संख्या १७ वरून २१ करण्यात येऊन समितीच्या प्रमुखपदी मा संसदीय कार्य मंत्री श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांची नियुक्ती करण्यात आली होती.

उपरोक्त तदर्थ समितीने विधानमंडळास आपला अहवाल दिनांक १२.०७.२०२४ रोजी सादर केला आहे. समितीने संपुर्ण ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेचा सखोल अभ्यास करून यासंदर्भात आवश्यक असणारी सर्व विस्तृत माहिती विभागाकडून प्राप्त करुन घेतली. यात या मोहिमेची आवश्यकता, वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट, आर्थिक तरतूद झालेला खर्च, मोहिमेमध्ये सहभागी शासकीय / अशासकीय / खाजगी संस्था, रोप निर्मिती, रोप खरेदी यासाठी राबविण्यात आलेली खरेदी प्रक्रिया, रोपांची लागवड, देखभाल तपासणी जिवंत रोपांची टक्केवारी व या संपूर्ण अभियानाच्या अंमलबजावणीत काही अनियमितता वा गैरव्यवहार झाला किंवा कसे या सर्व मुद्यांची समितीने सखोल छाननी व तपासणी केली आहे त्यात समितीस कोणतेही तथ्य आढळून आले नाही या वृक्ष लागवड अभियानाची राज्यात झालेली अंमलबजावणी निश्चितच समाधानकारक असून ही मोहिम राज्यात यशस्वी झाल्याचे समितीचे स्पष्ट मत असल्याचे समितीने अहवालात नमुद केले आहे सदर समितीस प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे निर्दशनास आलेले नसून कोणीही दोषी आढळून आलेले नाही.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** मान्य. आश्वासनाची पूर्तता दिनांक १२.०७.२०२४ रोजी करण्यात आली आहे. आश्वासन पुर्ततेच्या विवरणपत्राच्या प्रती संसदीय कार्य विभागास दिनांक २८.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

२७ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १९४ क्रमांक ०५ , दिनांक २८ डिसेंबर २०२१.

(२) **विषय.—**राज्यात वृक्ष लागवडीसाठी शासन कोट्यवधी रूपये खर्च करीत असताना राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड सुरू असणे. श्री. अरुण लाड, मा. वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५५

(३) **आश्वासन.—मा. राज्यमंत्री/ श्री. दत्तात्रय भरणे.—** तसेच गव्याच्या धडकेत मृत्यू झालेल्या तरुणाच्या कुटुंबियांना शासकीय नियमाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**दिनांक २३.०४.२०२५ रोजी आश्वासन पुर्तता अहवाल संसदीय कार्य विभागास सादर करण्यात आला आहे (सोबत प्रत जोडली आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** मान्य

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२२ चे पहिले(अर्थसंकल्पीय) अधिवेशन	३१, ४७	०२

महसूल व वन विभाग

३१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १९८ क्रमांक ११ , दिनांक २२ मार्च २०२२.

(२) **विषय.—**सन २०१८ ते सन २०२० या काळात सरकारकडून हाती घेण्यात आलेल्या ३३ कोटी वृक्ष लागवडीत कोट्यवधी रुपयांचा अपहार होणे.

मा. श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी विचारलेली लक्षवेधी सूचना क्र. ५०२

(३) **आश्वासन.—मा. राज्यमंत्री/ श्री. दत्तात्रय भरणे. :** त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेवर तत्कालीन मा. राज्यमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभेच्या सन्माननीय १६ सदस्यांची तदर्थ समिती दि. १०.०३.२०२१ रोजी गठीत करण्यात आली होती. तद्नंतर दि. ०४.०८.२०२३ रोजी सदर तदर्थ समितीचे पुनर्गठीत करून सदस्य संख्या १७ वरून २१ करण्यात येऊन समितीच्या प्रमुखपदी मा संसदीय कार्य मंत्री श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांची नियुक्ती करण्यात आली होती.

उपरोक्त तदर्थ समितीने विधानमंडळास आपला अहवाल दिनांक १२.०७.२०२४ रोजी सादर केला आहे. समितीने संपुर्ण ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेचा सखोल अभ्यास करून यासंदर्भात आवश्यक असणारी सर्व विस्तृत माहिती विभागाकडून प्राप्त करून घेतली. यात या मोहिमेची आवश्यकता, वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट, आर्थिक तरतूद झालेला खर्च, मोहिमेमध्ये सहभागी शासकीय / अशासकीय / खाजगी संस्था, रोप निर्मिती, रोप खरेदी यासाठी राबविण्यात आलेली खरेदी प्रक्रिया, रोपांची लागवड, देखभाल तपासणी जिवंत रोपांची टक्केवारी व या संपूर्ण अभियानाच्या अंमलबजावणीत काही अनियमितता वा गैरव्यवहार झाला किंवा कसे या सर्व मुद्यांची समितीने सखोल छाननी व तपासणी केली आहे त्यात समितीस कोणतेही तथ्य आढळून आले नाही या वृक्ष लागवड अभियानाची राज्यात झालेली अंमलबजावणी निश्चितच समाधानकारक असून ही मोहिम राज्यात यशस्वी झाल्याचे समितीचे स्पष्ट मत असल्याचे समितीने अहवालात नमुद केले आहे सदर समितीस प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे निर्दशनास आलेले नसून कोणीही दोषी आढळून आलेले नाही.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** मान्य. आश्वासनाची पूर्तता दिनांक १२.०७.२०२४ रोजी करण्यात आली आहे आश्वासन पुर्ततेच्या विवरणपत्राच्या प्रती संसदीय कार्य विभागास दिनांक २८.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

४७ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १९८ क्रमांक १४ , दिनांक २४ मार्च २०२२.

(२) **विषय.—**राज्यातील साखर कारखान्यांनी ऊसाचे विनापरवाना गाळप केलेबाबत.

मा. श्री. प्रविण दरेकर विरोधी पक्ष नेता व इतर यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र. १२७२८.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** या कारखान्यांनी शासनाकडे अपील केले असल्यामुळे सदर प्रकरणी अपीलावर निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**राज्यातील साखर कारखान्यांनी ऊसाचे विनापरवाना गाळप केलेल्या साखर कारखान्यांनी मा.मंत्री (सहकार) यांचेकडे केलेल्या अपिलावर अद्याप अंतिम निर्णय प्राप्त झालेला नाही. अपीलावर शासनाचा अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. तथापी दंडात्मक कारवाई झालेल्या साखर कारखान्यांकडून दंडाच्या रकमा भरून घेण्याबाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. मंत्री (सहकार) यांचेकडे दि. ६.२.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दिलेल्या निदेशानुसार दि. १४.१०.२०१५ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे प्रति मे. टन रु.५००/- प्रमाणे आकारण्यात येणारा दंड यापूर्वीच्या शासनाच्या दि. ३०.६.२०१२ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रति मे. टन रु.१००/- प्रमाणे आकारण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास माहे जून, २०२४ मध्ये सादर करण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

सन २०२२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२२ चे दुसरे(पावसाळी) अधिवेशन	२१	०१

महसूल व वन विभाग

२१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड १९९ क्रमांक ०३ , दिनांक २२ ऑगस्ट २०२२.

(२) **विषय.—**नायगाव (ता. पाटोदा, जि. बीड) येथील मयुर अभयारण्यातील ग्लिरिसिदिया वनस्पती नष्ट करुन त्याजागी वन्यजीवांना पोषक झाडे लावण्याबाबत श्री. सुरेश धस, वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्रमांक १४३३८.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री वने श्री. सुधीर मुनगंटीवार :** सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**दि. ३०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्य प्रधान वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे. अहवाल प्राप्त. तथापि, सुधारित अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे. शासनाचा निर्णय समितीला ३ महिन्याच्या आत समितीला अवगत करण्यात यावा.

सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२२ चे तिसरे(हिवाळी) अधिवेशन	५, २२, ५५, ६९, ७०, ७१, ९६, १२५	०८

महसूल व वन विभाग

५ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०२, दिनांक २० डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—**चारकोप कांदिवली (प.) मुंबई येथील भागातील खारफुटीवरील आवैध बांधकाम रोखण्याबाबत. श्री. विजय उर्फ भाई गिरकर व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र. १५२०८.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री वने श्री. सुधीर मुनगंटीवार :** बृहन्मुंबई महानगरपालिका व पोलिस प्रशासनामार्फत संयुक्त स्थळपहाणी करून अतिक्रमण/कांदळवन ऱ्हास आढळून आल्यास निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**सदर आश्वासन वगळण्या बाबत मा. समिती प्रमुख, विधान परिषद आश्वासन समिती यांना दि. ९.१०.२०२४ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. दि. ९.१०.२०२४ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** मान्य.

२२ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०३, दिनांक २१ डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—**शासकीय भुखंड दिलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांबाबत मा. श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १९६.

(३) **आश्वासन.—**मा. मंत्री / श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सन्माननिय सदस्यांनी जी काही सूचना केलेली आहे, त्याबाबत सहकार मंत्री महोदयांसमवेत बैठक घेऊ.

(४) सद्यःस्थितीदर्शक विभागाचे अभिप्राय - सन २०२२ च्या तिसऱ्या अधिवेशनात केंद्रिय कर्मचाऱ्यांच्या साई वैभव गृहनिर्माण संस्थेला अद्याप जागा न दिल्याबाबत मा. वि. प. स. श्री. जयंत पाटील यांनी महसुल विभागाकडे लक्षवेधी सुचना क्रमांक १९६ उपस्थित केली होती. त्यावरील चर्चेदरम्यान मा. वि. प. स. श्री. प्रविण दरेकर यांनी शासकीय भुखंड मंजुर करण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सभासद मंजूरी सभासद बदल याबाबत मुद्दे उपस्थित केले आहेत.

सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय भुखंड महसुल विभागाकडुन मंजूर करण्यात येतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय भुखंड वितरीत करण्याबाबत सविस्तर कार्यपध्दती महसुल विभागाच्या शासन निर्णय क्र. एलसीएस ०६०६/ प्र. क्र.५४/ज-१, दि. २५.०५.२००७ मध्ये नमूद करण्यात आली आहे. अशा गृहनिर्माण संस्थांमधील सभासद बदल वाढीव सभासद मंजूरी सदनिका हस्तांतरण इत्यादी सर्व बाबी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत हाताळण्यात येतात.

मा. मंत्री (महसूल) यांनी महसूल विभागाच्या लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान सहकार मंत्री महोदयांसमवेत बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे. त्यानुषंगाने सदर आश्वासन हे महसूल विभागाशी संबंधीत असल्याने या आश्वासनाचे हस्तांतरण स्विकारण्याची विनंती महसूल व वन विभागास सहकार विभागाव्दारे दि.२०.०७.२०२३ रोजी करण्यात आली होती. महसूल विभागाकडून कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने दि.०४.०३.२०२५, दि.२६.०३.२०२५ तसेच दि.३१.०५.२०२५ च्या टिप्पणीद्वारे हस्तांतरण स्विकारण्याबाबत व त्यानुसार सहकार विभागास अवगत करण्याबाबत महसूल विभागास विनंती करण्यात आली आहे. तथापि, महसूल विभागाकडून अद्यापही आश्वासन स्विकृत/अस्विकृत करण्याबाबत काहीही कळविण्यात आले नाही. आश्वासनाचे हस्तांतरण करण्याबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

५५ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०७, दिनांक २७ डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—** करमाळा तालुक्यातील सिना-कोळेगाव धरणग्रस्तांना पर्यायी जमीन मिळण्यांची आवश्यकता या बाबत.... श्री. रणजितसिंह मोहिते- पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सुचना क्र.४२५.

(३) **आश्वासन.—**"तरीही येथून पुढे ही काळजी घेतली जाईल. जुन्या गावठाणामध्ये भावकीच्या जमिनी एका बाजुला याकरिता सर्व लोकांना एकत्र बसवून यामध्ये जास्तीत जास्त सुसुत्रपणा आणता येईल. त्याकरीता कार्यवाही केली जाईल."

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**प्रस्तुत आश्वासन मदत व पुनर्वसन विभाग यांच्याशी सबंधित असल्याने सदरचे आश्वासन मदत व पुर्नवसन विभागाकडे दिनांक २६.०४.२०२३ हस्तांतर प्रस्तावित करण्यात आले होते. तसेच दिनांक २२.०६.२०२३ रोजी हस्तांतरण बाबत पुनःश्च विनंती केली आहे.

तसेच, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. काकाप१८१९/प्र.क्र.२४/१८ (र.व. का.) दि.०७.०९.२०१९ अन्वये प्रस्तुत आश्वासन महसूल विभागाच्या नावावरून वगळून मदत व पुनर्वसन विभागाच्या नाव दर्शविण्याबाबत दि.२६.१०.२०२३ रोजी संसदीय कार्य विभागास विनंती केली आहे. मदत व पुनर्वसन विभागास हस्तांतर.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

६९ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड क्रमांक २०० क्रमांक ०७, दिनांक २७ डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—** तालुक्यात अनधिकृत खडी क्रशरमुळे शासनाच्या महसूलाची हानी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असणेबाबत. प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र. २०२

(३) **आश्वासन.—मा. मंत्री महसूल श्री. राधाकृष्ण विखे पाटील :** त्यानुसार सर्व प्रकरणांची विभागीय आयुक्तांकडून चौकशी केली जाईल. तसेच सदर प्रकरणी जे अधिकारी दोषी असतील त्यांच्या विरुद्ध कारवाई केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**मा. विधानपरिषद सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्यावेळे चर्चेदरम्यान उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने कर्जत तालुक्यातील सर्व खनींची तसेच स्टोन क्रशरच्या अनियमिततेबाबतची संपूर्ण चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांना दिनांक १० जानेवारी २०२३ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त यांनी दिनांक २७ मार्च २०२३ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर करण्यात आला असता, सदर अहवाल शासनाने मान्य केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने अनियमततेबाबत जबाबदार असलेल्या संबंधित जिल्हाधिकारी, उप वनसंरक्षक, अहमदनगर, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, अपर जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्मअधिकारी, अहमदनगर, उप विभागीय अधिकारी व तहसीलदार, कर्जत, तसेच मंडळ अधिकारी/तलाठी यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले आहेत.

तसेच याप्रकरणी संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार कर्जत यांना दिनांक ३० डिसेंबर २०२२ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. तथापि, सदर आदेशा विरुद्ध संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे आव्हानित केले असता, न्यायाधिकरणाने सदर आदेशास पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

७० (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०७, दिनांक २७ डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—** कर्जत तालुक्यात अनधिकृत खडी क्रशरमुळे शासनाच्या महसूलाची हानी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असणेबाबत. प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री महसूल श्री. राधाकृष्ण विखे पाटील :** सदर प्रकरणीतालुक्याच्या तहसीलदारांवर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करण्यासंबंधी तात्काळ कार्यवाही केली जाईल. तसेच प्रांत अधिकाऱ्यांना देखील आज तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांना देखील स्वतंत्रपणे चौकशी केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**मा. विधानपरिषद सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या वेळे चर्चेदरम्यान उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने कर्जत तालुक्यातील सर्व खानींची तसेच स्टोन क्रशरच्या अनियमिततेबाबतची संपूर्ण चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांना दिनांक १० जानेवारी २०२३ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त यांनी दिनांक २७ मार्च २०२३ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर करण्यात आला असता, सदर अहवाल शासनाने मान्य केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने अनियमततेबाबत जबाबदार असलेल्या संबंधित जिल्हाधिकारी, उप वनसंरक्षक, अहमदनगर, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, अपर जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर, उप विभागीय अधिकारी व तहसीलदार, कर्जत, तसेच मंडळ अधिकारी/तलाठी यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले आहेत.

तसेच याप्रकरणी संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार कर्जत यांना दिनांक ३० डिसेंबर २०२२ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. तथापि, सदर आदेशा विरुद्ध संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे आव्हानित केले असता, न्यायाधिकरणाने सदर आदेशास पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिलेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

७१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०७, दिनांक २७ डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—** कर्जत तालुक्यात अनधिकृत खडी क्रशरमुळे शासनाच्या महसूलाची हानी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असणेबाबत. प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—**तसेच सदर प्रकरणी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तातडीने चौकशी करून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्यासंबंधी त्यांना सूचना दिल्या जातील.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**मा. विधानपरिषद सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या वेळे चर्चेदरम्यान उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने कर्जत तालुक्यातील सर्व खानींची तसेच स्टोन क्रशरच्या अनियमिततेबाबतची संपूर्ण चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांना दिनांक १० जानेवारी २०२३ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त यांनी दिनांक २७ मार्च २०२३ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर करण्यात आला असता, सदर अहवाल शासनाने मान्य केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत जबाबदार असलेल्या संबंधित जिल्हाधिकारी, उप वनसंरक्षक, अहमदनगर, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, अपर जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर, उप विभागीय अधिकारी व तहसीलदार, कर्जत, तसेच मंडळ अधिकारी/तलाठी यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

९६ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०८, दिनांक २८ डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—** मौजे तुडाळ येथील खाणपट्टा नुतणीकरणाचे आदेश अप्पर जिल्हाधिकारी यांनी अनिर्णत ठेवल्याबाबत.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर, वि.प.स. यांनी. दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५९७

(३) **आश्वासन.—मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील :** विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडून या संदर्भातील सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.**—प्रस्तुत आश्वासनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक २९ मे २०२३ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांना सूचना देण्यात आल्या असता, विभागीय आयुक्त, कोकण यांनी दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यानुसार मौजे तुडाळ येथील ग.नं. १६/१ (जुना १६/२) वरील खाणपट्ट्याची नुतनीकरणाची कार्यवाही प्रलंबित आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** आश्वासन मान्य करण्यात यावे.

१२५ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद खंड २०० क्रमांक दिनांक डिसेंबर २०२२.

(२) **विषय.—** मुंबईतील मजूर संस्थांची तपासणी करण्याबाबत. श्री. सुनील शिंदे व श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांनी विचारलेला अतारांकीत प्रश्नक्र. १३५१९.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री / श्री. अतुल सावे :** तपासणी अहवालाबाबत संबंधित खुलासा प्राप्त झाल्यानंतर सदर बाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) **सद्यःस्थितीदर्शक विभागाचे अभिप्राय.—** १. मुंबईत साडेसातशेहून अधिक मजूर संस्था असून या संस्थांचे सदस्य खरोखरच मजूर आहेत किंवा नाहीत याची तपासणी करण्याबाबत मा. नागपूर उच्च न्यायालयाने सन २०१७ मध्ये दिलेल्या आदेशानुसार सहकार आयुक्त, पुणे यांनी दि. १५ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देऊनही आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची बाब सदर प्रश्नाद्वारे उपस्थित करण्यात आली होती. त्यास अनुसरून सदर प्रश्नाच्या उत्तरामध्ये मा. मंत्री (सहकार) महोदय यांनी तपासणी अहवालाबाबत संबंधित संस्थांकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर सदर बाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन क्र. १२५ दिले होते.

२. सदर आश्वासनाच्या पूर्ततेच्या अनुषंगाने मुंबई मधील ४ जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रातील एकूण ७६६ मजूर सहकारी संस्थांपैकी ६१० संस्थांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे व उर्वरित तपासणी शिल्लक असलेल्या उपरोक्त १५६ मजूर सहकारी संस्थांची तपासणी करण्याची प्रक्रिया व तपासणी केलेल्या ६१० मजूर सहकारी संस्थांकडून तपासणी अहवालाबाबत खुलासा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग यांचे स्तरावर सुरू आहे.

३. तपासणीची प्रक्रिया अपूर्ण राहण्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :—

- मजूर सहकारी संस्थांनी तपासणीकरीता अभिलेख सादर न करणे.
- तपासणीकरीता संस्थेच्या नोंदणीकृत पत्त्यावर गेलेले अधिकारी / कर्मचारी यांना संस्था बंद असल्याचे आढळणे.
- काही संस्थांकडून तपासणीकरीता अपूर्ण अभिलेख उपलब्ध करून देणे.
- तपासणीवेळी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित नसणे.

(५) समितीचा अभिप्राय / शेरा. - वगळण्यात यावे.

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष (१)	आश्वासन क्रमांक (२)	एकूण आश्वासने (३)
सन २०२३ चे पहिले(अर्थसंकल्पीय) अधिवेशन	१६, २१, २८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, २६६, २८८, ३१९, ३३१, ३४५, ३४८, ३९८	१६

महसूल व वन विभाग

१६ (१) **संदर्भ व दिनांक .**—विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०४, दिनांक २ मार्च २०२३.

(२) **विषय.**— उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी पदोन्नतीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत.

मा. सर्वश्री. गोपिचंद पडळकर व इतर विधानपरिषद सदस्य यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र. १७४६९.

(३) **आश्वासन.**—सदर माहिती उपलब्ध केली जाईल आणि जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. जयेत प्र. पाटील यांनी मागितलेली वस्तुस्थिती असेल तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.**— निवडसूची वर्ष २०२१-२२ मध्ये उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या स्थापना मंडळ क्रमांक दोन यांच्या शिफारसीनुसार दिनांक १८.०८.२०२२ च्या आदेशान्वये, अपर जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सदर पदोन्नतीसूचीमध्ये श्रीमती वंदना सूर्यवंशी यांना देखील अपर जिल्हाधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सदर पदोन्नतीच्या अनुषंगाने विभागीय चौकशीच्या अनुषंगाने प्राप्त माहितीनुसार पदोन्नतीच्यावेळी श्रीमती वंदना सूर्यवंशी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नव्हती. सदर बाब विचारात घेऊन श्रीमती सूर्यवंशी यांना अपर जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. सबब, श्रीमती सुर्यवंशी यांना देण्यात आलेली पदोन्नती रदद करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

तत्कालीन मुद्रांक जिल्हाधिकारी, श्रीमती वंदना सूर्यवंशी व तत्कालीन सहाय्यक नगर रचनाकार, श्री. मुळे यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्याच्या अनुषंगाने नोंदणी महानिरिक्षक, पुणे यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर अहवालास अनुसरुन नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.**— मान्य करण्यात येत आहे.

महसूल व वन विभाग

२१ (१) **संदर्भ व दिनांक .**—विधानपरिषद खंड २०० क्रमांक ०४, दिनांक २ मार्च २०२३.

(२) **विषय.**— महामुंबई सेझसाठी संपादीत करण्यात आलेल्या शेत जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याची आवश्यकता असणे यासंबंधी..

श्री. जयंत पाटील विपस यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९०.

(३) **आश्वासन.**—ब्रम्हगिरी परिसरात उत्खनन करण्यास बंदी घालण्यासंबंधी आवश्यक ती कार्य़वाही करण्यात येईल.

सभापती महोदय, १० ते ११ तारखेला बैठक घेवू यासंबंधी १३ तारखेला बैठक घेण्यात येईल.

तसेच त्या ठिकाणी अवैध उत्खनन सुरू असेल तर ते आजच तात्काळ स्थगित करण्यात येईल.

तथापि, ज्या प्रक्रिया शासन स्तरावर, अधिकारी स्तरावर होतात त्या प्रक्रियांच्या बाबतीत निश्चितपणे कालमर्यादा घालण्यात येईल. असे मी आपल्या माध्यमातून सभागृहाला आश्वासित करू इच्छितो.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.**— राज्यातील अवैध गौण खनिजाच्या उत्खनन वच वाहतुकीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक यांच्याकडून शासन स्तरावर व क्षेत्रीय स्तरावर प्राप्त तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही करण्याची कालमर्यादा निश्चित करण्याबाबतच्या सूचना दिनांक ७ मार्च २०२५ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.**— आश्वासन मान्य करण्यात यावे.

महसूल व वन विभाग

११९ (१) **संदर्भ व दिनांक .**—विधानपरिषद खंड २०१ क्रमांक ०७, दिनांक ९ मार्च २०२३.

(२) **विषय.**— राज्यातील कारखान्यामधील कार्यकारी संचालक व संबंधित दोषी संचालकाविरूद्ध गुन्हे दाखल करणे.

प्रा. राम शिंदे, व वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ सहकार श्री. अतुल सावे :** हा उशिर का झाला याची चौकशी आपण करू, दि. १५ फेब्रुवारी नंतर १५-२० दिवस गेले, त्या बद्दल चौकशी करून कारवाई करू.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** शासनाच्या दि. २७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था, पुणे यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यात आले होते. त्यांनी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी सदर अहवाल दि. १५/०२/२०२३ रोजी साखर आयुक्तालयास पाठविण्यात आला होता. तथापि कारखान्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी कारखान्याचा विना परवाना गाळपाचा कालावधी, त्या कालावधीत विना परवाना केलेले गाळप (मे.टन) व उत्पादित केलेली साखर ही माहिती अहवालात स्पष्टता नसल्याने साखर आयुक्तालयाने दि. १६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती देण्याबाबत अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले. यावर अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. १४/०३/२०२३ रोजी साखर आयुक्तालयास लेखी म्हणणे सादर केले. दरम्यान दि. १५.०३.२०२३ रोजी, कारखान्याने गाळप हंगाम २०२२-२३ विनापरवाना सुरू केल्याने कारखान्यावर दंडात्मक कारवाई का करू नये व मा.मंत्री समितीच्या दि. १९.०९.२०२२ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्याने गुन्हा का दाखल करू नये याबाबत कारखान्यास म्हणणे मांडण्याकरिता साखर आयुक्त तथा परवाना प्राधिकारी यांचे समोर सुनावणी ठेवण्यात आली होती. याबाबत दि. २०.०३.२०२३ रोजी देखील सुनावणी घेण्यात येऊन कारखान्याने विनापरवाना गाळप केल्याप्रकरणी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश १९८४ च्या खंड ४ व दि. १४/१०/२०१५ चे शासनाच्या अधिसूचनेतील खंड २ (अ) मधील तरतुदी अन्वये कारखान्याने हंगाम २०२२-२३ मध्ये विना परवाना गाळप केलेल्या ९०० टन ऊस गाळपावर रु. ५००/- प्रति टन प्रमाणे रू. ४,५०,०००/- दंडात्मक कारवाईचे आदेश साखर आयुक्तालया मार्फत दि. २३ मार्च २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच कारखान्याने मा. मंत्री समितीच्या दि. १९.०९.२०२२ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्याने कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. सुभाष गुळवे यांच्यावर दि. ०८.०३.२०२३ रोजी भिगवण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार एफ.आय.आर दाखल केलेली आहे. ही वस्तुस्थिती पहाता सदर प्रकरणी विलंब झाल्याचे दिसून येत नाही.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१२० (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक ०७, दिनांक ९ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यातील कारखान्यामधील कार्यकारी संचालक व संबंधित दोषी संचालका विरूद्ध गुन्हे दाखल करणे.
प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ श्री. अतुल सावे :** साखर आयुक्त यांची देखील सखोल चौकशी करु. जर ते दोषी आढळून आले तर त्यांच्यावर नक्की कारवाई करु.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** अपर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी सदर अहवाल दि. १५/०२/२०२३ रोजी साखर आयुक्तालयास पाठविण्यात आला होता. साखर आयुक्तांनी सदर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी दि. १६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती अपर निबंधक सहकारी संस्था, यांनी दि. १४/०३/२०२३ रोजी उपलब्ध करून दिली. दि.१५/०३/२०२३ व दि. २०.०३.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीअंती कारखान्याने विनापरवाना गाळप केल्याप्रकरणी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश १९८४ च्या खंड ४ नुसार रू. ४,५०,०००/- दंडात्मक कारवाईचे आदेश साखर आयुक्तालया मार्फत दि. २३ मार्च २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच कारखान्याने मा. मंत्री समितीच्या दि. १९.०९.२०२२ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्याने कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. सुभाष गुळवे यांच्यावर दि. ०८.०३.२०२३ रोजी भिगवण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार एफ.आय.आर दाखल केलेली आहे. अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या अहवालामध्ये निरिक्षण व निष्कर्षात नमूद केले नुसार मा. मंत्री समितीमधील दि.१९/०९/२०२२ रोजीचा निर्णय व साखर आयुक्तालयाकडील दि. २२/०९/२०२२ रोजीच्या परिपत्रकीय सूचना पहाता साखर आयुक्त, यांच्यास्तरावरून कारवाई करण्याचे स्वतंत्र आदेश देणे अपेक्षित व अभिप्रेत नाही. यावरून साखर आयुक्त, पुणे यांचा दोष दिसून येत नाही. तथापि सदर प्रकरणी प्रथम चौकशी अधिकारी यांच्या चुकीच्या अहवालामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई झालेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१२१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक ०७, दिनांक ९ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यातील कारखान्यामधील कार्यकारी संचालक व संबंधित दोषी संचालकाविरूद्ध गुन्हे दाखल करणे.
प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ श्री. अतुल सावे :** मंत्री मंडळाच्या बैठकीत पुढील हंगामाच्या आधी आपली सूचना मांडण्यात येईल. त्यावेळी काही फेरबदल करायचे असल्यास ते नक्की केले जातील.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** गाळप हंगामात साखर कारखान्याचे गाळप सुरू करण्याबाबत राज्यात सुसुत्रता असावी म्हणून दर वर्षी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२३/०८/२०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या मा. मंत्री समितीची बैठक आयोजित करण्यात येऊन गाळप हंगाम सुरू करण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येतो.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

१२२ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक ०७, दिनांक ९ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यातील कारखान्यामधील कार्यकारी संचालक व संबंधित दोषी संचालकाविरूद्ध गुन्हे दाखल करणे.
प्रा. राम शिंदे, व वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ श्री. अतुल सावे :** या संबंधी का उशिर झाला याचा विचार करु, माहिती घेवू. त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज पडली तर ती नक्क करु.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** अपर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी सदर अहवाल दि.१५/०२/२०२३ रोजी साखर आयुक्तालयास पाठविण्यात आला होता. साखर आयुक्तांनी सदर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी दि. १६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती अपर निबंधक सहकारी संस्था, यांनी दि. १४ /०३/२०२३ रोजी उपलब्ध करून दिली. दि.१५/०३/२०२३ व दि. २०.०३.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीअंती कारखान्याने विनापरवाना गाळप केल्याप्रकरणी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश १९८४ च्या खंड ४ नुसार रू. ४,५०,०००/- दंडात्मक कारवाईचे आदेश साखर आयुक्तालया मार्फत दि. २३ मार्च २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच कारखान्याने मा. मंत्री समितीच्या दि. १९.०९.२०२२ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्याने कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. सुभाष गुळवे यांच्यावर दि. ०८.०३.२०२३ रोजी भिगवण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार एफ.आय.आर दाखल केलेली आहे. ही वस्तुस्थिती पहाता विलंब झालेला नाही.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१२३ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक ०७, दिनांक २ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यातील कारखान्यामधील कार्यकारी संचालक व संबंधित दोषी संचालकाविरूद्ध गुन्हे दाखल करणे.
प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ श्री. अतुल सावे :** या प्रकरणी सुनावणी घेवून किती दंड आकारण्यात आला ही बाब आपल्याला अवगत करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** बारामती ॲग्रो लि. शेटफळ, ता. इंदापूर, जि. पुणे या कारखान्याने सन २०२२-२३ च्या गाळप हंगामात कारखान्याने विनापरवाना गाळप केल्याप्रकरणी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदे १९८४ च्या खंड ४ व दि. १४/१०/२०१५ चे शासनाच्या अधिसूचनेतील खंड २ (अ) मधील तरतूदी अन्वये कारखान्याने हंगाम २०२२ - २३ मध्ये विना परवाना गाळप केलेल्या ९०० टन ऊस गाळपावर रु.५००/- प्रति टन प्रमाणे ₹.४,५०,०००/- दंडात्मक कारवाईचे आदेश साखर आयुक्तालया मार्फत दि. २३ मार्च २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१२४ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक ०७, दिनांक २ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यातील कारखान्यामधील कार्यकारी संचालक व संबंधित दोषी संचालकाविरूद्ध गुन्हे दाखल करणे.
प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ श्री. अतुल सावे :** सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार साखर आयुक्तांना बाजुला ठेवून या प्रकरणी चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची कार्यवाही करण्यात येईल. मी पुन्हा सांगतो की, साखर आयुक्तांना बाजुला ठेवून हे करु.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विनापरवाना गाळप झाल्याबाबत चौकशी करण्यासाठी स्वतंत्ररित्या अपर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था, पुणे यांना आदेशीत केले होते. अपर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी सदर अहवाल दि.१५/०२/२०२३ रोजी साखर आयुक्तालयास पाठविण्यात आला होता. साखर आयुक्तांनी सदर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी दि. १६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती अपर निबंधक सहकारी संस्था, यांनी दि. १४/०३/२०२३ रोजी उपलब्ध करून दिली. दि. १५/०३/२०२३ व दि. २०.०३.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीअंती कारखान्याने विनापरवाना गाळप केल्याप्रकरणी महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश १९८४ च्या खंड ४ नुसार रू. ४,५०,०००/- दंडात्मक कारवाईचे आदेश साखर आयुक्तालया मार्फत दि. २३ मार्च २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच कारखान्याने मा. मंत्री समितीच्या दि. १९.०९.२०२२ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्याने कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. सुभाष गुळवे यांच्यावर दि. ०८.०३.२०२३ रोजी भिगवण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार एफ.आय.आर दाखल केलेली आहे. अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या अहवालामध्ये निरिक्षण व निष्कर्षात नमूद केले नुसार मा. मंत्री समितीमधील दि.१९/०९/२०२२ रोजीचा निर्णय व साखर आयुक्तालयाकडील दि.२२/०९/२०२२ रोजीच्या परिपत्रकीय सूचना पहाता साखर आयुक्त, यांच्यास्तरावरून कारवाई करण्याचे स्वतंत्र आदेश देणे अपेक्षित व अभिप्रेत नाही. यावरून साखर आयुक्त, पुणे यांचा दोष दिसून येत नाही. तथापि सदर प्रकरणी प्रथम चौकशी अधिकारी यांच्या चुकीच्या अहवालमुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई झालेली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

२६६ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १२, दिनांक १६ मार्च २०२३.

(२) **विषय.—** सहकार आयुक्तालयातंर्गतच्या पतसंस्थांच्या कार्यक्षेत्र वाढ व शाखाविस्तार प्रस्तावांना मान्यता देताना गैरव्यवहार झाल्याबाबत.

श्री. जयंत पाटील वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. १६९३२.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ सहकार श्री. अतुल सावे :** सभापती महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठक आयोजित केली जाईल. सदर बैठकीत प्रशासनातील अधिकारी आणि पतसंस्थेतील संचालकांना उपस्थित न राहण्याबाबत कळविले जाईल. सदरहू बैठकीत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** कार्यवाही पूर्ण झाल्याबाबत दि. १४.०६.२०२४ रोजी संसदीय कार्य विभागास कळविण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

२८८ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १३, दिनांक १७ मार्च २०२३.

(२) **विषय.—** सांगली जिल्ह्यातील सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून शेतकऱ्यांनी जीवन संपवणे बाबत.

श्रीम. उमा खापरे व इतर यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २६०.

(३) **आश्वासन.—मा. उप मुख्यमंत्री/ श्री. देवेंद्र फडणवीस :** कारण जिल्हाधिकारी, उप निबंधक, पोलिस अधिक्षक यांच्याकडे काम जास्त असल्यामूळे ते नियमित बैठक घेऊ शकत नाहीत. त्यामूळे अनेक वेळा गोष्टी पडून राहतात. त्यामुळे ते किंवा त्यांचा वरिष्ठ लेव्हलचा प्रतिनिधी असा बदल आपण त्यामध्ये करू. जेणे करून या संदर्भातील बैठका नियमीत होतील.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** राज्यात अनधिकृत सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करणे तसेच सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दि. १.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर समितीच्या नियमित बैठका

होत असल्याचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, सांगली यांनी सादर केला आहे. तथापि, सदर आश्वासनाच्या अनुषंगाने सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक अथवा त्यांचे प्रतिनिधी असा बदल करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

३१९ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १३, दिनांक १७ मार्च २०२३.

(२) **विषय.—** रॉयल्टीच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न कसे वाढेल.

श्री. प्रसाद लाड यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेदरम्यान दिलेल्या सुचना.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री दिपक केसरकर सामान्य प्रशासक :** निश्चितपणे सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**सदर आश्वासनाच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ जून २०२५ रोजी बैठक घेण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार शासनाकडून वेळोवेळी गौण खनिजाचे स्वामित्वधनाचे दर निश्चित करण्यात येतात. तसेच सामान्य नागरिकांना सहज वाळू/रेती उपलब्ध होण्यासाठी व शासनाचा महसूल वाढण्याच्या दृष्टीने दिनांक ८ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयान्वये "वाळू/रेती" निर्गती धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच दिनांक २३ मे २०२५ च्या शासन निर्णयान्वये "राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा वापर करण्याकरिता धोरण निश्चित करण्यात आले आहे." त्यामुळे गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या स्वरूपात शासनास महसूल प्राप्त होणार आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन (वने) विभाग

३३१ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १४, दिनांक २० मार्च २०२३.

(२) **विषय.—** धामोळे गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.

श्री. आंबादास दानवे, वि.प.स. यांनी वि.प.स. नियम ९३ अन्वये दिलेली सूचना क्र. २५.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री/ सहकार श्री. उदय सामंत :** १५ दिवसांच्या आत ६.४५ लाख रुपयांच्या कामाला मंजुरी दिली जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—**सदर आश्वासन नगर विकास विभागाशी संबंधित असल्याने त्यांच्या सहमतीने सदर आश्वासनाचे हस्तांतरण नगर विकास विभागाकडे करण्यात आले आहे. याबाबत शासन पत्र दिनांक ३ जून २०२५ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास व विधानमंडळ सचिवालयास कळविण्यात आले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

३४५ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १६, दिनांक २३ मार्च २०२३.

(२) **विषय.—** शासकीय कब्जेहक्काच्या जमिनी रुपांतरण योजनेस मुदतवाढ मिळणेबाबत...

सर्वश्री. अमोल मिटकरी व इतर यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. १७५८१.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री महसूल राधाकृष्ण विखे पाटील :** सदर बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येईल खंडकऱ्यांचे वर्ग-२ करण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. सिंधी समाज जो निर्वासीत म्हणून आलेला आहे, त्यांच्याही बाबतचा निर्णय या बैठकीतच घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** उक्त आश्वासन कार्यासन ज-१ यांच्याकडून दि. १६/०४/२०२४ रोजी या कार्यासनास प्राप्त झाले आहे. सदर आश्वासन हे कार्यासन ल-७ व र-६ या दोन कार्यासनासी संबंधित असून सदर आश्वासनातील कार्यासन ल-७ शी संबंधित मुद्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तथापि,

कार्यासन र-६ यांच्याबाबतच्या मुद्याची माहिती अद्याप प्राप्त नसल्याने उक्त आश्वासन पूर्ततेची कार्यवाही प्रलंबित आहे. कार्यासन र-६ यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर उक्त आश्वासन पूर्ततेची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

१. सदर आश्वासनातील मुद्दा क्र. १ मधील (सदर बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येईल. खंडकऱ्यांचे वर्ग-२ करण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.) विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यात येऊन महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३ हा दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला. उक्त सुधारणा अधिनियमाअन्वये महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील कलम २८-१(अअ) मधील पोट-कलम (३) खाली नवीन पोट-कलम (३-१अ) समाविष्ट करण्यात आले असून त्याअन्वये माजी खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग १ करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. उक्त तरतुदींच्या अनुषंगाने सुधारित मार्गदर्शक सूचना देण्याबाबत क्र. मशेम-२०२०/प्र.क्र. ५०/ल-७, दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

२. तसेच मुद्दा क्र. २ मधील (सिंधी समाज जो निर्वासित म्हणून आला आहे. त्यांच्याही बाबतचा निर्णय या बैठकीतच घेण्यात येईल) विषयाच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ नोव्हेंबर २०२३ रोजी, परिषद सभागृह क्र. ५, ७वा मजला, मंत्रालय व अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या मंत्रालयीन दालनात दि. २७ डिसेंबर २०२३, दिनांक २० जून २०२४ रोजी व मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरून सदर विषयाच्या अनुषंगाने मा. मंत्रिमंडळ प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

सहकार विभाग

३४८ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १६, दिनांक २३ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यातील विशेषतः यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेचा लाभ मिळणेबाबत.

मा. श्री. अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेला मुद्दा.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री / सहकार श्री. अतुल सावे :** मा. सभापती महोदया, आपण सांगितल्याप्रमाणे आपल्या उपस्थितीत बैठक घेऊ.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** मा. सभापती महोदय यांचेकडे दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी बैठकीकरीता दिनांक व वेळ मिळण्याबाबत नस्ती सादर करण्यात आली.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** वगळण्यात यावे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभाग

३९८ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद खंड २०१ क्रमांक १८, दिनांक २५ मार्च २०२३.

(२) **विषय.—** राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती सर्वश्री श्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.स. यांचा २५९ अन्वये प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—मा. उपमुख्यमंत्री / श्री. देवेंद्र फडणवीस :** सन्माननीय सदस्य डॉ. मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्ततेच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/सद्यःस्थिती.—** राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका व सहकारी पतसंस्थांचे कर्ज घेतलेल्या १०३५८ कर्जदारांचा कोविड- १९ मुळे मृत्यू झाला असून सदर कर्जदारांची थकित कर्जाची रक्कम रु. २४२.६२ कोटी इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर मयत कर्जदारांचे वारस संबंधित बँकेच्या / शासनाच्या प्रचलित एक रकमी कर्ज परतफेड योजनेचा लाभ मिळण्यासाठी संबंधित बँकेकडे अर्ज करु शकतात.

(५) **समितीचा अभिप्राय/शेरा.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन	४९, ५६, ५७, ५८, १८४, १८५, १८६, १८७, १८८, १८९, २०२, २०३, २४८, २६८, २७४	१५

सहकार व वस्त्रोद्योग (सहकार) विभाग

४९ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २० जुलै २०२३.

(२) **विषय.—**अकोला जिल्ह्यातील सहकार सोसायट्या व जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांचे संमतीपत्र न घेता परस्पर कर्जाचे पुनर्गठन करणे.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १२

(३) **आश्वासन.—मा. मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील :-** सभापती महोदया, मी आपल्या माध्यमातून सदनाला आश्वस्त करू इच्छितो की, सदर प्रकरणी पूर्ण चौकशी करू, सर्व जिल्ह्यामधील चौकशी करून त्यानंतर शासन स्तरावरुन धोरण ठरवून याबाबतची माहिती आपल्यासमोर मांडली जाईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—** याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचेकडून अमरावती विभागातील ५ जिल्ह्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. उर्वरीत जिल्ह्यांचा अहवाल त्वरीत प्राप्त करून कार्यवाही करण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय.—**प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

५६ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २१ जुलै २०२३.

(२) **विषय.—**वाळू उपसा संदर्भात सर्वश्री अब्दुलखान दुर्राणी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारंकित प्रश्न क्रमांक १९०९८ व सर्वश्री प्रविण दटके व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारंकित प्रश्न क्रमांक १९९२०.

(३) **आश्वासन.— मंत्री :** आम्ही त्याबाबतीत तात्काळ पुढील ८ दिवसांत कारवाई करीत आहेत. शासन स्तराहून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी होऊन कारवाईबाबत शिफारशी येतील, त्याप्रमाणे शासन कारवाई करेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**तत्कालन अप्पर जिल्हाधिकारी, परभणी या पदावर कार्यरत असताना श्री. राजेश श्रीपतराव काटकर यांनी अर्धन्यायिक प्रकरणी गौण खनिज, वक्फ जमिनी विषयक कामकाजात केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, यांच्याकडून दिनांक १५ सप्टेंबर २०२२ च्या पत्रान्वये विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असता, विभागाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२२ च्या पत्रान्वये अनियमिततेत आर्थिक नुकसान झाले आहे किंवा कसे? याबाबत अभिप्राय विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून मागविण्यात आले. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अभिप्राय विचारात घेऊन विभागाने श्री. काटकर यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९८९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

५७ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २१ जुलै २०२३

(२) **विषय.—**वाळू उपसा संदर्भात सर्वश्री अब्दुलखान दुर्राणी व इथर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारंकित प्रश्न क्रमांक १९०९८ व सर्वश्री प्रविण दटके व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारंकित प्रश्न क्रमांक १९९२०.

(३) **आश्वासन.—**त्याबाबतीत शासन निश्चितपणे जो काही १-२ महिन्यांचा कालावधी लागेल त्यामध्ये एक धोरण लवकर जाहीर करणार आहे.

सभापती महोदय, आपण सूचित केल्याप्रमाणे तारांकित प्रश्न क्रमांक १९०९८, तारांकिंत प्रश्न क्रमांक १९९२० व तारांकित प्रश्न क्रमांक १९०७० या तीन प्रश्नांचे विषय सारखेच असल्यामुळे सोमवारी किंवा मंगळवारी समनाननीय सदस्यासोबत स्वतंत्र बैठक आपल्या दालनात घेण्यात येईल. त्यावेळी जे प्रश्न असतील व त्या अनुषंगाने जी आवश्यक कारवाई करायची आहे ती निश्चितपणे करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**श्री. उमाकांत दांगट याचा समितीचा अहवाल आल्यानंतरच या आश्वासनावर कार्यवाही करणे योग्य होणार आहे.

मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे बेठक आयोजित करण्यासाठी वेळ व दिनांक देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. अपिल निश्चित करण्यासाठी दांगट समितीची कार्यवाही सुरू.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

१८६ (१) **संदर्भ व दिनांक.—**खंड क्रमांक २०२, दिनांक २८ जुलै २०२३

(२) **विषय.—**पुणे (ता. दौंड) येथील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत. डॉ. श्रीमती मनिषा कायंदे व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्रमांक १९५३४

(३) **आश्वासन.—मा. मंत्री / श्री. दिलीप वळसे-पाटील :—** त्याकरिता चौकशी अधिकारी विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, (साखर) पुणे यांची नेमणुक केलेली आहे. वरीलप्रमाणे चौकशी पुर्ण करण्यासंदर्बात कार्य़वाही सुरु आहे. चौकशीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग पुणे यांनी त्यांचे जा.क्र.प्राससंसा / प्रशा/ भिमा पाटस ससाका / क्रं८३ सु.आदेश/ ३९१/ २०२३ दिनांक १९/०४/२०२३ रोजी सुधारित महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश श्री.डी.एन. पवार विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) पुणे यांना देण्यात आले आहे. चौकशी संबधात कारखान्यास विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) पुणे यांनी दिनांक १९/०६/२०२३ व १०/०७/२०२३ रोजी चौकशी मुद्या संदर्भात आवश्यक दप्तर उपलब्ध करून देण्या विषयी कळविलेले असता, कारखान्याने विलेप वर्ग-१ सह संस्था, साखर पुणे यांना पत्र देवून सधःस्थितीत कारखान्याकडे कायम कर्मचारी नाहीत असे कळविले, तसेच दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने SARFA-ESI ॲक्टनुसार श्री. साईप्रिया शुगर्स लि. हिप्पागिरी मलगुर ता. जमखंडी जि. बालाकोट पिन-५८७३०१ (कर्नाटक) या कंपनी सोबत भाडेतत्त्वाचा करार केलेला आहे. कलम ८३ अन्वये चौकशी पूर्ण करणे संदर्भात विलेप वर्ग-१ साखर पुणे यांनी चौकशी कामी पाठपुरावा सुरु असतांना मा. मंत्री, यांचे समोर कारखान्याने महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६० चे कलम १५४ अन्वये पुनरीक्षण अर्ज कलम ८३ चौकशी आदेश विरुध्द अर्ज दाखल केला होता. त्यास मा. मंत्री महोदय, यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक-आरव्हीए-२०२३/प्र.क्र.४४६/१५-स मंत्रालय मुंबई -३२, दिनांक १३/१०/२०२३ अन्वये प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे यांनी कलम ८३ अन्वये पारित केलेले चौकशी आदेश रद्द केलेले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—**वगळण्यात यावे.

५८ (१) **संदर्भ व दिनांक.—**खंड क्रमांक २०२, दिनांक २१ जुलै २०२३.

(२) **विषय.—** वाळू उपसासंदर्भात सर्वश्री अब्दुल दुर्राणी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्रमांक १९०९८ व सर्वश्री प्रविण दटके व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. १९९२०.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील** : सभापती महोदया आपण सूचित केल्याप्रमाणे तारांकित प्रश्न क्र. १९०९८, तारांकित प्रश्न क्र. १९९२० व तारांकित प्रश्न क्र. १९०७० या तीन प्रश्नांचे विषय सारखेच असल्यामुळे सोमवारी किंवा मंगळवारी सन्माननीय सदस्यांसोबत स्वतंत्र बैठक आपल्या दालनात घेण्यात येईल. त्यावेळी जे प्रश्न असतील व त्या अनुषंगाने जी आवश्यक कारवाई करायची आहे ती निश्चितपणे करण्यात येईल.

(४) **आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कार्यवाही.—**क्र. विपआ-५८/०८२४/प्र.क्र. ३०५/ख-२, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडलेली आहे.) कार्यवाही पूर्ण.

(५) **समितीचा अभिप्राय.—**सदर आश्वासन २०२५ च्या तिसऱ्या अधिवेशनात पटलावर ठेवण्यात आलेले आहे.

महसूल व वन विभाग

२७४ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक ४ ऑगस्ट २०२३

(२) **विषय.—**मा. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, यांनी वि.प.स. यांनी ता. प्र. क्र. १९८१४ संदर्भात उपस्थित केलेला मुद्दा सोलापूर कर्ज वाटपाचे उद्दिष्ट्य पूर्ण करणेबाबत.

(३) **आश्वासन.— मंत्री —: श्री. दिलीप वळसे-पाटील —:** बोजा कमी करण्याच्या संदर्भात राज्याची परिस्थिती पाहता कोणत्या जिल्ह्यात काय घडले ही बाब सन्माननीय सदस्यांनी पत्र दिले किंवा माहिती दिली तर कर्ज देण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यासाठी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक रु. ४२५० कोटी निश्चित करण्यात आला होता. या वर्षात जिल्हयात एकूण रु. ३९०२ कोटी - (९१.८१८ टक्के) पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्जमाफी योजनेचा / एकरकमी कर्ज - परतफेड योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरचे कारण सांगून नव्याने कर्जवाटप करण्यात टाळाटाळ होत असल्याबाबत कोणत्याही शेतकऱ्याची बँकेकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन (वन) विभाग

१८४ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २७ जुलै २०२३

(२) **विषय.—**उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक बाबत सन २०२३ चे वि.स.वि. क्र. २२.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री : श्री. सुधिर मुनगंटीवार :—**मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सदरहू विधेयकांच्या अनुषंगाने माझ्या दालनात बैठक आयोजित केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम २०२३ पारित करण्यात आला असून त्या अन्वये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणाऱ्या नुकसानभरपाईच्या रक्कमेत वाढ करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** विधेयक क्रमांक २२ ऐवजी विधेयक क्रमांक २८ चर्चेस घेण्यात आले. परंतु विषयामध्ये क्रमांक २२ चा उल्लेख आहे विधेयक क्रमांक २८ च्या अनुषंगाने नस्ती मंत्री (वने) यांचे मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

महसूल व वन विभाग

१८५ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २७ जुलै २०२३

(२) **विषय.—**वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रकरण करणे विधेयक .. सन २०२३ चे वि. स. वि. क्र. २८.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री : श्री. सुधिर मुनगंटीवार :—**अधिवेशन संपल्यावर सह्याद्री येथे एक बैठक घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम २०२३ पारित करण्यात आला असून त्या अन्वये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणाऱ्या नुकसानभरपाईच्या रक्कमेत वाढ करण्यात आली आहे. नस्ती मा. मंत्री (वने) मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१८७ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २८ जुलै २०२३

(२) **विषय.—**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाबाबत. श्री. राजहंस सिंह, वि.प.स. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५०६.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री : श्री. सुधीर मुनगंटीवार :—**या विषयाच्या अनुषंगाने दोन्ही सन्माननीय सदस्यांची माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित केली जाणार आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमकांच्या पुनर्वसनाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. (बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे) नस्ती मा. मंत्री (वने) यांचे मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१८८ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २८ जुलै २०२३

(२) **विषय.—**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाबाबत. श्री. राजहंस सिंह, वि.प.स. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५०६.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री : श्री. सुधिर मुनगंटीवार :—**सभापती महोदया, यासंबधी वन विभागाच्या माध्यमातून निश्चित शिफारस केली जाईल. चौकशी करायची असेल तर सन्माननीय सदस्यांनी पत्र द्यावे, मी आपल्याला आश्वस्त करतो की, माननीय आमदारांची समिती करून चौकशी केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जागेवरील अतिक्रमणधारकांचे यापूर्वी केलेले पुनर्वसन उर्वरित अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्यात येत असलेल्या अडचणी यासंदर्भात चौकशी करून उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळातील सदस्यांची दिनांक ११ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे). नस्ती मा. मंत्री (वने) यांचे मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१८९ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २८ जुलै २०२३

(२) **विषय.—**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाबाबत. श्री. राजहंस सिंह, वि.प.स. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५०६.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री : श्री. सुधिर मुनगंटीवार :—**सभापती महोदया, वन विभागाच्या माध्यमातून नोटीस दिली असेल तर ती मागे घेतली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**विधानपरिषदेत झालेल्या चर्चेतील आरे, युनिट क्रमांक २ हे क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारीतील नाही. तसेच सदर ठिकाणी अतिक्रमणधारकांस संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून नोटीस देण्यात आलेल्या नाहीत. नस्ती मा. मंत्री (वने) यांचे मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—**प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

२०२ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक २८ जुलै २०२३

२०३ (२) **विषय.—**अल्याळी (जि. पालघर) येथील गुरचरण जमिनीवर अतिक्रमाण केल्याबाबत. डॉ. श्रीमती मनिषा कायंदे व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्रमांक १९५२२.

(३) **आश्वासन.—** या प्रकरणाची विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून चौकशी करण्यात येईल. खालच्या स्तरावरील अधिकाऱ्याकडून चौकशी करून काही फायदा होणार नाही. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ही चौकशी करण्यात येईल. यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. बनावट दस्तावेज केले असेल तर तेथे असलेले मुद्रांक अधिकारी व त्या विभागाचे अधिकारी यांचा दोष असेल तर कारवाई करण्यात येईल. यामध्ये शासनाची फसवणूक झाली असेल तर अधिकाऱ्यांना फक्त निलंबित करून चालणार नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.

आम्ही विभागीय आयुक्तांना सूचना देत आहोत की, त्यांनी एका महिन्याच्या आत चौकशीची कार्यवाही पूर्ण करावी.

ज्या गावांमध्ये बनावट दस्तावेज होतात, नोटरी किंवा असे प्रकार होतात त्या तालुक्याचे तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. तोरस्कर यांच्या कार्यकाळात काय घडले होते, याबाबतची माहिती मी उपलब्ध करून देईन.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**मौजे-अल्याळी, ता. जि. पालघर येथील जुना स. क्र. ६५, नवीन गट नं.१९८ मधील क्षेत्रावर केलेल्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या निर्देशानुसार सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दि.२७.१२.२०२३ च्या आदेशान्वये सहाय्यक आयुक्त (मावक) व तहसिलदार (महसूल), कोकण विभाग यांची द्विसदस्यीय समिती गठीत केली.

उक्त द्विसदस्यीय समितीने त्यांचा दि.२१.०८.२०२४ रोजीचा चौकशी अहवाल विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत शासनास सादर केला आहे. सदर चौकशी अहवाल व अहवालात नमुद केलेले निष्कर्ष / निरीक्षणे विचारात घेता, मौजे अल्याळी, ता.जि. पालघर येथील जुना स.नं.६५, नवीन ग.नं.१९८/३/अ मधील सरकार (गुरचरण) जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ५०, ५३ अणि ५४ नुसार व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल SUO MOTO PUBLIC INTEREST LITIGATION No.०२/२०२२ मधील मा. न्यायालयाच्या दि.१५.०९.२०२२ रोजीच्या आदेशानुसार तात्काळ निष्कासनाची कार्यवाही करणेबाबत, उक्त जमिनीचे ७/१२ अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश न तपासता दुय्यम निबंधक कार्यालयाने उक्त जमिनीबाबत केलेले सर्व गहाणखतांचे दस्त नियमानुसार रद्द करण्याची कार्यवाही करणेबाबत तसेच तत्कालीन दुय्यम निबंधक, तलाठी, मंडळ अधिकारी व पालघर नगर परिषदेचे तत्कालीन अधिकारी / कर्मचारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करणेबाबत प्रस्तावित करून त्याबाबतचा प्रस्ताव तसेच आश्वासनाची विवरणपत्रे मा. मंत्री (महसूल) महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य करण्यात यावे

महसूल व वन विभाग

२४८ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक ३ ऑगस्ट २०२३

(२) **विषय.—**मौजे वांद्रे (ता. मुरुड, जि. रायगड) येथील वांद्रे ग्रामस्थांकडे असलेल्या शासकीय जमिनीवरील शेत जमिनीचे निष्कासन रद्द करून शेती प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याबाबत... श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेली सूचना क्रमांक १३.

(३) **आश्वासन.—**सन्माननीय सदस्यांची मागणी असेल तर मी या संदर्भात वस्तुनिष्ठ माहिती देण्यास तयार आहे. आपण म्हणत असाल तर मी यासंदर्भात बैठक घेण्यास तयार आहे :—

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सदर आश्वासनाच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ जून २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा.श्री. जयंत पाटील, माजी वि.प.स. तसेच जिल्हाधिकारी, रायगड उपस्थित (व्ही.सी. द्वारे) होते.

सदर बैठकीत मा. मंत्री (महसूल) महोदयांनी मौजे वेळास्ते (वांद्रे), ता. मुरुड, जि. रायगड येथील ग.नं.१८४, १८६, १८७, १९१ व १९२ या मिळकतीवर केलेल्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने मा.श्री. जयंत पाटील, माजी वि.प.स. यांचे समवेत जिल्हाधिकारी, रायगड यांनी संयुक्तीक बैठक घेऊन अतिक्रमणाबाबतच्या कागदपत्रांची छाननी करणेबाबत व तद्नंतर त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

मा. मंत्री (महसूल) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार शासन पत्र क्र. विपआ २०२३/प्र.क्र.४६४/ज-४अ, दिनांक ९ जुलै २०२५ अन्वये बैठकीचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रस्तुत प्रकरणी मा. मंत्री (महसूल) कार्यालयाने बैठकीसाठी वेळ व दिनांक उपलब्ध करून दिल्यानंतर मा. मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्यात येईल. २४/२/२०२६ ला बैठकीची वेळ दिली आहे.

महसूल व वन विभाग

२६८ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०२, दिनांक ३ ऑगस्ट २०२३.

(२) **विषय.—**मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमीपुत्रांच्या समस्या याबाबत...

(३) **आश्वासन.—मंत्री** उप सभापती शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन निवेदन करावे. मा. मंत्री / श्री. राधाकृष्ण विखे-पाटील सभापती महोदया, होय.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**तत्का. मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेले उत्तर विचारात घेता, या प्रकरणी सभागृहात त्याच अधिवेशनात निवेदन होणे अभिप्रेत होते. परंतु असे निवेदन केल्याचे दिसून येत नाही. तथापि याच अधिवेशनात श्री. अशोक उर्फ भाई जगताप, सन्मा. वि.प.स. यांनी विधान परिषद सभागृहात याच आशयाची विशेष उल्लेख सूचना मांडली होती. सदर विशेष उल्लेख सूचनेचे उत्तर श्री. अशोक उर्फ भाई जगताप यांना मा. मंत्री (महसूल) यांच्या स्वाक्षरीने दिनांक २५/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषद नियम-२८९ च्या सूचनेवर निवेदन करण्याचे औचित्य आता शिल्लक राहत नसल्यामुळे सदर आश्वासन प्रलंबित यादीतून वगळण्याबाबत मा. अध्यक्ष, आश्वासन समिती यांना विनंती करण्याबाबत मा. मंत्री (महसूल) महोदयांकडे नस्ती मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

२७४ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद कामकाज खंड : २०२ क्रमांक : १२ दि.०३/०८/२०२३ मा. मंत्री /राज्यमंत्री श्री. यांनी दिलेले उत्तर.

(२) **विषय.—**मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमीपुत्रांच्या समस्या याबाबत... म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना... श्री. भाई जगताप वि.प.स.

(३) **आश्वासन.—मा. मंत्री** / श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : "सभापती महोदया, होय."

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सन-२०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात सन्मा. विधानपरिषद सदस्य यांनी दि.०४/०८/२०२३ रोजी नियम-२८९ च्या सूचनेशी संबंधित विषयाची विशेष उल्लेख सूचना उपस्थित केली होती. या विशेष उल्लेख सूचनेबाबत तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या दिनांक २५/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सन्मा. विधानपरिषद सदस्य यांना संबंधित प्रकरणाची वस्तुस्थिती कळविली आहे. सन्मा. वि.प.स. यांच्या

नियम-२८९ च्या सूचनेबाबत मा. उपसभापती महोदयांच्या निर्देशानुसार सन-२०२३ च्या चालू अधिवेशन सत्रात मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन होणे आवश्यक होते. परंतु सदर अधिवेशन सत्रात मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन होऊ शकले नाही. तथापि, मा. मंत्री (महसूल) यांनी विशेष उल्लेख सूचनेच्या अनुषंगाने सन्मा. विधानपरिषद सदस्य श्री. अशोक उर्फ भाई जगताप यांना वस्तुस्थिती कळविली असल्याने, मा. मंत्री (महसूल) यांच्या दिनांक ०५/०२/२०२५ रोजी पत्रान्वये सदर आश्वासन (आ.क्र. २६८) महसूल व वन विभागाच्या प्रलंबित आश्वासनाच्या यादीतून वगळण्याची विनंती आश्वासन समितीस करण्यात आली होती. परंतु आश्वासन पूर्ततेच्या अनुषंगाने दिनांक १३/०२/२०२५ रोजी आश्वासन समितीसमोर झालेल्या साक्षीवेळी आश्वासन समिती प्रमुख यांनी येत्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात नियम-२८९ च्या अनुषंगाने निवेदन करावे असे निदेश दिले होते. त्यानुसार आश्वासन समिती कक्षाने दिनांक ०२/०३/२०२५ च्या पत्रान्वये निवेदन होईपर्यंत सदरहू आश्वासन क्र. २६८ प्रलंबित ठेवण्यात येईल, असे कळविले होते. त्यानुसार महाराष्ट्र विधानपरिषद नियम-२८९ च्या या सूचनेबाबत मा. मंत्री (महसूल) यांनी दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सभापती महोदयांना निवेदन सादर करून सभापती महोदयांच्या मान्यतेने निवेदनाच्या २५० प्रती दिनांक २०/०३/२०२५ रोजी सर्व सन्मा. विधानपरिषद सदस्यांना सभागृहात वितरित करण्यात आल्या आहेत. कार्यवाही सुरू.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळावे. मान्य करण्यात येत आहे.

सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन	३९, ४०, ४१, ९९, १५३, १५४, १५५,१५६, १५७, १७५, १९१, १९२, १९५	१४

महसूल व वन विभाग

१५२ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक १५/१२/२०२३.

(२) **विषय.—**माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यासंबंधी सर्वश्री. सचीन अहीर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५४८.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :-** शासनाची भूमिका या संदर्भात स्पष्ट आहे की, या प्रकरणात त्यांच्याविरुध्द तात्काळ कारवाई करून जमीन शासनाकडे तांबडतोब घेण्याबाबतच्या सुचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील. पुढील तीन महिन्यामध्ये सर्व ट्रस्टची चौकशी मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांनी ताबडतोब पूर्ण करावी. शासनाची जेथे अशी फसवणूक झाली असेल त्या सर्व ट्रस्ट वर कारवाई करण्यात येईल. जे भाडेकरु तेथे अनेक वर्ष राहतात, त्यांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. शासन निश्चितपणे त्या संदर्भात देखील विचार करेल.

सर्व प्रकरणांमध्ये दिरंगाई का झाली, दोषी कोण आहेत, नियमबाह्य पध्दतीने नुतनीकरणाचे अधिकार नसतांना परवानगी देणारे कोण आहेत याची चौकशी केली जाईल आणि दोर्षीवर कारवाई केली जाईल.

विशेष माहिम घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

जे लोक आहेत त्यांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनेचा निश्चित विचार केला जाईल.

सभापती महोदया, आपण ज्या सूचना केल्या त्यानुसार सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुचना देण्यात येतील. अशा सर्व शासकीय भुखंडासंदर्भात जेथे अतिक्रमण झाले असेल बेकायदेशीर कब्जा घेतला असेल. मुदत संपली असेल, त्यासाठी जी कारवाई करण्याची आवश्यकता आहे ती करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सदर आश्वासन वगळण्याची विनंती मा. समिती प्रमुख, विधानपरिषद आश्वासन समिती यांना दि.२४.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे.

दि.०१.०८.२०२४ रोजीच्या क् पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी त्यांच्या दि. १२.०८.२०२४ च्या पत्रान्वये शासनास सादर केली होती. तद्नंतर सदर आश्वासनाच्या अनुषंगाने दि.२८.०८.२०२४ च्या पत्रान्वये नुतनीकरणास शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली आहे. तसेच आश्वासन क्र. १५३ ते १५८ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी स्तरावरुन विशेष मोहिम राबविण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य, आश्वासन वगळण्यात यावे.

१५३ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद क्रमाक १५३ खंड-२०३ क्र.७, दिनांक १५ डिसेंबर, २०२३.

(२) **विषय.—**माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी सर्वश्री सचीन अहीर व इतर वि.प.स. यांनी म-वि-पः नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५४८.

(३) **आश्वासन.—** सभापती महोदया, नियमाचे उल्लंघन झाले आहे. अनधिकृत वापर होत आहे, अशा सर्व जमिनींच्या बाबतीत विशेष मोहिम घेऊन सर्व जमिनी शासनाकडे जमा - करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—** सदर आश्वासनाच्या अनुषंगाने दि.०१.०८.२०२४ व दि.०५.०२.२०२५ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना विशेष मोहिम राबविण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या आहेत.

मुंबई शहर जिल्ह्यात शासकीय भाडेपट्टयाच्या एकुण १३०७ मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी ६९१ मिळतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. भाडेपट्टा संपुष्टात आलेला मिळतीपैकी २८५ मिळकतीची तपासणी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून करण्यात आली.

२८५ तपासणी करण्यात आलेल्या प्रकरणापैकी १२१ प्रकरणात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टानूतनीकरण करून एकुण भुईभाडे रू.८९,२३,०४,०९३/- इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे.

भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या ६९१ पैकी २८५ बाबत असून उर्वरित ४०६ प्रकरणात जिल्हाधिकारी स्तरावर तपासणी सुरू आहे.

सदर १२१ प्रकरणापैकी ६४ प्रकरणात शर्तभंग आढळून आल्याने, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शर्तभंग नियमानुकुल करण्यात आला आहे व त्यामधून शासनास रू.२११,१२,५२,१८९/- इतका महसूल प्राप्त झाला आहे. व उर्वरित ५७ प्रकरणात शर्तभंग आढळून आलेला नाही.

मुंबई उपनगर जिल्ह्यात शासकीय भाडेपट्टयाच्या एकुण ३५९ मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी २२३ मिळतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. २२३ मिळकतीपैकी एकुण ४२ मिळकतीच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणेत आले आहे. तसेच २० मिळकतीचे भोगवटादार वर्ग-२ मध्ये रूपांतरण करणेत आले व ३३ मिळकतीचे वर्ग-१ मध्ये रूपांतरण करणेत आले आहे.

भाडेपट्टयाचे नुतनीकरण व भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करतेवेळी ११ प्रकरणांमध्ये शर्तभंग आढळून आलेले आहेत. सदर शर्तभंग शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नियमानुकूल करण्यात आला आहे. व त्यामधून शासनास रू. ३१,९१,१०,८३०/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर मधून भाडेपट्टा नुतनीकरण, शर्तभंग नियमानुकुल व भोगवटादार वर्ग-१ रुपांतरणान्वये शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासनास एकूण रक्कम रु.३३२,२६,६७,११२/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

उपरोक्त माहिती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचे दि.१२.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये तसेच जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी त्यांचे दिनांक २७.०२.२०२५ व दि.१२.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** विपआ-२५२४/प्र.क्र. ०२/ज-२, दि.१०.०४.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.) कार्यवाही पूर्ण

१५४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमाक १५४ खंड-२०३ क्र.७, दिनांक १५ डिसेंबर २०२३.

(२) **विषय.—** माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी... सर्वश्री सचीन अहीर व इतर नि वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.५४८.

(३) **आश्वासन.—** सदर विषयाबाबतची संपूर्ण माहिती घेऊन लोकहिताच्या दृष्टीने त्यांच्याही पुनर्वसनाच्या बाबतीत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**शासनाने प्रदान केलेल्या भाडेपट्टयाच्या जमिनीबाबत शासन निर्णय दि.१२.१२.२०१२ मधील तरतुदीनुसार नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते. व सदर जमिनीमध्ये शर्तभंग आढळल्यास शासन निर्णय दि.१४.०६.२०१७ व दि.०६.११.२०१८ अन्वये नियमित केला जातो. तसेच, सदर मिळकतीचा शासन निर्णय दि.१३.०४.२०१७अन्वये पुनर्विकास करण्यात मंजूरी देण्यात येते. त्यामुळे जे भाडेकरु तेथे अनेक वर्ष राहतात त्यांचे वरील शासन निर्णयामुळे संरक्षण होते.

(५) **समितीचा अभिप्राय.—** विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, दि.१०.०४.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.) कार्यवाही पूर्ण.

१५५ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमाक १५५ खंड-२०३ क्र.७, दिनांक १५ डिसेंबर, २०२३.

(२) **विषय.—** माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी... सर्वश्री सचीन अहीर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.५४८.

(३) **आश्वासन.—** सर्व प्रकरणांमध्ये दिरंगाई का झाली, दोषी कोण आहेत, नियमबाह्य पध्दतीने नुतनीकरणाचे अधिकार नसतांना परवानगी देणारे कोण आहेत याची चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**माझगांव महसूल विभागातील भूकर क्र.३६५, व भुकर क्र.३६९ ही मिळकतचा भाडेपट्टा दि.३१.१२.२००२ रोजी संपुष्टात आलेला होता. त्यादरम्यान भाडेपट्टा नूतनीकरण धोरण दि.०५.१०.१९९९ याला मा. मुंबई उच्च न्यायालयात आव्हानीत केले होते. तद्नंतर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दि.१२.१२.२०१२ रोजीचे नूतनीकरण धोरण तयार करण्यात आले. या धोरणानुसार नूतनीकरणाचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

सदर धोरणाच्या अनुषंगाने जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट यांनी दि.२२.१०.२०१६ व रोजीच्या अर्जान्वये भाडेपट्टा नूतनीकरणाकरीता अर्ज सादर केला होता. यानुसार जिल्हाधिकारी यांनी भुईभाडयाची रक्कम भरण्याबाबतचे आदेश दिले.

(५) **समितीचा अभिप्राय.—** विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, दि.१०.०४.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.)

१५६ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमाक १५६ खंड-२०३ क्र.७, दिनांक १५ डिसेंबर, २०२३.

(२) **विषय.—** माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी... सर्वश्री सचीन अहीर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.५४८.

(३) **आश्वासन.—** विशेष माहिम घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सदर आश्वासनाच्या अनुषंगाने दि.०१.०८.२०२४ व दि.०५.०२.२०२५ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना विशेष मोहिम राबविण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या आहे.

मुंबई शहर जिल्ह्यात शासकीय भाडेपट्टयाच्या एकुण १३०७मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी ६९१ मिळकतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. भाडेपट्टा संपुष्टात आलेला मिळतीपैकी २८५ मिळकतीची तपासणी करण्यात आली.

२८५ तपासणी करण्यात आलेल्या प्रकरणापैकी १२१ प्रकरणात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टानुतनीकरण करून एकुण भुईभाडे रू.८९,२३,०४,०९३/- इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या ६९१ पैकी झालेली असून उर्वरित ४०६ प्रकरणात जिल्हाधिकारी स्तरावर तपासणी सुरू आहे.

सदर १२१ प्रकरणापैकी ६४ प्रकरणात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शर्तभंग नियमानुकुल करण्यात आला आहे व त्यामधून शासनास रू. २११,१२,५२,१८९/- इतका महसूल प्राप्त झाला आहे. व उर्वरित ५७ प्रकरणात शर्तभंग आढळून आलेला नाही.

मुंबई उपनगर जिल्ह्यात शासकीय भाडेपट्टयाच्या एकुण ३५९ मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी २२३ मिळतीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. २२३ मिळकतीपैकी एकुण ४२ मिळकतीच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणेत आले आहे. तसेच २० मिळकतीचे भोगवटादार वर्ग-२ मध्ये रपांतरण करणेत आले व ३३ मिळकतीचे वर्ग-१ मध्ये रूपांतरण करणेत आले आहे.

भाडेपट्टयाचे नुतनीकरण व भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करतेवेळी ११ प्रकरणांमध्ये शर्तभंग आढळून आलेले आहेत. सदर शर्तभंग शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नियमानुकूल करण्यात आला आहे. व त्यामधून शासनास रू.३१,९१,१०,८३०/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर मधून भाडेपट्टा नुतनीकरण, शर्तभंग नियमानुकुल व भोगवटादार वर्ग-१ रुपांतरणान्वये शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासनास एकूण रक्कम रु.३३२,२६,६७,११२/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

उपरोक्त माहिती जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी त्यांचे दिनांक २७.०२.२०२५ व दि.१२.०६.२०२५ तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचे दि.१२.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, ०.०४.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. प्रत सोबत जोडली आहे.)

१५७ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमाक १५७ खंड-२०३ क्र. ७, दिनांक १५ डिसेंबर, २०२३.

(२) **विषय.—** माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी...

सर्वश्री सचीन अहीर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.५४८.

(३) **आश्वासन.—** सभापती महोदया, आपण ज्या सुचना केल्या त्यानुसार सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुचना देण्यात येतील. अशा सर्व शासकीय भुखंडासंदर्भात जेथे अतिक्रमण झाले असेल बेकायदेशीर कब्जा घेतला असेल, मुदत संपली असेल, त्यासाठी जी कारवाई करण्याची आवश्यकता आहे ती करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—** शासनाने प्रदान केलेल्या भाडेपट्टयाच्या जमिनीबाबत शासन निर्णय दि.१२.१२.२०१२ मधील तरतुदीनुसार नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते. व सदर जमिनीमध्ये शर्तभंग आढळल्यास शासन निर्णय दि.१४.०६.२०१७ व दि.०६.११.२०१८ अन्वये नियमित केला जातो. तसेच, सदर मिळकतीचा शासन निर्णय दि.१३.०४.२०१७ अन्वये पुनर्विकास करण्यास मंजूरी देण्यात येते. त्यामुळे जे भाडेकरु तेथे अनेक वर्ष राहतात त्यांचे वरील शासन निर्णयामुळे संरक्षण होते.

(५) **समितीचा अभिप्राय.—** (१) जमीन-२५०५/प्र.क्र.४०५/ज-२, दि. १२.१२.२०१२

(२) जमीन-२५१२/०७/प्र.क्र.३०/ज-२ दि.१३.०४.२०१७

(३) जमीन-२५१६/प्र.क्र.१६/ज-२ दि.१४.०६.२०१७

(४) जमीन-२५१८/.क्र.५/ज-२ दि.०६.११.२०१८

प्रत सोबत जोडली आहे.

पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभाग

४० (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक ११/१२/२०२३.

(२) **विषय.—**स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत. मा. सर्वश्री. ॲड. अनिल परब व इतर वि.प.स यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २१९५९.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री.दिलीप वळसे-पाटील** :- तसेच बँकेच्या संदर्भात ज्या अनियमितता झालेल्या आहेत त्या दुरुस्त करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल. तसेच या संदर्भात राज्य शासनाकडून सहकार आयुक्तांना ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार सहकार आयुक्त पुढील कार्यवाही करतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**बँकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ पाटील हे सदर पदासाठी विहीत केलेली अर्हता पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी दि. २८.११.२०२३ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेस अहवाल सादर केला आहे. तसेच श्री. सौरभ पाटील यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत कलम ७९ अन्वये दि.२७.१२.२०२३ व २६.०९.२०२४ रोजी बँकेस निर्देश दिले आहेत. सदर बँक सहकार आयुक्त व निबंधक यांच्या निर्देशांचे पालन करीत नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ११०अ अन्वये बँकेवर प्रशासक नेमणेबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी दि. २६.०६.२०२४ च्या पत्रान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेस कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सहकार विभाग

३९ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक ११/१२/२०२३.

(२) **विषय.—**स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत. मा. सर्वश्री. ॲड. अनिल परब व इतर वि.प.स यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २१९५९.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री.दिलीप वळसे-पाटील :—**या संदर्भात राज्य शासनाकडे चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या संदर्भात पुढे कोणती कार्यवाही करायची, रिझर्व बँकेला काय सांगायचे, सरकारने काय करायचे? याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**बँकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ पाटील हे सदर पदासाठी विहीत केलेली अर्हता पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी

दि. २८.११.२०२३ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेस अहवाल सादर केला आहे. तसेच श्री. सौरभ पाटील यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत कलम ७९ अन्वये दि.२७.१२.२०२३ व २६.०९.२०२४ रोजी बँकेस निर्देश दिले आहेत. सदर बँक सहकार आयुक्त व निबंधक यांच्या निर्देशांचे पालन करीत नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ११०अ अन्वये बँकेवर प्रशासक नेमणेबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी दि. २६.०६.२०२४ च्या पत्रान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेस कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सहकार विभाग

४१ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक ११/१२/२०२३.

(२) **विषय.—**स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत. मा. सर्वश्री. ॲड. अनिल परब व इतर वि.प.स यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २१९५९.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री.दिलीप वळसे-पाटील** सभापती महोदया, दोन महिन्यांमध्ये या बाबतीत सर्व कार्यवाही पूर्ण केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**बँकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ पाटील हे सदर पदासाठी विहीत केलेली अर्हता पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी दि. २८.११.२०२३ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेस अहवाल सादर केला आहे. तसेच श्री. सौरभ पाटील यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत कलम ७९ अन्वये दि.२७.१२.२०२३ व २६.०९.२०२४ रोजी बँकेस निर्देश दिले आहेत. सदर बँक सहकार आयुक्त व निबंधक यांच्या निर्देशांचे पालन करीत नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ११०अ अन्वये बँकेवर प्रशासक नेमणेबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी दि. २६.०६.२०२४ च्या पत्रान्वये भारतीय रिझर्व्ह बँकेस कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सहकार विभाग

९९ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक १३ डिसेंबर २०२३.

(२) **विषय.—**ऊस तोडणी मजूरांसाठी राज्यामध्ये कायदा अस्तित्वात नसणे यासंबंधी श्री. सुरेश धस, वि.प.स यांनी म.वि.प नियम १०१ अन्वये दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.४३२.

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री.दिलीप वळसे-पाटीलः-** कामगारांना पूर्ण संरक्षण देणे व मुकादम यांच्याकडील पैसे बुडणार नाहीत याबाबत आवश्यक ती व्यवस्था किंवा कायदा केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**शासनाने दि. ७ मार्च, २०२५ चे पत्रान्वये साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली असून साखर कारखाना व्यवस्थापन, वाहतूकदार, मुकादम आणि ऊस तोडणी कामगार यांच्यातील उचल (अग्रीम) रक्कम वाटप याबाबत अहवाल सादर करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत. शासन त्यावर निर्णय घेण्यात येईल. अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन त्यावर निर्णय घेण्यात येईल.

(५) **समितीचा अभिप्राय.—** समितीचे अभिप्राय व रोटा वगळण्यात यावे.

सहकार विभाग

१७५ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक १५/१२/२०२३.

(२) **विषय.—**मा. श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी उपस्तित केलेला मुद्दा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामधील एनटीसी प्रवर्गाच्या बिंदूनामावली तपासणीतील त्रुटी दूर करणेबाबत उपस्थित मुद्दा.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. दिपक केसरकर :—** तो विषय माझ्या खात्याशी संबंधित नसला तरी संबंधित अधिकारी त्याला उत्तर देतील व संबंधित मंत्री महोदय योग्य तो निर्णय घेतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**दिनांक १९/५/२०२५ रोजी आश्वासनपूर्तीच्या ३५ प्रती संसदीय कार्य विभागास पाठविण्यात आल्या आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सहकार विभाग

१९१ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक १८/१२/२०२३.

(२) **विषय.—**अमरावती जिल्हयातील जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाने नियमबाह्य पध्दतीने कर्जाचे वाटप केल्याबाबत. श्रीमती उमा खापरे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २१७२१.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री / श्री.दिलीप वळसे-पाटील :-** मी आता स्वतः यावर मॉनीटरींग करेन व लवकर ही चौकशी पूर्ण कशी होईल याबाबत आपण प्रयत्न करू.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सहकार आयुक्त व निबंधक यांच्या दि.०९/११/२०२३ च्या आदेशानुसार सदर बँकेची कलम ८३ अन्वये चौकशी करणे करीता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोर्शी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. मंत्री (सहकार) यांच्या दि.१५/०७/२०२४ च्या आदेशान्वये सदर चौकशीस स्थगिती देण्यात आली आहे.

तथापि, आश्वासनाची पूर्तता होण्याच्या दृष्टीने सदर स्थगिती उठविण्याबाबत मा. मंत्री (सहकार) यांना नस्ती सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सहकार विभाग

१९२ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक १८/१२/२०२३.

(२) **विषय.—**अमरावती जिल्ह्यातील जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाने नियमबाह्य पध्दतीने कर्जाचे वाटप केल्याबाबत.श्रीमती उमा खापरे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २१७२१.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री / श्री.दिलीप वळसे-पाटील :-** या संदर्भात समिती नियुक्त केलेली आहे त्याचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त करून काही बँकांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन आपण निर्णय घेऊ. या बँकाना कोणत्या प्रकारे योग्य दिशा दाखवता येईल व त्यांच्याकडून हे काम करून घेता येईल यासंबंधी आपण निर्णय घेऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**सहकार आयुक्त व निबंधक यांच्या दि.०९/११/२०२३ च्या आदेशानुसार सदर बँकेची कलम ८३ अन्वये चौकशी करणे करीता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोर्शी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. मंत्री (सहकार) यांच्या दि.१५/०७/२०२४ च्या आदेशान्वये सदर चौकशीस स्थगिती देण्यात आली आहे.

तथापि, आश्वासनाची पूर्तता होण्याच्या दृष्टीने सदर स्थगिती उठविण्याबाबत मा. मंत्री (सहकार) यांना नस्ती सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सहकार विभाग

१९५ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०३, दिनांक १८/१२/२०२३.

(२) **विषय.—**राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊसतोडणी यंत्रासाठी अनुदान निधी दिला नसल्याबाबत. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील व इतर, विपस यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २२०९४.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री / श्री. दिलीप वळसे-पाटील :-**सभागृहातील सदस्यांच्या, शेतकऱ्यांच्या व साखर कारखानदारांच्या भावनांचा विचार करून हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेण्यात येईल. यासाठी एक योजना तयार करण्यात येईल. त्यानंतर याबाबतचा निर्णय करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—**राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या दोन वर्ष कालावधीत ९०० ऊस तोडणी यंत्र खरेदीवर खरेदी किंमतीच्या ४०% अथवा रु.३५ लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदान स्वरूपात देणेबाबत दि.२०.०३.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. सदर प्रकल्पात अनुदानासाठी केंद्र हिस्सा ६० % व राज्य हिस्सा ४०% आहे. त्यानुसार प्रकल्पाची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. ऊस तोडणी यंत्रासाठी देण्यात येणारे अर्थ सहाय्याची मोठी रक्कम ही बाब विचारात घेता राज्याचे अर्थिक थिती विचारात घेऊन अशा प्रकारची योजना नव्याने घेता येईल काय याबाबत विभागस्तरावर तपासणी सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** वगळण्यात यावे.

सन २०२४ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२४ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन	१३	०१

महसूल व वन विभाग

१३ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०५, दिनांक २९/२/२०२४.

(२) **विषय.—**सन २०२४-२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(३) **आश्वासन.—** या पर्टिक्युलर केसची नुकसानभरपाई निबंधक, भूसंपादन यांच्याकडे जमा केलेली असून या केसमध्ये आवश्यक तो निर्णय झाल्यानंतर ती नुकसानभरपाई संबंधित शेतकऱ्याला मिळेल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेल्या विशिष्ट केसचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून मागविला होता. त्यांनी भिवंडी, कल्याण आणि ठाणे या तीनही ठिकाणी जेथे बुलेट ट्रेनच्या प्रकल्प होते तेथे चौकशी केली पण त्यांच्याकडे कशी कोणत्याही प्रकारची केस आढळून आलेली नाही. त्यामुळे ही विशिष्ट केस सापडत नसल्यामुळे किंवा ओळखली जात नसल्यामुळे हे आश्वासन वगळण्याची विनंती केली आहे.

सदर आश्वासन वगळण्याबाबत दि.२४.०९.२०२४ रोजी मा. समिती प्रमुख, विधानपरिषद यांना विनंती करण्यात आलेली आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य, आश्वासन वगळण्यात यावे.

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन	११०, १११, ११२, १२०, १२१, १२२, १२३, १२६, १७८	०९

महसूल व वन विभाग

११० (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०६, दिनांक ९/७/२०२४

(२) **विषय.—**नंदूरबार जिल्ह्यातील अक्क्लकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करण्याची होत असलेली मागणी यासंबंधी

श्री. आमश्या पाडवी वि.प.स. यांनी मविप नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४१६.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील :—** अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यासंबंधी समितीने २५ तारखेपर्यंत किंवा या महिन्याअखेर शासनाला अहवाल सादर करावा. शेवटी पदांची निर्मिती करणे, तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही आणि तहसील कार्यालयाची निर्मिती करताना प्राधान्यक्रम कशाला दिला पाहिजे यासंदर्भात समिती शासनास शिफारस करील. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :- निश्चितपणे समितीला या बाबी देखील तपासून पाहाण्यास सांगण्यात येईल.

मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :- या संदर्भात निकष तयार करीत असताना लोकसंख्या हा घटक प्रामुख्याने विचारात घेवून जनतेला जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध होण्याकरीता आपण केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. तसेच त्यांना पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. त्यामुळे समितीला ही बाब सोपवित असताना शासन स्तरावरुन निश्चितपणे निर्णय घेऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात मोलगी येथे स्थानिक प्रशासकीय गरज विचारात घेऊन दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये तात्पुरते अपर तहसील कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तथापि, सदर कार्यालयाकरीता नियमित पदे देऊन कार्यालय स्थापित करणे ही धोरणात्मक बाब असल्याने कालमर्यादेत निर्णय घेणे शक्य नाही. यास्तव, आश्वासन क्रमांक ११०, १११, ११२ वगळण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर आश्वासन वगळण्याबाबत दि २९ मे २०२५ रोजी मा. समिती प्रमुख विधानपरिषद यांना विनंती करण्यात आलेली आहे. (सोबत पत्र जोडले आहे)

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य, वगळण्यात यावे.

१११ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद क्रमाक १११ खंड-२०६ क्र.१०, दिनांक ९ जुलै, २०२४.

(२) **विषय.—** नंदूरबार जिल्हयातील अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करण्याची होत असलेली मागणी यासंबंधी श्री. आमश्या पाडवी वि.प.स. यांनी मविप नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४१६

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील :—** निश्चितपणे समितीला या बाबी देखील तपासून पाहाण्यास सांगण्यात येईल

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—सदर आश्वासन वगळण्याबाबत दिनांक २९.०५.२०२५ रोजी मा समिती प्रमुख, विधानपरिषद यांना विनंती करण्यात आलेली आहे. (सोबत पत्र जोडले आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय.—**मान्य आश्वासन वगळण्यात यावे.

११२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमाक ११२ खंड-२०६ क्र.१०, दिनांक ९ जुलै, २०२४

(२) **विषय.—** नंदूरबार जिल्हयातील अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करण्याची होत असलेली मागणी यासंबंधी श्री. आमश्या पाडवी वि.प.स. यांनी मविप नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४१६

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील :—** या संदर्भात निकष तयार करीत असताना लोकसंख्या हा घटक प्रामुख्याने विचारात घेवून जनतेला जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध होण्याकरीता आपण केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. तसेच त्यांना पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. त्यामुळे समितीला ही बाब सोपवित असताना शासन स्तरावरुन निश्चितपणे निर्णय घेऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन वगळण्याबाबत दिनांक २९.०५.२०२५ रोजी मा समिती प्रमुख, विधानपरिषद यांना विनंती करण्यात आलेली आहे. (सोबत पत्र जोडले आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य, आश्वासन वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१२० (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०६, दिनांक ९ जुलै, २०२४.

(२) **विषय.—** मौजे नवापाडा (ता. नवापूर, जि. नंदूरबार) येथील आदिवासी व्यक्तीची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे केल्याबाबत.

श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी उपस्थिती केलेला तारांकित प्रश्न क्र.२३१८५

(३) **आश्वासन.— मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील :—** पुढील १५ दिवसांमध्ये, मी महिन्याभरात असे म्हणणार नाही, कागदपत्राची छाननी करून तशाप्रकारे जर आदिवासीची जमिन हडप करण्याचा प्रयत्न झाला असेल तर निश्चितपणे कारवाई करु.

मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :— सन्माननीय सदस्यांनी दिलेले कागदोपत्री पुरावे हे आपण नेहमी ग्राहय धरतो, तो पुरावा ग्राहय धरुन कारवाई करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्याकडून दि.२३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला असून अद्याप अहवाल अप्राप्त.

जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्याकडुन दि.२३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला असून अद्याप अहवाल अप्राप्त.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१२१ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०६, दिनांक ९/७/२०२४.

(२) **विषय.—**मौजे नवापाडा (ता. नवापूर, जि. नंदूरबार) येथील आदिवासी व्यक्तींची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे केल्याबाबत.

श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी उपस्थिती केलेला तारांकित प्रश्न क्र. २३१८५.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :-** निश्चितपणे कोकण विभागाचे अतिरिक्त विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करून या सर्व प्रकरणांची अशाप्रकारे जर प्रकरणे घडली असतील तर एक महिन्याच्या आत चौकशी करून शासन स्तरावर कारवाई करण्यात येईल.

मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :- सभापती महोदया, होय, तशा प्रकारच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—अपर आयुक्त कोकण विभाग यांच्या कार्यालयात अनौपचारिक साधला असता, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर कार्यालयाकडून दिनांक २७.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये अंतरिम अहवाल प्राप्त झाला असून जिल्हाधिकारी कार्यालयात . प्रकरणनिहाय तपासणी / छाननी सुरु असल्याचे सांगण्यात आले आहे. सबब माहिती अद्याप अप्राप्त आहे. कार्यवाही सुरू आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य करण्यात यावे.

महसूल व वन विभाग

१७८ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०६, दिनांक २/७/२०२४.

(२) **विषय.—**मा. श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला मुद्दा. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याने चौकशी करण्याची होत असलेल्या मागणीबाबत उपस्थित मुद्दा.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :-** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या संदर्भात पुढील आठवड्यात बँकेच्या लोकांना बोलावून त्यांच्या समवेत बैठक घेऊ. मी आपल्याला देखील त्या बैठकीसाठी निमंत्रित करतो. यामध्ये कोणी दोषी असले तरी त्यांना माफ केले जाणार नाही. जो चुकीचा वागला असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—सदर आश्वासनाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्याबाबत दि. १७/०१/२०२५ रोजी मा. मंत्री (सहकार) यांना नस्ती सादर करण्यात आली आहे. याबाबत मा. मंत्री (सहकार) यांच्या कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन वगळण्यात यावे.

१२२ (१) **संदर्भ व दिनांक .—**खंड क्रमांक २०६, क्र. १०, ९ जुलै, २०२४.

(२) **विषय.—** मौजे नवापाडा (ता. नवापूर, जि. नंदूरबार) येथील आदिवासी व्यक्तीची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे केल्याबाबत श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.२३१८५.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :-**नागपूर व अमरावती या दोन्ही विभागीय आयुक्तांना त्या संगळ्या प्रकाराची चौकशी करण्याच्या सूचना देण्यात येतील आलेल्या चौकशी अहवालानंतर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— शासन पत्र क्र.विपआ/प्र.क्र.१५/ज-८ दिनांक २८ जानेवारी, २०२५ अन्वये विभागीय आयुक्त, नागपूर व विभागीय आयुक्त, अमरावती यांना सभागृहात दिलेल्या आश्वासनास अनुसरून नागपूर व अमरावती विभागातील दोन्ही आयुक्तांना चौकशी करण्याचे सूचित करण्यात आले.

नागपूर विभागः-

विभागीय आयुक्त, नागपूर यांचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या आदेशान्वये सहा. आयुक्त (भुसूधार), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली. विभागीय आयुक्त यांच्या दिनांक २७ मार्च, २०२५, ११ एप्रिल व दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर करण्यात आला.

उल्लंघन झालेल्या प्रकरणी सुनावणी घेऊन आदेश पारित करण्यात आले.

अमरावती विभागः- विभागीय आयुक्त, अमरावती कार्यालयाच्या १६ मे, २०२५ व दिनांक ०७.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास चौकशी अहवाल सादर केला.

उल्लंघन झालेल्या प्रकरणी सुनावणी घेऊन आदेश पारित करण्यात आले. तसेच प्रलंबित प्रकरणांबाबत सुनावणीची व आदेश पारित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे..

(५) **समितीचा अभिप्राय.—** १. विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. जमीन/कार्या ९(४)/कावि-११७/२०२५ दिनांक ११ एप्रिल, २०२५ व पत्र क्र. जमीन/कार्या ९(४)/कावि-२४५/२०२५ दिनांक ११ ऑगस्ट, २०२५.

२. विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून प्राप्त अहवाल पत्र क्र.आकाअ/भु सूधार/स.म.अ १/आदि.ज./का वि-६६/२०२५ दिनांक १६ मे,२०२५ व पत्र क्र. आकाअ/भुसूधा र/स.म.अ.१//कावि-२१३/२०२५ दिनांक ७ऑगस्ट, २०२५.

सदर आश्वासन-२०२५ च्या तिसऱ्या अधिवेशनात पटलावार ठेवण्यात आलेले आहे.

क्र.विप्रआ-२०२५/प्र.क्र.१५/ज-८, दि.१६.०९.२०२५ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.) कार्यवाही पूर्ण

१२३ (१) **संदर्भ व दिनांक .—** खंड क्रमांक २०६, क्र. १०, दिनांक ९ जुलै, २०२४

१२६(२)**विषय.—**. मौजे नवापाडा (ता. नवापूर, जि. नंदूरबार) येथील आदिवासी व्यक्तीची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे केल्याबाबत श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २३१८५.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे पाटील :-**आपण पेक्यूलर सर्कमस्टन्सेस चा उल्लेख केला आहे. त्याचे उल्लंघन झाले असेल तर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.— नागपूर विभाग : -**

नागपूर विभागाअंतर्गत तालुका गोंदिया अंतर्गत येथील एका प्रकरणी आदिवासी जमिनधारकाच्या जमिनीबाबत खोटे दस्तऐवज तयार करून गैर आदिवासीधारकाने जमिन बळकाविल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने तहसिलदार, गोंदिया यांनी चौकशी करून मूळ आदिवासी धारकाच्या वारसांस जमिन परत करण्याचे आदेश दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी पारित केले आहेत. दिनांक १९ जून, २०२५ रोजी अभिलेख दुरूस्ती करून ७/१२ अद्यायावत करण्यात आला.

तसेच, नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यात आढळून आलेल्या आदिवासीची शेतजमिन बिगर आदिवासीस अनधिकृतरित्या हस्तांतरण प्रकरणी चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात येऊन तहसिलदार यांनी दिनांक १ जुलै, २०२५ रोजी आदिवासी जमिनधारकाच्या बाजूने निकाल पारित केला आहे.

नागपूर जिल्ह्यातील नागपूर ग्रामीण अंतर्गत आढळून आलेल्या आदिवासीची शेतजमिन बिगर आदिवासीस अनधिकृतरित्या हस्तांतरण प्रकरणी चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात येऊन तहसिलदार यांनी दिनांक १ जुलै, २०२५ रोजी आदिवासी जमिनधारकाच्या बाजूने निकाल पारित केला आहे.

अमरावती विभागः-

अमरावती विभागामध्ये आदिवासीची शेतजमिन बिगर आदिवासीस अनधिकृतरित्या हस्तांतरणाची एकूण १०६ प्रकरणे प्राप्त झाली असून त्यापैकी ४१ प्रकरणांमध्ये अंतिम आदेश पारित झाले असून एकूण २८ प्रकरणांतील जमीनी मूळ मालकास प्रत्यार्पित केली आहे व एकूण १३ प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत.

तसेच एकूण ६३ प्रकरणांबाबत सुनावणीची तसेच नियमानुसार अंतिम आदेश पारित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच एकूण २ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत..

(५) **समितीचा अभिप्राय.—** विभागीय आयुक्त, आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन	१३	०१

महसूल व वन विभाग

१३ (१) **संदर्भ व दिनांक .—**विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०८, क्र. ०३

(२) **विषय.—**सन-२०२४ चे विधानसभा विधेयक क्र.२७. महाराष्ट्र धारणा जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण (सुधारणा) विधेयक करण्याबाबत.

(३) **आश्वासन.—** मा. मंत्री/श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :- पुरग्रस्ताच्या संदर्भात त्यावेळी कायदा नव्हता म्हणून अशा लोकांना पुनर्वसनाचा कायदा लागू करता येईल किंवा कसे हे तपासून घेतले जाणार आहे..

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—क्र. दिपआ-२०२५/प्र.क्र.१७/म-०५ ई. ऑफिस क्र.१०६९०९६ अन्वये पुनर्वसन उपविभागाकडे हस्तांतरणासाठी प्रस्तावित केले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात येवे.

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन	३०, ३२, ४९, ५०, ९२, १०६, १५२, २२४, २३८, २४४, २५३, २५४, २५८, २७०, २७१	१५

महसूल व वन विभाग

३० (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. ०४, दिनांक ९ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** राज्यात ठाणे, पालघर व रायगड जिल्हयातील घर खरेदीदारांना विकासकाकडून नुकसान भरपाईपोटी येणारी रक्कम वसुल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून न हलगर्जीपणा होणे यासंबंधी ॲड निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी म.वि.प.नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११०

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**शासनातर्फे कडक कारवाई करून ११२४ प्रकरणांमध्ये सर्व शक्यता तपासून तीन महिन्यात आतमध्ये याची सर्व वसुली पूर्ण होईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—महारेराकडून वसुली करिता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे ५४६, जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे १५७, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे ३४२ आणि जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे ७९ अशी एकूण ११२४ महसूल वसुली प्रमाणपत्रे प्राप्त झाली होती.

अशाप्रकारे महारेरा कडून वसुली करीता प्राप्त झालेल्या ११२४ प्रकरणांपैकी ४०४ प्रकरणे कसूरदारांची मालमत्ता आढळून येत नसल्याने तसेच महारेराच्या प्रमाणत्रामध्ये वसुलीची नेमकी रक्कम नमुद नसणे इ. त्रुटींमुळे महारेरा यांना परत करण्यात आली आहेत, ३०३ प्रकरणात एनसीएलटी /इतर न्यायालय यांच्याकडून वसुलीस स्थगिती देण्यात आली आहे आणि तडजोड / समझोता /पुर्णतः वुसलीने निकाली २८५ प्रकरणे आहेत. तसेच १३२ प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरू असून त्यापैकी ९० प्रकरणांत लिलावाची प्रक्रिया सुरु आहे, असे जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि.१३.०४.२०२६ च्या पत्रान्वये, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व पालघर यांच्या दि.१५.०४.२०२६ च्या पत्रान्वये आणि जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.१३.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** १) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे पत्र क्र.मुंउजि/नात/व.शा./ लक्ष वेधी सुचना/कावि-१५५९/२०२६, दि. १५.०४.२०२६

(२) जिल्हाधिकारी, रायगड यांचे पत्र क्र. मशा/वसुली/अ-४/लक्षवेधी सूचना क्र.११०/२०२६, दि.१३.०४.२०२६

(३) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/क-१/टे-७/ई-४३५३७०७/२०२५, दि.१३.०४.२०२६

(४) जिल्हाधिकारी, पालघर यांचे पत्र क्र. महसूल/वसुली/कावि-११३/२३, दि.१५.०४.२०२६

(प्रत सोबत जोडली आहे.)

३२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. ०४, दिनांक ६ मार्च, २०२५.

(२) **विषय.—**राज्यात ठाणे, पालघर व रायगड जिल्हयातील घर खरेदीदारांना विकासकाकडून नुकसान भरपाईपोटी येणारी रक्कम वसुल करण्याबाबत १०१ जिल्हाधिकाऱ्यांकडून न हलगर्जीपणा होणे यासंबंधी ॲड निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी म.वि.प.नियम अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.११०

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**या संदर्भातील संपूर्ण अहवाल सभागृहाला सादर करणार आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला प्रप्ता झालेल्या ११२४ प्रकरणांकपैकी ४८६ प्रकरणे कसुरदारांची मालमत्ता आढळून येत नसल्याने महारेरा यांना परत करण्यात आली आहेत. १७४ प्रकरणात एनसीएलटी/इतर न्यायालय यांच्याकडून वसुलीस स्थगिती देण्यात आली आहे. आणि २६९ प्ररकणात वसुली पुर्ण करण्यात आली आहे. तसेच १३२ प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु असून त्यापैकी ९० प्रकरणात लिलावाची प्रक्रिया सुरु असल्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्यांकडून वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे. सदर आश्वासनास असुनरुन महारेराकडून वसुलीकरीता प्राप्त झालेल्या ११२४ प्रकरणांच्या वसूली संदर्भातील अतिरिक्त माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही असते. सबब, तथापि, विधानमंडळाचे कामकाज सुरु होण्याच्या एक आठवडापूर्वी करणे आवश्यक विधानमंडळाच्या आगामी सन

२०२६ च्या पावसाळी अधिवेशनात मा. सभापती यांच्या मान्यतेने आश्वासन क्र.३२ च्या अनुषंगाने माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य करण्यात आले.

४९ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. ०४, दिनांक १० मार्च, २०२५.

(२) **विषय.—**मुंबईतील पर्यावरणादृष्टया संवेदनशील ठिकाणांवरील १०२ नकाशे बनावट असल्याबाबत श्री. विक्रांत पाटील व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र.१५२

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकळे :-**मी असेही सांगितले की, या संदर्भातील अधिवेशनात सभागृहाला सादर करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—मुंबईतील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवरील १०२ नकाशे बनावट असल्याबाबत तारांकित प्रश्न क्र. १५२ उपस्थित झाला होता. सदर प्रश्नाच्या उत्तरावेळी दि. १०.०३.२०२५ रोजी विधानपरीषद सभागृहात उत्तरावेळी मा. मंत्री (महसूल) यांनी "या संदर्भातील अहवाल पुढील अधिवेशनात सभागृहाला सादर करण्यात येईल." असे आश्वासन दिले होते. त्यास अनुसरून सदर प्रकरणाचा अहवाल मा.मंत्री (महसूल) यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ४६ अन्वये निवेदनाव्दारे दि. १७.०७.२०२५ रोजी विधानपरिषद सभागृहात मांडला आहे. त्याबाबत विधानपरिषद सभागृहाचे दि.१७.०७.२०२५ च्या कार्यवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य करण्यात आले.

५० (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. ०६, दिनांक १० मार्च, २०२५.

(२) **विषय.—**मुंबईतील पर्यावरणादृष्टया संवेदनशील ठिकाणांवरील १०२ नकाशे बनावट असल्याबाबत श्री. विक्रांत पाटील व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र.१५२

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळेः—** सन्माननीय सदस्य श्री. प्रविण दरेकर यांनी जे सांगितले त्या संदर्भात मी तातडीने विधी व न्याय विभागाबरोबर चर्चा करीन ही केस सिव्हील डिव्हीजन कोर्टात आहे. आपण उत्कृष्ट वकील नेमून जे २०-२३ लोक कोर्टात गेलेले आहेत त्यासंदर्भात कोर्टातून स्थगिती उठविण्याच्या प्दृष्टीने प्रयत्न करु.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—सदर प्रकरणी मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि. २८ मे, २०२५ रोजी बैठक पार पाडली. सदर बैठकीत बनावट नकाशांच्या आधारे बांधकाम परवानगी मिळवून केलेल्या बांधकामांबाबत निष्कासन कार्यवाहीस स्थगिती मिळविलेल्या न्यायालयीन प्रकरणांची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेने विधि व न्याय विभागास तात्काळ पार उपलब्ध करून द्यावी व विधि व न्याय विभागाने सदर देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही करता येईल याबाबतचे अभिप्राय बृहन्मुंबई महानगरपालिकेस द्यावेत, असे निर्देश दिले आहेत. विषयांकित बैठकीचे इतिवृत्त दि.०१.०७.२०२५ च्या शासन पत्राव्दारे संबंधितांना आवश्यकं कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** दि.०१.०७.२०२५ चे शासन पत्र व मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि. २८ मे, २०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

९२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. ०४, दिनांक १७ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांना तलाठी भरतीमध्ये संधी मिळणेबाबत. सर्वश्री. ॲड. निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र.२

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकळे :-**सभापती महोदय होय.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जुलै,

२००८ च्या परिपत्रकान्वये संबंधित पदाच्या सेवा भरती नियमातील सर्व अटींची पूर्तता ते करीत असल्यास, त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व त्यांची गुणानुक्रमे निवड होत असल्यास महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नेमणूकीस ते पात्र राहतील. फक्त १५ वर्षे सलग वास्तव्याचा प्रश्न उद्‌भवल्यास वादग्रस्त सीमा भागातील मराठी भाषिक उमेदवारांचे महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील १५ वर्षांचे वास्तव्य विचारात घेण्यात यावेत, तसेच संबंधीत विभागानी सदर उमेदवारांचे असे १५ वर्षाचे वास्तव्यासंदर्भातील सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील कागदपत्रे तपासून घ्यावेत. तसेच सदर उमेदवारांनी सेवा प्रवेश नियमातील इतर सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील, राहील अशा सूचना देण्यात आल्या आहेत. असे अभिप्राय सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त राज्यात राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC), मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर असे सहा केंद्र कार्यान्वित आहेत. या केंद्रांमधुन केंद्रिय लोकसेवा आयोगाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षेचे पुर्व प्रशिक्षण देण्यात येते. सामाईक प्रवेश परीक्षा आयोजित करून या केंद्रांमध्ये प्रवेश देण्यात येतो. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२४.०४.२००० अन्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई आणि इतर सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र येथे प्रवेशासाठी महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के एवढें आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यानुसार या आरक्षणाचा लाभ घेऊन या मागातील विद्यार्थी कोल्हापूरसह अन्य सर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रवेश मिळवू शकतात असे अभिप्राय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिले आहेत.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५०/विशि-३ दि.०१ जुलै २०२० नुसार कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठका होऊन त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागामध्ये मराठी भाषिक विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रम राबविण्यासंदर्भात विद्यापीठ संचलित अनुदानित महाविद्यालय/उपकेंद्र स्थापन करण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठामधील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग तसेच लोकविकास केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने शिनोळी, तालुका चंदगड येथे सुरवातीला सन २०२०-२१ मध्ये कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले होते. सदर केंद्रांतर्गत पाच अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. यापैकी एक कोर्स पूर्णपणे निःशुल्क सुरु होता. सदर अभ्यासक्रमासाठी सन २०२०-२१ मध्ये ११ विद्याथी प्रवेशित होते. सदर केंद्रातून काजु लागवड प्रक्रिया व विपणन हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. तथापि, पुढे सन २०२१-२२ वारंवार प्रयत्न करूनही एकही विद्यार्थी प्रवेशित झाला नाही. त्यामुळे याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने त्रिसदस्य समिती गठीत केली आहे. त्यानुसार अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

तसेच सीमा भागातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठांतर्गत सर्व अनुदानित अभ्यासक्रमांना शैक्षणिक शुल्कात १०० टक्के सवलत देण्यात येते. त्याचप्रमाणे सर्व विनाअनुदानित व्यवसायिक अभ्यासक्रमांना शैक्षणिक शुल्कात २५ टक्के सवलत देण्यात येते. मागील चार वर्षापासून मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा १० टक्के पर्यंत जास्त विद्यार्थी प्रवेशित करण्यात येतात. या विद्यार्थ्यांना मोफत वस्तीगृह सुविधा पुरवण्यात येते. ज्यातून सीमा सागातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात सोय होते. असे अभिप्राय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिले आहेत.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य करण्यात आले.

१०६ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. ०९, दिनांक १७ मार्च, २०२५.

(२) **विषय.—**खटाव (जि.सातारा) तालुक्यात अवैधरित्या वाळू उत्खनन होत असल्याबाबत. सर्वश्री. शशिकांत शिंदे व इतर वि.प.स. यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र.९७७

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** ७ दिवसात चौकशी करून चौकशी अंती जर हे अधिकारी, ठीक आहे प्रांत अधिकाऱ्याने दखल घेतली . परंतु तहसीलदार, रेव्हेन्य इन्स्पेक्टर, तलाठी हे चौकशीमध्ये दोषी आढळून आले तर त्यांना निलंबित करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने कार्यवाही करून अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांना दि. २०.०३.२०२५ व ०४.०६.२०२५ च्या पत्रान्वये कळविले होते.

विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक प्राथमिक अहवाल शासनास सादर केला होता. तथापि, त्यामध्ये कोण अधिकारी/कर्मचारी दोषी आहेत याबाबत स्पष्टता नसल्याने दि ०४.०६.२०२५ च्या शासन पत्रान्वये स्वयंस्पष्ट अहवाल हे. पाठविण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांना कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाच्या दि. २०.०६.२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार, तहसिलदार खटाव (वडूज) आणि उपविभागीय अधिकारी, माण यांनी सन २०२४ साली ११ व जानेवारी २०२५ पासून ४० दंडात्मक आदेश व कारवाया केलेचे दिसून येत आहे. अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत महसूल विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून कारवाई झालेचे, सकृतदर्शनी दिसून येत असलेने त्यांचा अनधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतुकीबाबत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग असलेचे दिसून येत नाही. असा अहवाल सादर केला आहे. अपर आयुक्त विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या अहवालावरुन दिसून येत आहे की, वेळोवेळी क्षेत्रिय महसूली अधिकारी/कर्मचारी यांनी कारवाई केलेली असल्याने त्यांनी कर्तव्यात कसूरी केल्याचे दिसून येत नाही. त्यामूळे निलंबन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.—** क्रमांक-विपआ-१०६/खजिन-०१ दि.१३.०८.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत.

१५२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १०, दिनांक १८ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(३) **आश्वासन.—मा.मंत्री/श्री. मंगलप्रभात लोढा :-** या दोन्ही जागांच्या संदर्भात बैठक घेण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—** दिनांक १६.४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. तपासून सादर करण्यात येत आहे. कार्यवाही सुरु आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** तातडीने बैठक घेऊन कार्यवाही करणे, प्रलंबित ठेवण्यात यावे.

२२४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १४, दिनांक २४ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** गोंदिया जिल्हयातील केंद्रीय विद्यालयाला एकाच ठिकाणी दहा एकर जागा मिळण्याबाबत. सर्वश्री. अभिजित वंजारी व इतर वि.प.स.यांनी विचारलेला तारांकित प्रश्न क्र.३९४

(३) **आश्वासन.—** मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकळे :-ही बाब विचारात घेता केंद्रीय विदयालयाकरिता उक्त दोन जागेपैकी एक जागा उपलब्ध करून देऊ.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.—** केंद्रीय विद्यालयाकरिता मोजा चुटीया ता. गोंदिया येथील गट क्र. ४६६ आराजी २४.१२ हे. आर मधील केंद्रीय विद्यालयाला आवश्यक असणारी ०५ ते १० एकर जागेची दिनांक ०८.१०.२०२५ रोजी, प्राचार्य केंद्रीय विद्यालय व इतर यांचेमार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली आहे.

प्राचार्य केंद्रीय विद्यालय यांचेमार्फत सदर जागेबाबतचा अहवाल उपायुक्त, केंद्रीय विद्यालय संगठण मुंबई यांना दिनांक १४.१०.२०२५ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

तसेच, केंद्रीय विद्यालयाकरिता इतर अन्य पर्यायी जागा, मौजा ईरीं, ता. गोंदिया येथील गट क्र. ९४८ आराजी १३.०७ हे. आर जागेची दिनांक १३.१०.२०२५ रोजी, प्राचार्य केंद्रीय विद्यालय व इतर यांचेमार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी झालेली आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे केंद्रीय विद्यालयाकरिता सुचविण्यात आलेल्या दोन जागेपैकी केंद्रीय विद्यालयाकरिता सोईची होणाऱ्या जागेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास, त्यानुसार जमीन मंजूरीची कार्यवाही यथाशिघ्र करण्याचे नियोजित आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** कार्यवाही सुरू आहे.

२३८ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १४, दिनांक २४ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक २७ महाराष्ट्र महामार्ग सुधारणा विधेयक.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**जमिनी अधिग्रहणाचा विषय माझ्या विभागाशी संबंधित असल्यामुळे मी या संदर्भात २ सन्माननीय सदस्यांसमवेत तातडीने बैठक घेतो.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— मा. मंत्री (महसूल) यांना सदर आश्वासनाच्या बैठकीबाबत सुयोग्य दिनांक व वेळ देण्याकरिता नस्ती सादर ई-नस्ती क्र. १४०६४६५.

(५) **समितीचा अभिप्राय.—** बैठक घेण्यात यावी आखासन प्रलंबित ठेवण्यात यावे

२४४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र.१४, दिनांक २४ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** पुणे शहरातील येवलेवाडी, पिसोळी भागात कोंढवा मोठया प्लॉटची प्रमाणात अनधिकृत नागरिकांना होत असलेली विक्री यासंबंधी टिळेकर, वि.प.स.यांनी श्री. योगेश म.वि.प.नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७१

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** उप आयुक्त, सह आयुक्त यांनाही आपल्या खात्यामार्फत सूचना दिली जाईल. यानंतर हिलटॉप, हिलस्पोल महत्वाच्या भागात एसडीओ व तहसिलदार, पीएमआडीएचे महानगरपालिका, अधिकारी, पोलीस आयुक्त अशी संयुक्त कारवाई केली जाईल. महसूलातील एजीओ तसेच महानगरपालिकेचे उपायुक्त आणि पोलीस आयुक्त यांना सांगून अपेक्षित कारवाई करण्याचा निर्णय शासनाकडून केला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—

(५) **समितीचा अभिप्राय.—**आश्वासन मान्य करण्यात यावे.

२५३ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १४, दिनांक २४ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** महाराष्ट्रातील देवस्थान इनाम जमिनी खालसा करून शेतकऱ्यांच्या नावे करणे यासंबंधी सर्वश्री. सदाशिव खोत व इतर वि.प.स.यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली विधी सूचना क्र.५३२.

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** या संदर्भात प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती केली आहे. त्या समितीचा अहवाल लवकरच घेण्यात येईल व जे शेतकरी शेतसारा भरतात त्याबाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— महाराष्ट्र देवस्थान इनाम नाहीसे करणेबाबत अधिनियम २०२६ चे प्रारुप मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी नंतर जाहीर प्रगटन करून त्यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येतील तदनंतर अधिनियामाचे प्रारुप अंतिम करून कायदा निर्मितीची प्रक्रिया करण्यात येईल. कार्यवाही सुरु आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात यावे

२५४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १४, दिनांक २४ मार्च, २०२५.

(२) **विषय.—** महाराष्ट्रातील देवस्थान इनाम जमिनी खालसा करून शेतकऱ्यांच्या नावे करणे यासंबंधी सर्वश्री. सदाशिव खोत व इतर वि.प.स.यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५३२.

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :**-त्यामुळे याबाबतीत लवकरात लवकर सरकार निर्णय करेल व तो निर्णय चांगल्या पध्दतीचा करु अशा प्रकारचे आश्वासन मी सभागृहात देऊ इच्छितो.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— महाराष्ट्र देवस्थान इनाम नाहीसे करणेबाबत अधिनियम २०२६ चे प्रारुप मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी नंतर जाहीर प्रगटन करून त्यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येतील तद्नंतर अधिनियामाचे प्रारुप अंतिम करून कायदा निर्मितीची प्रक्रिया करण्यात येईल. कार्यवाही सुरु आहे

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात यावे.

२५८ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १४, दिनांक २४ मार्च, २०२५.

(२) **विषय.—**अनधिकृत धार्मिक स्थळ राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असणे यासंबंधी सर्वश्री ॲड. निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी म.वि.प.नियम, ९७ अन्वये उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** मी सभागृहाला आश्वस्त करतो की, दिनांक २० मे, २०२५ रोजी पूर्वी हे संपूर्ण अतिक्रमण काढून टाकण्यात येईल. अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका यांनी व महसूल विभागाच्या एसडीओ श्रीमती उर्मिला पाटील यांनी लेखी दिलेले आहे की, आम्ही हे अतिक्रमण दिनांक २० मे २०२५ पूर्वी काढणार आहोत.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— आश्वासाच्या अनुषंगाने रिट याचिका क्र.२०२५/५१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये शासनाची बाजू मांडण्याकरिता व सदरचे स्थगिती आदेश निरसित करण्याकरिता विधी व न्याय विभागाच्या मान्यतेने ॲड. कौशिक म्हात्रे यांची विशेष अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सदयस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात यावे.

२७० (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १५, दिनांक २५ मार्च, २०२५.

(२) **विषय.—**मध्यप्रदेश जळगाव जिल्हयातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ एल.बोरगांव बुजुर्ग ते मुक्ताईनगर रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचे फेरमुल्यांकन करणे यासंबंधी श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी म.वि.प.नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७३०.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** २ तारखेलला याबाबत बैठक घेण्यात येईल. आपण जे सहा ते सात प्रश्न उपस्थित केले त्यातून मार्ग काढून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

२७१ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २०९, क्र. १५, दिनांक २५ मार्च, २०२५.

(२) **विषय.—**सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक २७ महाराष्ट्र महामार्ग सुधारणा विधेयक.

(३) **आश्वासन.—** मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे यासाठी स्पष्टपणे पुन्हा नव्याने शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन	१, ५, ८४, ८५, ८६, १२८, १३४, २१०, २११, २९८, २९९, ३००, ३०१, ३०२, ३१२, ४३७	१६

महसूल व वन विभाग

१ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०२

(२) **विषय.—** मौजा देऊरवाडा (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील वर्धा नदीच्या किनाऱ्यावर रेतीचा अवैधरित्या साठा करून वाहतूक होत असल्याबाबत. श्री. दादाराव केचे वि.प.स. यांनी उपस्थित होत केचे केलेला तारांकित प्रश्न क्र. ३०४२

(३) **आश्वासन.—मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**याबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—जिल्हाधिकारी वर्धा यांना या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालानुसार मौजा देऊरवाडा येथील अवैध उत्खनन, वाहतूक व साठ्याबाबत मंडळ अधिकारी, वाठोडा व ग्राम महसूल अधिकारी, देऊरवाडा यांनी कोणतीही कारवाई केल्याचे दिसून आले नाही. अशी कार्यवाही करण्यास कसूर केली असल्याने संबंधित श्री. के. एन. चौधरी, मंडळ अधिकारी वाठोडा, ता. आर्वी, जि. वर्धा व श्रीमती शुभांगी डेहनकर, ग्राम महसूल अधिकारी, देऊरवाडा, ता. आर्वी, जि. वर्धा यांना जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक ३ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत केले आहे. त्यामुळे शासन स्तरावर वेगळ्या कार्यवाहीची गरज उरली नाही.

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य, वगळण्यात यावे.

महसूल व वन विभाग

५ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०२, दिनांक १ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** मौजा देऊरवाडा (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील वर्धा नदीच्या किनाऱ्यावर रेतीचा अवैधरित्या साठा करून वाहतूक होत असल्याबाबत. श्री. दादाराव केचे वि.प.स. यांनी उपस्थित होत केचे केलेला तारांकित प्रश्न क्र.३०४२

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सभापती महोदय, सन्मानीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी महत्वाचे विधान केले आहे, त्यासंदर्भात जर त्यांनी मला अधिकची माहिती दिली तर मी अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात त्या संदर्भात निवेदन करेन.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे सादर करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

८४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०६, दिनांक ७ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** पूर्व द्रुतगती मार्गाच्या शेजारील खाडीवरील मॅन्गोव्हज नष्ट करून अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत. श्री.प्रसाद लाड, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सभापती महोदय होय

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— क्रमांक-विपआ-२०२६/प्र.क्र.२७/समन्वय-०१ सदर आश्वासन वन विभागास हस्तांतरणासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** प्रलंबित ठेवण्यात आले.

८५ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०६, दिनांक ७ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** न्यायालयीन आदेश नसतांना देखील छत्रपती संभाजीनगर येथील VITS हॉटेल बंद केल्यामुळे कामागार आणि छोटे व्यावसायकि अडचणीत येणे या संबंधी श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३२३

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे २०२५ चे पुन्हा व्हॅल्युएशन करु एमपीअयाडी कोर्टासमोर पुन्हा सक्षम प्राधिकारी जातील पुन्हा मेरीटवर निविदा काढू ६६०० गुंतवणूकदाराची सरकारला काळजी आहे. या हॉटेल विक्रीतून जी रक्कम येईल ते ६६०० लोकांना द्यायचे आहेत. याकरिता शासन पूर्ण प्रयत्न करेल, हे मी येथे सांगू इच्छितो.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासनाबाबतची नस्ती ई ऑफिस क्र. १४३२०६० अन्वये मा. मंत्री महोदयांकडे सादर करण्यात आले आहे. कार्यवाही सुरु आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

८६ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०६, दिनांक ७ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** न्यायालयीन आदेश नसतांना देखील छत्रपती संभाजीनगर येथील VITS हॉटेल बंद केल्यामुळे कामागार आणि छोटे व्यावसायीक अडचणीत येणे या संबंधी श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३२३

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळेः-** तथापि, या ठिकाणी आपण काही मुद्दे मांडलेले आहेत आणि अशा प्रकरणामध्ये पारदर्शकता असली पाहिजे, याकरिता यासंदर्भात अटी शर्ती किंवा इतर प्रक्रियेमध्ये कुठे अनियमितता झाली आहे का, याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासनाबाबतची नस्ती ई ऑफिस क्र. १४३२०६० अन्वये मा. मंत्री महोदयांकडे सादर करण्यात आले आहे. कार्यवाही सुरु आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

१२८ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०७, दिनांक ८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** येळवण आणि पिंपळखुटा (ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) येथून गौण खनिजांची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत. सर्वश्री अमोल मिटकरी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.२७६४

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सन्माननीय सदस्यांकडे अधिकची माहिती असेल तर या प्रकरणात अधिक खोलात जाऊन निश्चितपणे संबंधितांवर कारवाई केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—सदर आश्वासन वगळण्याबाबत दि. २३.०१,२०२६ च्या पत्रान्वये मा समिती प्रमुख, विधानपरिषद यांना विनंती करण्यात आलेली आहे. (सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन वगळण्यात येत आहे.

१३४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०७, दिनांक ८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** बंजारा समाजाच्या तांडयांची स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणेबाबत. मा.श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली पॉईट ऑफ इन्फरमेशन

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सभापती महोदय होय.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—जालना जिल्हयात एकूण २८७ बंजारा लमाण तांडे असून त्यापैकी २१ तांडे नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्यास पात्र आहेत. यापैकी २० प्रस्ताव जिल्हास्तरावर प्राप्त झाले असून ९ प्रस्तावांची छाननी झाली असून १ तांडयास स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेस मंजूरी मिळाली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन माथ करण्यात येत आहे.

२१० (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०९, दिनांक १० जुलै, २०२५.

(२) **विषय.—** राज्यव्यापी सार्वत्रिक शेतजमीन मोजणी मोहिम राबविणे यासंबंधी सर्वश्री शिवाजीराव गर्जे व इतर, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.८७

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** या सदर्भात कडक आदेश देण्यात येतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—दिनांक २०. ०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत कलम १४३ नुसार पूर्वीचा रस्ता असेल तर दुसरा रस्ता देण्यापासून प्रतिबंध करण्यात आला आहे. या परिपत्रकातील सूचनांचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशी तरतूद केलेली आहे.

शासन परिपत्रक क्रमांक : विपआ-२०२६/प्र.क्र.६८(E १६२४३९६)/पाणंद रस्ते, दि. २०/०४ २०२६

क्र.विपआ-२०२६/प्र.क्र.६८/पाणंद रस्ते दि.२०.०८.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.)

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात येत आहे

२११ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. ०९, दिनांक १० जुलै, २०२५.

(२) **विषय.—** राज्यव्यापी सार्वत्रिक शेतजमीन मोजणी मोहिम राबविणे यासंबंधी सर्वश्री शिवाजीराव गर्जे व इतर, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ८७

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी या संर्भात जी सुधारणा सूचना सूचविली आहे ती अंमलात आणली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— दि. ३१.१२.२०२५ रोजीच्या अधिसुचनेन्वये मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले. त्यामध्ये "(५) पोलीस सुरक्षा. शेत रस्त्यांच्या किंवा वहिवाटीच्या मार्गाच्या वापराच्या प्रकरणांमध्ये, जर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्याने, मामलतदाराच्या निर्णयाचे पालन करण्यात कसूर केली तर, अर्जदारास मोफत पोलीस सुरक्षा पुरविणे अनिवार्य असेल." अशी तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२५ महराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४ दि. ३१/१२/२०२५

(५) **समितीचा अभिप्राय.—** क्र.विपआ-२०२६/प्र.क्र.६७/पाणंद रस्ते दि.१५.०४.२०२६ च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.) कार्यवाही पूर्ण

२९८ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. १२, दिनांक १५ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** कोरेगांव (जि. सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत. श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.२९६३

(३) **आश्वासन.—** मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनमुळे :-मी या सर्वांची चौकशी करतो आणि विभागीय चौकशी करून जो दोषी असेल त्याच्यावर आम्ही महिन्याभराच्या आत कारवाई करु.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— उपविभागीय अधिकारी कार्यालय, कोरेगाव यांचे कार्यालयाकडून अल्पक्षेत्र विक्री बाबत देण्यात आलेल्या आदेशांची तपासणी करणे तसेच दुय्यम निबंधक कार्यालय, कोरेगाव यांचेकडे झालेल्या सर्व खरेदी-विक्री दस्तांची तपासणी करून यामध्ये तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन होईल असे दस्त झाले किंवा कसे? याबाबतची तपासणी करणे याकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचे दिनांक १२/०६/२०२५ रोजीचे आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती.

सदर नियुक्त समिती मार्फत सन २०१७ ते सन २०२५ या कालावधीतील एकूण १०४७ अल्पक्षेत्र विक्री परवानगी आदेशाची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर प्रकरणे दोषपूर्ण असल्याचा निष्कर्ष समितीमार्फत दिनांक १७/१०/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, सातारा यांना सादर केलेल्या अहवालात काढलेला आहे.

श्री. अभिजीत नाईक, तत्कालीन उपविभागीय अधिकारी, कोरेगाव यांनी तुकडेजोड तुकडेबंदी कायद्याअंतर्गत विक्री परवानगी आदेश पारित करताना नियमांचे उल्लंघन केले आहे. तसेच कार्यालयीन कार्यपध्दतीचा अवलंब केलेचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी अनियमितता झालेली असुन श्री. अभिजीत नाईक, तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव दोषी असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्याचे जिल्हाधिकारी, सातारा यांनी शासनास सादर केलेल्या दिनांक १३ डिसेंबर २०२५ च्या अहवालात नमूद केलेले आहे.

सदर अहवालांच्या अनुषंगाने शासन नियमानुसार तत्कालीन उप विभागीय अधिकारी, कोरेगाव यांच्या विरुद्ध कारवाई करण्याचे संकल्पित आहे.

क्र.विपआ-३५२६/प्र.क्र.११/ज-५अ, दि.१५.०४.२०२६ (ई-१५६८७१६) च्या पत्रान्वये संसदीय कार्य विभागास प्रती देण्यात आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे).

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात आहे.

२९९ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. १२, दिनांक १५ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** कोरेगांव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत. श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.२९६३

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनमुळे :-**सदर प्रकरणी विभागीय दोषीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील तसेच कायदा हातामध्ये घेऊन चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर कारवाई केली जाईल. सदर प्रकरणी समावेश सदर असलेल्या एजंटची पोलिसांमार्फत चौकशी केली जाईल. चौकशीमध्ये आमच्या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्यास त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— उपविभागीय अधिकारी कार्यालय, कोरेगाव यांचे कार्यालयाकडून अल्पक्षेत्र विक्री बाबत देण्यात आलेल्या आदेशांची तपासणी करणे तसेच दुय्यम निबंधक कार्यालय, कोरेगाव यांचेकडे झालेल्या सर्व खरेदी-विक्री दस्तांची तपासणी करून यामध्ये तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन होईल असे दस्त झाले किंवा कसे? याबाबतची तपासणी करणे याकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचे दिनांक १२/०६/२०२५ रोजीचे आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती.

सदर नियुक्त समिती मार्फत सन २०१७ ते सन २०२५ या कालावधीतील एकूण १०४७ अल्पक्षेत्र विक्री परवानगी आदेशाची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर प्रकरणे दोषपूर्ण असल्याचा निष्कर्ष समितीमार्फत दिनांक १७/१०/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, सातारा यांना सादर केलेल्या अहवालात काढलेला आहे.

श्री. अभिजीत नाईक, तत्कालीन उपविभागीय अधिकारी, कोरेगाव यांनी तुकडेजोड तुकडेबंदी कायद्याअंतर्गत विक्री परवानगी आदेश पारित करताना नियमांचे उल्लंघन केले आहे. तसेच कार्यालयीन कार्यपध्दतीचा अवलंब केलेचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी अनियमितता झालेली असुन श्री. अभिजीत नाईक, तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव दोषी असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत, असल्याचे जिल्हाधिकारी, सातारा यांनी शासनास सादर केलेल्या दि.१३/१२/२०२५ च्या अहवालात नमूद केलेले आहे.

जिल्हाधिकारी, सातारा यांचे पत्र क्र. कुका/अधिअभि-कावि-१८३५/२०२५, दि.१३/१२/२०२५ व क्र.मह-३/कुका/अधिअभि-कावि-१००/२०२६, दि.१५/०४/२०२६

(५) **समितीचा अभिप्राय.—** मान्य करण्यात यावे.

३०० (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. १२, दिनांक १५ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** बदलापूर (जि.ठाणे) जवळील उल्हास व वालधुनी नदीपात्रात अतिक्रमण होत असल्याबाबत सर्वश्री (ॲड.) अनिल परब व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.२८०४

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**तसेच गणपत पाटील नगर येथे ३ दिवसांच्या आतमध्ये जिल्हाधिकारी जातील व पुढील कारवाई करतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन मा-मंत्री (महसूल) यांच्याकडे सादर करण्यात आले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी. आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

३०१ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. १२, दिनांक १५ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** बदलापूर (जि.ठाणे) जवळील उल्हास व वालधुनी नदीपात्रात अतिक्रमण होत असल्याबाबत सर्वश्री (ॲड.) अनिल परब व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.२८०४

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**याबाबत मी आश्वस्त करतो की, तातडीने महसूल विभाग व जलसंपदा विभाग हे काम करेल

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन जलसंपदा विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागाकडे आश्वासनाचे हस्तांतरण प्रस्तावित केले आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

३१२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. १२, दिनांक १५ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** मौजे जांभे, ता.जि. सातारा येथील जमीन गटाच्या अभिलेख्यामध्ये ७/१२ सदरी मूळ वतनदाराचे नाव राहिल्यामुळे खरेदी विक्रीचे बेकायदेशीर व्यवहार झाले यासंबंधी सर्वश्री. (ॲड.) निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम, १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ८४१.

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळेः-**आम्हाला पुढील काळात हे तपासावे लागेल सन २००३-२००४ व सन २००४-२००५ मध्ये वहिवाटदाराच्या नोंदी किंवा कोणाच्या नोंदी कोणी हटविल्या आहेत. तेवढाच एक चौकशीचा भाग आहे. बाकी प्रकरणात नियमाप्रमाणे सर्व बाबी पूर्ण झाल्या आहेत. तपास आपणांकडून त्याबद्दलचा करण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात क्र.३१२ सर्वश्री. (ॲड.) निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी विवरणपत्राचा मसूदा मौजे जांभे, ता. जि. सातारा येथील जमीन गटाच्या मा. मंत्री (महसूल) अभिलेख्यामध्ये ७/१२ सदरी मुळ वतनदाराचे नाव यांच्या मान्यतेस् राहिल्यामुळे खरेदी विक्रीचे बेकायदेशीर व्यवहार झाले यासंबंधी लक्षवेधी सुचना उपस्थित केली होती.

सदर लक्षवेधीवरील चर्चे दरम्यान सन २००३-०४ मध्ये वहिवाटदारांची नावे कशी कमी झाली याबाबतचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

त्यावर मा. मंत्री महोदयांनी सदर आश्वासन दिलेले आहे.

आश्वासन पूर्ततेसाठी आतापर्यंत करण्यात आलेली कार्यवाही

मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सातारा यांच्या दिनांक १७/०७/२०२५ च्या पत्रान्वये अहवाल शासनास प्राप्त झाला.

(५) **समितीचा अभिप्राय.— मान्य करण्यात यावे**

४३७ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २१०, क्र. १५, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** विरार-अलिबाग कॉरिडॉर तयार करताना डोंबिवली येथील निळजे ते हेटवणे येथील शेतकरी यांच्या जमिनी संपादन करून त्यांना मोबदला न मिळणे याबाबत.

ॲड अनिल परब, वि.प.स. यांनी म.वि.प.नियम, ९३ अन्वये दिलेल्या सूचना क्रमांक २७ ला अनुलक्षून श्री. चंद्रशेखर दिलेले निवेदन बावनकुळे यानी दिलेले निवेदन.

(३) **आश्वासन.—** या मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-संदर्भात मी आढावा घेऊन अत्यंत कमी जमीन व जे आर्थिक दुर्बल शेतकरी आहेत त्यांना प्राधान्य निधी देण्यात येईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन मा-मंत्री (महसूल) यांच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आले आहे. ई-नस्ती क्र. १६२४३८१

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात यावे.

१९ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. ०२, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** राज्यातील शेतकरी समृध्दी होण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना याबाबत.

सर्वश्री. प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. शंभूराज देसाई -**श्री. निरंजन डावखरे साहेबांनी रायगड जिल्हयामध्ये विशेषकरुन या अडचणी निर्माण होत असल्याची खंत व्यक्त केलेली आहे. आजच जिल्हाधिकारी रायगड यांना सूचना दिल्या जातील ते सुरळीत पार पाडण्यासाठी आणि आवश्यकता पडल्यास महसूल विभागामार्फत अधिक गतीने त्या योजना राबवण्याच्या सूचना महसूल प्रशासनाला दिल्या जातील

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— विपआ-२०२६/प्र.क्र.२१/समन्वय-०१ कृषी विभागास हस्तांतरणासाठी प्रस्तावित केले आहे. (ई-ऑफिस क्र.१६१४०१९)

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन प्रलंबित ठेवण्यात यावे.

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

अधिवेशन वर्ष	आश्वासन क्रमांक	एकूण आश्वासने
(१)	(२)	(३)
सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन	१९, ३४, ३६, ३९, ५२, ६३, १०४, १०५	०८

महसूल व वन विभाग

७२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद खंड क्रमांक २११, क्र. २ दिनांक १८ जुलै २०२५.

(२) **विषय.—**राज्यातील शेतकरी समृद्धी होण्याकरिता करावयाची व उपाययोजना याबाबत.

सर्वश्री. प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव.

(३) **आश्वासन.—** मा.मंत्री/श्री. शंभूराज देसाई :- श्री. निरंजन डावखरे साहेबांनी रायगड जिल्ह्यामध्ये विशेषकरून या अडचणी निर्माण होत असल्याची खंत व्यक्त केलेली आहे. आजच जिल्हाधिकारी रायगड यांना सूचना दिल्या जातील ते सुरळीत पार पाडण्यासाठी आणि आवश्यकता पडल्यास महसूल विभागामार्फत अधिक गतीने त्या योजना राबवण्याच्या सूचना महसूल प्रशासनाला दिल्या जातील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— विपआ-२०२६/प्र.क्र२१/समन्वय-०१ कृषी विभागास हस्तांतरणासाठी प्रस्तावित केले आहे. (ई-ऑफीस क्र. १६१४०१९)

३४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. १३, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** अंजनगाव सुर्जी येथे विहिगाव या गावात खेळाचे मैदान खोदल्याबाबत माहितीचा मुद्दा श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.

(३) **आश्वासन.—** मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :- संभापती महोदय, विभागीय उद्या आयुक्त सदर गावामध्ये जातील व संबंधित तहसीलदारांची चौकशी करतील. त्यानंतर उद्या संध्याकाळपर्यंत शासनाकडे रिपोर्ट दिला जाईल. त्यानुसार सदर प्रकरणी उद्या संध्याकाळी कारवाई करु.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— विभागीय आयुक्त अमरावती यांनी दिनांक ११.१२.२०२५ रोजी अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मौजे विहीगांव येथील शहानूर नदीकाठच्या खेळाचे मैदान गॅट नं.५ चे स्थळ निरीक्षण केले. सदर वेळी निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती, उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांनी उपस्थित राहून सदर मैदानाचा संयुक्त पंचनामा केला.

त्यामध्ये सदेर क्षेत्रावर ०४ ते ०५ वर्षापूर्वी खडडे केले असल्याचे दिसून आले तथापि, सदर खडडे कोणी केले आहेत हे स्पष्ट झाले नाही. त्यानुसार दिनांक ०५.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये खेळाच्या मैदानावरील संपूर्ण खड्डे बुजविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

सदर क्षेत्रावर अतिक्रमण असल्याबाबत तहसिलदार यांचेकडे तक्रार दाखल केली होती. नुषंगाने अतिक्रमाण काढण्याबाबत आदेश पारित झाल्याचे गटविकास अधिकारी, सचिव ग्रामपंचयात विहिगांव यांना विभागीय आयुक्त यांनी तात्काळ कार्यवाही पूर्ण करणेबाबत सुचित केले. तसेच दिनांक ०४.१२.२०२५ अन्वये मौजे विहिगांव साँझ्याअंतर्गत खुदावनपुर मधील गट नं. ५ गोठान खडवाडी एफ क्लास जागेवरील खेळाचे मैदानावरील अतिक्रमा काझ्याची कार्यवाहीबाबत आदेश पारित करण्यात आले. सदर आदेशाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी यांचेकडून निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात यावे.

३६ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. १३, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** वाशिम शहरामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेमधील शाळेच्या बाजूला भूमी अभिलेख कार्यालयाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबद्दल माहितीचा मुद्दा.

श्री. किरण सरनाईक, वि.प.स.

(३) **आश्वासन.—** मा.मंत्री/श्री.चंद्रशेखर बावनकुळेः- सभापती महोदय सन्माननीय सदस्यांनी मला या विषयासंबंधी सविस्तर माहिती सादर केली तर सदर माहिती मी आज संबंधित जिल्हाधिका-यांकडे पाठवून त्याबाबत चौकशी करून घेतो.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या दि.०१.०४.२०२६ रोजीच्या अहवालान्वये . वाशिम शहरामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेमधील शाळेच्या बाजूला भूमि अभिलेख कार्यालयाच्या जमिनीवर , केलेल्या अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी, वाशिम यांनी दि.३०.१२.२०२५ रोजी बैठक आयोजित करून अतिक्रमण निष्कासित करणेबाबत निर्देश दिले. त्यानुषंगाने सदर न जागेची मोका पाहणी करण्यात आली व तहसीलदार, वाशिम यांनी अतिक्रमण निष्कासित करणे कामी अतिक्रमण धारकांना पूर्वसूचना देऊन दि.०४.०२.२०२६ रोजी मुख्याधिकारी, वाशिम, तहसीलदार, वाशिम यांचे उपस्थितीत अतिक्रमण निष्कासित करण्यात आले. परंतु सदर अतिक्रमण धारकांपैकी सी.स.नं ७३५/१ चे मालमत्ता धारक यांनी मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वाशिम येथे RCS क्र.२०/२०२६ दि.०३.०२.२०२६ अन्वय दावा दाखल केला होता. सदर प्रकरणात मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वाशिम यांनी पुढील आदेशापर्यंत सदर मालमत्ता बाबत जैसे थे चा आदेश दिला आहे. दरम्यानच्या काळात सदर अतिक्रमण धारकांपैकी सी.स.नं.७३५/१ चे मालमत्ता धारक यांनां मालकी हक्काचा पुरावा सादर करणे कामी दि.२२.०१.२०२६ व दि. २७.०१.२०२६ रोजी भूमि अभिलेख कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. परंतु त्यांनी कुठलेही दस्तऐवज सादर केले नाहीत. सबब सदर मिळकतीबाबत पुढील कार्यवाही करणे कामी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, वाशिम यांचेकडे दि.१८.०२.२०२६ रोजी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी दि.२५.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सुधारित अहवाल सादर करण्याबाबत उप अधीक्षक, भूमि अभिलेख, वाशिम यांना कळविले आहे. त्यानुषंगाने उप अधीक्षक, भूमि अभिलेख, वाशिम या कार्यालयाकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

जिल्हाधिकारी, वाशिम यांचे पत्र क्र. कक्ष-४/म.स.१(मह सूल)/कावि-३८५/२०२६ दि.०१.०४.२० २६.

(५) **समितीचा अभिप्राय.—**

३९ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. ०३, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** अहिल्यानगर जिल्हयातील संगमनेर येथील सह दुय्यम निबंधक यांनी दस्तान नोंदणी प्रक्रियेत अडथळा आणणे यासंदर्भात मा.श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-४०९

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**यामध्ये तीन पर्यायी व्यवस्था केल्या जाणार आहेत. प्रथम त्याला त्या ठिकाणी ठेवले जाणार नाही. कॅम्प आयोजित केला जाणार आहे आणि I.G.R. ला त्या ठिकाणी पाठवून चौकशी करण्यासाठी सांगितले जाणार आहे.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्याकडून अहवाल अप्राप्त आहे कार्यवाही सुरु आहे

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन माथ करण्यात येते आहे.

५२ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. ०४, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** राज्यात अवैधरित्या वाळूची वाहतूक व विक्रीमुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असल्याबाबत. सर्वश्री. कृपाल तुमाने व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.४७६५

(३) **आश्वासन.— मा.राज्यमंत्री/श्री.योगेश कदम :-** मी सांगू इच्छितो की, ३१ डिसेंबर पर्यंत सर्व वाळू घाटांचे लिलाव केले जातील

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— सदर आश्वासन सादर करण्यात येत आहे. कार्यवाह सुरु आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** आश्वासन मान्य करण्यात येत आहे.

६३ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. ०४, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक सन २०२५ चे वि.स.वि.क्रमांक-९७

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-** त्या संदर्भात २००२ पासून २०२४ पर्यतच्या काळात ज्या वर्षी एनए केले असेल त्या वर्षाच्या संदर्भात एसओपी तयार करून त्यात स्पष्टता आणली जाईल.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**— दिनांक १०.०२.२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित त्यानुषंगाने विहित विवरणपत्रात माहिती संसदीय कार्य विभागास पाठविण्याकरिता नस्ती सादर करण्यात आली आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** कार्यवाही सुरु आहे.

१०४ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. ०५, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक सन वि.स.वि.क्रमांक १०१

(३) **आश्वासन.— मा.मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**आपण त्या प्रश्नाधीन जमिनीबाबत उल्लेख केलेला आहे. त्या जमिनीची जिल्हाधिकारी उद्या पाहणी करतील आणि पुढील ७ दिवसात ती जागा मोकळी करून तेथे शासकीय जमीन असल्याचा फलक लावतील.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—दिनांक २५.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. सादर तपासून करण्यात येत आहे. कार्यवाही सुरु आहे.

(५) **समितीचा अभिप्राय.—** अहवाल समितीस सादर करावा. आवाजन प्रलंबित ठेवग्यात यावे

१०५ (१) **संदर्भ व दिनांक .—** विधानपरिषद क्रमांक खंड क्रमांक २११, क्र. ०५, दिनांक १८ जुलै, २०२५.

(२) **विषय.—** हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक सन २०२५ चे वि.स.वि.क्रमांक १०१

(३) **आश्वासन.— मा. मंत्री/श्री. चंद्रशेखर बावनकुळे :-**सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. एकनाथ खडसे साहेबांनी मुक्ताईनगर येथील सन १९६५ किंवा त्यापूर्वी पासून वसलेल्या ११ गावांचे गावठाण डिक्लेअर करणे, त्यांना गावठाणाचा दर्जा देणे आणि फ्री होल्ड करणे असर मुद्दा उपस्थित केलेला आहे. शासन याचा निश्चितपणे विचार करील. पुढील अधिवेशनापर्यंत या गांवाना गावठाण दर्जा देणे, मालकी देणे ते त्या ग्रामपंचायतीमध्ये असलेच परंतु त्यांना सर्व योजना लागू होतील यासाठी कार्यवाही करणे या संदर्भात आपण जी सूचना केलेली आहे ती निश्चितपणे स्वागतार्ह आहे. या सूचनेचा आम्ही निश्चितपणे विचार करु.

(४) **आश्वासनपूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई.**—कार्यवाही सुरू

(५) **समितीचा अभिप्राय.—** अहवाल समितीन सादर करावा अहवाल आखाजन प्रलंबित ठेवण्यात यावे.

परिशिष्ट -चार
शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके व पत्रक

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०११ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) ते सन २०२५ च्या तिसऱ्या (हिवाळी)अधिवेशनात शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या प्रलंबित आश्वासनांपैकी कार्यवाही करण्यात आलेल्या आश्वासनांबाबतीत विभागांकडून काढण्यात आलेले शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके यासारखे सर्व दस्ताऐवज/कागदपत्रे या परिशिष्टांमध्ये समाविष्ट आहेत.संबंधित दस्ताऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या कागदपत्रांच्या दस्तऐवजांच्या शिरोभागी नमूद केले आहे.

आश्वासन क्रमांक - १९२

क्र.विपआ-२०२२/प्र.क्र.६७/ज-१अ,

मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : २३/०६/२०२५

विषय:- विधानपरिषदेत दिलेल्या सन २०११ च्या पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील आश्वासन क्र.१९२

आदरणीय महोदय,

सन २०११ च्या पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील आश्वासन क्र.१९२ "कोकणीतील देवस्थान जमिनी मोठया प्रमाणात कब्जेदारांच्या ताब्यात असून त्या ग्रामस्थांच्या वापराखाली आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली आहे. " या विषयाबाबत मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांनी "निश्चितपणे या संदर्भातील कोकणातील जे जे आमदार या विषयाशी संबंधित आहेत, त्यांची अधिवेशन संपण्यापूर्वी शासन स्तरावर बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल." असे आश्वासन दिले आहे.

सदर आश्वासन हे सन २०११ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन संपण्यापुर्वी शासनस्तरावर बैठक घेण्याबाबतचे आहे. तथापि, सदर अधिवेशन संपण्यापुर्वी आश्वासन क्र.१९२ च्या अनुषंगाने कोणतीही बैठक झालेली नाही. तसेच, सदर अधिवेशन संपलेले असून मंत्रीमंडळामध्ये देखील बदल झालेला आहे. वास्तव सन २०११ च्या पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील आश्वासन क्र.१९२ च्या अनुषंगाने आश्वासनाची पुर्तता करणे शक्य नाही.

तसेच देवस्थान इनाम जमिनींबाबत धोरण निश्चित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन सदर आश्वासन क्र. १९२ वगळण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

मा.समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२

प्रत:-

(१) कक्ष अधिकारी, संसदीय कार्य विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
(२) कक्ष अधिकारी,(म-५) महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
(३) निवडनस्ती (ज-१अ)

अधिवासन क्रमांक- ७८२







महसूल व वन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
Email ID :-m5.revenue@maharashtra.gov.in
दुरध्वनी क्र.:०२२-२२७९३७१५

क्रमांक: विपआ-२०१९/प्र.क्र.४७/म-५

दिनांक : २४.०७.२०२५

प्रति,

कक्ष अधिकारी ,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय : सन-२०१२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील
विधानंपरिषद आश्वासन क्रमांक ७८२ ची माहिती.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन -२०१२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात विधानपरिषद देण्यात आलेले आश्वासन क्रमांक ७८२ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,
व्यं.ग. आयलाने
दि-२४/०७/२०२५
(व्यंकटेश ग.आयलाने)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरीलप्रमाणे

प्रत -

१) उप सचिव,विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) निवडनस्ती (म-५)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२ २२८२१६५५ Email ID :-J3.revenue@maharashtra.gov.in

तात्काळ/ विधीमंडळ कामकाज प्राथम्य.
क्रमांक : विपआ-२६२१/ ४२२/ प्र.क्र.१९/ज-३, दिनांक : १६ सप्टेंबर,२०२१.

प्रति,
कक्ष अधिकारी (म-५)
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय :- सन २०१२ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.७८२ "उद्योग पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचाराबाबत" मा. श्री. विनोद तावडे व इतर विपस यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान मा. सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या अश्वासनानुषंगाने उपस्थित मुद्यांसंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र.विपआ-२०१९/प्र.क्र.४७/म-५, दि.०५/०४/२०२१.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

०२. सन २०१२ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात मा. श्री. विनोद तावडे, तत्का.विधान परिषद सदस्य व इतर यांनी "उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत" महाराष्ट्र विधान परिषद नियम २५९ अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावरील चर्चे दरम्यान मा. विधान परिषद सदस्यांनी विविध मुद्दे उपस्थित केले होते. त्यानुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या (आश्वासन क्र.७८२ या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल) आश्वासनानुषंगाने उपस्थित मुद्यांची कार्यासननिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती उक्त संदर्भाधीन पत्रान्वये करण्यात आली आहे.

यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली असून त्यांनी सादर केलेली माहिती पुढील प्रमाणे आहे:-

मुद्दा क्र.	उपस्थित करण्यात आलेला मुद्दा	कार्यवाहीचा तपशिल
१)	कुर्ला मुलुंड खोत जमीन अधिकाऱ्यांनी परस्पर विकणे.	सदर विषय हा कोणत्या गावातील व त्याचा सर्वे नंबर, न.भू.क्र. याबाबतचा बोध होत नाही. तथापि, मुंबई उपनगर जिल्ह्यातील कुर्ला तालुक्यातील गावे ही खोताच्या मालकीची असल्यामुळे सन १९५१ पूर्वी गावातील मिळकतीचे सर्व अभिलेख खोताकडे होते. तसेच शेतसारा ही खोतांकडून वसूल केला जात होता. कुर्ला तालुक्यात सन १९५१ मध्ये द सालसेट इस्टेट लँड रेव्हेन्यू एक्झामशन ॲबॉलीशन) कायदा अस्तित्वात

		आल्याने या कायद्यातील तरतूदीनुसार खोतांची मालकी असलेल्या जमिनी ह्या तत्का. जिल्हाधिकारी यांनी शासन जमा करुन घेतल्या होत्या. सदर जमिनी शासन जमा केल्यानंतर सदर मिळकतीवर जमीन महसूल लागू करण्यात येऊन वसूलीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. या कार्यवाही अनुषंगाने संबंधित खोतांनी शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. या न्यायालयीन प्रकरणी खोत व शासन यांच्यात समझोता करार झाला असून या करारामध्ये खाली नमूद ३ परिशिष्टात विभागणी करण्यात आली आहे. १) परिशिष्ट-अ खोताच्या मालकीच्या जमिनी २) परिशिष्ट-ब शासनाच्या मालकीच्या जमिनी ३) परिशिष्ट-क मुंबई महसूल कायदा १८७९ मधील कलम ३७(२) व द सालसेट इस्टेट लॅन्ड रेव्हेन्यू एक्झामसन ॲबॉलीशन) कायदा १९५१ मधील कलम ४ प्रमाणे चौकशीसाठी जमिनी. उपरोक्त प्रमाणे परिशिष्ट-अ, ब व क प्रमाणे कार्यवाही होऊन गाव अभिलेखात नोंदी झाल्या असून परिशिष्ट क मधील जमिनींबाबत चौकशी होऊन या मिळकती परिशिष्ट अ व ब मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. सबब, कुर्ला मुलुंड खोत जमीन अधिकाऱ्यांनी परस्पर विकणे अशी बाब संबंधित अभिलेख पाहता दिसून आलेली नाही.
2)	अंधेरी येथे मे. आकृती बिल्डरला तेलगल्ली गुंदवली येथील कोट्यावधी रुपयांची जमीन देणे.	झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजनेअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी खालील नमुद मिळकतीबाबत सुधारीत एकत्रिकरण/ पोटविभाजन आदेश क्र. झोपुप्रा/ न.भू.अ./ प्र.क्र.२७८/२००१, दि. ०२/०२/२००२ रोजी निर्गमित केलेले आहे. मौजे गुंदवली, ता. अंधेरी येथील न.भू.क्र.४२८(पै), ४३०, ४३०/ १ते२, ४३२, ४३२/ १ते१२, ४३३, ४३३/ १ते३५, ४३४, ४३४/ १ते२, ४३५, ४३५/ १ते२, ४३५, ४३५/ १ते१२, ४३६, ४३६/ १ते९६, ४३७, ४३९, ४४०, ४४०/ १ते५४, ४४१, ४४२, ४४३, ४४४(पै), ४४५, ४४७(पै), ४४८, ४५०, ४५१/ १ते१०, ४५१(पै), ४५२, ४५२/ १ते५६, ४५३(पै), ४५४, ४५४/ १ते१०, ४५५(पै), ४५५/ १ते२१, ४५८(पै), ४५९ (पै), ४६० (पै), ४६७ (पै), ४५ते४९, ५४ते५७. उक्त आदेशाच्या अनुषंगाने न.भू.क्र. ४२७ या मिळकतीची नवीन मिळकतपत्रिका उघडून **न.भू.क्र.४२७/१, २, ४ व ७** या मिळकतीच्या मिळकतपत्रिकेवर ***"महाराष्ट्र सरकार झोपडपट्टी पुनर्वसन, प्राधिकरण विक्री घटक"*** असे नाव दाखल करण्यात आलेले आहे. मौजे- गुंदवली, ता. अंधेरी येथील **न.भू.क्र.४२७/३** च्या मिळकतपत्रिकेवर धारक सदरी ***"महाराष्ट्र सरकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियोजित डी.पी. रस्ता"*** असे नाव दाखल आहे. मौजे-गुंदवली ता.अंधेरी येथील **न.भू.क्र.४२७/५** या मिळकतीचे मिळकतपत्रिकेवर ***"महाराष्ट्र सरकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुनर्वसन घटक"*** असे नाव धारक सदरी दाखल करण्यात आलेले आहे. तसेच सदर मिळकतपत्रिकेमध्ये अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगर यांचे आदेश क्र. पथक-२/ कक्ष-६/ कावि-१८१/ ०५, दि. १७/१०/०५, पंचनामा, ताबेपावती, निवाडा अन्वये **न.भू.क्र.४२९, ४२९/ १ते१८** या मिळकतीस दाखल असलेले धारक कृष्णलाल मंगलदास शाह वगैरे ३ व इमला मालक जता शंकर मिश्रा यांची नावे कमी करुन मिळकतपत्रिकेवर **महाराष्ट्र शासनाचे** नाव दाखल करुन नविन मिळकतपत्रिका उघडण्यात आलेली आहे.

		तथापि, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे क्षेत्र दुरूस्ती आदेश क्रमांक सी/कार्या-२क/ क्षे.दु./ एस.आर.२०३३, दि.१४/११/२००३ अन्वये **न.भू.क्र. ४४७ क** अशी नवीन मिळकतपत्रिका उघडून त्यावर **७०२५.६ चौ.मी. क्षेत्र** दाखल केले व **सत्ताप्रकार** "**जी**" करुन धारणाधिकार सदरी **महाराष्ट्र शासन** अशी नोंद घेण्यात आलेली आहे. सोबत उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांच्या दि.११/०६/२०२१ च्या अहवाला सोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती माहितीसाठी सादर करण्यात येत आहेत.
३)	जुहू येथील सर्वे क्र.३२० हा भूखंड पोलिसांसाठी राखीव ठेवलेला असताना भूखंड अधिकाऱ्यांच्या सोसायटीला काम देण्यात येणे	मौजे जुहू, ता. अंधेरी येथील स.नं.३२० हा पोलिसांसाठी राखीव भूखंड अधिकाऱ्यांच्या सोसायटीला देण्याबाबत कोणत्याही प्रशासकीय विभागाकडून अथवा कोणत्याही संस्थेकडून मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तहसिलदार अंधेरी यांच्या अहवालानुसार मौजे जुहू या महसूली गावात स.नं.३२० असा सर्वे नंबर अस्तित्वात नाही. तसेच नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांच्या अहवालानुसार मौजे जुहू या महसूली गावातील न.भू.क्र.३२० हा विठ्ठल नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेच्या नावे आहे.
४)	बोरीवली येथील वळणई आदिवासी जमीन घोटाळा प्रकरण	मौजे-वळणई, ता.बोरीवली येथील स.नं.२३/५ चा न.भू.क्र.३६०, स.नं. २३/१२ चा न.भू.क्र. ३६१ व स.नं. ६४ चा न.भू.क्र.३३४ असा कमी जास्त पत्रकानुसार आहे. तसेच सर्व्हे नंबर निहाय गाव न.नं.७/१२ ची माहिती पुढीलप्रमाणे आहे. मौजे वळणई, ता.बोरीवली येथील स.नं.२३/५/ब क्षेत्र ०.७४.७८ हे.आर.चौ.मी. स.नं. २३/१२/क, क्षेत्र ०.०८.९४ हे.आर व स.नं. ६४/ब, क्षेत्र ०.११.७८ हे. आर असून गा न.नं.७/१२ च्या उताऱ्यात कब्जेदार सदरी १) श्री. परशुराम बाबुराव वनगे, २) श्री. रामकिशन बाबूराव वनगे, ३) श्रीम. जयवंती बाबूराव वनगे, ४) श्रीम. अश्विनी अशोक धनावडे, ५) श्रीम. भानू बाबूराव वनगे, ६)श्रीम. रेणुका काशीराम वनगे, ७) श्री. जगदीश काशीराम वनगे, ८) श्री. भूपेश काशीराम वनगे, ९) श्रीम. अंजली काशीराम वनगे व १०) श्रीम. शालिनी काशीराम वनगे यांची नावे दाखल आहेत. मौजे-वळणई, ता.बोरीवली येथील स.क्र.२३/५,२३/१२,६४पै या मिळकती पूर्वी श्री. परशुराम बाबुराव वनगे व इतर १० यांचे नावे होत्या. तसेच गाव न.नं.७/१२ च्या उताऱ्यात इतर हक्कामध्ये "**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६(अ) ला अधीन**"अशी नोंद दि. १७/०१/२००२ अन्वये घेण्यात आलेली होती. ***तथापि श्री. परशुराम बाबुराव वनगे यांना दिलेले "मल्हारकोळी" जातीचे प्रमाणपत्र जात प्रमाणपत्र पडताळणी कमिटी यांनी त्यांचेकडील आदेश क्र. DD/TCSC/मुंबई ११-०४ दिनांक. ०६/०७/२००५ अन्वये रद्द करणेत आलेले आहे.*** त्यानुसार तत्कालीन उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे जमीन प्रत्यार्पित करण्याच्या अनुषंगाने सुरु कार्यवाही आदेश क्र.डीएलएन/ टीआरबी/ RESTORATION/ ०२/ ०४, दि.१४/०७/२००५ अन्वये अंतिम निकाल देऊन प्रकरण वगळण्यात आले आहे. त्याअनुषंगाने तहसीलदार बोरीवली यांनी पत्र क्र. तह/बोरी/जमीन/ १९४७/२००५, दि. १०/१०/२००५ अन्वये उक्त नमूद गा.न.नं.७/१२ वरील इतर हक्क सदरी असलेली "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ३६(अ) ला अधीन" अशी घेतलेली नोंद/ शेरा कमी करुन तशी नोंद (फेरफार नोंद क्र.१०७६) अधिकार अभिलेखात दिनांक १०/१०/२००५ रोजी घेण्यात आली आहे.

		परंतु विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अ.शा.पत्र, दि.१५/०९/२००१ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दि.०४/१०/२००१ च्या पत्र आणि तहसीलदार बोरीवली यांच्या दि.१४/१२/२००५ रोजीचे आदेश (क्र. तह/बोरी/जमीन/आदिवासी-२३२९/२००५, दि.१४/१२/२००५) यानुसार या मिळकतीच्या गा.न.नं.७/१२ च्या उताऱ्याम इतर हक्क सदरात फेरफार क्र. १०७८, दि.१४/१२/२००५ अन्वये पुन्हा *"महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६चे कलम३६(अ) ला अधीन "*अशी नोंद घेण्यात आली. या फेरफार (क्र.१०७८) नोंदी बाबत तत्कालीन उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडे अपील दाखल झालेले होते. सदर अपिल प्रकरणी आदेश क्र.DLN/RTS/A/३३/०५, दि.२०/१२/२००५ अन्वये गा.न.नं.७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील ३६अ चा शेरा कमी करण्याचे आदेश पारीत करण्यात आले होते. या आदेशाविरुध्द उपजिल्हाधिकारी (अपीले) मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे अपील दाखल झाले असता, या अपिल प्रकरणी उपजिल्हाधिकारी (अपीले) मुंबई उपनगर जिल्हा यांनी आदेश क्र.C/RTS/A/१/२००६,दि.१३/०४/२००६ नुसार उपविभागीय अधिकारी यांचेकडील आदेश कायम केले आहेत. त्यानुसार स.नं. २३/५, २३/१२ व ६४ पै च्या गा.न.नं.७/१२ उताऱ्यातील इतर हक्क सदरातील "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६चे कलम ३६अ ला अधीन" हा शेरा फेरफार क्र.११००, दिनांक ०२/०७/२००७ अन्वये कमी करण्यात आलेला आहे. या मिळकतीची तलाठी मालवणी यांनी स्थळपाहणी केली असता, श्री.अल्पेश अजमेरा यांनी मिळकतीवर तीन रहिवासी इमारतीचे बांधकाम केलेले असून, या इमारतीमध्ये रहिवाश्यांचे वास्तव्य आहे. तर काही क्षेत्र मोकळे आहे. या बांधकामास आदेश क्र. सी/ डेस्क/ एलएनडी/ एनएडी/ एसआर/ ७७४, दि.११/१०/२००४ नुसार बिनशेती परवानगी देण्यात आलेली आहे. *आज रोजी गा.न.नं.७/१२ च्या उताऱ्यात इतर हक्क सदरी "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६चे कलम ३६अ ला अधीन" अशी नोंद नसल्यामुळे मौजे-वळणई, ता.बोरीवली येथील स.क्र.२३/५, २३/१२,६४पै या मिळकती ह्या आदिवासी खातेदाराच्या असल्याचे निष्पन्न होत नाही.* मौजे वळणई, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.३३४अ/१, ३३४अ/२, ३३४अ/३ ३३४/ब, ३३४/क, ३३४/ड, ३६०, ३६१अ, व ३६१ब या मिळकतीच्या मिळकत पत्रकांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. **न.भू.क्र. | धारकाचे नाव | क्षेत्र(चौ.मी.)** ३३४अ/१ | शेती | ३०४९.७० ३३४अ/२ | बृहन्मुंबई महानगरपालिका | ४६०.९० ३३४अ/३ | शेती | ३५७.७० ३३४/ब | मालाड इंडस्ट्रीअल युनिटस को. ऑ.सो.लि. | ९३९३.६० ३३४/क | बृहन्मुंबई महानगरपालिका डी.पी. रोड | १५५२.१० ३३४/ड | मालाड इंडस्ट्रीअल युनिटस को. ऑ.सो.लि. | ७५२७.१० ३६० | शेती | ९५६६.४० ३६१अ | शेती | २६०८.०० ३६१ब | बृहन्मुंबई महानगरपालिका | ५२.१०
५)	मागाठाणे येथील आदिवासींच्या	मौजे मागाठाणे, ता. बोरीवली येथील स.नं.११०/ब, क्षेत्र-०८६.२५ हे. आर (८६२५चौ.मी.) व स.नं.१११/१/ब, क्षेत्र-०.४०.४८ हे.आर. (४०४८चौ.मी.) या दोन

	मालकीच्या जमिनीवर वाय.सी.मोदी यांनी इमारतीचे बांधकाम सुरु केलेले असणे.	मिळकतीच्या गा.न.नं.७/१२ उताऱ्यात कब्जेदार सदरी श्री. पांडुरंग मंगळया चावरे व इतर १७ व्यक्तींची नावे दाखल आहेत. तसेच गाव न.नं.७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात *"सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरास बंदी" "कुळ कायद्याने प्राप्त जमीन" तसेच विशिष्ट शर्तीवर "अपर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय गहाण, दान, विक्री, बक्षीस करता येणार नाही"* अशा नोंदी आहेत. त्याचप्रमाणे *"महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६अ"* ला अधीन अशी नोंद दि.१७/०१/२००२ रोजी घेण्यात आली आहे. वरील दोनही मिळकतीच्या विकासासाठी श्री. वाय.सी.मोदी (विकासक) यांना श्री. बाबु मंगळया चावरे व इतर यांच्या नावे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून आदेश क्र.सी/ एलएनडी/ ७-अ/ एनएपी/ एसआर-२६८७, दि.२२/०७/१९९२ व क्रमांक सी/ एलएनडी/ ७-अ/ एनएपी/ एसआर-२७०९, दि.२२/०७/१९९२ असे दोन बीनशेती परवानगी आदेश प्राप्त झाले आहेत. मौजे-मागाठाणे, ता. बोरीवली येथील सर्वे क्र.११०पै व १११/१/पै, या मिळकतीशी संबंधित न.भू.क्र.१७०, १७१ व १७२ ची मिळकतपत्रिका पाहता, मिळकतीचे पोटविभाजन झालेले असून, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. **न.भू.क्र. | धारकाचे नाव | क्षेत्र(चौ.मी.)** १७०/अ | श्रीमती पार्वतीबाई मंगळया चावरे व इतर | ६१०६ १७०/ब | बृहन्मुंबई महानगरपालिका डी.पी.रोड | २३४२.५ १७०/क | श्रीमती पार्वतीबाई मंगळया चावरे व इतर | ६१८४.६ १७०/ड | धारक सदरी नाव दाखल नाही, तथापि इतर हक्कात 'महाराष्ट्र शासन' नाव दाखल | ७९५.२ १७१ | मिळकत पत्रिका रद्द (न.भू.क्र. १७० मध्ये सामील झाल्याने) | १६५४.६ १७२ | मिळकत पत्रिका रद्द (न.भू.क्र. १७० मध्ये सामील झाल्याने) | ६२०९.० जिल्हाधिकारी, मुंबई उपनगगर यांचे आदेश क्र. DLN/ TNC/SR०८/९९, दि.२२/१२/१९९९ व दि. १४/०१/२००३ अन्वये मौजे-मागाठाणे, ता.बोरीवली येथील स.नं.११० व स.नं.१११/१ या मिळकतीस *"मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम,१९४८ कलम ४३ व ६३" अन्वये श्री. बाबू मंगळया चावरे व इतर ५ व्दारा श्री. वाय सी मोदी यांना विक्री परवानगी देण्यात आलेली आहे.* यासंदर्भात दि.१८/१२/१९९९ रोजी श्रीमती पार्वतीबाई मंगल्या चावरे व इतर ५ यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे जबाब दिलेला असून, सदर जबाबामध्ये श्री. वाय सी मोदी भागीदार मे. पृथ्वी बिल्डर डेव्हलपर्स यांना सदरची जमीन विक्री केल्याचे नमूद केले आहे. तसेच आम्ही कोणत्याही अनुसूचित जमातीचे नाही, सदर विधानात तफावत निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहिल, असे श्रीमती पार्वतीबाई चावरे व इतर यानी जबाबात नमूद केले आहे. तसेच दि. १८/१२/१९९९ रोजी श्री. वाय. सी. मोदी यांनी दिलेल्या जबाबामध्ये मौजे-मागाठाणे, ता.बोरीवली स.नं ११०पै. व स.नं.१११/१पै. ही जमीन श्री. मंगळया बारक्या चावरे यांचेकडून विकत घेऊन, विकासासाठी वापर करणार असल्याचे नमूद केले आहे. आज रोजी न.भू.क्र.१७० व १७१ या मिळकतीवर मे. पृथ्वी एनक्लेव्ह गृहनिर्माण संस्थेची ७ मजली इमारत असून, त्यात ए,बी,सी,डी, ई अशा ५ विंग आहेत

		व श्री. चावरे यांची २ मजली निवासी इमारत आहे. तसेच न.भू.क्र.१७२ या मिळकतीवर मे.धीरज रीजन्सी सहकारी गृहनिर्माण संस्थेची ७ मजली इमारत असून, ए.बी.सी.डी. ई अशा ५ विंग आहेत. मे. पृथ्वी एनक्लेव्ह-२सहकारी गृहनिर्माण संस्थेची ७ मजली इमारत असून ए व बी अशा २ विंग आहेत. प्रस्तुत प्रकरणात सर्वे नं.११० पै व १११/१पै या मिळकतीशी संबंधित न.भू.क्र. १७०, १७१ व १७२ च्या अनुक्रमे गा.न.नं.७/१२ उताऱ्यात व मिळकत पत्रिकेत आजही श्री. चावरे कुटूंबियांची नावे धारक म्हणुन दाखल असून, ७/१२ व मिळकत पत्रकाच्या छायाप्रती सोबत संलग्न केल्या आहेत. त्यामुळे ***उक्त मिळकतीच्या अधिकार अभिलेखात आदिवासी खातेदाराचे नाव कमी करुन बिगर आदिवासी खातेदाराचे नाव दाखल झालेले नाही असे स्पष्टपणे दिसून येते***, तथापि विषयांकीत जमिनीच्या क्षेत्रात श्री. चावरे यांच्या दोन मजली इमारती व्यतिरिक्त वर नमूद केलेल्या तीन सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या एकूण १२ विंगच्या इमारत उभ्या आहेत. या इमारतीमधील सदनिकेंमध्ये अनेक कुटूंबे वास्तव्यास आहेत. संबंधित सदनिकाधारकांना श्री. चावरे कुटुंबिय किंवा श्री. वाय.सी. मोदी यांच्याकडून विक्री करण्यात आल्या आहेत. तसेच सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ (उ.श्रे.), मुंबई उपनगर यांच्या अहवालानुसार, पृथ्वी बिल्डर्स आणि डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे रमेशचंदर सखुआ तर्फे सुभाष पी. बाणे यांनी व इतर व्यक्तींनी उक्त मिळकतीवरील इमारतीमधील सदनिका / गाळयांचे हस्तांतरण केल्याचेही दिसून येत आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना दि.१८/१२/१९९९ रोजी श्रीम. पार्वतीबाई मंगळ्या चावरे व इतर पाच यांनी ते स्वत: अनुसूचित जमातीचे नसल्याचा जबाब लिहून दिला आहे. परंतु मौजे-मागाठाणे, ता. बोरीवली येथील सर्वे क्र.११०पै व १११/१/पै, या मिळकतीशी संबंधित न.भू.क्र.१७०, १७१ व १७२ मिळकतीच्या गा.न.नं.७/१२ उताऱ्यावरील "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६चे कलम ३६अ ला अधीन" हा शेरा / नोंद कमी करण्याची कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तसेच श्रीम. पार्वतीबाई मंगळ्या चावरे यांनीही या संदर्भात पाठपुरावा/ अर्ज प्रकरण केले असल्याचे दिसून येत नाही.
६)	मागाठाणे, बोरीवली येथील आदिवासींची जमीन खोट्या दस्ताऐवजाच्या आधारे हडप केलेली असणे.	मौजे मागाठाणे, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.१७५ चा कमी जास्त पत्रकाप्रमाणे सर्वे न. १०८/१/१, १०८/१/ब, १०८/१/ड, १०८/१/क व १०८/१/क/१ अशा ५ मिळकती आहेत. या मिळकतीच्या गाव नमुना नं.७/१२ उताऱ्यात धारक सदरी पुढील प्रमाणे नावाची नोंद आहे.

गावाचे नाव व तालुका	सर्वे नंबर	क्षेत्र हे. आर. चौ.मी.	धारकाचे नाव	इतर हक्क सदरातील नोंद
मौजे मागाठाणे, ता.बोरीवली	१०८/१/१,	०.५०.०१	कांतीभाई छोटाभाई पटेल व मगनभाई सोमाभाई पटेल	---
	१०८/१/ब,	०.२८.०९	सेंट फ्रान्सिस एज्युकेशन ट्रस्ट	---
	१०८/१/ड,	०.०४.९१	मुंबई महानगरपालिका डी.पी. रोड	---
	१०८/१/क	०.७२.१५	दत्तात्रय लक्ष्मण बावीशे व इतर ८	३६ अ ची नोंद दाखल तसेच सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी, श्री.लक्ष्मीचंद देवीचंद नागरदास चतुरदास कुळ म्हणून नोंद

				अ.जि. यांच्या परवानगीशीवाय विक्री, देणगी, गहाण, दान, वाटप इ. बंदी
	१०८/१/क/१	०.०८.७८	मुंबई महानगरपालिका डी.पी. रोड	---

मौजे मागाठाणे, ता. बोरीवली येथील वर नमूद मिळकतीपैकी स.नं.१०८/१/क वगळता स.नं.१०८/१/१, स.नं.१०८/१/ब, स.नं.१०८/१/ड व स.नं.१०८/१/क/१ या मिळकतीच्या गा.न.नं.७/१२ उताऱ्यातील इतर हक्क सदरात "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६(अ) ला अधीन" अशी नोंद / शेरा नाही. तसेच या मिळकतीच्या सर्वे क्र. १०८/१/१, १०८/१/ब, १०८/१/ड या मिळकतीच्या संबंधित न.भू.क्र. १७५/अ/१, १७५/अ/२, १७५/अ/३,च्या मिळकतपत्रिकांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

न.भू.क्र.	धारकाचे नाव	क्षेत्र(चौ.मी.)
१७५/अ/१	बृहन्मुंबई महानगरपालिका	४९०.२
१७५/अ/२	सेंट फ्रान्सिस एज्युकेशन ट्रस्ट	२८२४
१७५/अ/३	बृहन्मुंबई महानगरपालिका	२९६५.८

स.नं.१०८/१/१, न.भू.क्र. १७५/अ/२,या मिळकतीवर सेंट फ्रान्सीस ट्रस्टचे सेंट जॉन्स हायस्कूलची तळमजला + ५ मजली इमारत आहे. तसेच न.भू.क्र १७५/अ/१ व १७५/अ/३ या मिळकतीवर महानगरपालिकेचे खुले मैदान, डी. पी. रोड आहे.

मौजे-मागाठाणे, ता. बोरीवली येथील वरील नमूद स.नं.१०८/१/१ च्या मिळकतीमधील क्षेत्र विकसित करताना श्री. कांतीभाई छोटाभाई पटेल व श्री. मगनभाई सोमाभाई पटेल यांच्यावतीने द मॅनेजिंग ट्रस्टी सेंट फ्रान्सिस एज्युकेशनल ट्रस्ट यांना कुळ कायदा कलम ४३ च्या शर्तीनुसार उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांनी आदेश क्र. डीएलएन/ टीएनसी/ एसपी/ एसआर-०२/१९९९, दि.२०/११/२००४ अन्वये परवानगी दिली आहे. तसेच सदर मिळकत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक ०७/०१/२००५ च्या आदेशानुसार श्री. कांतीभाई छोटाभाई पटेल व श्री. मगनभाई सोमाभाई पटेल यांचे कुळ मुखत्यार श्रीमती गीता देसाई यांच्या नावाने बीनशेती परवानगी दिली आहे.

तसेच मौजे-मागाठाणे, ता. बोरीवली येथील सर्वे क्र.१०८/१/क, मधील २ एकर क्षेत्राला कुळ कायदा कलम ३२ 'ग' प्रमाणे मालक ठरल्याने फेरफार क्र.५२८, दि.२०/०९/१९६८ प्रमाणे श्री. लक्ष्मण सखाराम बावीशे यांचे नाव दाखल होते. परंतु मृत्यूपश्चात फेरफार क्र.६७८, दि.०२/०५/२००३ अन्वये श्री. दतात्रय लक्ष्मण बावीशे व इतर यांची नावे वारसाने दाखल झालेली आहेत. इतर हक्क सदरी "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ (अ)" चा शेरा व "मे.अपर जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय गहान,दान, विक्री,करता येणार नाही," असा शेरा आहे. तसेच श्री.दतात्रय लक्ष्मण बावीशे व इतर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस डी.पी.रोड करीता जागा हस्तांतरीत केल्याने ८ गुंठे क्षेत्राकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावे फेरफार क्र.६९८, दि.१२/१०/२००७ नुसार गा.न.नं.७/१२ उघडण्यात आला आहे. सदर फेरफार क्र.६९८ च्या संचिकेमध्ये सदर डी.पी.रोड चा ताबा श्री.दतात्रय लक्ष्मण बावीशे यांनी नोंदणीकृत डीक्लेरेशन कम इंडिमिनिटी बाँड बदर-२/७०१९/५/२००७ नुसार दिला आहे. सोबत अनोंदणीकृत नोटराईज्ड कुळमुखत्यार पत्र दिनांक ०९/०५/२००६ व दि.१४/०७/२००६ नुसार इतर कब्जेदार यांनी जमिनीच्या विकासासाठी कुळमुखत्यारपत्र श्री.दतात्रय लक्ष्मण बावीशे यांना दिल्याचे दिसून येत आहे. सदर मिळकत ही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी श्री. दतात्रय लक्ष्मण बावीशे यांचे नावे

आदेश क्र, सी/डेस्क/७अ/एलएनडी/ एनएपी/एसआर/८११२, दिनांक ३०/०५/२००६ अन्वये बिनशेती परवानगी दिली आहे. या मिळकतीचा संबंधित न.भू.क्र. १७५/ब/१, १७५/ब/२, मिळकतपत्रिकांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

न.भू.क्र.	धारकाचे नाव	क्षेत्र(चौ.मी.)
१७५/ब/१	दत्तात्रय बावीशे व इतर	६५९३.५
१७५/ब/२	बृहन्मुंबई महानगरपालिका	८७८.८

मौजे-मागाठाणे ता. बोरीवली येथील स.नं.१०८/१/क, न.भू.क्र. १७५/ब/१,१७५/ब/२ या मिळकतीवर राधाकृष्ण नावाची २० मजली इमारत, राधा गोविंद नावाची ९ मजली इमारत व डी. पी. रोड आहे. तसेच श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण बावीशे यांच्या मुलाचे (श्री. दिनेश हरिश्चंद्र बावीशे) अंदाजे १ गुंठा क्षेत्रात राहते घर आहे.

प्रस्तुत प्रकरणात सर्वे नं.१०८/१/क या मिळकतीशी संबंधित न.भू.क्र. १७५/ब/१ व १७५/ब/२ च्या अनुक्रमे ७/१२ उताऱ्यात व मिळकत पत्रिकेत आजही श्री. दत्तात्रय लक्ष्मण बावीशे व इतर ८ यांची नावे धारक म्हणुन दाखल असून, ७/१२ व मिळकत पत्रकाच्या छायाप्रती सोबत संलग्न केल्या आहेत. विषयांकीत जमिनीच्या अधिकार अभिलेखात आदिवासी खातेदाराचे नाव कमी करुन बिगर आदिवासी खातेदाराचे नाव दाखल झालेले नाही असे स्पष्टपणे दिसून येते, तथापि विषयांकीत जमिनीच्या क्षेत्रात गा.न.नं.७/१२ उताऱ्यावरील कब्जेदार श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण बावीशे यांचा मुलगा श्री. दिनेश हरिश्चंद्र बावीशे यांचे कुटूंबियांचे निवासस्थान वगळता राधाकृष्ण नावाची २० मजली इमारत, राधा गोविंद नावाची ९ मजली इमारत उभी आहे. सदर इमारतीमधील सदनिकेमध्ये अनेक कुटूंबे वास्तव्यास आहेत. सदर सदनिका धारकांना त्यांच्या सदनिकांची विक्री गा.नं.नं.७/१२ उताऱ्यावरील कब्जेदार श्री. दत्तात्रय लक्ष्मण बावीशे व इतर यांनी केली किंवा कसे? याबाबत सह जिल्हा निबंधक, वर्ग - १ (उ.श्रे.), मुंबई उपनगर यांच्या दिनांक १२/०७/२०२१ रोजीच्या अहवालानुसार मे.श्रीकृष्ण चैतन्य एंटरप्रायजेस चे भागीदार राधाकृष्ण देसाई यांच्या तर्फे मुखत्यार अनंत पवार यांनी व इतर व्यक्तींनी विषयांकित मिळकतीवरील इमारतीमधील सदनिका / गाळयांचे हस्तांतरण केल्याचे दिसून येत आहे.

सबब, उपरोक्त विषयांकित आश्वासनानुषंगाने प्राप्त झालेल्या ६ मुद्यांबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सादर केलेली माहिती म-५ कायासनास उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(सुनिल कोठेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : निवड नस्ती (कार्यासन ज-३)

७ ते ९

ज ४

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मुंबई-४०० ०३२

E-mail ID:- j4.revenue-mh@gov.in
दूरध्वनी क्र.:- ०२२ २२७९४०७२

क्र. विपआ-२७२१/UOR १३/प्र.क्र. ७०/ज-४
दिनांक:- ११ फेब्रुवारी, २०२२

प्रति,
कक्ष अधिकारी (म-५),
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय:- सन २०१२ च्या पहिले अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ७८२ "या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणांची चौकशी निश्चितपणे केली जाईल"

संदर्भ:- १) सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. विपआ- २०१९/ प्र.क्र. ४७/म-५, दिनांक २८/०९/२०२१
२) शासन समक्रमांकाचे दिनांक १३/०१/२०२२ रोजीचे पत्र.
३) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. विपआ-२०१९/प्र.क्र. ४७/म-५, दिनांक १०/०२/२०२२.

महोदय,

सन २०१२ च्या पहिले अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ७८२ मधील मुद्दा क्रमांक ८, १६ व १९ च्या विवरणपत्रास शासन मान्यता घेवून सदर विवरणपत्रांच्या प्रती संदर्भाधीन पत्र क्र. २ नुसार दिनांक १३/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये आपणास उपलब्ध करून दिलेल्या आहेत. उपरोक्त मुद्द्यांची माहिती संदर्भाधीन क्र. ३ च्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्याची विनंती केलेली आहे. तरी, सदर विवरणपत्रांची माहिती पुनश्च सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. (प्रत संलग्न)

आपला,

(भास्कर र. पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

विधानपरिषदेत दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कारवाईबाबतचे विवरण
सन-२०१२ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

विभागाचा फाईल क्रमांक:-विपआ २७१९/UOR १३/प्र.क्र. ७०/ज ४

विभागाचे नांव:- महसूल व वन विभाग

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासनपूर्ती बाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले, त्याबाबतचे आदेश, निर्णय इ. चा दिनांक	आश्वासना ची पुर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन करण्यासाठी लागलेल्या विलंबचा कालावधी	आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्या वर केलेली कारवाई
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
७८२	विधानपरिषद कामकाज:- १-१ खंड: क्रमांक:- २४ दिनांक:- २०.४.२०१२ माननीय मंत्री/ राज्यमंत्री श्री यांनी दिलेले उत्तर	'उद्योग पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार' सर्वश्री. विनोद तावडे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव	मा. श्री. बाळासाहेब थोरात:- या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल. मुद्दा क्र. ७). आदिवासी वाडी जमीन (मीरा रोड) महाजनवाडी क्र. ७७ ही आदिवासीची जमीन हडप करणेबाबत.	मौजे मिरा, ता. जि. ठाणे येथील स. नं. ७७ पैकी ०-७५-०० हे. आर (नवीन गांव मौजे महाजनवाडी स. नं. १/२) ही जमीन मुळची सरकारी (महाराष्ट्र शासनाची गुरचरण) होती. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश क्र. एलएनडी/एसआर-५०९, दिनांक १४/०५/१९५२ च्या आदेशान्वये अटी व शर्तीवर एकलव्य आदिवासी सहकारी घर बांधकाम संस्था मर्यादीत यांना प्रदान करण्यात आली होती. मंडळ अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरहू जमिनीवर शर्तभंग झाल्यामुळे सन १९९८ पासून एकूण २७ प्लॉटपैकी २० प्लॉट सरकार जमा करणेबाबत आदेश पारित करणेत आले असून उर्वरीत ०७ प्लॉटबाबत शर्तभंगाची कार्यवाही पूर्ण करून संपूर्ण जमीन ०-७५-०० हे. आर ही जमिनीच्या अधिकार अभिलेखात महाराष्ट्र शासनाचे नावे दाखल करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, ठाणे यांना निर्देश देण्यात आले आहेत. मौजे मिरा, ता. जि. ठाणे येथील स.नं. ७७ पैकी नविन मौजे महाजनवाडी येथील स.नं. १/२, क्षेत्र ०-१०-३०				प्रशासकीय कारणामुळे विलंब झाला.	रकाना क्र. ५ व ९ वस्तुस्थिती लक्षात घेता कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

(१३)

विधानपरिषदेत दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कारवाईचा विवरण
सन-२०१२ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

विभागाचा फाईल क्रमांक:-विपआ २७१९/UOR १३/प्र.क्र. ७०/ज ४ — विभागाचे नांव:- महसूल व वन विभाग

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासनपूर्ती बाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले, त्याबाबतचे आदेश, निर्णय इ. चा दिनांक	आश्वासना ची पुर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन करण्यासाठी लागलेल्या विलंबचा कालावधी	आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्या वर केलेली कारवाई
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
७८२	विधानपरिषद कामकाज:- १-१ खंड: क्रमांक:- २४ दिनांक:- २०.४.२०१२ माननीय मंत्री/ राज्यमंत्री श्री यांनी दिलेले उत्तर	'उद्योग पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार' सर्वश्री. विनोद तावडे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव	मा. श्री. बाळासाहेब थोरात:- या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल. मुद्दा क्र. ८) ठाणे जिल्ह्यातील आदिवासीच्या जमिनी बिगर आदिवासी लोकांनी शासकीय कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करुन लाटणे.	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६अ नुसार आदिवासी खातेदारांच्या जमिनी बिगर आदिवासी खातेदारांकडे हस्तांतरीत करण्यास शासनाच्या पूर्वमान्यतेने व जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वमंजूरीने परवानगी देता येते. त्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ तयार करण्यात आले असून त्यातील नियम ४अ(१) नुसार खऱ्याखुऱ्या कृषीतर प्रयोजनासाठी (Bonafide non-agriculture purpose) आदिवासी खातेदारांच्या जमिनी बिगर आदिवासी खातेदारांकडे हस्तांतरीत करण्यास मंजूरी दिली जाते.			प्रशासकीय कारणामुळे विलंब झाला.	रकाना क्र. ५ व ९ वस्तुस्थिती लक्षात घेता कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

२३०

विधानपरिषदेत दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कारवाईस-ची विवरण
सन-२०१२ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

विभागाचा फाईल क्रमांक:-विपआ २७१९/UOR १३/प्र.क्र. ७०/ज ४

विभागाचे नांव:- महसूल व वन विभाग

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासनपूर्ती बाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले, त्याबाबतचे आदेश, निर्णय इ. चा दिनांक	आश्वासना ची पुर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन करण्यासाठी लागलेल्या विलंबचा कालावधी	आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्या वर केलेली कारवाई
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
७८२	विधानपरिषद कामकाज:- १-१ खंड: क्रमांक:- २४ दिनांक:- २०.४.२०१२ माननीय मंत्री/ राज्यमंत्री श्री यांनी दिलेले उत्तर	'उद्योग पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार' सर्वश्री. विनोद तावडे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव	मा. श्री. बाळासाहेब थोरात:- या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल. मुद्दा क्र. ९) हिरानंदानी बिल्डरला मौजे कावेसर व मौजे कोळशेत येथील ८४ एकराचा शासकीय भूखंड अनधिकृतपणे देण्यात येणे.	नवनगर वसाहत प्रकल्पात समाविष्ट होणाऱ्या शासकीय जमिनी विकासकास मंजूर करण्याचे शासनाचे धोरण आहे. सदर धोरणानुसार मौजे कोलशेत, ता. जि. ठाणे येथील १,३३,०९०-०० चौ. मी. जमीन व मौजे कावेसर, ता. जि. ठाणे येथील १,९५,११५.०० चौ. मी. जमीन अनुक्रमे महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन, क्र. जमीन-२७०८/प्र. क्र. ८५/ज-४, दि. १७/०८/२०१० व क्र. जमीन-२७०८/ प्र. क्र. ८४/ज-४, दि. १७/१०/२०१० तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एलबिपी/एसआर-१२/२०१०, दिनांक ०६/०९/२०१० व क्र. महसूल/क-१/टे-१/एलबिपी/एसआर-१३/२०१०, दि. ०६/०९/२०१० अन्वये प्रचलित बाजारभावाने येणारी किंमत आकारून कब्जेहक्काने मे. रोमा बिल्डर्स प्रा. लि. यांना मंजूर करण्यात आली आहे.				प्रशासकीय कारणामुळे विलंब झाला.	रकाना क्र. ५ व ९ वस्तुस्थिती लक्षात घेता कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग ,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय ,मुंबई -३२.

क्र.विपआ/२०२०/प्र.क्र.९१/ज-७अ
दिनांक : ०२.०६.२०२२

प्रति,
कक्ष अधिकारी,
म-५ कार्यासन,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय :- महाराष्ट्र विधानपरिषद नियम २५९ अन्वये आश्वासन क्र.७८२ २०१२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन.
संदर्भ :- आपले पत्र क्र.विपआ- २०१९/प्र.क्र.४७/म-५, दि.०१.११.२०२१

महोदय,

संदर्भीय पत्रान्वये मागविण्यात आलेले विषयांकित आश्वासन पूर्ततेबाबतचे शासन मान्यता घेऊन तयार केलेले विवरणपत्र सोबत जोडले आहे.

आपली,

(मानसी साठे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे.

पत्र निर्गमित
दिनांक : 3/6/22

विधानपरिषदेने दिलेल्या आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबधी विवरण

सन २०१२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विभागाची नस्ती क्र.: विपआ-२०२०/प्र.क्र.९१/ज-७ (अ)

विभागाचे नाव : महसूल व वन विभाग

आश्वासन क्र.	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासनाच्या पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले त्याबाबतचे आदेश, निर्णय इ. चा दिनांक	आश्वासन पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन पूर्ती करण्या साठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासन पूर्ती करण्या साठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यावर केलेली कार्यवाही
७८२	उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत मा.श्री.विनोद तावडे, तत्कालीन विधानपरिषद सदस्य व इतर यांच्या म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्तावाच्या	"या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी ज़ी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल." सन्माननीय विधानपरिषद सदस्यांनी उक्त नमूद प्रस्तावावरील चर्चेदरम्यान महसूल (खुद्द) विभागाशी संबंधित विविध मुद्दे (एकूण १२) उपस्थित केले	मा. मंत्री - "मौजे केज येथील गायरान जमीन-सर्वे नं.३०/१ क्षेत्र ४३ हे.४६ आर पैकी ६ हे. क्षेत्राची अनधिकृतरित्या विल्हेवाट लावणे"	जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.१८.०३.२०११ रोजीच्या आदेशान्वये श्री.किसन अमृता लांडगे यांचे शासकीय गायरान जमीन स.नं.३०/१ मधील २.०० हे.आर वरील अतिक्रमण शासन निर्णय महसूल व वन विभाग दि.२८.११.१९९१ अन्वये नियमित केले आहे. तसेच, यापूर्वी तहसिलदार, केज यांनी पारित केलेल्या बेकायदेशीर आदेशाविरुध्द पोलीस स्टेशन केज येथे गु.र.क्र.१८८/२००० याप्रमाणे गुन्हा नोंद झाला असून यापूर्वीचा फेर क्र. ३३७१ रद्द करण्यात आला आहे. तसेच, दि.०१.०४.१९७८ ते दि.१९.०४.१९९० या कालावधीत झालेली व दि.१४.०४.१९९० रोजी अस्तित्वात असलेल्या अतिक्रमणांबाबतच्या नोंदवहीमध्ये सदरच्या अतिक्रमणाची नोंद असून त्यानुसार, फेर	उक्त प्रकरणी नियमानुसार कार्यवाही झाली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.	निरंक	निरंक	निरंक	निरंक

	चर्चेच्या अनुषंगाने सन २०१२ च्या पहिल्या अधिवेशनात आश्वासन क्र.७८२ दिले होते.	आहेत. या सर्व मुद्यांच्या अनुषंगाने उत्तर देताना मा.मंत्री (महसूल) यांनी वरीलप्रमाणे आश्वासन दिले आहे. ३. महसूल (खुद्द) विभागाशी संबंधित या १२ मुद्यांपैकी मुद्या क्र. 90) हा या कार्यासनाशी संबंधीत आहे. सदर मुद्या पुढीलप्रमाणे आहे :-		क्र.७५०४ दि.२६.०४.२०११ रोजी मंजूर झाला. आहे. सद्यस्थितीत, सदर स.नं.३०/१ मधील ४३.४६ हे.आर जमिनीच्या २.०० हे.आर. या क्षेत्राच्या सदरी ७/१२ मालकी हक्कामध्ये श्री.किसन अमृता लांडगे या एकाच व्यक्तीचे नांव समाविष्ट आहे.					

(24)

११

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
दालन क्र.एम-७ ए, बोटमाळा, मादाम
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२३४४५ ई-मेल: deskm1223.rfd-mh@gov.in

क्रमांक:- विपआ-२०१९/प्र.क्र.४७/म-१(धोरण) दिनांक:- १० सप्टेंबर, २०२४

प्रति,
कक्ष अधिकारी (कार्यासन-४),
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

विषय:- सन २०१९ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन विधानपरिषद आश्वासन क्र.७८२
उदयोग,पाटबंधारे व महसूल खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत-श्री.विनोद तावडे, तत्का.विधानपरिषद सदस्य व इतर यांच्या म.वि.प.नियम २५९ अन्वये प्रस्ताव

संदर्भ : महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.८७१२/म.वि.स./विपआस/ड-१३, दि.२.८.२०२४ रोजीचे पत्र,

महोदय,

विषयाधीन प्रकरणी सन २०१९ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशानातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक ७८२ कार्यविवरणपत्राच्या २० प्रती या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

१०।९।२०२४

(सुनिल जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी:-
१. कक्ष अधिकारी (म-५)/महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२. निवडनस्ती म-१(धोरण)/महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

H 3170.pdf - 19

विवरणपत्र-अ

विधानपरिषद दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कारवाईसंबंधी विवरणपत्र

सन २०१२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ७८२

विभागाचा फाईल क्रमांक:-विपआ-२०१९/प्र.क्र.४७/म-१(धोरण), दि.१०.०९.२०२४ विभागाचे नाव:- महसूल व वन विभाग (महसूल)

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले त्याबाबतचे आदेश, निर्णय इ. चा दिनांक	आश्वास नाची पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन पूर्ती करण्या-साठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	अश्वासन पूर्ती करण्या-सा-ठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांव र केलेली कारवाई
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
७८२	विधानपरिषद कामकाज खंड-१४७ क्रमांक-०२ दि. पृष्ठ क्र. मा.मंत्री श्री.बाळासाहेब थोरात	उदयोग,पाटबंधारे व महसूल खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत श्री.विनोद तावडे,तत्का. विधानपरिषद सदस्य यांच्या म.वि.प.नियम २५९ अन्वये प्रस्ताव:- ११) हिरानंदानी बिल्डरच्या मौजे कोळशेत येथील २४ एकर जागेच्या १०० कोटी रुपयांचे बनावट दस्त प्रकरण	श्री. बाळासाहेब थोरात- या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील , त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल.	मौजे कोलशेत ता. जि. ठाणे येथील स.न.१७७/३,१८०/२,१८१/२ व १९३/६ क्षेत्र १४८८० चौ.मी. ही मिळकत सह दुय्यम निबंधक ठाणे क्र.१ यांचे कार्यालयातील दस्त क्र. १०१७८ दिनांक २२.११.२००१ अन्वये मे. रोमा बिल्डर्स प्रा.लि. यांनी श्री. माणिकचंद मिश्रीमल व इतर दोन यांचेकडून विकसन कराराने घेतलेली आहे. दस्तातील तीनही पक्षकारांनी कबुली जबाब दिला असून ओळखदाराची सही घेवून तत्कालिन नोंदणी अधिकारी यांनी दस्तऐवजाची नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्ण केलेली आहे. दस्तऐवजातील लिहून देणार पक्षकार श्री. मोहनलाल रूपचंद यांनी दिलेल्या विकसन करार व कुलमुखत्यारपत्रामध्ये केलेल्या सह्या या बनावट असल्याचा अहवाल Forgery Detection Pvt. Bureau यांनी तक्रारदार श्री. राजेंद्र जैन यांना दिनांक २९.४.२००९ रोजी दिला आहे. सदर अहवालाची मूळ प्रत सह	दि.११.८. २०१०	दि.११. ८.२०१०	--	--	रकाना ५ व ९ पहाता कारवाईचा प्रश्न उदभवत नाही.

			जिल्हा निबंधक वर्ग -१ ठाणे शहर कार्यालयाने सदर व्यवहाराची मागणी केली असता, त्यांचा सदरचा अहवाल हा गोपनीय असल्याने त्यांचेकडील ग्राहक श्री. जैन यांचेकडे संपर्क साधवा असे दिनांक १२.५.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. श्री. राजेंद्र जैन यांना सह जिल्हा निबंधक वर्ग १, ठाणे शहर यांनी दिनांक ११.८.२०१० अन्वये दस्त क्र. १०१७८/२००१ वर खोटया सह्या झालेल्या आहेत म्हणून अहवालाची मुळ प्रत सादर करण्यास कळविले आहे. तथापि, त्यांनी अद्यापपर्यंत मुळ प्रत सादर केलेली नाही. नोंदणी अधिनियम कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यासाठी पक्षकाराने पुरावे देवून फसवणूक झाल्याबाबत सिद्ध करणे आवश्यक आहे. सन २०११ पासून पक्षकारांना कळवूनही त्यांनी अद्यापपर्यंत संपर्क साधला नसल्याने गुन्हा दाखल करण्यात पक्षकारांना स्वारस्य नसल्याचे दिसून येत असून कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नाही. तथापि संबंधित पक्षकार यांनी संबंधितांविरुद्ध कासारवडवली ता. जि. ठाणे या पोलिस स्टेशनमध्ये दिनांक १७९/२००९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.				

(सुनिल जाधव)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

ख-२

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

क्र.विपआ-७८२/०२२५/प्र.क्र.६५/ख-२ दिनांक. ०९ जून, २०२५.

अतितत्काळ
विधानमंडळ कामकाज प्राथम्य

प्रति,
कक्ष अधिकारी, (कार्यासन म-५)
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- विधानपरिषद आश्वासन क्र.७८२(सन २०१२ चे पहिले अधिवेशन)
आ.क्र.७८२:- या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रगरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल.
संदर्भ: जिल्हाधिकारी, सातारा, क्र.गौख/२-विपआ/एसआर-०१/२०२५, दि.१२.०२.२०२५ चे पत्र

उपरोक्त विषयासंदर्भातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक ७८२ बाबत संदर्भाधीन पत्रान्वये जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती पत्रा सोबत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(सदानंद गो. साहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत :-वरिल प्रमाणे

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी सातारा यांचे कार्यालय
राज्य महामार्ग 58, एलआयसी ऑफिसजवळ, पोवई नाका, सदरबझार, सातारा.
दूरध्वनी क्रमांक 02162-232175, E-mail ID : miningofficersatara@gmail.com

जा.क्र.गौख/2-विपआ/एसआर-01/2025 दिनांक : 12/02/2025.

प्रति,
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय मुंबई-400 032.

विषय :- सन 2012 चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन विधानपरिषद.
आश्वासन विधानपरिषद आश्वासन क्र.782 :- या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणाची चौकशी निश्चितपणे केली जाईल.

संदर्भ :- 1) आपलेकडील पत्र क्रमांक:विपआ-782/0225/प्र.क्र.65/ख-2, दि.11/02/2025.
2) तहसिलदार खटाव यांचेकडील पत्र क्र.वसूली/काधि/149/2025, दि.11/02/2025.

उपरोक्त विषयांस अनुसरुन सादर करणेत येते की, संदर्भिय पत्रान्वये मा.विधानपरिषद सदस्य श्री.विनोद तावडे, तत्कालीन वि.प.स. यांनी सभागृहात म.वि.प.नियम 259 अन्वये प्रस्तावाच्या चर्चेवेळी मा.मंत्री(महसूल) यांनी आश्वासन दिले आहे. आश्वासन क्र.782 च्या इतिवृत्तामध्ये गौणखनिज विषयी "खटाव, जि.सातारा येथे विनापरवाना मुरुम व गौण खनिज उत्खनन यामध्ये साडेतीन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होणे" हा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने संपुर्ण माहिती व कागदपत्रे तात्काळ शासनास सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

उक्त विषयाबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र.गौख/2-विपआ/एसआर-01/2025, दि.11/02/2025 अन्वये तहसिलदार खटाव यांना अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.02 चे पत्रान्वये तहसिलदार खटाव यांचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी त्यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध कागदपत्रांचे तपासणी केली असता, खटाव तालुक्यामध्ये अशी याव घडलेचे दिसून येत नाही. यावाबतची संचिका नजर चुकीने अन्य संकलनाच्या

दप्तरात गेली असलेस त्याचाही शोध घेणेची कार्यवाही सुरु असून जर अशा प्रकारची बाब अथवा संचिका आढळून आलेस तसा अहवाल सादर करणेची दक्षता घेत असलेबाबत नमूद केलेले आहे.

वरीलप्रमाणे पुर्तता अहवाल आपले माहितीस्तव सविनय सादर.

सोबत :- तहसिलदार खटाव यांचा अहवाल असे.

(सिध्दांत चव्हाण)
उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा.

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय
ई-मेल- tahsildarkhatav@gmail.com

क्रं/वसूली/कावि/15१/२०२५ दिनांक ११/०२/२०२५ दुरध्वनी ०२२६२-२२०२३८

प्रति,

मा. जिल्हाधिकारी सो
सातारा(गौण-खनिज शाखा)

विषय:- सन 2012 चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन विधानपरिषद आश्वासन विधानपरिषद आश्वासन क्रं 782 ~ या प्रकरणांमध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील,त्या प्रकरणांची चौकशी निश्चितपणे केली जाईल.

संदर्भ:-1.मा.उपजिल्हाधिकारी सो (महसूल) सातारा यांचेकडील पत्र क्रं गौख./2/विपआ/एसआर/01/2025 दिनांक 11/02/2025.

2. मा.जिल्हा खणिकर्म अधिकारी सो सातारा यांचेकडील दि.10/02/2025चा दुरध्वनी संदेश.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रात नमूद केले प्रमाणे मा.विधानपरिषद सदस्य, श्री विनोद तावडे ,तत्कालीन वि.प.स.यांनी सभागृहात म.वि.प.नियम 259 अन्वये प्रस्तावाच्या चर्चेवेळी मा.मंत्री,महसूल यांनी आश्वासन दिले आहे. आश्वासन क्रं 782 च्या इतिवृत्तामध्ये गौणखनिज विषयी खटाव सा.खटाव जि.सातारा येथे विनापरवाना मुरूम व गौण खनिज उत्खनन या मध्ये साडेतीन कोटी रूपयांचा भ्रष्टाचार होणे हा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने संपूर्ण माहिती व कागदपत्रे तात्काळ शासनास सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

तथापि उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता खटाव तालूकेमध्ये अशी बाब घडलेचे विसून येत नाही. याबाबतची संचिका नजरे चुकीने अन्य संकलनाच्या वेष्टनात गेली असलेस त्याचाही शोध घेणेची कार्यवाही सुरु असून जर अशा प्रकारची बाब अथवा संचीका आढळून आलेस तसा अहवाल सादर करणेची दक्षता घेत आहोत.

सबब पुढील योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे.

आश्वासन क्रमांक १९०

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
दालन क्र एम-७.ए, पोटमाळा, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२३४४५ ई-मेल: **deskm१२३.rfd-mh@gov.in**

क्रमांक:- विपआ-२०२५/४५०/प्र.क्र.१०९/मुद्रांक-२ **दिनांक:- १८ सप्टेंबर, २०२५**

प्रति,

कक्ष अधिकारी (कार्यासन-४),
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

विषय:- सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.१९०

महोदय,

विषयाधीन प्रकरणी सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशनात दि.१६.१२.२०१६ रोजी ॲड. श्री. रामहरी रूपनवर, विधान परिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्रमांक १९० च्या पुर्ततेबाबतच्या कार्यविवरणपत्राच्या ३५ प्रती या सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र:- कार्यविवरणपत्र

(विनायक लवटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. कक्ष अधिकारी (म-५),महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
२. निवड नस्ती, कार्यासन-मुद्रांक-२ (म-१ (धोरण)), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

महाराष्ट्र शासन

नोंदणी व मुद्रांक विभाग

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

नोंदणी व मुद्रांक विभाग

तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे -411001

दुरध्वनी क्र. 020-2612382 कार्यासन क्र.14 e-mail- do14-igro@mah.gov.in

जा.क्र.का.14/पुर्वि.प्र.क्र.13/2020/2025/ 441 /2025 दि. 06/06/2025

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव

(महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)

मंत्रालय, मुंबई.

विषयः- सन 2016 चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन विधान परिषद आश्वासन क्र.190 व 194 बाबत.

संदर्भ- 1. सह सचिव,महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा. क्र.विपआ-2017/450/प्र.क्र.109/म-1(धोरण) दि.06/05/2025.

2.कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा. क्र.विपआ-2017/449/प्र.क्र.108/म-1 (धोरण) दि.02/06/2025.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.1 च्या पत्रान्वये अन्वये मा. अपर मुख्य सचिव महसुल यांच्या निर्देशानुसार विषयांकित प्रकरणी तात्काळ कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल शासनास पाठविण्याचे निर्देश शासनाकडुन देण्यात आलेले आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी आश्वासन क्र.१९० व क्र.१९४ बाबत या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही बाबत स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश या कार्यालयास देण्यात आलेले आहेत.

सन 2016 चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन विधान परिषद आश्वासन क्र.190 व 194 शी निगडीत असलेले या कार्यालयाकडील पुनरिक्षण प्रकरण क्र.13/2020 मध्ये पारित करण्यात आलेल्या आदेशाची प्रत तसेच अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना या कार्यालयातर्फे पाठविण्यात आलेल्या चौकशी करण्याबाबतच्या पत्राची प्रत पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत- वरीलप्रमाणे.

Ravi

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से)

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक

महाराष्ट्र राज्य, पुणे .

6/6/2025

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
नोंदणी व मुद्रांक विभाग

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकीय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे411001
दुरध्वनी- 020-26123826 ई-मेल:- do14-igro@mah.gov.in

का.क्र.14/पु.वि.क्र.13/2020/259 /2025 दि. 17/03/2025

प्रति,

अपर मुद्रांक नियंत्रक,
मुंबई

विषय:- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53अ अन्वये पुनर्विलोकन प्रकरण क्रमांक 13/2020 (मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी 2 वि. श्री. अवतार सिंग) मध्ये चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत.

मौजे बोर्ला व्हिलेज, चेंबूर येथील सर्वे नं. 80 व सर्वे नं. 80हिस्सा क्र. 7 येथील 2 एकर 21 गुंठे या मिळकतीचा खरेदी खताचा दस्त दि बॉम्बे समाचार प्रा. लि. (मुळ मालक) व मे. नटराज प्रा.लि. (लिहून घेणारा) यांनी दिनांक 09/02/2012 रोजी निष्पादित केलेला दस्त योग्य मुद्रांकित करण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी – 2, मुंबई या कार्यालयामध्ये दाखल करण्यात आला होता. दस्ताकित मिळकतीचे बाजारमुल्य निर्धारित करतांना एकूण विक्री क्षेत्र 2 एकर 21 गुंठे (म्हणजेच 10100 चौमी) विचारात घेवून तसेच दस्तामधील भाडेकरू व्याप्त क्षेत्राचे पुरावे घेवून मुल्य निर्धारण करतांना केवळ 8131 चौमी. क्षेत्र व भाडेकरूव्याप्त मिळकतीचे पुरावे घेवून मुल्य रू.93 लाख इतके बाजारमुल्य निर्धारण केले आहेत. प्रत्यक्षात मोबदला रक्कम रू. 1.20 कोटी ही जास्त असल्याने या रकमेवर रू.6 लाख इतक्या मुद्रांक शुल्काची आकारणी करून दस्त दि.22/03/2012 रोजी प्रमाणीत करून दिलेला आहे, असे उपलब्ध नस्तीचे अवलोकन करता दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील दि. 12.06.2018 रोजीचा आश्वासन क्र. 190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने दस्तांकित मिळकतीचे बाजारमुल्य उपसंचालक नगर रचना, मुंबई यांचेकडून पडताळून घेतले असता विक्री क्षेत्र 2 ऐकर 21 गुंठे (म्हणजेच 10100 चौमी) या क्षेत्राची किंमत रु.11,34,53,500/- इतकी निर्धारित केलेली आहे. या रकमेवर 5% दराने रु.56.72 लाख इतके मुद्रांक शुल्क आकारणी करणे आवश्यक होते.

परंतु अभिनिर्णय प्रमाणपत्र देतेवेळी नजरचुकीने 2 ऐकर 21 गुंठे क्षेत्र चौ.मी. मध्ये परिवर्तीत करतांना 10100 चौ.मी. एवढे क्षेत्र करण्याऐवजी 8181 चौ.मी. क्षेत्र विचारात घेतल्याने मिळकतीचे बाजारमुल्य निर्धारित करताना चुक झालेली आहे. मुल्यांकन करतांना कार्यालयाने जमिनीचे क्षेत्रफळ कमी गृहीत धरल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-2, मुंबई यांनी अपर मुद्रांक नियंत्रक यांना सादर केलेल्या दि.02/03/2020 रोजीच्या अहवालावरुन दिसून येते.

मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-2, मुंबई यांनी दि. 02.03.2020 रोजीच्या नोटीसद्वारे उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार कमी आकारण्यात आलेले रु.56,72,675/- इतके मुद्रांक शुल्क व (अभिनिर्णीत आदेशाच्या दिनांकापासून ते मार्च 2020 अखेर) त्यावरील दंड रु. 98.41.100 - इतके शुल्क शासन जमा करणेस संबधित पक्षकारांना कळविले आहे.

सदर प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2 यांनी देय मुद्रांक शुल्काच्या प्रमाणात नियमानुसार दंड वसूल करणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 31 व 39 अन्वये प्रमाणित केलेल्या दस्तावर मुद्रांक जिल्हाधिकारी पुन्हा निर्णय देऊ शकत नाही. सदर निर्णयावर पुनर्विलोकन करण्याचे अधिकार हे मुख्य नियंत्रक, महसूल प्राधिकारी यांना म.मु.अ. चे कलम 53-अ अन्वये असल्याने सदरचे प्रकरण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53-अ अन्वये पुनर्विलोकन करणेसाठी या कार्यालयात सादर केले आहे.

मा. महोदयांकडे दि.24/02/2025 रोजी अंतीम सुनावणी होऊन प्रकरण आदेशासाठी राखीव ठेवण्यात आले. प्रस्तुत प्रकरणातील दस्त दि.22/03/2012 रोजी प्रमाणीत करुन दिलेला आहे. कलम 53अ अन्वये दस्ताचे पुनर्विलोकनाकरीता दस्त प्रमाणीकरणापासून सहा वर्षाच्या कालावधीची तरतुद आहे. सदरचे प्रकरण पुनर्विलोकनाचे कार्यवाहीकरीता दि.09/03/2020 रोजीच्या पत्रान्वये या कार्यासनाकडे पाठविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53 मधील तरतुदीप्रमाणे सदरचे प्रकरण दि.21/03/2018 पर्यंत पुनर्विलोकनाचे कार्यवाहीकरीता प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि सदर प्रकरणी तक्रारीचे दिवशी (दि.12/06/2018) अधिनियमातील तरतुदीप्रमाणे 6 वर्षाचा कालावधी उलटुन गेलेला आहे.

त्या अनुषंगाने आपण सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडुन खुलासा प्राप्त करावा व जबाबदारी निश्चित करुन तसा स्वयंस्पष्ट अहवाल 7दिवसात या कार्यालयास सादर करावा.

Ravi

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.
17/3/2025

मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
यांचे समोर

पुनरिक्षण प्रकरण क्र.13/2020
जिल्हा : मुंबई

महाराष्ट्र शासन तर्फे
मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई _____अर्जदार(निम्न प्राधिकारी)
विरुध्द
श्री.अवतार सिंग, संचालक
नटराज रियलकॉन प्रा.लि. _____गैरअर्जदार

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे कलम 53अ खालील पुनरिक्षण प्रकरण
गैरअर्जदारातर्फे प्राधिकृत:- ॲड. विजय लिमये

(सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने)

न्यायनिर्णय

(आज दिनांक 06 जुन, 2025 रोजी पारित)

मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई यांचेकडील अभिनिर्णय प्र.क्र. SDE/NEW/232/12 मध्ये दि.19/04/2012 रोजी सह दुय्यम निबंधक कुर्ला क्र.3 येथे नोंदणीकृत करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणपत्र दस्तऐवज क्र. 3034/2012 यावर कमी मुद्रांक शुल्क वसुल केले असल्याच्या सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (ज्याचा यापुढे उल्लेख "उक्त अधिनियम"असा केला आहे) चे कलम 53अ अन्वये प्रकरण पुनरिक्षणार्थ घेण्यात आले.

1. **प्रकरणाची पार्श्वभूमी-**

1.1 मे.नटराज रियलकॉन प्रा.लि.तर्फे संचालक श्री. अवतार सिंह अलग यांना पहिल्या भागाचे खरेदीदार/लिहून घेणार व दि बॉम्बे समाचार प्रा.लि. तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.मंचरजी नसरबानजी कामा यांना दुसऱ्या भागाचे विक्रेते/लिहून देणार असे नमूद करुन, मौजे बोरला, सर्वे नं 80, सर्व्हे नं.83, हिस्सा नं.7, सि.टी.एस. नं 667 यांचे 7/12 प्रमाणे क्षेत्र 2 एकर 21 गुंठे व प्रॉपर्टी कार्ड प्रमाणे क्षेत्र 10221.20 चौ.मी. या मिळकती मधील मालकी हक्काचे हस्तांतरण करण्याचे अनुषंगाने "अभिहस्तांतरण पत्र" (Deed of Conveyance) या शिर्षकाचा दस्तऐवज निष्पादित करण्याचे ठरले.

1.2 अर्जदाराने, मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई (ज्याचा यापुढे उल्लेख "निम्न प्राधिकारी" असा केला आहे) यांचे कार्यालयात महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 31 अन्वये अभिहस्तांतरणपत्र / खरेदीपत्र दस्तऐवज मसुदा अभिनिर्णयाकरीता दि.09/02/2012

रोजी मुद्रांक शुल्काच्या आकारणीकरीता दाखल केला. त्यास अभिनिर्णय प्र.क्र. SDE/NEW/232/12 देण्यात आला.

1.3 निम्न प्राधिकारी यांनी मिळकतीचे बाजारमुल्य रु.1,20,00,000/- इतके ठरवून त्यावर उक्त अधिनियमाचे परिशिष्ट एक मधिल अनुच्छेद 25(ब) नुसार 5% दराने रु.6,00,000/- इतक्या मुद्रांक शुल्काची मागणी केली. सदरची रक्कम गैरअर्जदाराने दि.21/03/2012 रोजी पावती क्र.100373 अन्वये शासनजमा केल्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम 32(1)(ब) अन्वये मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई यांनी दि.22/03/2012 रोजी प्रमाणपत्र निर्गमित केले.

1.4 गैरअर्जदाराने सदरचा दस्तऐवज सह दुय्यम निबंधक, कुर्ला-3 यांचेकडे दि.19/04/2012 रोजी नोंदणीकरीता हजर केला असता तो बदर-13/3034/2012 अन्वये नोंदणीकृत करण्यात आला.

1.5 सदर प्रकरणी सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याचे निर्देश शासनाने जा.क्र.विपआ-2018/450/प्र.क्र.109/म-1 दि.12/06/2018 रोजीच्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिले. तसेच नोंदणी व मुद्रांक विभागास दि. 15/02/2019 रोजी ई-मेलद्वारे प्राप्त महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्र. 834/ई-2 दि.06/01/2017 अन्वये ॲड निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी विधानपरिषदेत दि.16/12/2016 रोजी "औचित्याचा मुद्दाद्वारे" उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भात केलेली कारवाई अथवा त्या संदर्भातील माहिती संबंधित सदस्यांना मंत्री महोदयांनी परस्पर पाठवुन त्याची प्रत मा. सभापतींच्या अवलोकनार्थ, विधानमंडळ सचिवालयास पाठविण्याबाबत निर्देशित करण्यात आले.

1.6 तसेच दस्तांकीत मिळकतीचे बाजारमुल्य, उपसंचालक नगर रचना, मुंबई यांचेकडून पडताळून घेतले असता विक्री क्षेत्र 2 एकर 21 गुंठे (म्हणजेच 10221.20 चौ.मी.) या क्षेत्राचे बाजारमुल्य रु.11,34,53,500/- इतकी निर्धारित केले आहे. दस्तातील नमूद मोबदला रु.1,20,00,000/- पेक्षा बाजारमुल्य जास्त असल्याने या रकमेवर 5% दराने रु.56,72,675/- इतके मुद्रांक शुल्क आकारणी करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणी दस्तऐवजात नमूद 2 एकर 21 गुंठे क्षेत्राचे मी. करताना 10221.20 चौ.मी. करण्याऐवजी 8181 चौ.मी. क्षेत्र विचारात घेतल्याने मिळकतीचे बाजारमुल्य निर्धारित करताना चुक झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-2, मुंबई यांनी दि.02/03/2020 रोजीच्या नोटीसद्वारे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार रु.50,72,675/-इतके न्युन मुद्रांक शुल्क शासन जमा करणेस संबधित पक्षकारांना कळविले आहे.

1.7 अभिनिर्णय प्र.क्र.SDE/NEW/232/12 मध्ये दि.19/04/2012 रोजी नोंदणीकृत करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणपत्राच्या दस्तऐवजावर कमी मुद्रांक शुल्क वसुल केले असल्याच्या सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने या दस्तासंबंधित महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे 53अ अन्वये पुनरीक्षण प्रकरण सुरु करण्यात आले. यास्तव सदरचे पुनरीक्षण प्रकरण.

2. **सुनावणी व युक्तिवादाचे मुद्दे –**

उक्त प्रकरणात न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची प्रथम नोटीस दिनांक 09/03/2020 रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे व दि. 23/06/2020, 20/10/2020, 24/11/2020, 22/12/2020, 05/01/2021, 19/01/2021, 02/02/2020, 28/09/2021, 01/10/024, 15/10/2024, 22/10/2024, 27/11/2024, 10/12/2024, 24/12/2024, 27/01/2025 व दि. 24/02/2025 रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस गैरअर्जदारातर्फे ॲड. विजय लिमये उपस्थित होते. त्यांनी मांडलेले युक्तिवादाचे मुद्दे खालीलप्रमाणे:-

अ) सदरचा दस्त अभिनिर्णय प्राप्त करुन गैरअर्जदाराने त्यानुसार मुद्रांक शुल्काची रक्कम भरलेली आहे. एकदा अभिनिर्णीत केलेला दस्त पुन्हा अभिनिर्णीत करता येत नाही.

आ) सदर दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2 यांनी 22/03/2012 रोजी अभिनिर्णीत केलेला आहे. तो दस्त 6 वर्षाच्या कालावधीतच पुनरिक्षणासाठी घेता येईल. पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेला 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची नोटीस पारित करण्यात आलेली आहे.

यानुसार पुनरिक्षणाची कार्यवाही बंद करण्याची विनंती केली.

3. **विचारार्थ मुद्दे –**

3.1 सदरचा दस्त पुनरिक्षणासाठी घेता येईल का?

4. **निष्कर्ष –**

5. नाही. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53-अ नुसार पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेला 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची नोटीस पारित करण्यात आलेली आहे.

6. कारणमिमांसा-

6.1 दि.19/04/2012 रोजी नोंदणीकृत करण्यात आलेले अभिहस्तांतरणपत्र याबाबत गैरअर्जदाराचे युक्तिवादाचे मुद्दे विचारार्थ घेतले.

6.2 गैरअर्जदाराचे कथन की, सदरचा दस्त अभिनिर्णय प्राप्त करुन गैरअर्जदाराने त्यानुसार मुद्रांक शुल्काची रक्कम भरलेली आहे. एकदा अभिनिर्णित केलेला दस्त पुन्हा अभिनिर्णित करता येत नाही. सदर दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2 यांनी 22/03/2012 रोजी अभिनिर्णित करुन प्रमाणित केलला आहे. सदर अभिहस्तांतरण पत्राचा दस्त 6 वर्षाच्या कालावधीतच पुनरिक्षणासाठी घेता येईल. पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेला 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची नोटीस पारित करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील दस्त दि.22/03/2012 रोजी निम्न प्राधिकारी यांनी प्रमाणीत करुन दिलेला आहे. सदर प्रकरण या प्राधिकाऱ्याकडे दि.09/03/2020 रोजी पुनरिक्षणासाठी पाठविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53अ अन्वये दस्ताचे पुनरिक्षणाकरीता आवश्यक असलेला सहा वर्षाचा कालावधी दि.21/03/2018 रोजीच संपुष्टात आला आहे. यास्तव सदर प्रकरणी पुनरिक्षण करता येणार नाही, या निष्कर्षाप्रत मी येत आहे.

यास्तव खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53-अ नुसार 6 वर्षाची कालमर्यादा संपुष्टात आल्याने पुनरिक्षण करता येत नाही.

Ravi

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से.)
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

ठिकाण – पुणे
दिनांक - 06/06/2025.

क्र.का.14/पुर्वि प्र.क्र.13/2020/ 440 /2025
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
तळमंजला, नविन प्रशासकीय इमारत,
पुणे 411001.
दिनांक - 06 /06/2025.

प्रत – 1) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.12 यांना योग्य त्या कार्यवाहीकरीता.
2) मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीकरीता.
3) श्री.अवतार सिंग, संचालक, नटराज रियलकॉन प्रा.लि., लवकुश बंगला नं.5, सिंधी सोसायटी, चेंबुर, मुंबई-71.

आश्वासन क्रमांक १९४

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
दालन क्र एम-७.ए, पोटमाळा, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२३४४५ ई-मेल: **deskm१२३.rfd-mh@gov.in**

क्रमांक:- विपआ-२०२५/४४९/प्र.क्र.१०८/मुद्रांक-२ **दिनांक:- १८ सप्टेंबर, २०२५**

प्रति,

कक्ष अधिकारी (कार्यासन-४),
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

विषय:- सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.१९४

महोदय,

विषयाधीन प्रकरणी सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशनात दि.१६.१२.२०१६ रोजी ॲड. श्री. निरंजन डावखरे, विधान परिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्रमांक १९४ च्या पुर्ततेबाबतच्या कार्यविवरणपत्राच्या ३५ प्रती या सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र:- कार्यविवरणपत्र

(विनायक लवटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. कक्ष अधिकारी (म-५),महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
२. निवड नस्ती, कार्यासन-मुद्रांक-२ (म-१ (धोरण)), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

महाराष्ट्र शासन

नोंदणी व मुद्रांक विभाग

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

नोंदणी व मुद्रांक विभाग

तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे -411001

दुरध्वनी क्र. 020-2612382 कार्यासन क्र.14 e-mail- do14-igro@mah.gov.in

जा.क्र.का.14/पुर्वि.प्र.क्र.13/2020/2025/ 441 /2025 दि. 06/06/2025

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव
(महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)
मंत्रालय, मुंबई.

विषयः- सन 2016 चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन विधान परिषद आश्वासन क्र.190 व 194 बाबत.

संदर्भ- 1. सह सचिव,महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा. क्र.विपआ-2017/450/प्र.क्र.109/म-1(धोरण) दि.06/05/2025.
2.कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा. क्र.विपआ-2017/449/प्र.क्र.108/म-1 (धोरण) दि.02/06/2025.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.1 च्या पत्रान्वये अन्वये मा. अपर मुख्य सचिव महसुल यांच्या निर्देशानुसार विषयांकित प्रकरणी तात्काळ कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल शासनास पाठविण्याचे निर्देश शासनाकडुन देण्यात आलेले आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणी आश्वासन क्र.१९० व क्र.१९४ बाबत या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही बाबत स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश या कार्यालयास देण्यात आलेले आहेत.

सन 2016 चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन विधान परिषद आश्वासन क्र.190 व 194 शी निगडीत असलेले या कार्यालयाकडील पुनरिक्षण प्रकरण क्र.13/2020 मध्ये पारित करण्यात आलेल्या आदेशाची प्रत तसेच अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना या कार्यालयातर्फे पाठविण्यात आलेल्या चौकशी करण्याबाबतच्या पत्राची प्रत पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत- वरीलप्रमाणे.

Ravi

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे .
6/6/2025







महाराष्ट्र शासन

नोंदणी व मुद्रांक विभाग

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

नविन प्रशासकीय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे411001

दुरध्वनी- 020-26123826 ई-मेल:- do14-igro@mah.gov.in

का.क्र.14/पु.वि.क्र.13/2020/259 /2025 दि. 17/03/2025

प्रति,

अपर मुद्रांक नियंत्रक,

मुंबई

विषय:- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53अ अन्वये पुनर्विलोकन प्रकरण क्रमांक 13/2020 (मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी 2 वि. श्री. अवतार सिंग) मध्ये चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत.

मौजे बोर्ला व्हिलेज, चेंबूर येथील सर्वे नं. 80 व सर्वे नं. 80हिस्सा क्र. 7 येथील 2 एकर 21 गुंठे या मिळकतीचा खरेदी खताचा दस्त दि बॉम्बे समाचार प्रा. लि. (मुळ मालक) व मे. नटराज प्रा.लि. (लिहून घेणारा) यांनी दिनांक 09/02/2012 रोजी निष्पादित केलेला दस्त योग्य मुद्रांकित करण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी – 2, मुंबई या कार्यालयामध्ये दाखल करण्यात आला होता. दस्तांकित मिळकतीचे बाजारमुल्य निर्धारित करतांना एकूण विक्री क्षेत्र 2 एकर 21 गुंठे (म्हणजेच 10100 चौमी) विचारात घेवून तसेच दस्तागधील भाडेकरू व्याप्त क्षेत्राचे पुरावे घेवून मुल्य निर्धारण करतांना केवळ 8131 चौमी. क्षेत्र व भाडेकरूव्याप्त मिळकतीचे पुरावे घेवून मुल्य रू.93 लाख इतके बाजारमुल्य निर्धारण केले आहेत. प्रत्यक्षात मोबदला रक्कम रू. 1.20 कोटी ही जास्त असल्याने या रकमेवर रू.6 लाख इतक्या मुद्रांक शुल्काची आकारणी करून दस्त दि.22/03/2012 रोजी प्रमाणीत करून दिलेला आहे, असे उपलब्ध नस्तीचे अवलोकन करता दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील दि. 12.06.2018 रोजीचा आश्वासन क्र. 190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने दस्तांकित मिळकतीचे बाजारमुल्य उपसंचालक नगर रचना, मुंबई यांचेकडून पडताळून घेतले असता विक्री क्षेत्र 2 ऐकर 21 गुंठे (म्हणजेच 10100 चौमी) या क्षेत्राची किमत रु.11,34,53,500/- इतकी निर्धारित केलेली आहे. या रकमेवर 5% दराने रु.56.72 लाख इतके मुद्रांक शुल्क आकारणी करणे आवश्यक होते.

परंतु अभिनिर्णय प्रमाणपत्र देतेवेळी नजरचुकीने 2 ऐकर 21 गुंठे क्षेत्र चौ.मी. मध्ये परिवर्तीत करतांना 10100 चौ.मी. एवढे क्षेत्र करण्याऐवजी 8181 चौ.मी. क्षेत्र विचारात घेतल्याने मिळकतीचे बाजारमुल्य निर्धारित करताना चुक झालेली आहे. मुल्यांकन करतांना कार्यालयाने जमिनीचे क्षेत्रफळ कमी गृहीत धरल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-2, मुंबई यांनी अपर मुद्रांक नियंत्रक यांना सादर केलेल्या दि.02/03/2020 रोजीच्या अहवालावरुन दिसून येते.

मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-2, मुंबई यांनी दि. 02.03.2020 रोजीच्या नोटीसद्वारे उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार कमी आकारण्यांत आलेले रु.56,72,675/- इतके मुद्रांक शुल्क व (अभिनिर्णीत आदेशाच्या दिनांकापासून ते मार्च 2020 अखेर) त्यावरील दंड रु. 98,41,100 - इतके शुल्क शासन जमा करणेस संबधित पक्षकारांना कळविले आहे.

सदर प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2 यांनी देय मुद्रांक शुल्काच्या प्रमाणात नियमांनुसार दंड वसूल करणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 31 व 39 अन्वये प्रमाणित केलेल्या दस्तावर मुद्रांक जिल्हाधिकारी पुन्हा निर्णय देऊ शकत नाही. सादर निर्णयावर पुनर्विलोकन करण्याचे अधिकार हे मुख्य नियंत्रक, महसूल प्राधिकारी यांना म.मु.अ. चे कलम 53-अ अन्वये असल्याने सदरचे प्रकरण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53-अ अन्वये पुनर्विलोकन करणेसाठी या कार्यालयात सादर केले आहे.

मां. महोदयांकडे दि.24/02/2025 रोजी अंतीम सुनावणी होऊन प्रकरण आदेशासाठी राखीव ठेवण्यात आले. प्रस्तुत प्रकरणातील दस्त दि.22/03/2012 रोजी प्रमाणीत करुन दिलेला आहे. कलम 53अ अन्वये दस्ताचे पुनर्विलोकनाकरीता दस्त प्रमाणीकरणापासून सहा वर्षाच्या कालावधीची तरतुद आहे. सदरचे प्रकरण पुनर्विलोकनाचे कार्यवाहीकरीता दि.09/03/2020 रोजीच्या पत्रान्वये या कार्यासनाकडे पाठविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53 मधील तरतुदीप्रमाणे सदरचे प्रकरण दि.21/03/2018 पर्यंत पुनर्विलोकनाचे कार्यवाहीकरीता प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि सदर प्रकरणी तक्रारीचे दिवशी (दि.12/06/2018) अधिनियमातील तरतुदीप्रमाणे 6 वर्षाचा कालावधी उलटुन गेलेला आहे.

त्या अनुषंगाने आपण सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडुन खुलासा प्राप्त करावा व जबाबदारी निश्चित करुन तसा स्वयंस्पष्ट अहवाल 7दिवसात या कार्यालयास सादर करावा.

Ravi

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.
17/3/2025

मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
यांचे समोर

पुनर्रिक्षण प्रकरण क्र.13/2020
जिल्हा : मुंबई

महाराष्ट्र शासन तर्फे
मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई _____अर्जदार(निम्न प्राधिकारी)
विरुध्द
श्री.अवतार सिंग, संचालक
नटराज रियलकॉन प्रा.लि. _____गैरअर्जदार

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे कलम 53अ खालील पुनरिक्षण प्रकरण
गैरअर्जदारातर्फे प्राधिकृत:- ॲड. विजय लिमये

(सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने)

न्यायनिर्णय

(आज दिनांक 06 जुन, 2025 रोजी पारित)

मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई यांचेकडील अभिनिर्णय प्र.क्र. SDE/NEW/232/12 मध्ये दि.19/04/2012 रोजी सह दुय्यम निबंधक कुर्ला क्र.3 येथे नोंदणीकृत करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणपत्र दस्तऐवज क्र. 3034/2012 यावर कमी मुद्रांक शुल्क वसुल केले असल्याच्या सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (ज्याचा यापुढे उल्लेख "उक्त अधिनियम"असा केला आहे) चे कलम 53अ अन्वये प्रकरण पुनरिक्षणार्थ घेण्यात आले.

1. **प्रकरणाची पार्श्वभूमी-**

1.1 मे.नटराज रियलकॉन प्रा.लि.तर्फे संचालक श्री. अवतार सिंह अलग यांना पहिल्या भागाचे खरेदीदार/लिहून घेणार व दि बॉम्बे समाचार प्रा.लि. तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.मंचरजी नसरबानजी कामा यांना दुसऱ्या भागाचे विक्रेते/लिहून देणार असे नमूद करुन, मौजे बोरला, सर्वे नं 80, सर्व्हे नं.83, हिस्सा नं.7, सि.टी.एस. नं 667 यांचे 7/12 प्रमाणे क्षेत्र 2 एकर 21 गुंठे व प्रॉपर्टी कार्ड प्रमाणे क्षेत्र 10221.20 चौ.मी. या मिळकती मधील मालकी हक्काचे हस्तांतरण करण्याचे अनुषंगाने "अभिहस्तांतरण पत्र" (Deed of Conveyance) या शिर्षकाचा दस्तऐवज निष्पादित करण्याचे ठरले.

1.2 अर्जदाराने, मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई (ज्याचा यापुढे उल्लेख "निम्न प्राधिकारी" असा केला आहे) यांचे कार्यालयात महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 31 अन्वये अभिहस्तांतरणपत्र / खरेदीपत्र दस्तऐवज मसुदा अभिनिर्णयाकरीता दि.09/02/2012

रोजी मुद्रांक शुल्काच्या आकारणीकरीता दाखल केला. त्यास अभिनिर्णय प्र.क्र. SDE/NEW/232/12 देण्यात आला.

1.3 निम्न प्राधिकारी यांनी मिळकतीचे बाजारमुल्य रु.1,20,00,000/- इतके ठरवून त्यावर उक्त अधिनियमाचे परिशिष्ट एक मधिल अनुच्छेद 25(ब) नुसार 5% दराने रु.6,00,000/- इतक्या मुद्रांक शुल्काची मागणी केली. सदरची रक्कम गैरअर्जदाराने दि.21/03/2012 रोजी पावती क्र.100373 अन्वये शासनजमा केल्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम 32(1)(ब) अन्वये मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई यांनी दि.22/03/2012 रोजी प्रमाणपत्र निर्गमित केले.

1.4 गैरअर्जदाराने सदरचा दस्तऐवज सह दुय्यम निबंधक, कुर्ला-3 यांचेकडे दि.19/04/2012 रोजी नोंदणीकरीता हजर केला असता तो बदर-13/3034/2012 अन्वये नोंदणीकृत करण्यात आला.

1.5 सदर प्रकरणी सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याचे निर्देश शासनाने जा.क्र.विपआ-2018/450/प्र.क्र.109/म-1 दि.12/06/2018 रोजीच्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिले. तसेच नोंदणी व मुद्रांक विभागास दि. 15/02/2019 रोजी ई-मेलद्वारे प्राप्त महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्र. 834/ई-2 दि.06/01/2017 अन्वये ॲड निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी विधानपरिषदेत दि.16/12/2016 रोजी "औचित्याचा मुद्दाद्वारे" उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भात केलेली कारवाई अथवा त्या संदर्भातील माहिती संबंधित सदस्यांना मंत्री महोदयांनी परस्पर पाठवुन त्याची प्रत मा. सभापतींच्या अवलोकनार्थ विधानमंडळ सचिवालयास पाठविण्याबाबत निर्देशित करण्यात आले.

1.6 तसेच दस्तांकीत मिळकतीचे बाजारमुल्य, उपसंचालक नगर रचना, मुंबई यांचेकडून पडताळून घेतले असता विक्री क्षेत्र 2 एकर 21 गुंठे (म्हणजेच 10221.20 चौ.मी.) या क्षेत्राचे बाजारमुल्य रु.11,34,53,500/- इतकी निर्धारित केले आहे. दस्तातील नमूद मोबदला रु.1,20,00,000/- पेक्षा बाजारमुल्य जास्त असल्याने या रकमेवर 5% दराने रु.56,72,675/- इतके मुद्रांक शुल्क आकारणी करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणी दस्तऐवजात नमूद 2 एकर 21 गुंठे क्षेत्राचे मी. करताना 10221.20 चौ.मी. करण्याऐवजी 8181 चौ.मी. क्षेत्र विचारात घेतल्याने मिळकतीचे बाजारमुल्य निर्धारित करताना चुक झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-2, मुंबई यांनी दि.02/03/2020 रोजीच्या नोटीसद्वारे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार रु.50,72,675/-इतके न्युन मुद्रांक शुल्क शासन जमा करणेस संबधित पक्षकारांना कळविले आहे.

1.7 अभिनिर्णय प्र.क्र.SDE/NEW/232/12 मध्ये दि.19/04/2012 रोजी नोंदणीकृत करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणपत्राच्या दस्तऐवजावर कमी मुद्रांक शुल्क वसुल केले असल्याच्या सन 2016 चे पाचवे हिवाळी अधिवेशनातील आश्वासन क्र.190 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने या दस्तासंबंधित महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे 53अ अन्वये पुनरीक्षण प्रकरण सुरु करण्यात आले. यास्तव सदरचे पुनरीक्षण प्रकरण.

2. **सुनावणी व युक्तिवादाचे मुद्दे –**

उक्त प्रकरणात न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची प्रथम नोटीस दिनांक 09/03/2020 रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे व दि. 23/06/2020, 20/10/2020, 24/11/2020, 22/12/2020, 05/01/2021, 19/01/2021, 02/02/2020, 28/09/2021, 01/10/024, 15/10/2024, 22/10/2024, 27/11/2024, 10/12/2024, 24/12/2024, 27/01/2025 व दि. 24/02/2025 रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस गैरअर्जदारातर्फे ॲड. विजय लिमये उपस्थित होते. त्यांनी मांडलेले युक्तिवादाचे मुद्दे खालीलप्रमाणे:-

अ) सदरचा दस्त अभिनिर्णय प्राप्त करुन गैरअर्जदाराने त्यानुसार मुद्रांक शुल्काची रक्कम भरलेली आहे. एकदा अभिनिर्णीत केलेला दस्त पुन्हा अभिनिर्णीत करता येत नाही.

आ) सदर दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2 यांनी 22/03/2012 रोजी अभिनिर्णीत केलला आहे. तो दस्त 6 वर्षाच्या कालावधीतच पुनरिक्षणासाठी घेता येईल. पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेला 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची नोटीस पारित करण्यात आलेली आहे.

यानुसार पुनरिक्षणाची कार्यवाही बंद करण्याची विनंती केली.

3. **विचारार्थ मुद्दे –**

3.1 सदरचा दस्त पुनरिक्षणासाठी घेता येईल का?

4. **निष्कर्ष –**

5. नाही. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53-अ नुसार पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेला 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची नोटीस पारित करण्यात आलेली आहे.

6. **कारणमिमांसा-**

6.1 दि.19/04/2012 रोजी नोंदणीकृत करण्यात आलेले अभिहस्तांतरणपत्र याबाबत गैरअर्जदाराचे युक्तिवादाचे मुद्दे विचारार्थ घेतले.

6.2 गैरअर्जदाराचे कथन की, सदरचा दस्त अभिनिर्णय प्राप्त करुन गैरअर्जदाराने त्यानुसार मुद्रांक शुल्काची रक्कम भरलेली आहे. एकदा अभिनिर्णित केलेला दस्त पुन्हा अभिनिर्णित करता येत नाही. सदर दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2 यांनी 22/03/2012 रोजी अभिनिर्णित करुन प्रमाणित केलला आहे. सदर अभिहस्तांतरण पत्राचा दस्त 6 वर्षाच्या कालावधीतच पुनरिक्षणासाठी घेता येईल. पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेला 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्युन मुद्रांक शुल्क शासनजमा करण्याची नोटीस पारित करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील दस्त दि.22/03/2012 रोजी निम्न प्राधिकारी यांनी प्रमाणीत करुन दिलेला आहे. सदर प्रकरण या प्राधिकाऱ्याकडे दि.09/03/2020 रोजी पुनरिक्षणासाठी पाठविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53अ अन्वये दस्ताचे पुनरिक्षणाकरीता आवश्यक असलेला सहा वर्षाचा कालावधी दि.21/03/2018 रोजीच संपुष्टात आला आहे. यास्तव सदर प्रकरणी पुनरिक्षण करता येणार नाही, या निष्कर्षाप्रत मी येत आहे.

यास्तव खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम 53-अ नुसार 6 वर्षाची कालमर्यादा संपुष्टात आल्याने पुनरिक्षण करता येत नाही.

Ravi-

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से.)
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

ठिकाण – पुणे
दिनांक - 06/06/2025.

क्र.का.14/पुर्वि प्र.क्र.13/2020/ 440 /2025
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
तळमजला, नविन प्रशासकीय इमारत,
पुणे 411001.
दिनांक - 06 /06/2025.

प्रत – 1) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.12 यांना योग्य त्या कार्यवाहीकरीता.
2) मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-2, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीकरीता.
3) श्री.अवतार सिंग, संचालक, नटराज रियलकॉन प्रा.लि., लवकुश बंगला नं.5, सिंधी सोसायटी, चेंबुर, मुंबई-71.

आश्वासन क्रमांक ७५

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ deskkh२-rfd@mah.gov.in

क्रमांक: विपआ-७७/०८२४/प्र.क्र.२९९/ख-२ दिनांक २३ जानेवरी, २०२५

प्रति,
कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.७७ ची माहिती पाठविण्याबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.७७ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(सदानंद गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

D:\Desktop And Download Data Backup Profile\Desktop\Rakesh\अधिवेशन पासवाळी अधिवेशन २०२३\Letter with logo.docx

प्रत: कक्ष अधिकारी (मा.), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

962/H-5
6/11/25

आश्वासन क्र.५५

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२.

ई मेल :- so4.pad@maharashtra.gov.in

क्रमांक :- विपआ-२०२५/प्र.क्र.१०/चार **दिनांक :-** ३१।१०।२०२५

प्रति,
सह सचिव/ उप सचिव,
मदत व पुनर्वसन विभाग
(विधानमंडळ कामकाज समन्वय शाखा)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाच्या परिषद सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनां हस्तांतरणाबाबत.....
सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्र. ५५

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. विपआ/३७२३/ ३२२/ प्र.क्र.१७८/र-४, दि. २८.०७.२०२५

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. सदर संदर्भाधीन पत्रान्वये महसूल व वन विभागाने महाराष्ट्र विधानमंडळाच्या परिषद सभागृहात देण्या आलेल्या सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासन क्र. ५५ आपल्या विभागाकडे पूर्व संमती हस्तांतरीत केले आहे.

३. त्यानुसार आश्वासन क्र. ५५ आपल्या विभागाच्या प्रलंबित आश्वासनांच्या यादीमध्ये व अभिलेख्या दर्शविण्यात येत आहे. सबब, सदर आश्वासनाची सत्वर पूर्तता करुन पूर्तता विवरणपत्राच्या ३५ प्रती आणि सद आश्वासनाची PDF FILE तयार करुन या विभागाकडे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी पाठवाव्यात, ही विनंती.

आपली,
सु तेरवणकर
(सुजाता तेरवणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलपमाणे.

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
१. उपसचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (कार्यासन ड-१३), विधानभवन, मुंबई .
२. कक्ष अधिकारी,(महसूल)व वन विभाग मंत्रालय, मुंबई
३. कक्ष अधिकारी, समन्वय कक्ष, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. निवड नस्ती – कार्यासन/चार संग्रहार्थ.

सं.क्र. २१७/का.चार
३१/०७/२०२५

आश्वासन क्रमांक - ५५

प्रती प्राप्त

महसूल → मदत व पुनर्व

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (म. व पु.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

"जनहिताय सर्वदा"

Email ID:deskr4-rev@mah.gov.in

दूरध्वनी क्र. ०२२-२२०२३३१२

क्रमांक:विपआ/३७२३/३२२/प्र.क्र.१७८/र-४

दिनांक: २८.०७.२०२५

प्रति,

कक्ष अधिकारी
संसदीय कार्य विभाग,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई

विषय: महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात विधान परीषद आश्वासन क्रमांक ५५.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधान परीषदेत दिलेले आश्वासन क्रमांक ५५ महसुल विभागाच्या नावे दर्शविण्यात आले होते. सदर आश्वासनातील विषय पुनर्वसन उप विभागाशी संबधीत असल्याने सदर आश्वासनाचे हस्तांतरण स्विकारणेबाबत महसूल उपकक्षाने पुनर्वसन उपकक्षास विनंती केली होती.

त्यानुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधान परीषदेत दिलेले आश्वासन क्रमांक ५५ पुनर्वसन उपकक्षाने हस्तांतरण स्विकारण्यात आलेले आहे. सदर आश्वासनाच्या पुर्तता पुनर्वसन उपकक्षाकडून करण्यात येत आहे.

आपला,

(अभिजीत गावडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-१. कार्यासन अधिकारी (समन्वय) र-१, महसुल व वन विभाग
२. कार्यासन अधिकारी, म-५, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. निवडनस्ती कार्यासन र-४

entry taken

सही. आनंद
सन २०२२/३ → आ.क्र.५५
चे पूर्तता मदत व पुन: विभागाने
दि. ३१.०७.२०२५ रोजी केले
आहे. सबब संदर्भ दि.दा.करावा.

१४.०८.२०२५

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ deskkh२-rfd@mah.gov.in

क्रमांक: विपआ-६९,७०,७१/०५२३/प्र.क्र.१६२/ख-२ दिनांक २४ जानेवरी, २०२५

प्रति,
कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Received
27/1/2025

विषय:- सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.६९,७० व ७१ ची माहिती पाठविण्याबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.६९,७० व ७१ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(सदानंद गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

D:\Desktop And Download Data Backup Profile\Desktop\Rakesh\अधिवेशन\पासवाळी अधिवेशन २०२३\Letter with logo.docx

प्रत : कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ deskkh२-rfd@mah.gov.in

क्रमांक: विपआ-६९,७०,७१/०५२३/प्र.क्र.१६२/ख-२ दिनांक २४ जानेवरी, २०२५

प्रति,
कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.६९,७० व ७१ ची माहिती पाठविण्याबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.६९,७० व ७१ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(सदानंद गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत: कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ deskkh२-rfd@mah.gov.in

क्रमांक: विपआ-६९,७०,७१/०५२३/प्र.क्र.१६२/ख-२ दिनांक २४ जानेवरी, २०२५

प्रति,
कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Received
27/1/2025

विषय:- सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.६९,७० व ७१ ची माहिती पाठविण्याबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.६९,७० व ७१ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(सदानंद गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

D:\Desktop And Download Data Backup Profile\Desktop\Rakesh\अधिवेशन\पासवाली अधिवेशन २०२३\Letter with logo.docx

प्रत: कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

आश्वासन क्रमांक ९६

महाराष्ट्र शासन

विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय

कोंकण भवन, १ ला मजला, नवी मुंबई- ४०० ६१४
दूरध्वनी क्र.- २७५७१५१७/२७५७८००३, ईमेल- rbkonkan@gmail.com

क्र. मशा/कार्या-९/गौखनि/ई-३६९४५२५/२०२५ दिनांक- १२/०२/२०२५

प्रति,
मा.उप सचिव
महसूल व वन विभाग, (ख-२)
मंत्रालय मुंबई ४०००३२.

विषय - <u>विधानसभा आश्वासन क्रमांक ९६.</u>
मौजे तुडाळ येथील खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश अप्पर जिल्हाधिकारी यांनी अनिर्णत ठेवल्याबाबत...
मा. श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेता व इतर वि.प.स.

संदर्भ -१) शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्रमांक विसआ ९६/०५२३ /प्र.क.१७२/ख-२, दि.२९.०५.२०२३ व दिनांक १०.०४.२०२४
२) जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र.खशा/गौख/कात-१/मौजे तुडाळ/ विधानसभा आश्वासन ९६/२०२५, दि.१२/०२/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन, मा. श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेता व इतर वि.प.स. यांनी विधानसभा आश्वासन क्रमांक ९६ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील संदर्भिय दि.१२.०२.२०२५ चे पत्रानुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशनात महाराष्ट्र विधानपरिषद नियम- १०१ अनुसार मौजे तुडाळ येथील शासकीय जमीनीवर खाणपट्टा मंजूर केल्याबाबत लक्षवेधी सूचना क्र. ५९७ उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र दि.२७.१२.२०२२ अन्वये शासनास अहवाल सादर करण्यांत आला होता.

तसेच मौजे तुडाळ, ता. अलिबाग येथील अनधिकृत उत्खननाबाबत अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पत्रानुसार अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने मा.श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांनी त्यांचेकडील दिनांक २८.१२.२०२२ चे पत्रात दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करुन जिल्हाधिकारी रायगड यांजकडून या कार्यालयाकडील पत्र दि.२९.१२.२०२२, दि.८.०६.२०२३ व दि.२२.०८.२०२४ चे पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी रायगड यांजकडील संदर्भिय पत्र दि.१२.०२.२०२५ अन्वये अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

मौजे तुडाळ येथील शासकीय जमीनीवर खाणपट्टा मंजूर केल्याबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र. ५९७ चे अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदयांनी "विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडून या संदर्भातील सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील", असे आश्वासन दिलेले आहे.

प्रस्तुत आश्वासनाबाबत मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे दि.२५/०३/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यांत आली. सदर बैठकीमध्ये "मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, १३/२/१ व १६/२ मधील क्षेत्रातून देण्यात आलेले परवाने व सदर क्षेत्रातून करण्यात आलेले उत्खनन याबाबत तपासणी करुन अनधिकृत गौण खनिज उत्खननाबाबत सखोल तपासणी करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी रायगड यांनी करावी", असे निर्देश दिलेले आहेत.

मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि.२५/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, १३/२/१ व १६/२ मधील क्षेत्रातून देण्यांत आलेले परवाने व सदर क्षेत्रातून करण्यांत आलेले उत्खनन याबाबत तपासणी करुन अनधिकृत गौणखनिज उत्खननाबाबत सखोल तपासणी करण्याची कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यांत आले होते. त्याअनुषंगाने प्रकरणी कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी अलिबाग यांना जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडून निर्देश देण्यांत आले. उक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी कार्यवाही केलेली असून त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल दि.०१/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील प्राप्त अहवालामधील बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. शासन पत्र दि.१३/०४/२०१८ अन्वये गौणखनिजाचा खनिपट्टयाची ईटीएसद्वारे मोजणी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने दिनांक १६/०५/२०१८ रोजी पहिली ईटीएस मोजणी करण्यात आली. सदर मोजणीवेळी खाणपट्टाधारक श्रीम. मानसी महेंद्र दळवी स्वतः उपस्थित नसल्यामुळे खाणपट्टा क्षेत्राचे सिमांकन करण्यात आलेले नसल्याने सदर क्षेत्रात सरसकट १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे दिसून आले.

२. तद्नंतर खाणपट्टाधारक यांनी खाणकाम सिमांकनाप्रमाणे हद्द कायम केली व खाणपट्टाधारकाचे उत्खननाची दि.२४/०७/२०१८ रोजी ईटीएस मोजणी केली असता खाणपट्टा क्षेत्रात ४०,५२२ ब्रास उत्खनन केल्याचे दिसून आले. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडील पत्र जा. क्र. खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दिनांक ०२/०८/२०१८ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

३. श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांनी मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.११६/२०१९ दाखल केलेला असुन त्यामधील आदेश दिनांक २५/०९/२०१९ अन्वये "वादी यांचा नि.क्र. ११ कडील जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा अर्ज २८ लाख १९ हजार २५१ रुपये जिल्हाधिकारी अलिबाग यांचे कार्यालयात दोन दिवसात जमा करण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर मंजूर करण्यात येतो." असे आदेश दिले होते. त्यानुषंगाने श्रीम. मानसी महेंद्र दळवी

यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात चलन क्र. MH००६७५१६२५२०१९२०M दि.३०/०९/२०१९ अन्वये स्वामित्वधनापोटी शासन जमा केली आहे.

४. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील दिनांक ०२/०८/२०१८ व दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रामध्ये प्राप्त निर्देशानुसार श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांनी केलेल्या उत्खननाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयाचे न्यायालयात सुनावणी घेवुन दि.१७/०६/२०२२ रोजी आदेश पारित करण्यात आलेले आहेत. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयाकडून दि.१७/०६/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशातील निष्कर्षाच्या आधारे श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांचेकडून अनाधिकृत गौणखनिज उत्खननाबाबत चालु असलेली वसुलीची कार्यवाही तात्पुरती थांबविण्याबाबत आदेश करण्यात आलेले असून याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शनाप्रमाणे वसुलीची पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

५. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयाकडील गौणखनिज अपिल क्र.०३/२०१९ मध्ये दि.१७/०६/२०२२ रोजी दिलेले आदेश हे आजरोजीपर्यंत कोणत्याही न्यायालयाने वा सक्षम प्राधिकारी यांनी रद्द केलेले नाहीत किंवा स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे सदरचे आदेश आजरोजी कायम आहेत. सदर निर्णयाच्या निष्कर्षामध्ये श्रीम. मानसी दळवी यांनी एकूण १९,३५० ब्रास गौणखनिज उत्खननापोटी स्वामित्वधन जमा केले असल्याचे नमुद केलेले आहे. तद्नंतर उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी त्यांचे कार्यालयातील अभिलेखाची तपासणी केली असता, एकूण २०,४५० ब्रास गौणखनिज उत्खननापोटी स्वामित्वधन श्रीम. दळवी यांनी शासन जमा केले असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे श्रीम. दळवी यांचेकडून ४०,५२२ ब्रास मधून २०,४५० वजा जाता एकुण २०,०७२ ब्रास गौणखनिज उत्खननापोटी स्वामित्वधन वसुली करण्याचे शिल्लक राहिलेले आहे. याप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

तद्नंतर मा. श्री. महेंद्र हरि दळवी, आमदार अलिबाग-मुरुड, विधानसभा यांनी मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले पत्र दि.२७/०६/२०२३ व त्यासोबतचा श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांचेकडील अर्जाचे अनुषंगाने मौजे तुडाळ, ता. अलिबाग येथील स.नं./ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १७-४७-० हे.आर. पैकी १-००-० हे.आर. क्षेत्रावर विशेष बाब म्हणून प्रस्तावित गौण खनिज खाणपट्टा नुतनीकरण व करारनामा निष्पादन करणेकामी शासनस्तरावरुन मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचेकडील पत्र दि.१५.१२.२०२३ अन्वये शासनास सादर करण्यांत आलेला होता. त्याअनुषंगाने शासनाकडून प्राप्त दि१५.०३.२०२४ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडून शिफारस केल्याप्रमाणे आवश्यक ते शासकीय येणी वसुल करुन गौणखनिज खाणपट्टयाचे नुतनीकरण व करारनामा निष्पादनास विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी रायगड कार्यालयास कळविण्यांत आलेले आहे.

सदर दि.१५.०३.२०२४ चे शासन पत्रात नमूद निर्देशानुसार प्रस्तावित खाणपट्टांतर्गत शासकीय येणी वसुलीबाबत योग्य ते आदेश पारित करुन नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन

अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी अलिबाग यांना जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडील पत्र दि.१५/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले होते.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील दि.१२.०२.२०२५ अन्वये प्राप्त अहवालात नूमद केल्याप्रमाणे तहसिलदार अलिबाग यांनी श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांना त्यांचेकडील दि.१६/०८/२०२४ रोजीच्या नोटीसीन्वये र.रु.५२,०९,५४९/- शासन जमा करणेबाबत नोटीस दिली होती. सदर नोटीसीच्या अनुषंगाने श्रीम. दळवी यांनी GRN No.MH००७२७४१५७२२०२४२५M, दि.२९/०८/२०२४ अन्वये र.रु. ५२,०९,५४९/- तहसिलदार अलिबाग यांचेमार्फत शासनजमा केलेली आहे. तसेच श्रीम. दळवी यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे शासन जमा करण्यात आलेली स्वामित्वधनाची रक्कम रु.२८,१९,२५१/- मा. दिवाणी न्यायालयाकडे परत मागणी करणार नाही असे लिहून दिले आहे. तसेच श्रीम. मानसी दळवी यांजकडून स्वामित्वधनाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. मात्र दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.११६/२०१९ अदयाप प्रलंबित असून त्याची पुढील तारिख १८/०२/२०२५ आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी सादर केलेला आहे.

त्याचबरोबर दि.१५.०३.२०२४ चे शासन पत्रानुसार प्रस्तावित गौणखनिज खाणपट्टयाचे नुतनीकरण व करारनामा निष्पादन करण्याकरीता महाराष्ट गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील नियम २० व नियम २३(सहा) मध्ये नमूद केलेप्रमाणे आवश्यक असलेली पर्यावरण विभागाकडील पर्यावरणविषयक पुढील अनुमती आणि भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाकडील मान्यताप्राप्त खाणकाम आराखडा तात्काळ सादर करणेबाबतचे पत्र दि.१५/०३/२०२४ रोजी श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांना देण्यांत आलेले आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी संबंधितांनी अदयापपर्यंत जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाकडे पर्यावरण विषयक पुढील अनुमती आणि मान्यताप्राप्त खाणकाम आराखडा सादर केलेला नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणांमधील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयाकडील प्रलंबित दावा (स्पेशल मुकदमा क्र. ११६/२०१९), पर्यावरण ना हरकत दाखला व मान्यता प्राप्त खाणकाम आराखडा अदयाप प्राप्त नसल्याने प्रस्तुत खाणपट्टा नुतनीकरणाबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे, असे जिल्हाधिकारी रायगड यांचे अहवालात नमूद आहे. तरी प्रकरणी शासनस्तरावरुन पुढील आदेश होणेस विनंती आहे.

सोबत जिल्हाधिकारी रायगड यांजकडील संदर्भिय पत्र दि.१२.०२.२०२५ ची प्रत जोडली आहे.

स्थळ प्रतीवर मा.अपर आयुक्त (महसूल) यांची स्वाक्षरी असे

Dongare

(माधुरी डोंगरे)
तहसिलदार (महसूल) कोकण विभाग

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४५१ e mail : raigaddm0003@gmail.com

क्र.खशा/गौख/कात-१/मौजे तुडाळ/विधानसभा आश्वासन ९६/२०२५ दिनांक - १२/०२/२०२५

प्रति,

मा. विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
नवी मुंबई.

विषय - विधानसभा आश्वासन क्रमांक ९६.
मौजे तुडाळ येथील खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश अप्पर जिल्हाधिकारी यांनी अनिर्णत ठेवल्याबाबत...
मा. श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेता व इतर वि.प.स.

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र.खशा/गौख/कात-१/विधानपरिषद नियम १०१/लक्षवेधी सूचना/२०२२, दि.२७/१२/२०२२.
२. या कार्यालयाचे पत्र क्र. खशा/गौख/तुडाळ-खाणपट्टा/मानसी दळवी/मार्गदर्शन/२०२२, दि.२७/१२/२०२२.
३. शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्रमांक लवेसू ५९७/१२२२/प्र.क्र.१७८/ख-२, दि.०५/०६/२०२३.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/कार्या-९/गौखनि/वि.स. आश्वासन ९६/२०२३, दि.०८/०६/२०२३.
५. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील पत्र क्र.उविअ/कात-३/जमिनबाब/वि.स. आश्वासन क्र.९६/तुडाळ/२०२३/१२१, दि.२५/०७/२०२३.
६. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील पत्र क्र.उविअ/कात-३/जमीनबाब/तुडाळ/ अवै.उत्खनन/२०२२-२३, दि.०१/१२/२०२३.
७. या कार्यालयाचे पत्र क्र.खशा/गौख/तुडाळ-खाणपट्टा/निष्पादन/दळवी/५५१२६४/२०२३, दि.१५/१२/२०२३.
८. शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्र. गौखनी-२८/१२२३/प्र.क्र.४८८/ख-२, दि.१५/०३/२०२४.
९. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील पत्र क्र.उविअ/कात-३/जमीनबाब/तुडाळ/ दळवी/आश्वासन/२०२५, दि.१२/०२/२०२५.

महोदय,

मा. श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेता व इतर वि.प.स. यांनी विधानसभा आश्वासन क्रमांक ९६ च्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील प्राप्त अहवालानुसार तसेच या कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखाची पडताळणी करुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे.

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशनात महाराष्ट्र विधानपरिषद नियम- १०१ अनुसार मौजे तुडाळ येथील शासकीय जमीनीवर खाणपट्टा मंजूर केल्याबाबत लक्षवेधी सूचना क्र. ५९७ उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने इकडील संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये शासनास अहवाल सादर करण्यांत आला होता. (प्रत संलग्न)

तसेच मौजे तुडाळ, ता. अलिबाग येथील अनधिकृत उत्खननाबाबत उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील दि.२६/१२/२०२२ रोजीच्या पत्रानुसार इकडील पत्र क्र. २ अन्वये मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत मार्गदर्शन व पुढील आदेशासाठी शासनांस विनंती करण्यांत आलेली आहे. (प्रत संलग्न)

मौजे तुडाळ येथील शासकीय जमीनीवर खाणपट्टा मंजूर केल्याबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र. ५९७ चे अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदयांनी "विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडून या संदर्भातील सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील", असे आश्वासन दिलेले आहे.

प्रस्तुत आश्वासनाबाबत मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे दि.२५/०३/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यांत आली. सदर बैठकीमध्ये "मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, १३/२/१ व १६/२ मधील क्षेत्रातून देण्यात आलेले परवाने व सदर क्षेत्रातून करण्यात आलेले उत्खनन याबाबत तपासणी करुन अनधिकृत गौण खनिज उत्खननाबाबत सखोल तपासणी करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी रायगड यांनी करावी", असे निर्देश दिलेले आहेत.

मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि.२५/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, १३/२/१ व १६/२ मधील क्षेत्रातून देण्यांत आलेले परवाने व सदर क्षेत्रातून करण्यांत आलेले उत्खनन याबाबत तपासणी करुन अनधिकृत गौणखनिज उत्खननाबाबत सखोल तपासणी करण्याची कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यांत आले होते. त्याअनुषंगाने प्रकरणी कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी अलिबाग यांना या कार्यालयाकडून निर्देश देण्यांत आले. उक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी कार्यवाही केलेली असून त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल दि.०१/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील प्राप्त अहवालामधील बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. शासन पत्र दि.१३/०४/२०१८ अन्वये गौणखनिजाचा खनिपट्टयाची ईटीएसद्वारे मोजणी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने दिनांक १६/०५/२०१८ रोजी पहिली ईटीएस मोजणी करण्यात आली. सदर मोजणीवेळी खाणपट्टाधारक श्रीम. मानसी महेंद्र दळवी स्वतः उपस्थित नसल्यामुळे खाणपट्टा क्षेत्राचे सिमांकन करण्यात आलेले नसल्याने सदर क्षेत्रात सरसकट १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे दिसून आले.

२. तद्नंतर खाणपट्टाधारक यांनी खाणकाम सिमांकनाप्रमाणे हद्द कायम केली व खाणपट्टाधारकाचे उत्खननाची दि.२४/०७/२०१८ रोजी ईटीएस मोजणी केली असता खाणपट्टा क्षेत्रात ४०,५२२ ब्रास उत्खनन केल्याचे दिसून आले. याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडील पत्र जा. क्र. खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दिनांक ०२/०८/२०१८ अन्वये शासनास सादर करण्यांत आलेला आहे.

३. श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांनी मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.११६/२०१९ दाखल केलेला असुन त्यामधील आदेश दिनांक २५/०९/२०१९ अन्वये "वादी यांचा नि.क्र. ११ कडील जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा अर्ज २८ लाख १९ हजार २५१ रुपये जिल्हाधिकारी अलिबाग यांचे कार्यालयात दोन दिवसात जमा करण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर मंजूर करण्यात येतो." असे आदेश दिले होते. त्यानुषंगाने श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांनी जिल्हाधिकारी

कार्यालयात चलन क्र. MH006751625201920M दि.३०/०९/२०१९ अन्वये स्वामित्वधनापोटी शासन जमा केली आहे.

४. मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील दिनांक ०२/०८/२०१८ व दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रामध्ये प्राप्त निर्देशानुसार श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांनी केलेल्या उत्खननाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयाचे न्यायालयात सुनावणी घेवुन दि.१७/०६/२०२२ रोजी आदेश पारित करण्यात आलेले आहेत. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयाकडून दि.१७/०६/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशातील निष्कर्षाच्या आधारे श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांचेकडून अनाधिकृत गौणखनिज उत्खननाबाबत चालु असलेली वसुलीची कार्यवाही तात्पुरती थांबविण्याबाबत आदेश करण्यात आलेले असून याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शनाप्रमाणे वसुलीची पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

५. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयाकडील गौणखनिज अपिल क्र.०३/२०१९ मध्ये दि.१७/०६/२०२२ रोजी दिलेले आदेश हे आजरोजीपर्यंत कोणत्याही न्यायालयाने वा सक्षम प्राधिकारी यांनी रद्द केलेले नाहीत किंवा स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे सदरचे आदेश आजरोजी कायम आहेत. सदर निर्णयाच्या निष्कर्षामध्ये श्रीम. मानसी दळवी यांनी एकूण १९,३५० ब्रास गौणखनिज उत्खननापोटी स्वामित्वधन जमा केले असल्याचे नमुद केलेले आहे. तद्नंतर उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी त्यांचे कार्यालयातील अभिलेखाची तपासणी केली असता, एकूण २०,४५० ब्रास गौणखनिज उत्खननापोटी स्वामित्वधन श्रीम. दळवी यांनी शासन जमा केले असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे श्रीम. दळवी यांचेकडून ४०,५२२ ब्रास मधून २०,४५० वजा जाता एकुण २०,०७२ ब्रास गौणखनिज उत्खननापोटी स्वामित्वधन वसुली करण्याचे शिल्लक राहिलेले आहे. याप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे. (प्रत संलग्न)

तद्नंतर मा. श्री. महेंद्र हरि दळवी, आमदार अलिबाग-मुरुड, विधानसभा यांनी मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट राज्य यांनी दिलेले पत्र दि.२७/०६/२०२३ व त्यासोबतचा श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांचेकडील अर्जाचे अनुषंगाने मौजे तुडाळ, ता. अलिबाग येथील स.नं./ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १७-४७-० हे.आर. पैकी १-००-० हे.आर. क्षेत्रावर विशेष बाब म्हणून प्रस्तावित गौण खनिज खाणपट्टा नुतनीकरण व करारनामा निष्पादन करणेकामी शासनस्तरावरुन मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ७ अन्वये शासनास सादर करण्यांत आलेला होता. त्याअनुषंगाने शासनाकडून प्राप्त संदर्भ क्र. ८ चे पत्रान्वये, इकडील कार्यालयाकडून शिफारस केल्याप्रमाणे आवश्यक ते शासकीय येणी वसुल करुन गौणखनिज खाणपट्टयाचे नुतनीकरण व करारनामा निष्पादनास विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत या कार्यालयास कळविण्यांत आलेले आहे.

सदर संदर्भ क्र. ८ चे शासन पत्रात नमूद निर्देशानुसार प्रस्तावित खाणपट्टांतर्गत शासकीय येणी वसुलीबाबत योग्य ते आदेश पारित करुन नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी अलिबाग यांना इकडील कार्यालयाकडील पत्र दि.१५/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले होते.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील संदर्भ क्र. ९ अन्वये प्राप्त अहवालात नूमद केल्याप्रमाणे तहसिलदार अलिबाग यांनी श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांना त्यांचेकडील दि.१६/०८/२०२४ रोजीच्या नोटीसीन्वये र.रु.५२,०९,५४९/- शासन जमा करणेबाबत नोटीस दिली होती.

सदर नोटीसीच्या अनुषंगाने श्रीम. दळवी यांनी GRN No.MH007274157220242 5M, दि.२९/०८/२०२४ अन्वये र.रु. ५२,०९,५४९/- तहसिलदार अलिबाग यांचेमार्फत शासनजमा केलेली आहे. तसेच श्रीम. दळवी यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे शासन जमा करण्यात आलेली स्वामित्वधनाची रक्कम रु.२८,१९,२५१/- मा. दिवाणी न्यायालयाकडे परत मागणी करणार नाही असे लिहून दिले आहे. तसेच श्रीम. मानसी दळवी यांजकडून स्वामित्वधनाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. मात्र दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.११६/२०१९ अदयाप प्रलंबित असून त्याची पुढील तारिख १८/०२/२०२५ आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी सादर केलेला आहे. (प्रत संलग्नीत)

त्याचबरोबर संदर्भ क्र. ८ चे शासन पत्रानुसार प्रस्तावित गौणखनिज खाणपट्टयाचे नुतनीकरण व करारनामा निष्पादन करण्याकरीता महाराष्ट गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील नियम २० व नियम २३(सहा) मध्ये नमूद केलेप्रमाणे आवश्यक असलेली पर्यावरण विभागाकडील पर्यावरणविषयक पुढील अनुमती आणि भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाकडील मान्यताप्राप्त खाणकाम आराखडा तात्काळ सादर करणेबाबतचे पत्र दि.१५/०३/२०२४ रोजी श्रीम. मानसी महेंद्र दळवी यांना देण्यांत आलेले आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी संबंधितांनी अदयापपर्यंत या कार्यालयाकडे पर्यावरण विषयक पुढील अनुमती आणि मान्यताप्राप्त खाणकाम आराखडा सादर केलेला नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणांमधील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयाकडील प्रलंबित दावा (स्पेशल मुकदमा क्र. ११६/२०१९), पर्यावरण ना हरकत दाखला व मान्यता प्राप्त खाणकाम आराखडा अदयाप प्राप्त नसल्याने प्रस्तुत खाणपट्टा नुतनीकरणाबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे.

(मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे मान्यतेने)

आपला विश्वासू,

(अ.प्र. दवकेर)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड - अलिबाग

विधानपरिषदेने दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरणपत्र

सन : २ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

विभागाचा फाईल क्र : .....

विभागाचे नाव : महसूल व वन विभाग

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन कक्षा पूर्ण करण्यात आले.त्याबाबतचे आदेश,निर्णय असल्यास त्याचा दिनांक (प्रत सोबत जोडावी)	आश्वासनाची पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासनपूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
९६	विधानपरिषद कामकाज खंड : २०० क्रमांक : ०८ दिनांक : २८/१२/२०२२ माननीय मंत्री / : राज्यमंत्री श्री. यांनी दिलेले उत्तर	मौजे तुडाळ येथील खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश अप्पर जिल्हाधिकारी यांनी अनिर्णीत ठेवल्याबाबत, सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सुचना ५९७.	**मा. मंत्री / श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :-** विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडून या संदर्भातील सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील.						

०/८

ख-२

श्री.चव्हाण, स.स.

२/१.

२/१२

लक्षवेधी सूचना क्र.५९७

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. अंबादास दानवे, ॲड. अनिल परब, श्री. अभिजीत वंजारी, मा.विधानपरिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सर्व्हे नं. १३/२/१, १६/२, ही जमिन सरकारी अकारीपड असून महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय दि.२३.१.२०१९ अन्वये शासकीय जमिनीवर लिलाव पद्धतीने खारपट्टा देण्याची तरतूद असणे, मौजे तुडाळ येथील स.नं.ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १४.४७.० हेक्टर आर पैकी १.००.० हेक्टर आर या खाणपट्टा जमिनीकरीता दि.३१.३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात येणे, परंतु लिलाव पद्धतीने खाण धारकाबाबत खनिज खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश व्यपगत झालेले असणे, याबाबतची टिपणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी मंजूर केलेली असून मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरीता दि.३१.१२.२०१९ करीता सादर करण्यात येणे, याबाबत मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी आजतागायत ती अनिर्णीत ठेवण्यात येणे, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या मोजणीच्या अनुषंगाने खाणधारकाने एकूण १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर खाणीमध्ये उत्खननाकामी महाराष्ट्रराज्य वीज वितरण कंपनी यांचेकडील माहे मार्च २०२० पर्यंत विद्युत देयक व होणारा वीज वापर यांचे विवरणपत्र सादर करण्यात येणे यावरून सदर अनधिकृत उत्खनन आजमितीस सुरू असणे, त्यानुषंगाने खाणधारकास दंडात्मक आदेश काढून तात्काळ दंडात्मक रक्कम शासनास जमा करण्याबाबत कळविलेले असणे, मा. जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र जा.क्र.खशा/कात-१/ ईटीएस मोजणी /तुडाळ/२०१८, दि.२.०८.२०१८ व पत्र क्र. गौखशा/कात-१/तुडाळ/मा.म.दळवी/अन.उत्खनन/२०२०, दि.१९.०५.२०२० अन्वये सदर प्रकरणी सुनावनी घेण्याकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात आले असणे, तद्नंतर मा. अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र. गौखशा/कात-१/तुडाळ/दळवी/अन. उत्खनन/२०२०, दि.१५.१०.२०२० अन्वये (परिशिष्ट-२४) सदर प्रकरणी या कार्यालयाकडील मुळ संचिकासह उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत आदेशित केलेले होते. सद्य:स्थितीत सदरचे प्रकरणे या कार्यालयाकडील पत्र दि.२०.११.२०२० अन्वये उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयात वर्ग करण्यात आली असणे, परंतु सदर प्रकरण हे उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे पुन्हा वर्ग करण्यात येणे, सबब. याबाबत कोणताही आदेश न झाल्याने महाराष्ट्र शासनाचा १५ कोटी ३१ लाख ११ हजार ३२५ हून अधिक दंडात्मक रक्कम खाणधारकाने न भरल्याने शासनाचा महसूल वसूली कामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे तुडाळ येथील सर्वे नं.१४/१, १३/२/१ व १६/२ मधील जमीनीचे क्षेत्र हे सरकारी आकारपड आहे. यापैकी सर्वे नं. १६/२ मधील क्षेत्रात जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक ०९.११.२००४ च्या आदेशान्वये प्रथम ५ वर्षाकरीता संबंधितास खाणपट्टा मंजूर करण्यात आला. तद्नंतर सदर खाणपट्याचे दिनांक ०५.०५.२०१० च्या आदेशान्वये ५ वर्षाकरीता नुतणीकरण करण्यात आले. सदर नुतणीकरणाची मुदत संपल्यानंतर संबंधित

खाणपट्टाधारकाने नुतणीकरणाबाबत दिनांक १९.१०.२०१५ रोजी नुतणीकरण अर्ज दाखल केर जिल्हाधिकारी रायगड यांनी दिनांक ३१.०३.२०१६ च्या आदेशान्वये ५ वर्षाकरीता नुतणीकरण मंजूर करण आले. तथापि, सदर खाणपट्ट्याचे दिनांक ३१.०३.२०१६ च्या आदेशान्वये करण्यात आलेले नुतणीकर दिनांक २३.०१.२०१९ रोजीपर्यंत निष्पादन करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ९ "खाणपट्टा करण्याबाबतची रीत" यामध्ये दिनांक १२.०१.२०१८ रोजी सुधारणा करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दि २३.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २ मधील नियम ९ मधील तरतुदीनुसार गौण खनिज (अधिसूचीत केलेले गौण खनिज वगळून) खाणपट्ट लिलावाची कार्यपध्दती देण्यात आलेली आहे. सदर तरतुद विचारात घेवून जिल्हाधिकारी, रायगड यांनी खाणपट्टा नुतणीकरणाच्या निष्पादनाचा निर्णय घेतला नाही.

सदर खाणपट्ट्याचे खाणपट्टाधारक यांनी खाणकाम सिमांकणाप्रमाणे हद्द कायम केल्यानुसार दि २४.०७.२०१८ रोजी ईटीएसद्वारे मोजणी केली असता, सदर खाणपट्टाक्षेत्रात ४०,५५२ ब्रास उत्खनन केर आढळून आले. यापैकी अनाधिकृत ३०,३७२ ब्रास उत्खननाकरीता तहसिलदार, अलिबाग यांनी दि २५.०३.२०१९ रोजी रक्कम रूपये १५,३१,११,३२५/- इतक्या दंडाची नोटीस दिली. यानंतर उपविभ अधिकारी, अलिबाग यांनी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ नुसार दिनांक १७.०६.२ रोजी दिलेल्या आदेशातील निष्कर्षानुसार खाणपट्टाधारक यांनी सदर खाणपट्टयामधून उत्खनन केलेल्या खनिजापोटी १९,३५० ब्रास परिमाणाचे स्वामित्वधन शासनजमा केलेले आहे. उर्वरीत २१,२०२ परिमाणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवा प्रक्रिया सुरू आहे.

मौजे तुडाळ ता. अलिबाग या भागामध्ये क्रशरधारक यांना देण्यात आलेल्या विद्युत जोडणीचा तपा वितरीत करण्यात आलेले विद्युत देयक रक्कम, त्यांनी अदा केलेल्या देयकाच्या रकमा याबाबतचा दि ०१.०४.२०१६ पासूनची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वि वितरण कंपनी(लि.),महामंडळ अलिबाग-रायगड यांना उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी कळविले

****

(७)

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) II - 6
SGS/KTG प्रथम श्रीमतीनाफडे 17:20

श्री. अंबादास दानवे : सभापती महोदया, "मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सव्हे नं.१३/२/१, १६/२ या ठिकाणी दिनांक १६ मे, २०१८ रोजी खाणधारकाने उत्तखनन केले होते. यामध्ये ETS मशीनद्वारे मोजणी केली असता, १ लाख ६ हजार ८८३ ब्रास उत्तखणन केलेले होते. दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी १ लाख ६ हजार ८८३ ब्रासऐवजी ४० हजार ५२२ ब्रास उत्तखणन केल्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

सभापती महोदया, १ लाख ६ हजार ८८३ ब्रासचे उत्तखणन केलेले असताना ४० हजार ५२२ ब्रास उत्तखणन केल्याबाबतचा अहवाल सादर केलेला असून, ते खरे आहे काय ? यामधील तफावतीबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे. अवैध उत्तखणन केल्याप्रकरणी उर्वरित ६६ हजार ३६१ ब्रासवर ५ पट शास्ती प्रशासन, सरकारने लावलेली आहे. ती रक्कम प्रशासन, सरकारने वसुल केलेली आहे काय ? खाणधारकाने आदेशाविरुध्द पुनर्विलोकन, पुनर्निरीक्षणाकरीता अपील दाखल केले असता २५ टक्के रक्कम अपीलकर्त्याला भरावी लागते. कमी उत्तखणन दाखवूनही पेनल्टी लावण्यात आली होती. याकडे प्रशासनाने कानाडोळा केलेला आहे. यासंदर्भात माझ्याकडे आवश्यक ती कागदपत्रे आहेत. तेथील प्रांताचे आदेश आहेत. शासनाचे राजपत्र आहे. तहसीलदाराचा आदेश आहे. अशा प्रकारे शासनाची लूट झाल्याचे तरी प्रथमदर्शनी दिसून येत आहे. २५ टक्के रक्कम न भरता ही तेथील संबंधित प्रांतानी सुनावणी घेतली आहे. यामधील फरकाची रक्कम आहे, ही ५ पट असायला पाहिजे हवी असताना ती रक्कम त्यांना का दिली असा देखील माझा प्रश्न आहे. गौन खनीज उत्तखणनाचे एक अवैध मोठे रॅकेट आहे. काही लोकांच्या माध्यमातून त्यांनी रायगड जिल्ह्यात अवैध धंदे सुरु केलेली आहेत.

यानंतर श्री. बोर्डे.....

श्री.अंबादास दानवे.....

अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांनी वीज वितरण कंपनीचे देयक भरलेले नाही. त्यांच्याकडून अनधिकृतपणे वीज वापर होत आहे. अशाप्रकारे अनधिकृतपणे काम करणाऱ्या संस्थेवर हे सरकार मेहरबानी का दाखवित आहे, हा माझा प्रश्न आहे. बेकायदेशीरपणे उत्खनन करणाऱ्यांनी दंडात्मक रक्कम भरण्यासाठी त्यांच्या मालमत्तेवर बोजा लावावयास पाहिजे होता. परंतु अशा प्रकारची कारवाई केली गेली नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, अशाप्रकारे चुकीचे काम करणाऱ्या, शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर निंलबनाची कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितली तेवढी मोठी या विषयाची व्याप्ती नाही. परंतु संपूर्ण गटाच्या एकूण उत्खननाच्या बाबतीत जी आकारणी करण्यात आली आहे ती १ लाख ६ हजार ८८३ ब्रास संदर्भातील आहे. हे उत्खनन एका व्यक्तीचे नाही. कुडाळ येथे अनेक लोकांचे खाणपट्टे आहेत. ज्यांच्याविरुद्ध कारवाई झाली त्यांनी ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे ही रक्कम कमी करण्यात आली. ही रक्कम प्रथमदर्शनी भरलेल्या स्वामित्वधनापेक्षा ३० हजार ब्रास इतकीच दिसून येते. तसेच तहसीलदारांनी दिलेली नोटीस ही एकूण संपूर्ण उत्खननाच्या बाबतीत दिली आहे. तहसीलदारांनी दिलेल्या नोटीशीची फेरतपासणी करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेली आहे. उप विभागीय अधिकारी या बाबतीत चौकशी करीत आहेत. या प्रकरणी कोणाचा निष्काळजीपणा झाला अशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे कोणाचे निलंबन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. एकूण जी कार्यवाही करण्यात आली त्या संदर्भात क्षेत्रीय अधिकारी चौकशी करीत आहेत. सभापती महोदया, मी निदर्शनास आणून देतो की, हे प्रकरण २०१८ मधील आहे. १९९६ पासून त्या ठिकाणी उत्खनन सुरु आहे. सर्वसाधारणपणे सातत्याने दर पाच वर्षांनी खाणपट्टयांचे नूतनीकरण करण्यात येते. ही अनेक वर्षांपासूनची प्रचलित पद्धत आहे. ही पद्धत कायद्याला आणि नियमाला धरुन आहे. अतिरिक्त उत्खनन केलेल्या खनिजांचे

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) JJ - 2
SJB/KTG प्रथम श्री.सोनावणे 17:30

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील .....

स्वामित्व धन वसूल करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आहेत. १९८० ते १९९६ या कालावधीत करण्यात आलेल्या उत्खननाची माहिती मागविण्यात आली होती. कारण त्या काळात उत्खनन मोजणीची प्रक्रिया अस्तित्वात नव्हती. आता जी मोजणी झालेली आहे त्यानुसार आवश्यक ती वसुली करण्यात येईल. यामध्ये काही गैर घडले अशी वस्तुस्थिती नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी सांगितले की, यामध्ये काहीही गैर घडलेले नाही. मी त्यांना विचारु इच्छितो की, अजून किती गैर घडणे बाकी आहे ? दि.१६/०५/२०१८ रोजी ETS मशीनद्वारे उत्खननाची मोजणी करण्यात आली. त्या मशीनद्वारे १ लाख ६ हजार ८८३ ब्रास उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाले आहे, यात काही वाद नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, अतिरिक्त उत्खनन करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांचे रॅकेट वर्षानुवर्षे राज्यात सुरु आहे. या रॅकेटवर अशा प्रकारची मेहरबानी करण्याचे काम राज्य सरकारच्या माध्यमातून सुरु आहे. प्रत्यक्षात १ लाख ६ हजार ८८३ ब्रास उत्खनन झालेले असताना त्यांच्याकडून ४०,५५२ ब्रास उत्खनन झाल्याचे सांगण्यात येत आहे. ही बाब माहीत पडली म्हणून हा प्रकार लक्षात आला. नाही तर हा प्रकार वर्षानुवर्षे सुरुच राहिला असता. जे अधिकारी अवैध उत्खनन करणाऱ्यांशी मिळालेले आहेत, ते आता एकमेकांकडे बोट दाखवित आहेत. यात विलंब करुन कशाही प्रकारे हा प्रकार दाबला जाईल, यासाठी प्रयत्न करीत आहेत. सभापती महोदया, सरकारकडून वेगवेगळे शासकीय आदेश काढले जातात. या माध्यमातून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत आहे. मला वाटते ही चोरीची पद्धत सर्वमान्य झालेली आहे. मंत्री महोदयांनी हा प्रकार थांबवावा अशी आमची अपेक्षा आहे. हा प्रकार थांबविणे शक्य आहे. कारण अशा प्रकरणांत एकाला शिक्षा झाली तर असा प्रकार करणाऱ्या इतरांना संदेश जाईल. मला वाटते मंत्री महोदयांनी अनधिकृत उत्खननाचा विषय हलक्यात घेता कामा नये. कारण हे राज्याचे खनिज आहे. कारण हा प्रकार एका ठिकाणी सुरु झाला

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) JJ - 3
SJB/KTG प्रथम श्री.सोनावणे 17:30

ॲड.अनिल परब ....

तर हळूहळू संपूर्ण ठिकाणी तो सुरु होऊन, अख्खा महाराष्ट्रच लुटला जाईल. महसूल विभागाला जो मोठ्या प्रमाणात महसूल येतो त्या महसुलामध्ये चोर दलाली करतात. यासाठी आपल्याला कडक पावले उचलावी लागतील. त्यांच्याकडून पाच पट दंड वसूल केला पाहिजे. मी स्पेसिफिक विचारतो की, ETS मशीनच्या अहवालानुसार १ लाख ६ हजार ८८३ ब्रास उत्खनन केल्याचे आपण मान्य करीत आहात काय, असल्यास, या प्रकरणी संबंधितांकडून पाच पट दंडात्मक वसुली करणार काय, तसेच ती वसुली करण्यासाठी त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविणार काय ? आपण बोजा चढविला नाही तर संपूर्ण राज्यात संदेश जाईल की, शासन अशा चोर लोकांच्या मागे आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, सरकारच्या अधिकृत ETS मशीनद्वारे उत्खननाचा जो आकडा आलेला आहे तो शासनाने मान्य करावा, नाही तर ETS मशीनने मोजणी करणे बंद करावे. वास्तविक पाहता ETS मशीन चोऱ्या रोखण्यासाठी लावलेली आहे. प्रत्यक्षात किती उत्खनन झाले या संदर्भात त्या मशीनचा अहवाल येत असताना सुद्धा तेथील प्रांत लिहून देतात की, ४०, ५५२ ब्रास उत्खनन झाले आहे. मग ETS मशीन कशाला लावली ? एकतर ETS मशीनच्या अहवालावर विश्वास ठेवा, नाही तर सर्व मशीन काढून टाकून राज्यातील चोर लोकांना संदेश द्या की, तुम्ही काहीही केले तरी शासन तुमच्या पाठीमागे आहे. मी पुन्हा विचारतो की, ETS मशीनद्वारे उत्खननाबाबत जो अहवाल आला आहे तो मान्य करण्यात येईल काय, असल्यास, संबंधित संस्थेला पाच पट दंड करुन त्याच्या मालमत्तेवर बोजा चढविणार काय, वसुलीची कार्यवाही तत्काळ सुरु करणार काय, तसेच ज्या अधिकाऱ्यांनी हा प्रकार केला त्याच्यावर ताबडतोब कारवाई करणार काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, शासनाला ETS मशीनच्या अहवालासंदर्भातील कोणतीही बाब लपवायची नाही. हे मान्य आहे की, अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या दगड खाणींमध्ये हे प्रकार सुरु आहेत. या प्रकरणी

(99)

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) JJ - 4
SJB/KTG प्रथम श्री.सोनावणे 17:30

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील .....

संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे, अशी आपली मागणी आहे आणि शासनाची सुद्धा तीच भूमिका आहे. यापूर्वी अशाप्रकारे बेकायदेशीर उत्खनन केल्याप्रकरणी कोणतीही कारवाई होत नव्हती. मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बेकायदा उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करणे सुरु केले. माझ्या अहमदनगर जिल्ह्यात आतापर्यंत जवळजवळ ९०० रुपये दंडाची आकारणी करण्यात आली. ETS मशीनच्या माध्यमातून उत्खननाची मोजणी करण्यात आली. अशा प्रकारची मोजणी निरंतरपणे करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. जेणेकरुन बेकायदेशीर उत्खनन करण्यावर निर्बंध येतील. या बाबीला प्रचंड विरोध होत आहे. यामध्ये काही पाठीराखे आहेत, अनेक मंडळी त्यामध्ये गुंतलेल्या आहेत. हा व्यवसाय आजचा नाही. परंतु यासाठी राज्य सरकार नवीन धोरण आणत आहे. आम्ही या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची मदत घेत आहोत. यात दोन बाबी समाविष्ट आहेत. सहजपणे उत्खननाचे परवाने कसे दिले जातील. अनधिकृत उत्खननामुळे सरकारची रॉयल्टी बुडविली जाते. सरकारचे उत्पन्न यातून कसे वाढेल, हा मुख्यत: आमचा दृष्टिकोन आहे. शेवटी सरकारला उत्पन्न मिळाले पाहिजे. या उत्खननातून हायवेची कामे होतात. बऱ्याच बांधकामांमध्ये वाळूऐवजी क्रश वापरला जात आहे. राज्यात वाळूमाफियांनी मोठा उच्छाद मांडला होता. साधारणत: १५ जानेवारीपर्यंत राज्याचे नवीन धोरण जाहीर होईल. वाळूचे लिलाव बंद करुन थेट सरकारच्या यंत्रणेमार्फत वाळू उत्खनन करण्यात येईल. अतिशय अल्प दरात राज्यातील सर्व लोकांना वाळू उपलब्ध करुन देण्याचे धोरण आम्ही आणत आहोत. आतापर्यंत सरकारला उत्पन्न मिळत नव्हते. परंतु आता नवीन धोरणामुळे सरकारला थेट उत्पन्न मिळण्यास सुरुवात होईल.

नंतर श्री.कांबळे .....

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, त्यांची देखील इच्छा आहे की, चोऱ्या बंद व्हाव्यात. त्यामुळे त्यांनी देखील हे मान्य केले आहे की, आपण ETS मशिनद्वारे हे सर्व करीत आहोत. माझे म्हणणे एवढेच आहे की, ETS मशिनद्वारे हे करीत आहात तर ....

उप सभापती : दंडाची रक्कम १५ कोटी रुपये आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, त्याच्या पाच पट आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. चालू असलेल्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने आमचा प्रयत्न आहे. सदर प्रकरणात पहिल्या टप्प्यामध्ये मोजणी करण्यात आली होती, आपण १ लाख ६ हजारांचा उल्लेख करीत आहात, ती साध्या पध्दतीने मोजणी करण्यात आली होती.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, ETS मशिनद्वारे केलेली मोजणी आहे. माझे पूर्ण म्हणणे परत ऐकून घ्यावे. चोऱ्या बंद व्हाव्यात, ही माननीय मंत्र्यांची देखील इच्छा आहे. त्यामुळे आपण ETS सिस्टिम लावली आहे. ETS सिस्टिमद्वारे आलेला अहवाल १ लाख ६ हजार ८८३ ब्रासचा आहे. आमचे हेच म्हणणे आहे आणि आपण उत्तरात देखील म्हटले आहे की, ETS मशिनद्वारे मोजणी झाली आहे. आपण चोऱ्या बंद करण्यासाठी ETS सिस्टिम आणली आहे. आपण आणलेल्या सिस्टिमची अमलबजावणी केली पाहिजे नाही तर हे चोर कागदावर ४० हजार ब्रास लिहून त्याला माफ करीत आहेत, त्यातील २०-२५ टक्के ते लोक घेणार आहेत. आपण मान्य करीत आहात की, ETS मशिनद्वारे मोजणी झाली आहे तर याच्यावर कारवाई झाली पाहिजे, जो काही ५ पट दंड आहे तो आकारला गेला पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचे अहवाल दिले आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. माननीय मंत्र्यांनी स्वत: मान्य केले आहे की, ETS मशिनद्वारे हे सर्व झाले आहे. उत्तरात देखील आले आहे की, ETS मशिनद्वारे मोजणी झाली आहे आणि ही मोजणी १ लाख ६ हजार ८८३ ब्रासची झाली आहे. लेखी उत्तर माझ्या हातात आहे. लेखी उत्तरात असताना जर माननीय मंत्री म्हणतील की, ती साध्या पध्दतीने झाली

(93)

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) KK - 2
MSK/KTG प्रथम श्री.बोर्डे 17:40

ॲड. अनिल परब ....

आहे तर त्यांना अधिकाऱ्यांकडून चुकीची माहिती देण्यात येत आहे. माननीय मंत्र्यांनी त्यांचा कणखरपंणा विभागाला दाखवून देण्याची ही वेळ आहे. महसूल खात्यात चाललेले धंदे रोखायचे असतील तर हे पहिले पाऊल त्यांना आज उचलावेच लागेल. आमची त्यांच्याकडून अपेक्षा आहे. कारण ते खूप वर्षे मंत्रिमंडळात राहिलेले आहेत. राज्याचे मोठे नेते आहेत. त्यांना चोरी आवडणार नाही असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे त्यांच्याकडून ही अपेक्षा आहे. कदाचित आम्ही दुसऱ्या व्यक्तीकडून ही अपेक्षा केली नसती. मात्र त्यांच्याकडून जरुर अपेक्षा करीत आहोत. त्यांनी याबाबतीत ताबडतोब ETS मशिनचा अहवाल मान्य करावा. आपण हा अहवाल मान्य केलेलाच आहे. फक्त त्याच्यावर ५ पट दंड आकारायचा आहे. तो दंड वसूल करण्यासाठी त्याच्या मालमत्तेवर बोजा ठेवायचा आहे. तसेच ज्यांनी हे केले आहे, त्यांच्यावर कारवाई करायची आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सांगत असलेले दोन भाग आहेत. पहिल्यांदा सर्व गटांची एकत्र मोजणी साध्या पध्दतीने करण्यात आली होती. मात्र नंतर ज्यावेळी ही आकारणी १ लाख ६ हजार होती, त्यावेळी अर्जदाराने जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली आणि मग ETS मशिनद्वारे सीमांकन करुन ती मोजणी करण्यात आली. मर्यादित उत्खनन दिसत आहे ते ४०५२२ ब्रास दिसत आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, ETS मशिनद्वारे जी मोजणी झाली आहे, ती १ लाख ६ हजार ८३३ ब्रासची झाली आहे असे लेखी उत्तरामध्ये आले आहे. हे साध्या मोजणीने झालेले नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, ते साध्या पध्दतीनेच मोजण्यात आले आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, है साध्या मोजणीने झालेले नाही. है ETS मशिनद्वारे झाले असल्याचे लेखी उत्तर दिले आहे. लेखी उत्तरामध्ये १ लाख ६ हजार ८८३ ब्रास मान्य केले आहे तर त्याच्यावर ५ पटीने दंड झाला पाहिजे. ४० हजार हा आकडा आहे, यानंतर या लोकांनी आदेश काढून नंतर फेरफार करुन ती मोजली आहे. मग ETS मशिन का ठेवली आहे ? आपण ती मशिन फेकून द्यावी.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, मी सन्माननीय सदस्यांचा गैरसमज दूर करु इच्छितो की, यामध्ये साध्या पध्दतीने मोजणी म्हणजे सीमांकन न करता मोजणी करण्यात आली होती. ETS मशिनद्वारे मोजणी. फक्त मी म्हटले की साध्या पध्दतीने म्हणजे सीमांकन न करता झाले. अर्जदाराला ज्यावेळी लक्षात आले की, त्याच्याकडून जादा वसूल होत आहे, जादा उत्खनन दाखविले जात आहे, त्यावेळी त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यानंतर मग सीमांकन करुन ते मोजण्यात आले. त्यामुळे ४० हजार ब्रास त्यामध्ये समोर आले नाही. तेथे जे खाणपट्टे दिले आहेत, त्यामध्ये ४-५ लोक आहेत, एकच माणूस नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, मग १ लाख ६ हजार ८८३ ब्रास हा आकडा कुठून आला आहे ? ते बरोबर आहे म्हणत आहे. पण त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला आहे. प्रांतांच्या अहवालात देखील १ लाख ६ हजार ८८३ ब्रास आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे, प्रांताच्या अहवालात आहे, मग माशी कुठे शिंकली आहे ?

उप सभापती : १५ कोटी रुपयांच्या आकड्यासंदर्भात कोणीही बोलत नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, माननीय जिल्हाधिकारी सांगत आहेत. विनाकारण माहिती ट्विस्ट करण्याचा प्रयत्न आहे. माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात रकमेचा उल्लेख केला आहे, ४०५२२ ब्रास हे सीमांकन करुन मोजण्यात आल्यानंतर, १ लाख ६ हजार ८८३ ब्रासऐवजी ४०५५२ ब्रास निश्चित करण्यात आले आहे.

(94)

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) KK - 4
MSK/KTG प्रथम श्री.बोर्डे 17:40

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मला असे वाटते की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी. कारण माहिती अपूर्ण आहे. माहिती बरोबर नाही.

उप सभापती : मला हे समजत नाही की, आपण लाखांमध्ये बोलत आहात, पण लेखी उत्तरांमध्ये १५ कोटी ३१ लाख रुपयांची दंडाची नोटीस आहे. एवढी मोठी नोटीस असताना हे क्षुल्लक आहे असे कसे म्हणता येईल ?

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, हे क्षुल्लक नाही.

उप सभापती : आपण याबाबत काय कारवाई करणार आहात हे सन्माननीय सदस्य विचारीत आहेत. एवढी मोठी दंडाची रक्कम बुडविली आहे, कारवाई झालेली नाही, हेतुपूरस्सर संगनमत केले आहे, त्याबद्दल आपण चर्चा करीत नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. प्रश्नाचे समाधानकारक उत्तर येत नाही. लेखी उत्तरात माहिती आहे. आमच्याकडे लेखी पुरावे आहेत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, त्यांनी माझ्याकडे पुराव्याची कागदपत्रे द्यावीत. आपण ती तपासून घेऊ. शासनाला कोणतीही माहिती लपवायची नाही. वसुलीची आकडे दाखविले आहेत. जिल्हाधिकारी पुन्हा एकदा चौकशी करीत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल प्राप्त होत आहे. उप विभागीय अधिकाऱ्यांना याबाबतीत चौकशी करायला सांगितली आहे. खाणपट्टाधारकाने जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली. सीमांकन करुन एवढी दंडाची रक्कम होत नाही म्हणून याबाबतीत उत्खननाची रक्कम माझ्याकडून वसूल करु नये, हे नियमबाह्य केले आहे अशी विनंती अर्जदाराने केल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी उप विभागीय अधिकाऱ्यांना चौकशी आदेश दिले आहेत. चौकशीचा अहवाल अप्राप्त आहे. सदर बाबतीत सविस्तर अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

28-12-2022 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) KK - 5
MSK/KTG प्रथम श्री.बोर्डे 17:40

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, २६७ कोटी रुपये त्याला भरायचे आहेत.

उप सभापती : मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवत आहे. मला हे आकडे काय आहेत हे समजले तर बरे होईल. सर्वांना सगळे समजत आहे. ज्यांनी बोजा चुकविला आहे, त्यांच्यावर कारवाई काय होणार हा प्रश्न सन्माननीय सदस्य वेगवेगळ्या प्रकारे विचारीत आहेत. आपण अप्राप्त अहवाल किती दिवसांत प्राप्त होईल याबाबत सांगावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, मी आधीच स्पष्ट केले आहे की, या प्रकरणी जी आकारणी करण्यात आली आहे, ती परवानाधारकांना मान्य नव्हती. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी उप विभागीय अधिकाऱ्यांना या संदर्भात पुन्हा एकदा सुनावणी घ्यावी आणि चौकशी करावी अशा सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी फक्त अतिरिक्त उत्खनन केलेल्या खनिजाचे स्वामित्व धन वसूल करण्याबाबत कळविले आहे. सदर बाबतीत अहवाल अप्राप्त आहे. सदर प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेतली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, जी वस्तुस्थिती असेल त्याप्रमाणे, शासन कारवाई करील. शासनाचा कोणाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न नाही. विनाकारण काहीही नाही. शासनाचा हेतू स्पष्ट आहे. आम्ही कोणतीही माहिती लपवित नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, आम्हाला संरक्षण पाहिजे. आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. सर्व पुरावे आपल्याकडे पाठविले आहेत. आपण त्यांना निर्देश द्यावेत.

उप सभापती : मी या लक्षवेधी सूचनेला बराच वेळ दिला आहे. मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवत आहे. सदर बाबतीत तपशील दिला पाहिजे.

नंतर श्री. खर्चे ....

(१८०)

28-12-2022
VVK/KTG

(असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही)
प्रथम श्री.कांबळे

LL - 1
17:50

उप सभापती....

तुमच्याकडील अहवाल अप्राप्त आहे असे आपण म्हणत आहात, तो अहवाल किती दिवसात प्राप्त होईल ते सांगावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदया, जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी करण्याची भूमिका मान्य नसेल तर विभागीय आयुक्त यांना चौकशी करण्याच्या सूचना देण्यात येतील. पुढील १५ दिवसात अहवाल प्राप्त करुन घेण्यात येईल. शासनाची भूमिका स्पष्ट आहे, आकडेवारी चोरलेली नाही. आकडेवारी आपल्यापुढे मांडलेली आहे. अर्जदार व ज्यांनी उत्खनन केले असे अनेक लोक आहेत. याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट आहे, सरकारला कोणतीही माहिती लपवायची नाही. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडून या संदर्भातील सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील.

एक सदस्यीय वन विभाग

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदया, जर त्यातील चोरी लपवायची असती तर ती आकडेवारी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केली नसती. मुद्दा असा आहे की, अशा प्रकारे घाईगर्दीत घेतलेले निर्णय कोर्टात चॅलेंज होतात. त्यांचे म्हणणे असे आहे की, जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी करतो, जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी करणे मान्य नसेल तर विभागीय आयुक्त यांच्याकडून चौकशी करण्यात येईल व कारवाई करण्यात येईल. आपण त्यांना पुरेशी सुनावणीची संधी दिली नाही तर ती केस कोर्टात टीकत नाही त्यामुळे एका उच्च पदस्थ अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात येईल.

उप सभापती : ठीक आहे, आपण मांडलेला मुद्दा लक्षात आला आहे, मी माझा निर्णय जाहीर केलेला आहे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID : mailto:dokh.rfd@maharashtra.gov.in

---

क्रमांक: विपआ-९६/०५२३/ प्र.क्र.१७२/ख-२ दिनांक २१ऑगस्ट, २०२५.

प्रति,

Received 22.08.2025

कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

विषय- सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद
आश्वासन क्र.९६ ची माहिती पाठविण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.९६ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(स.गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

O/C

(29)

V

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID : mailto:dokh.rfd@maharashtra.gov.in

---

क्रमांक: विपआ-२१/०८२३/ प्र.क्र.३३३/ख-२ दिनांक १८ऑगस्ट, २०२५.

प्रति,

कक्ष अधिकारी,

18/8/25 संसदीय कार्य विभाग,

मंत्रालय, मुंबई 400 032.

विषय- सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.२१ ची माहिती पाठविण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.२१ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

18/08/2025

(स.गो.माहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७

क्रमांक: विपआ-३१९/०२२५/प्र.क्र.६३/ख-२ दिनांक: ०५.०२.२०२६

प्रति,

कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.

विषय:- सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र ३१९ ची माहिती पाठविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात महाराष्ट्र विधानपरिष्ज्ञद आश्वासन क्र.३१९ च्या पूर्ततेबाबतच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

(सदानंद गो. मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग, मंत्रालय (मुख्य इमारत, पहिला मजला),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
Email ID:- desk17-rfd@mah.gov.in

क्र.विपआ-२०२४/प्र.क्र.७३/ल-७
दिनांक:- १२ फेब्रुवारी,२०२५

प्रति,

कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय :- महाराष्ट्र विधान मंडळाच्या सन २०२३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ३४५.

"शासकीय कब्जेहक्काच्या जमिनी रुपांतरण योजनेस मुदतवाढ मिळण्याबाबत" यासंबंधी श्री. अमोल मिटकरी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र.१७५८१.

आश्वासन क्र.३४५ "सदर बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येईल. खंडकऱ्याचे वर्ग-२ करण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. सिंधी समाज निर्वासित म्हणून आलेला आहे, त्यांच्याही बाबतचा निर्णय या बैठकीतच घेण्यात येईल."

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ३४५ च्या कार्यपूर्ततेबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतच्या विवरणपत्राच्या प्रत्येकी ३५ प्रती पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

(अजित देशमुख)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) कक्ष अधिकारी,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
२) कक्ष अधिकारी, कार्यासन म- ५, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) निवड नस्ती (कार्यासन ल-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ deskkh२-rfd@mah.gov.in

क्रमांक: विपआ-५६/०८२४/प्र.क्र.३०३/ख-२ दिनांक २३ जानेवरी, २०२५

प्रति,

कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.५६ ची माहिती पाठविण्याबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.५६ च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(सदानंद गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

D:\Desktop And Download Data Backup Profile\Desktop\Rakesh\अधिवेशन\पासवाळी अधिवेशन २०२३\Letter with logo.docx

प्रत: कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID : mailto:dokh.rfd@maharashtra.gov.in

---

क्रमांक: विपआ-५८/०८२४/ प्र.क्र.३०५/ख-२ दिनांक १८ऑगस्ट, २०२५.

प्रति,

कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

विषय- सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.५८ ची माहिती पाठविण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र.५८च्या पूर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्राच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

(स.गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

आश्वासन क्रमांक १११ (3)

क्र.विपआ २०२४/ प्र.क्र.१४५/म-१०
मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : २९ मे,२०२५

विषय: महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत उपस्थित लक्षवेधी सूचना क्र.४१६ च्या अनुषंगाने दिलेले आश्वासन क्र.११०, १११ व ११२ वगळणेबाबत.

महोदय,

सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनामध्ये नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करणेबाबत श्री. आमश्या पाडवी, मा.वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.४१६ वरील चर्चेवेळी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी पुढीलप्रमाणे आश्वासने दिली आहेत :-

आश्वासन क्रमांक ११० - "अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यासंबंधी समितीने २५ तारखेपर्यंत किंवा या महिन्याअखेर शासनाला अहवाल सादर करावा. शेवटी पदांची निर्मिती करणे, तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही आणि तहसील कार्यालयाची निर्मिती करताना प्राधान्यक्रम कशाला दिला पाहिजे यासंदर्भात समिती शासनास शिफारस करील. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. "

आश्वासन क्रमांक १११ - " निश्चितपणे समितीला या बाबी देखील तपासून पाहाण्यास सांगण्यात येईल."

आश्वासन क्रमांक ११२ - " या संदर्भात निकष तयार करीत असताना लोकसंख्या हा घटक प्रामुख्याने विचारात घेवून जनतेला जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध होण्याकरीता आपण केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. तसेच त्यांना पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. त्यामुळे समितीला ही बाब सोपवित असताना शासन स्तरावरुन निश्चितपणे निर्णय घेऊ."

०३. प्रस्तुत प्रकरणी नमुद करण्यात येते की, दिनांक ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात मोलगी येथे स्थानिक प्रशासकीय गरज विचारात घेऊन तात्पुरते अपर तहसील कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तसेच विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या दिनांक ०४.१२.२०२४ रोजीच्या आदेशानुसार श्री. सतवन, परिविक्षाधीन तहसिलदार यांची अपर तहसिलदार मोलगी येथे नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, मोलगी येथे तात्पुरते अपर तहसिल कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे.

०४. विभागाच्या दि.२५.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल / नवीन कार्यालय निर्मिती व महत्वाच्या महसूली कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदलांबाबत शिफारशी करण्याकरीता श्री. उमाकांत दांगट, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील व इतर अधिकाऱ्यांची गठीत करण्यात आलेली समिती विभागाच्या दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आली आहे.

०५. सबब, प्रस्तुत आश्वासनातील मोलगी येथे दि. ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यात आले आहे तसेच विभागाच्या दि. १८.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये दांगट समिती बरखास्त करण्यात आली आहे. यास्तव, विभागाच्या आश्वासनाच्या यादीतून आश्वासन क्र.११०,१११, व ११२ वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

मा.समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती,
विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.

आश्वासन क्रमांक ११२ (3)

क्र.विपआ २०२४/ प्र.क्र.१४५/म-१०

मंत्री

महसूल

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

www.maharashtra.gov.in

दिनांक : २९ मे,२०२५

विषय: महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत उपस्थित लक्षवेधी सूचना क्र.४१६ च्या अनुषंगाने दिलेले आश्वासन क्र.११०, १११ व ११२ वगळणेबाबत.

महोदय,

सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनामध्ये नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करणेबाबत श्री. आमश्या पाडवी, मा.वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.४१६ वरील चर्चेवेळी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी पुढीलप्रमाणे आश्वासने दिली आहेत :-

आश्वासन क्रमांक ११० - "अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यासंबंधी समितीने २५ तारखेपर्यंत किंवा या महिन्याअखेर शासनाला अहवाल सादर करावा. शेवटी पदांची निर्मिती करणे, तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही आणि तहसील कार्यालयाची निर्मिती करताना प्राधान्यक्रम कशाला दिला पाहिजे यासंदर्भात समिती शासनास शिफारस करील. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल."

आश्वासन क्रमांक १११ - " निश्चितपणे समितीला या बाबी देखील तपासून पाहाण्यास सांगण्यात येईल."

आश्वासन क्रमांक ११२ - " या संदर्भात निकष तयार करीत असताना लोकसंख्या हा घटक प्रामुख्याने विचारात घेवून जनतेला जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध होण्याकरीता आपण केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. तसेच त्यांना पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. त्यामुळे समितीला ही बाब सोपवित असताना शासन स्तरावरुन निश्चितपणे निर्णय घेऊ."

०३. प्रस्तुत प्रकरणी नमुद करण्यात येते की, दिनांक ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात मोलगी येथे स्थानिक प्रशासकीय गरज विचारात घेऊन तात्पुरते अपर तहसील कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तसेच विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या दिनांक ०४.१२.२०२४ रोजीच्या आदेशानुसार श्री. सतवन, परिविक्षाधीन तहसिलदार यांची अपर तहसिलदार मोलगी येथे नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, मोलगी येथे तात्पुरते अपर तहसिल कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे.

०४. विभागाच्या दि.२५.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल / नवीन कार्यालय निर्मिती व महत्वाच्या महसूली कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदलांबाबत शिफारशी करण्याकरीता श्री. उमाकांत दांगट, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील व इतर अधिकाऱ्यांची गठीत करण्यात आलेली समिती विभागाच्या दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आली आहे.

०५. सबब, प्रस्तुत आश्वासनातील मोलगी येथे दि. ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यात आले आहे तसेच विभागाच्या दि. १८.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये दांगट समिती बरखास्त करण्यात आली आहे. यास्तव, विभागाच्या आश्वासनाच्या यादीतून आश्वासन क्र.११०,१११, व ११२ वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

मा.समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती,
विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.

आश्वासन क्रमांक १२ (3)

क्र.विपआ २०२४/ प्र.क्र.१४५/म-१०

मंत्री

महसूल

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

www.maharashtra.gov.in

दिनांक : २९ मे,२०२५

विषय: महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधानपरिषदेत उपस्थित लक्षवेधी सूचना क्र.४१६ च्या अनुषंगाने दिलेले आश्वासन क्र.११०, १११ व ११२ वगळणेबाबत.

महोदय,

सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनामध्ये नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करणेबाबत श्री. आमश्या पाडवी, मा.वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.४१६ वरील चर्चेवेळी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी पुढीलप्रमाणे आश्वासने दिली आहेत :-

आश्वासन क्रमांक ११० - "अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यासंबंधी समितीने २५ तारखेपर्यंत किंवा या महिन्याअखेर शासनाला अहवाल सादर करावा. शेवटी पदांची निर्मिती करणे, तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही आणि तहसील कार्यालयाची निर्मिती करताना प्राधान्यक्रम कशाला दिला पाहिजे यासंदर्भात समिती शासनास शिफारस करील. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल."

आश्वासन क्रमांक १११ - " निश्चितपणे समितीला या बाबी देखील तपासून पाहाण्यास सांगण्यात येईल."

आश्वासन क्रमांक ११२ - " या संदर्भात निकष तयार करीत असताना लोकसंख्या हा घटक प्रामुख्याने विचारात घेवून जनतेला जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध होण्याकरीता आपण केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. तसेच त्यांना पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. त्यामुळे समितीला ही बाब सोपवित असताना शासन स्तरावरुन निश्चितपणे निर्णय घेऊ."

०३. प्रस्तुत प्रकरणी नमुद करण्यात येते की, दिनांक ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात मोलगी येथे स्थानिक प्रशासकीय गरज विचारात घेऊन तात्पुरते अपर तहसील कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तसेच विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या दिनांक ०४.१२.२०२४ रोजीच्या आदेशानुसार श्री. सतवन, परिविक्षाधीन तहसिलदार यांची अपर तहसिलदार मोलगी येथे नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, मोलगी येथे तात्पुरते अपर तहसिल कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे.

०४. विभागाच्या दि.२५.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल / नवीन कार्यालय निर्मिती व महत्वाच्या महसूली कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदलांबाबत शिफारशी करण्याकरीता श्री. उमाकांत दांगट, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील व इतर अधिकाऱ्यांची गठीत करण्यात आलेली समिती विभागाच्या दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आली आहे.

०५. सबब, प्रस्तुत आश्वासनातील मोलगी येथे दि. ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यात आले आहे तसेच विभागाच्या दि. १८.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये दांगट समिती बरखास्त करण्यात आली आहे. यास्तव, विभागाच्या आश्वासनाच्या यादीतून आश्वासन क्र.११०,१११, व ११२ वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

मा.समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती,
विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.

आश्वासन क्रमांक ८४

Note # 1
विपआ-**2026**/प्र.क्र.**27**/समन्वय-**01**

महसूल व वन

विभाग/समन्वय-**01**

सन 2025 च्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनातील
विधानपरिषद आश्वासन क्र. 84 चे कृपया अवलोकन व्हावे.

मा.श्री. प्रसाद लाड वि.स.स. यांनी पॉईट ऑफ़ इनफ़ोर्मेशन या आयुधाद्वारे पुढील नमुद मुद्दा उपस्थित केला होता. "पुर्व द्रुतगती मार्गाच्या शेजारील खाडीवरील मॅन्ग्रोव्हज नष्ट करुन अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत" जिल्हाधिकारी व महानगरपालिकेला संयुक्त निर्देश देऊन अतिक्रमण तात्काळ अनधिकृत बांधकाम तोडण्याची विनंती मा.श्री. प्रसाद लाड वि.स.स. यांनी केली होती. सदर प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांनी "सभापती महोदय होय" असे आश्वासन दिले होते.

सदर प्रकरणी नमुद करण्यात येते की, सदर विधानपरिषद आश्वासन हे सायन कोळीवाडा येथील कांदळवनावरील अतिक्रमणाशी संबंधित आहे. विभागाच्या विषयसुचीनुसार " कांदळवनासंबंधी बाबी" हा विषय वन उप विभागाकडे सुपुर्द करण्यात आला असल्याने सदर विधानपरिषद आश्वासन क्र. 84 वर पुढील कार्यवाही वन उप विभागामार्फ़त होणे आवश्यक आहे. यास्तव विधानपरिषद आश्वासन क्र. 84 चे हस्तांतरण स्वीकरण्याबाबत वन उप विभागास विनंती करण्यात यावी.

क.अ. (श्री.शेख)

सह सचिव (श्री.देशमुख)

अपर मुख्य सचिव (महसूल)

अपर मुख्य सचिव (वने)

Sign

10/04/2026 05:47 PM

ALIM KASAM SHAIKH
SECTION OFFICER

आश्वासन क्रमांक - २१

अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- गौखनि १०/०२२५/प्र.क्र.७२/ख-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांकः- ०७ मार्च, २०२५

प्रस्तावना:-

राज्यातील अवैध गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतूकीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक यांच्याकडून मोठया प्रमाणात शासनस्तरावर व क्षेत्रीय स्तरावर तक्रारी/निवेदने प्राप्त होत आहेत. अशा तक्रारीचे निवारण व त्याची शहानिशा करण्याच्या अनुषंगाने चौकशी करणे आवश्यक आहे. अशा प्राप्त तक्रारी/निवेदनावर कार्यवाही करण्याबाबतची निश्चित अशी कालमर्यादा घालणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीबाबत प्राप्त तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित करून त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासन परिपत्रकान्वये क्षेत्रीय यंत्रणास सूचना देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन परिपत्रक:-

सामान्य नागरीक व स्थानिक लोकप्रतिनीधी यांच्याकडून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

(i) सामान्य नागरीक व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून क्षेत्रीय अधिकारी/कार्यालयास अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक या विषयाबाबात प्राप्त झालेल्या तक्रारी/निवेदने, तसचे शासनस्तरावर क्षेत्रीय यंत्रणेकडे वर्ग करण्यात आलेल्या अशा प्रकारच्या तक्रारी/निवेदने यांच्या अनुषंगाने क्षेत्रीय यंत्रणेकडून तक्रारी/निवेदनामधील मुद्यांच्या अनुषंगाने निवेदन प्राप्त झाल्यापासून ०७ दिवसात प्रत्यक्ष पाहणी करुन चौकशीची कार्यवाही करण्यात यावी.

(ii) तक्रारीच्या चौकशीमध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक आढळून आल्यास पुढील १५ दिवसात संबंधिता विरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ (७) व ४७ (८) अन्वये, तसेच गौण खनिज उत्खनन (नियम व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी दंडात्मक कार्यवाही करावी.

(iii) अशा प्रकारच्या तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित तक्रारदार/निवेदन धारकांना लेखी कळविण्यात यावी.

(iv) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती तात्काळ स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविण्यात यावी.

(v) उपरोक्त प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या कालावधीत तक्रारी/निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात न आल्यास व संबंधित तक्रारदार/निवेदनधारकाला विहीत कालावधीत न कळविल्यास संबंधित सक्षम अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येवून विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येईल.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०३०७१४१६४९५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9bd008875b6a3a9fddad3e55fe032fdf13a27221cb2bbc67abd0155f914efc01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B2460740917 4C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2025.03.10 10:27:02 +05'30'

(सदानंद गो. मोहिते)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खासगी सचिव, मंत्रालय मुंबई.
८. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सर्व उपविभागीय अधिकारी
१३.सर्व तहसिलदार
१४.संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
१५.निवडनस्ती "ख-२," कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

आश्वासन क्रमांक ३१८

४५

राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा (M-SAND) वापर करण्याकरीता धोरण निश्चित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: गौखनि-१०/०३२५/प्र.क्र.८०/ख-२,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २३ मे,२०२५

वाचा:- १. सुधारित वाळू निर्गति धोरण-२०२५, शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१,दि.०८.०४.२०२५
२. दिनांक १३.०५.२०२५ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेला निर्णय
३. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३

प्रस्तावना :-

आधुनिक अर्थव्यवस्थेत पायाभूत सुविधांच्या विकासात वाळूची महत्त्वाची भूमिका आहे. वाळू प्रामुख्याने नदीच्या पात्रामध्ये आढळते. नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी, नद्यांमधील वाळू सुरक्षित पद्धतीने वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक वाळूला एम-सॅन्ड (कृत्रिम वाळू) पर्याय म्हणून विकास करणे आवश्यक आहे.

राज्यात वाळूची उपलब्धता कमी असल्याने सदर तुटवडा परराज्यामधून येणा-या वाळूमधून भागवला जात आहे. तथापि, भविष्यात विकासकामांसाठी निश्चित केलेली उद्दिष्टे पाहता राज्यातील वाळूची मागणी अनेक पटींनी वाढण्याची शक्यता आहे. शासनाने व मा. न्यायालयाने पर्यावरणपूरक मानके लागू केल्यामुळे, नदीच्या पात्रात आढळणाऱ्या वाळूची उपलब्धता मर्यादित झाली आहे. त्यामुळे, नदीपात्रातून निघत असलेल्या वाळूची जागा घेऊ शकतील अशा दर्जेदार बांधकामयोग्य वाळूची गरज M- Sand (कृत्रिम वाळू) द्वारे पूर्ण केली जाऊ शकते. नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम-सॅन्ड हीं सर्वात योग्य पर्यायी सामग्री आहे. म्हणून एम-सँडला प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम-सॅन्ड ही सर्वात योग्य पर्यायी सामग्री म्हणून एम-सँडला प्रोत्साहन देण्यासाठी त्याबाबतचे खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे:-

एम-सँड (Manufactured Sand or M-Sand) व्याख्या :- BSI and Indian Standards (IS) codes viz. IS ३८३:२०१६ - Coarse and fine aggregate for concrete- Specification (Third Revision)२, IS १५४२:१९९२-Sand for plaster- Specification (Second Revision)२, IS २११६:१९८०- Specification for sand for masonry mortars (First Revision)२, IS ४५६:२०००- Plain and reinforced concrete code of practice (Fourth Revision)२ & such other standards as fixed by BSI from time to time and should be suitable for construction activities. Fine

H 3170.pdf - 27 a

particles of less than १५० Microns size shall not be present in excess quantity than the percentage specified in the IS code.

०२. कृत्रिम वाळू धोरणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील:-

१. नदीच्या वाळूचा वापर कमी करणे, जेणे करून नद्यांच्या पर्यावरणावर होणारा प्रतिकूल परिणाम कमी करता येईल.

२.घरगुती आणि बांधकाम उद्योगांमधील वाळूची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त स्त्रोत विकसित करणे.

३.नदीच्या वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळूच्या विकासास प्रोत्साहन देणे.

४.एम-सँन्ड युनिटला उद्योग म्हणून प्रोत्साहन देणे.

५.ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्सने ठरवलेल्या मानकांनुसार स्वस्त, सुलभ आणि प्रभावी पर्यायी बांधकामयोग्य म्हणून दर्जेदार एम-सँन्डला प्रोत्साहन देणे.

६.एम-सँन्डला उत्पादन युनिट्सच्या मान्यतेच्या प्रक्रियेचे मानकीकरण करणे.

७.राज्यात शून्य कचरा खाणकामाला चालना देण्यासाठी खाणकामातील ओव्हरबर्डनपासून एम-वाळूच्या उत्पादनास प्रोत्साहन देणे.

८.जिल्ह्यांमध्ये उद्योग म्हणून एम-सँड युनिट्सची स्थापना करण्यास प्रोत्साहन देणे.

०३. एम-सँड साठी असलेले स्त्रोत खालीलप्रमाणे राहतील :-

एम-सँडच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणारा माल वा सामग्री ही कोणत्याही हानिकारक खनिज किंवा एम-सँडच्या गुणवत्तेवर प्रभाव पाडणाऱ्या पाइसाईट, अल्कालाईन मिनरल्स, सॉल्ट, सल्फेट, कोळसा, माईका, सेल, इत्यादींसारखे रासायनिक गुणधर्म नसेल अशी असली पाहिजे. एम-सँडच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सामग्रीचे स्त्रोत असतील:-

(i)**ओव्हरबर्डन:-** कोळसा खाणी अथवा अन्य मुख्य खनिज किंवा भविष्यात होणाऱ्या खाणपट्ट्यामधून उपलब्ध होणारे ओव्हरबर्डन/रिजेक्ट डम्प ज्यामध्ये मातीचे प्रमाण कमी असेल.

(ii)**इमारती बांधकामासाठी वापरात आणण्यात येत असलेले दगड :-** राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी इमारती बांधकामासाठी वापरण्यात येत असलेले दगड जो की एम-सँड निर्माण करण्यासाठी उपयोगात आणता येईल असा स्त्रोत

(iii)**विहीर आणि जलसंधारणाची कामे:-** विहीर आणि जलसंधारणाच्या कामांतून निघणारा दगड जो की एम-सँड निर्माण करण्यासाठी उपयोगात आणता येईल असा स्त्रोत

(iv)**दगड खाणपट्टे:-** महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार खाणपट्टाधारक यांना मंजूर करण्यात आलेल्या खाणपट्ट्यामधून निघणारा दगड जो की एम-सँड निर्माण करण्यासाठी उपयोगात आणता येईल असा स्त्रोत

(v)**औष्णिक विद्युत केंद्रातून निघणारी राख (Fly Ash)**

०४. एम-सँड युनिट स्थापित करणे/सुरू करणे याबाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे असतील(Establishment of M-Sand Manufacturing Unit):-

पृष्ठ ११ पैकी २

H/104-19

एम-सँड युनिटच्या माध्यमातून गौण खनिजापासून उत्पादित होणारे बांधकाम साहित्य तसेच त्यांच्या वाहतुकीचे सनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे एम-सँड युनिटधारकास कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(i) ज्या क्षेत्रावर एम-सँड युनिटसाठी CTE-Consent to Establish आणि CTO-Consent to Operate बाबतचे प्रमाणपत्र महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून घेणे बंधनकारक राहील.

(ii) ज्या क्षेत्रावर एम-सँड युनिट बसवण्यात येणार आहे अशा क्षेत्राबाबत संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून त्याबाबतचा वापर अनुज्ञेय असणे आवश्यक आहे. तसेच आवश्यक त्याठिकाणी अकृषिक परवानगी घेण्यात यावी. अशा ठिकाणीच CTE-Consent to Establish आणि CTO-Consent to Operate बाबतचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी देण्याची कार्यवाही करावी.

(iii) एम-सँड युनिट सुरू करण्यासाठी उद्योग आधार नोंदणी/जिल्हा उद्योग केंद्र यांची नोंदणी(DIC-District Industrial Center) असणारे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

(iv) एम-सँड युनिट सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ७१ नुसार व्यापारी परवाना घेण्यासाठी "महाखनिज" या संगणक प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करून व्यापारी परवाना प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. यापूर्वी सुरू असलेल्या एम-सँड युनिटधारकाने असा व्यापारी परवाना घेतलेला नसल्यास त्यांनी असा परवाना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. त्यानंतर व्यापारी परवाना नसलेले एम-सँड युनिट बंद करण्यात येतील. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व कार्यरत एम-सँड युनिटधारकांना लेखी सूचना द्यावी.

(v) ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यावर सक्षम प्राधिकारी म्हणजे जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या ७२ नुसार त्यावर एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा.

(vi) एम-सँड युनिटच्या माध्यमातून उत्पादित होणाऱ्या बांधकाम साहित्याची वाहतूक करण्यात येत असलेल्या वाहनासोबत वाहतूक करताना "महाखनिज" या संगणक प्रणालीमार्फत वाहतूक परवाना किंवा दुय्यम वाहतूक परवाना(दुय्यम वाहतूक पास म्हणजेच स्वामित्वधन आकारणी नसलेला पास) अनिवार्य राहील. अशा दुय्यम वाहतूक पास नसणाऱ्या वाहनाव्दारे एम-सँड युनिटच्या माध्यमातून गौण खनिजापासून उत्पादित होणाऱ्या बांधकाम साहित्याची वाहतूक आढळून आल्यास, सदर वाहनाने ज्या एम-सँड युनिटमधून वाहतूक केली आहे, अशा एम-सँड युनिटवर कारवाई करण्यात यावी.

(vii) एम-सँड युनिटधारकास वापरण्यात येणाऱ्या गौण खनिजाच्या वापराबाबत "परिशिष्ट-अ (आवक नोंदवही)" व "परिशिष्ट-ब (जावक नोंदवही)" प्रमाणे नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील व त्याबाबतचा ताळमेळ वेळोवेळी क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून तपासण्यात येईल.

(viii) गौणखनिज (कच्चा माल वा उत्पादित एम-सँड) वाहतूक करणाऱ्या वाहनांना GPS प्रणाली बसवणे बंधनकारक राहील अशा GPS असलेल्या वाहनांची नोंद "महाखनिज" प्रणालीवर करण्यात यावी. GPS प्रणाली नसलेल्या वाहनांची वाहतूक अवैध समजण्यात येईल.

(ix) व्यापारी लायसन्सधारक यानी ज्या ठिकाणाची एम-सँड युनिटसाठी परवानगी घेतली असेल त्याच ठिकाणी साठा करण्यात यावा. अशा जागा महाखनिज प्रणालीवर Geo fencing करण्यात याव्यात.

(x) एम-सँड युनिटच्या जागेभोवती कुंपण घालण्यात यावे जेणे करून वाहनांसाठी एकच प्रवेशमार्ग (Entry) व बाहेर जाण्याचा मार्ग (Exit) राहील. या आत-बाहेर जाण्याच्या मार्गात Electronic Weigh Bridge उभारणे आवश्यक राहील जेणे करून क्रशिंगसाठी आणलेल्या गौण खनिजाचे व त्यापासून तयार करण्यात आलेल्या एम-सँडच्या प्रत्येक वाहनाचे वजन घेण्यात येऊन, त्याची नोंद "महाखनिज" या संगणक प्रणालीवर घेतली जाईल. तसेच वजनकाट्याचे "महाखनिज" या संगणक प्रणालीसोबत सलंग्नीकरण करणे बधंनकारक राहील.

(xi) संबंधित तहसिलदार यांनी दरमहा "परिशिष्ट-अ (आवक नोंदवही)" व "परिशिष्ट-ब (जावक नोंदवही)" याप्रमाणे एम-सँड युनिटधारक यांनी ठेवलेल्या नोंदवह्या तपासणे व स्वामित्वधनाचा ताळमेळ घेणे व त्याबाबत जिल्हाधिकारी यांना अवगत करणे बंधनकारक व अनिवार्य राहील.

(xii) उत्खननाचे परिमाण निश्चित करण्यासाठी MR-SAC, नागपूर यांचेकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल.

०५. गुणवत्ता मानके आणि नियंत्रण उपाय (Quality Standards and Control Measures):-

राज्यात होणारी बांधकामे उच्च-गुणवत्तेची व किफायतशीर होण्याच्या अनुषंगाने एम-सँडसारख्या बांधकाम साहित्याची योग्य ती उपलब्धता होण्यासाठी एम-सँडची गुणवत्ता व तिच्या नियत्रंणासाठी खालीलप्रमाणे उपाय करण्यात येतील.

(i)क्वार्टझाइट, ग्रॅनाइट आणि वाळूचा खडक इत्यादी खडकांचे सर्वोत्तम योग्य साठे आणि एम-सँडच्या उत्पादनासाठी जादा भास्योग्य प्रगत तंत्रे/साधनांचा वापर करून पेट्रोग्राफिकल, खनिजशास्त्रीय, भूभौतिकीय आणि भू-रासायनिक तपासणी करून नमुना अभ्यासाद्वारे ओळखला जाईल.

(ii)एम-सँड उत्पादकांना बी.आय. एस. कोडमधील जसे की, काँक्रीटसाठी "आयएस 383:2016", प्लास्टरिंगसाठी "आयएस 1542:1992", वॉश वॉटरसाठी "आयएस 456:2000" आणि बी.आय.एस.ने वेळोवेळी निश्चित केलेल्या इतर मानकांचे पालन करणे एम-सँड युनिटधारक यांना आवश्यक असेल.

(iii)गुणवत्ता तपासण्यासाठी बीआयएसने निश्चित केलेल्या संबंधित मानकांची खालीलप्रमाणे पूर्तता करणे आवश्यक आहे. :-

१) गुणवत्ता आणि बाजारपेठेतील विश्वासार्हता प्राप्त करण्यासाठी एम-सँड उत्पादक त्यांच्या उत्पादनांसाठी बी.आय.एस. प्रमाणपत्र प्राप्त करतील.

२) एम-सँड उत्पादक त्यांच्या परिसरात नियमीत गुणवत्ता तपासणी करण्यासाठी एक गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळा स्थापन करतील, ज्याचे रेकॉर्ड बी.आय.एस. मानकांनुसार ठेवले जाईल. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रयोगशाळांमध्येही एम-सँडची गुणवत्ता तपासता येईल. असे रेकॉर्ड जिल्हा खनिकर्म अधिकारी, तहसिलदार यांना नियतकालिक पडताळणीच्या अधीन असतील. तिमाही अहवाल सादर करतेवेळी युनिटधारकाने सक्षम प्रयोगशाळेने दिलेले प्रमाणपत्र अहवालासोबत जोडणे आवश्यक राहील.

३) एम-सँड उत्पादक एनएबीएल-प्रमाणित/डीएमजी/ विद्यापीठ प्रयोगशाळांमध्ये उत्पादनांसाठी गुणवत्ता चाचण्या करतील त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांना दर तिमाही आधारावर सादर करतील.

०६. एम-सँड विक्री (Sale of M-Sand):-

एम-सँडची विक्री करताना राज्यात उपलब्ध असलेल्या एम-सँडची उपलब्धता बाजारमध्ये किंवा ग्राहकास निदर्शनास येण्याच्या अनुषंगाने एम-सँड युनिटधारकास विक्रीकरीता शासनाने तयार केलेल्या "महाखनिज" या संगणक प्रणालीच्या माध्यमातून करणे बंधनकारक राहील. स्वामित्वधनामध्ये सवलत देण्यात येत असल्याने एम-सँड युनिटधारक यांनी बाजारमूल्यापेक्षा कमी दराने विक्री करणे आवश्यक राहील.

०७. एम-सँड युनिट्ससाठी प्रोत्साहन:-

एम-सँड युनिटमधून उत्पादीत होणाऱ्या एकूण उत्पादनाच्या १००% एम-सँड म्हणून उत्पादन होत असल्यास असे एम-सँड युनिट शासनातर्फे वेळोवेळी घोषीत करतील अशा तसेच खालील नमूद प्रोत्साहनास पात्र राहील.

(i)उद्योग म्हणून एम-सँड युनिट्सची स्थिती कायम राहील.

(ii)एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी किमान निव्वळ उत्पन्न व आर्थिक उलाढालीची आवश्यकता नाही.

(iii)प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रथम पुढाकार घेणाऱ्या ५० महाराष्ट्र राज्याचा अधिवास असणाऱ्या/महाराष्ट्रात नोंदणी असणाऱ्या संस्था/इत्यादीना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योग विभागाच्या व या विभागाच्या सवलती लागू राहतील.

(iv)महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ९ मध्ये "लिलावाव्दारे खाणपट्टा मंजूर करण्याची सीत" नमूद करण्यात आलेली आहे. त्या कार्यपध्दतीनुसार शासनाकडे किंवा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीचा लिलाव करताना केवळ एम-सँड युनिट उभारण्यासाठी व त्यामधून उत्खनन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा अधिवास असणाऱ्या/महाराष्ट्रात नोंदणी असणाऱ्या संस्था/इत्यादीना भाग घेता येईल. अशा शासकीय जमिनीवरील तसेच खाजगी जमिनीवर एम सँड युनिटकरीता व्यक्ती/संस्था/इत्यादीना पाच एकरापर्यंत खाणपट्ट्यासाठी जागा सक्षम प्राधिकारी यांच्याकडून मंजूर करण्याबाबतची कार्यवाही शासनाच्या पूर्व मान्यतेने करण्यात येईल. अशा व्यक्ती/संस्था यांनी एक वर्षाच्या आत सदर जमिनीवर एम सॅड युनिट कार्यान्वित करणे बंधनकारक राहील.

(v)एम-सँड युनिटधारकांनी त्यांना देण्यात आलेल्या खाणपट्ट्याचे उत्खनन करताना खाणपट्ट्याच्या जागेमध्ये सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जलसंधारणाचा स्त्रोत तयार होण्याकरीता वर्तुळाकार/चौरस/आयात आकाराचा सुरक्षीत जलसंधारण तलाव तयार होईल या पध्दतीने उत्खनन करणे बंधनकारक राहील. उत्खनन पूर्ण झाल्यानंतर या जागेचा ताबा तहसीलदार यांनी जलसंधारण विभागास द्यावा. त्यानंतर या जागेवरील पाणीसाठा जलसंधारण विभागाच्या व्यवस्थापनेखाली असेल व त्याचा सार्वजनीक प्रयोजनासाठी वापर करता येईल. तसेच अशा जमिनीमध्ये पाणीसाठा वाढविण्यासाठी काही बदल करावयाचे असल्यास असे बदल करण्याचे अधिकार जलसंधारण विभागास राहतील.

(vi) यापूर्वी शासनाकडे किंवा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीवर खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे किंवा अशा खाणपट्ट्याचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे, अशा खाणपट्टाधारक यांनी सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षांच्या आत स्टोनक्रशरची उभारणी करणे व एम-सँड युनिट उभारून त्यामधून शक्य तितके एम-सँड उत्पादन करणे आवश्यक राहील. अन्यथा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ स्टोनक्रशरचे Cansent to establishment and Operate च्या परवान्याचे नुतनीकरण करणार नाही व जिल्हाधिकारी यांनी व्यापारी परवान्याचे नुतणीकरण करण्याची कार्यवाही करू नये.

तसचे एम-सँड युनिटधारकांनी त्यांना देण्यात आलेल्या खाणपट्ट्याचे उत्खनन करताना खाणपट्ट्याच्या जागेमध्ये सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जलसंधारणाचा स्त्रोत तयार होण्याकरीता वर्तुळाकार/चौरस/आयात आकाराचा सुरक्षीत जलसंधारण तलाव तयार होईल यापध्दतीने उत्खनन करणे बंधनकारक राहील. उत्खनन पूर्ण झाल्यानंतर या जागेचा ताबा तहसीलदार यांनी जलसंधारण विभागास द्यावा. त्यानंतर या जागेवरील पाणीसाठा जलसंधारण विभागाच्या व्यवस्थापनेखाली असेल व त्याचा सार्वजनीक प्रयोजनासाठी वापर करता येईल. तसेच अशा जमिनीमध्ये पाणीसाठा वाढविण्यासाठी काही बदल करावयाचे असल्यास असे बदल करण्याचे अधिकार जलसंधारण विभागास राहतील.

(vii)नवीन (स्टोन) खडीक्रशरला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ/जिल्हाधिकारी यांनी नव्याने अनुक्रमे Cansent to establishment and Operate चा परवाना देताना व व्यापारी परवाना देताना सदर परवानाधारकास तीन वर्षाच्या आत एम सॅड युनिट कार्यान्वित करणे बंधनकारक राहील.

(viii)खाजगी क्षेत्रावर मंजूर करण्यात आलेले व त्यांचे नुतनीकरण करण्यात आलेल्या खाणपट्टाधारक यांनी पुढील तीन वर्षांत स्टोनक्रशरची उभरणी करणे व एम-सँड युनिट उभारून त्यामधून शक्य तितके एम-सँड उत्पादन करणे बंधनकारक राहील. तसेच खाणपट्ट्यातून उत्खनन करताना खाणपट्ट्याच्या जागेमध्ये वर्तुळाकार/चौरस/आयात आकाराचा सुरक्षीत जलसंधारण तलाव होईल यापध्दतीने उत्खनन करून सार्वजनिक हिताच्यादृष्टीने जलसंधारणाचा स्त्रोत तयार होईल त्यापध्दतीने करून देणे बंधनकारक राहील.

(ix)एम-सँडच्या उत्पादनासाठी शासन वेळोवेळी घोषीत करेल याप्रमाणे स्वामित्वधन घेण्यास पात्र राहील. सध्या याकरिता रू.६००/- प्रति ब्रास इतके स्वामित्वधन आकारण्यात येते. तथापि, शंभर टक्के एम-सँड उत्पादीत करणाऱ्या एम-सँड युनिटधारकास रू.४००/- प्रति ब्रास इतकी सवलत देण्यात येईल.

०८. एम-सँड युनिटसाठी गुंतवणूक प्रोत्साहन:-

शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांच्याकडून वेळोवेळी वेगवेगळ्या घटकांसाठी Package Scheme of Incentive बाबत निर्णय घेण्यात येतात. अशा Package Scheme of Incentive मध्ये खनिज आधारीत असणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने मुख्यत: एम-सँड युनिट या उद्योगाचा अंतर्भाव करण्यात येईल. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाकडून (१)क्र.पीएसआय-२०१९/प्र.क्र.४६/उद्योग-९, दिनांक १६.०९.२०१९, (२)राज्यातील महिला उद्योजकासाठी विशेष धोरण-२०१७, क्र.साप्रोयो-२०१७/प्र.क्र.१५/उद्योग-८, दिनांक १४.१२.२०१७

तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आणि भविष्यात निर्गमित करण्यात येणारे धोरणे यानुसार सदर गुंतवणूक प्रोत्साहन उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांच्याकडून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील समाजातील वेगवेगळे घटक, गुतंवणूक मर्यादा व रोजगार निर्मिती तसेच प्रदेशानुसार केलेल्या वर्गीकरणानुसार औद्योगिक प्रोत्साहनाबाबत खाली नमूद तरतुदी कृत्रिम वाळू युनिटसाठी लागू राहतील:-

(i)औद्योगिक प्रोत्साहन अनुदान
(ii)व्याज अनुदान
(iii)विद्युत शुल्कातून सूट
(iv)मुद्रांक शुल्क माफी
(v)वीज दर अनुदान

तसेच एम-सँड युनिट उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या तात्काळ उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने उद्योग विभागाकडून एक खिडकी योजना राबविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

०९. राज्य सरकार, निमशासकीय, स्थानिक संस्था, पंचायती राज संस्था, विविध महामंडळे आणि राज्य सरकारद्वारे वित्तपुरवठा केलेल्या इतर संस्थांद्वारे केल्या जाणाऱ्या विविध बांधकाम कामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वाळूच्या प्रमाणाच्या किमान २०% एम-सँड असणे बंधनकारक राहील. तसेच, शक्य त्या बांधकामाकरीताचे प्रमाण टप्प्याटप्प्याने शंभर टक्के करण्यात यावे. अशा प्रकारे दिनांक ०१.०६.२०२५ पासून एम-सँडचा प्रत्यक्ष वापर करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, नगर विकास विभाग यासारख्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी तसेच राज्य शासनाच्या अखत्यारीतील सर्व संबंधित निमशासकीय महामंडळांनी पूरक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

१०. एम-सँड निर्मितीसाठी पाण्याचा उपयोग (Usage of Water of M-Sand Manufacturing Units):-

(i) एम-सँडची गुणवत्ता प्रभावित होऊ नये यासाठी एम-सँड निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या पाण्यामध्ये क्षार, सल्फेट लवण, कार्बनची अशुध्दता यासारखे हानीकारक घटक नसतील असे पाणी उपयोगात आणण्याची कार्यवाही एम-सँड युनिट्सधारक यांनी करावी.

(ii) एम-सँडच्या निर्मितीसाठी जलसंसाधनांचा अशा प्रकारे उपयोग करण्यात यावा, जेणे करून जल संसाधनाचे स्त्रोत खराब होणार नाहीत. तसेच वापर करण्यात आलेल्या पाण्याचा पुनर्वापर करता येईल असे संयत्र बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(iii) एम-सँड युनिटधारकांनी Zero Liquid Discharge च्या आधारे काम करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

११. कचरा व्यवस्थापन :-

(i)जलस्त्रोतांच्या संवर्धनाची गरज लक्षात घेऊन, एम-सँड धुण्याच्या गुणवत्तेशी तडजोड न करता पाण्याचा विवेकपूर्ण वापर करणे आवश्यक राहील. एम-सँड युनिट्स शून्य-डिस्चार्जच्या

संकल्पनेवर कार्य करतील आणि आवश्यक प्रक्रिया केल्यानंतर धुण्यासाठी वापरलेले पाणी पुन्हा वापरणे बंधनकारक राहील.

(ii)आवश्यक वॉश वॉटर गुणवत्ता मानके पूर्ण करणाऱ्या शहरी प्रक्रिया प्लांटमधील पाणी एम-सँड उत्पादनासाठी वापरले जाऊ शकेल.

(iii)एम-सँड युनिट्स पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार पद्धतीने कार्य करतील याची तसेच कचरा विल्हेवाट आसपासच्या पर्यावरणावर नकारात्मक परिणाम करत नाही याची खात्री करणे आवश्यक राहील. उत्पादनादरम्यान निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी योग्य प्रक्रियांचे पालन केले जाईल.

१२. सदर शासन निर्णय हा सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, उद्योग विभाग व वित्त विभाग यांच्याशी विचारविनिमय करून तसेच वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.२७७/२०२५/व्यय-९, दिनांक १६.०५.२०२५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी या शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने अधिकचे पूरक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०५२३१७०४४१०८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Dn: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=637145FD393D5D5C713E9460A7BC6BEE3011448B7FC64D13863089C76AF7A7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC7172A73579834FA622983DBF864770FBEF1D35A1CA975958E9919F3F809, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2025.05.23 17:09:53 +05'30'

(संजय औ. धारूरकर)
उप सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई.
५. मा. उपमुख्यमंत्री, यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खासगी सचिव, मंत्रालय मुंबई.
८. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व महामंडळे

१३. सर्व उपविभागीय अधिकारी
१४. सर्व तहसिलदार

एम-सँड युनिटधारकांसाठी नोंदवहीचा नमुना
शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०३२५/प्र.क्र.८०/ख-२, दिनांक २३.०५.२०२५ सोबतचे परिशिष्ट-"अ"
आवक नोंदवही

अ.क्र.	दिनांक	गौण खनिजाचे नाव	गौण खनिज कोठून आणले त्याबाबतची माहिती (खाणपट्टा आदेश)	गौण खनिजाचे परिमाण (ब्रास/मे.ट.)	वाहन क्रमांक	eTP नंबर	शिल्लक साठा (Progressive) (ब्रास/मे.टन)
१	२	३	४	५	६	७	८

एम-सँड युनिटधारकांसाठी नोंदवहीचा नमुना
शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०३२५/प्र.क्र.८०/ख-२, दिनांक २३.०५.२०२५ सोबतचे परिशिष्ट-"ब"
जावक नोंदवही

अ.क्र.	दिनांक	गौण खनिजाचे नाव	गौण खनिज घेणाऱ्याचे नाव	गौण खनिजाचे परिमाण (ब्रास/मे.ट.)	वाहन क्रमांक	eTP नंबर	गौण खनिज ज्या ठिकाणी पोहच होणर आहे ते ठिकाण	शिल्लक साठा (Progressive) (ब्रास/मे.टन)
१	२	३	४	५	६	७	८	९

—×०×—

महसूल व वन विभाग/ख-२

मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक २५.०६.२०२५ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता " महाराष्ट्र विधानपरिषद सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३१९ च्या बैठकीबाबत" या विषयाबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक २५.०६.२०२५ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता **" महाराष्ट्र विधानपरिषद सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३१९ च्या बैठकीबाबत"** या विषयाबाबत आयोजित बैठकीस उपस्थित खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते:-

१) श्री. प्रसाद लाड, विधानपरिषद सदस्य

२) श्री. संजय धारुरकर, उप सचिव (ख), महसूल व वन विभाग, मंत्रालय

३) श्री. सदानंद मोहिते, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय

सदर बैठकीमध्ये चर्चेअंती मा. मंत्री (महसूल) यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत:-

अ.क्र.	कार्यवाहीचा मुद्दा	संबंधित विभाग/अधिकारी	कालमर्यादा
१	महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतूदीनुसार शासनाकडून वेळोवेळी गौण खनिजाचे स्वामित्वधनाचे दर निश्चित करण्यात येतात. सामान्य नागरिकांना सहज वाळू/रेती उपलब्ध होण्यासाठी व शासनाचा महसूल वाढण्याच्या दृष्टीने दिनाक ०८.०४.२०२५ व ३०.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये "वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५" धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच दिनांक २३.०५.२०२५ च्या शासन निर्णयान्वये "राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा वापर करण्याकरिता धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या स्वरूपात शासनास महसूल प्राप्त होणार आहे.	महसूल व वन विभाग	निरंक

वरीलप्रमाणे आदेश देऊन बैठक समाप्त करण्यात आली.

****

आश्वासन क्रमांक ३४५

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ३(२)] शुक्रवार, जानेवारी १९, २०२४/पौष २९, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.- महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	१-४

दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,

सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६१ चा महा. २७.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २८-१अअ मधील,— १९६१ चा महा. २७.

(१) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३-१अ) या कलमात व कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-एक भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना, वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी त्यासाठी कोणतेही अधिमूल्य न आकारता, वर्ग-एक भोगवट्यावर देण्यात आल्या असल्याचे मानण्यात येतील ;

(ब) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी, जर अशा जमिनींना लागू असलेले संबंधित अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये असे रूपांतरण करण्याची तरतूद असेल तर, उक्त अधिनियम व नियम यांच्या तरतुदींनुसार वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरित करता येतील.";

(२) पोट-कलम (३अ) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल : —

"(३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाद्वारे निर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, त्याने निश्चित केलेल्या दरांत, शासकीय किंवा निमशासकीय संस्थांना अथवा महानगरपालिकेला, नगरपरिषदेला, नगर पंचायतीला किंवा ग्राम पंचायतीला सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याकरिता विल्हेवाट करता येईल.

स्पष्टीकरण.—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची विल्हेवाट करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(अ) (एक) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केलेल्या परिषदेच्या किंवा नगर पंचायतीच्या नगरपालिका क्षेत्रापासून ; १९६५ चा महा. ४०.

(दोन) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रापासून ; किंवा १९४९ चा ५९.

(तीन) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये व्याख्या केलेल्या गावठाणाच्या किंवा गावाच्या स्थळाच्या हद्दीपासून, १९६६ चा महा. ४१.

पाच किलोमीटरच्या परिसरात स्थित असलेल्या शैक्षणिक, वैद्यकीय, सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण किंवा सांस्कृतिक प्रयोजनांसाठी ; किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास योजनेत नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ; किंवा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये समाविष्ट असलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनांसाठी ; आणि १९६६ चा महा. ३७. २०१३ चा १३.

(ब) या प्रयोजनासाठी शासनाने अधिसूचित केलेल्या सार्वजनिक प्रकल्पातील प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी,

जमिनीची विल्हेवाट लावणे, असा आहे.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २९ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) पहिल्या परंतुकामधील, " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी रक्कम " या मजकुराऐवजी, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेच्या वास्तव बाजारमूल्याचे निर्धारण) नियम, १९९५ याच्या तरतुदींन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पंचाहत्तर टक्के इतकी रक्कम ";

(दोन) दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ मध्ये नवीन कलम २९अ समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

कलम २७ अन्वये दिलेल्या जमिनीच्या भोगवट्याचे रूपांतरण.

" **२९अ.** कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी, कलम २७ अन्वये वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनींचे,—

(एक) अशी जमीन दिल्याच्या तारखेपासून दहा वर्षे उलटल्यानंतर ; आणि

(दोन) जर अशी जमीन देण्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले नसेल तर ; किंवा जर अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले असेल तर, असे उल्लंघन नियमाधीन केल्यानंतर,

विहित करण्यात येईल अशा रूपांतरण अधिमूल्याचे प्रदान केल्यावर आणि अशा कार्यपद्धतीचे अनुपालन केल्यानंतर आणि अशा इतर अटी व शर्तींना अधीन राहून, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करू शकेल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम ४०अ वगळणे.

५. मुख्य अधिनियमाचे कलम ४०अ वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४६ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (इ-१) कलम २९अ अन्वये वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनींचे, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रुपांतरण करण्याचे रूपांतरण अधिमूल्य, त्याची कार्यपद्धती आणि त्याच्या इतर अटी व शर्ती ;".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

७. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१(सुधारणा) अधिनियम २०२३ अन्वये कलम २८-१ अअ मध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- मशेम-२०२०/प्र.क्र.५०/ल-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०२४

वाचा:- १. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: आयसीएच-१३७०/६८७२९-एम(Spl.) दि. १५/०५/१९७१

२. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि. ०४/०५/२०१२

३. महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि.०८/११/२०१२

४. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मशेम-२०२३/प्र.क्र.७५/ल-७, दि.२०/१०/२०२३

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार माजी खंडकरी शेतकऱ्यांना वाटप करावयाच्या जमिनीसंदर्भात शासन परिपत्रक क्रमांक आयसीएच-३४९८/ प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दिनांक ०४/०५/२०१२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. उक्त मार्गदर्शक सुचनेतील सुचना क्र.९.१ "ज्या पात्र प्रतिग्रहीत्यास (पात्र माजी खंडक-यांस) (यापुढे ज्याचा उल्लेख प्रतिग्रहीता म्हणून असेल) वरील परिच्छेद ३ व ६ नुसार जमिनीचे वाटप करण्यात आले आहे तो सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार भोगवटदार वर्ग-१ म्हणून धारण करील." अशी होती. तद्नंतर उक्त मार्गदर्शक सुचनेतील सुचना क्र.९.१ मध्ये संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रक क्र. आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि.०८/११/२०१२ अन्वये "ज्या पात्र प्रतिग्रहीत्यास (पात्र माजी खंडकऱ्यांस) (यापुढे ज्याचा उल्लेख प्रतिग्रहीता म्हणून असेल) वरील परिच्छेद ३ व ६ नुसार जमिनीचे वाटप करण्यात आले आहे, तो सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करील. अशा जमिनी भोगवटादार वर्ग-१ या सत्ताप्रकाराने देण्यासाठी आवश्यक त्या अधिनियमात स्वतंत्ररित्या सुधारणा करण्यात येतील," असे सुधारीत शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहेत.

आता, महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये उक्त अधिनियमामध्ये कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) खाली नवीन पोटकलम (३-१अ) तसेच पुर्वीच्या पोटकलम (३अ) ऐवजी नवीन पोटकलम (३अ) अतंर्भुत करण्यात आलेले आहे.

सबब, महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ मधील कलम २८-१ अअ मध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने सुधारीत मार्गदर्शक सूचना विहित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

<u>शासन परिपत्रक:-</u>

अ) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये उक्त अधिनियमामध्ये कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) खाली नवीन पोटकलम (३-१अ) अन्वये माजी खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, माजी खंडकरी शेतकऱ्यांना वाटप करावयाच्या जमिनीसंदर्भात निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रक क्रमांक: आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/भाग-जी/ल-७, दि.०८/११/२०१२ रद्द करण्यात येत आहे. तसेच महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: आयसीएच-१३७०/६८७२९-एम(Spl.) दि. १५/०५/१९७१ व शासन परिपत्रक क्र.आयसीएच-३४९८/प्र.क्र.२३/ भाग-जी/ल-७ दि. ०४/०५/२०१२ मधील मार्गदर्शक सुचनेतील संबधित तरतूदी या परिपत्रकान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

ब) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील कलम २८-१ अअ मधील पोट कलम (३) मधील तरतूदीनुसार माजी खंडकरी यांना वाटप करण्यात आलेल्या जमीनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यासंदर्भात महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ मधील कलम २८-१ (अअ) मधील पोट कलम (३) खालील पोट कलम (३-१अ) मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत, त्या विचारात घेऊन कार्यवाही करावी.

१) "ज्या व्यक्तीनीं (खंडकरी शेतकऱ्यांनी) औद्योगिक उपक्रमांना त्यांच्या पट्टयाने (खंडाने) दिलेल्या जमिनी वर्ग-१ भोगवट्याच्या होत्या अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-२ भोगवट्यावर दिलेल्या जमिनी महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३ महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रथम प्रसिध्द केलेल्या दिनांकापासुन त्यासाठी कोणतेही अधिमूल्य न आकारता, वर्ग-१ भोगवट्यावर देण्यात आले असल्याचे मानण्यात येतील. त्यानुसार संबधित तहसिलदार यांनी त्यांच्या स्तरावरुन गावनिहाय आढावा घेवुन या शासन परिपत्रकाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या कालावधीत गावनिहाय एकच आदेश करुन गावदप्तरी अंमल घ्यावा. (फेरफार, अधिकार अभिलेख इत्यादी बाबत)

२) ज्या व्यक्तीनीं (खंडकरी शेतकऱ्यांनी) औद्योगिक उपक्रमांना त्यांच्या पट्टयाने (खंडाने) दिलेल्या जमिनी वर्ग-२ भोगवट्याच्या होत्या अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-२ भोगवट्यावर दिलेल्या जमिनी धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतर करता येईल. तथापि, त्यासाठी जर अशा जमिनींना लागू असलेल्या संबंधित कायद्यात किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये संबधित अधिनियम व नियमांच्या तरतुदींनुसार अशा रूपांतरणाबाबत जी कायदेशीर तरतूद

असेल त्यानुसार कार्यवाही करणे व त्या कायद्यात निश्चित केलेल्या सक्षम प्राधिकारी यांची परवानगी घेवुन कार्यवाही करणे आवश्यक राहील.

३) ज्या खंडकरी शेतक-यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी वाटप केलेली जमीन परवानगी घेऊन विहीत अधिमुल्य रक्कम भरुन हस्तांतरित केली असेल अशा प्रकरणी प्रस्तुत जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ रुपांतरित करण्याबाबत ज्या खंडकरी शेतकऱ्यांची जमीन खंडाने देतेवेळी भोगवटादार वर्ग-१ होती त्याबाबत संबधित तहसिलदार उपरोक्त नमुद (१) प्रमाणे कार्यवाही करतील व ज्या खंडकरी शेतकऱ्यांची जमीन खंडाने देतेवेळी भोगवटादार वर्ग-२ होती त्याबाबत उपरोक्त नमुद (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

४) ज्या खंडकरी शेतक-यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी वाटप केलेली जमीन विनापरवानगी हस्तांतरित केली असेल किंवा विहीत अधिमुल्य रक्कम भरलेली नसेल अशा प्रकरणी झालेला शर्तभंग नियमानुकुल करताना उक्त अधिनियमातील कलम २९ मध्ये नमुद केलेली अधिमुल्य रक्कम भरल्यानंतर व जिल्हाधिकारी यांच्या पुर्वमान्यतेने भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग -१ रुपांतरित करण्याची कार्यवाही उपरोक्त क्र. १) व २) मधील तरतूदी विचारात घेवुन करण्यात यावी.

क) उक्त अधिनियमातील कलम २८-१ (अअ) मधील पोटकलम ३अ मध्ये महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६ च्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये परिभाषित केलेल्या गावठाण किंवा गावाच्या जागेच्या हद्दीपासुन ५ किलोमीटर अंतरातील शेती महामंडळाची जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीन्वये ग्रामपंचायतीकडुन केवळ गावठाण विस्तार, शासकीय घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन किंवा पाणीपुरवठा योजना या सार्वजनिक प्रयोजनार्थच जमीन मागणी अनुज्ञेय राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०२४०२०९१०११५३४३१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: cn=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=d36a0a6455652c60ea76104dd537113a9ca67ab14a315b9cefc36fc9be2915f8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCBB854E694C765DFB3A0240EB91EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2024.02.09 10:22:10 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे,
४) उपजिल्हाधिकारी (जमीन धारणा). पुणे / सातारा / कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक / अहमदनगर/ औरंगाबाद,
५) निवडनस्ती (ल-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक- ०७.११.२०२३
स्थळ- परिषद सभागृह क्र.५, ७वा मजला, मंत्रालय मुंबई-४०० ०३२

मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली बैठक

विषय: १) सिंधी कॉलनी देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली येथील विस्थापितांच्या हक्काबाबत
२) रिफयुजी कॉलनी परिपत्रकामध्ये सुधारणा करणेबाबत.

बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. कृष्णा दामाजी गजबे, मा.वि.स.स.
२) श्री. राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) श्री. संजय मीना, जिल्हाधिकारी, गडचिरोली (व्हि.सी व्दारे)
४) डॉ.विपिन, जिल्हाधिकारी, नागपूर (व्हि.सी व्दारे)
५) श्री. संजय इंगळे, सह सचिव (ज-८), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) श्री. धनंजय निकम उप सचिव(ज-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) श्री.सत्यनारायण बजाज, उपसचिव(र-६), मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय, मुंबई
८) श्री.सुनिल स. सामंत अवर सचिव,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) श्री.शरद येवले, कक्ष अधिकारी (र-६), मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) श्री. विरेंद्र कुकरेजा, सिंधी समाज प्रतिनिधी, नागपूर
११) श्री.किशन नागदेवे, पूर्व नगराध्यक्ष, नगर परिषद, देसाईगंज
१२) श्री.शांतीलाल कुकरेजा, पूर्व उपाध्यक्ष, नगर परिषद, देसाईगंज
१३) श्री.रामकुमार हरियानी
१४) श्री.बल्लभदास रामानी
१५) श्री.प्रेम साजनदास बसलानी
१६) श्री.जेसा मोटवानी, गडचिरोली (व्हि.सी व्दारे)
१७) श्री.नानकराम (व्हि.सी व्दारे)

अ. क्र	विषय	बैठकीत झालेली चर्चा व निर्णय	कार्यवाही करणार संबंधित विभाग /कार्यालय
१	सिंधी कॉलनी देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली येथील विस्थापितांच्या हक्काबाबत तसेच रिफयुजी कॉलनी परिपत्राकामध्ये सुधारणा करणेबाबत.	श्री. कृष्णा दामाजी गजबे, मा.वि.स.स. यांनी असे नमूद केले की, देसाईगंज तालुक्यातील सिंधी कॉलनीमध्ये एकूण ६४ भुखंड असून त्यामध्ये काही सिंधी कुटूंबांकडे विस्थापित असल्याबाबतचे दाखले / पुरावे उपलब्ध नसल्याने त्यांना जमिनीचे पट्टे मिळत नाही. त्यामुळे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तसेच यापूर्वी जाहीर केलेल्या सिंधी वसाहतीमध्ये वडसा येथील सिंधी वसाहतीचा समावेश नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी वडसा देसाईगंज येथील ६४ भूखडावरील १० भुखंडावर वारसानांचे नाते जुळत असून, उर्वरित १४ भुखंडावर कब्जे वहीवाटीत असलेल्यांचे नाते जुळत	कार्यासन-ज १. महसूल व वन विभाग. मंत्रालय.मुंबई

नसल्याचे नमूद केले.

४० भुखंडावर अतिक्रमण असून त्यापैकी १८ भुखंडावर अतिक्रमणधारक व कब्जेधारक यांचे नाते जुळत नाही व २१ भुखंडावर अतिक्रमण धारकांचे कब्जा आहे व ०१ भुखंड हे विहीर व गंदीराकरीता राखीव आहे. उपरोक्त १० भूखंडां व्यतिरिक्त इतर भूखंड धारकांकडे जमीन वाटप केल्याचे आदेश व लिज वर दिल्याबाबतचे करारनामा, नसल्याने पट्टा देण्याबाबत अडचणी आहेत.

जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि.२०.०७.१९८२ च्या शासन निर्णयाप्रमाणे नागपूर जिल्हयातील सिंधी वसाहतीबाबत कार्यवाही सुरु असल्याचे नमूद केले.

या अनुषंगाने श्री. कृष्णा दामाजी गजबे, मा.वि.स.स. यांनी सिंधी वसाहतीबावत दि.२७.०७.१९८२ च्या शासन निर्णयात नमूद तक्त्यातील रकाना क्र. ड प्रमाणे, सदर भूखंडधारकांकडे उपलब्ध पुराव्यांची कागदपत्रे तसेच सिंधी पंचायतीचा दाखला विचारात घेवून कार्यवाही राज्यामध्ये लागू करण्याबाबत विनंती केली.

तद्अनुषंगाने अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी असे नमुद केले की, दि.२७.०७.१९८२ च्या शासन निर्णयांची गडचिरोली व नागपूर जिल्हयांमध्ये सिंधी वसाहतींबाबत अंमलबजावणी करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असून त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

मा.मंत्री (महसूल) यांनी सिंधी समाजाच्या वसाहतीतील भूखंडधारकांच्या येणा-या अडचणींचे निराकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली व नागपूर यांचे समवेत दिवाळी नंतर बैठक आयोजित करुन,दि.२७.०७.१९८२ च्या शासन निर्णयाची धर्तीवर धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

बैठकीअंती उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

****

क.बैठक- २०२३/प्र.क्र.१२१/[redacted] महसूल व वन विभाग / [illegible]

"सिंधी विस्थापितांच्या [illegible] बाबत बैठक" या विषयावर अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली, बुधवार दि.२७.१२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता, पहिला मजला, दालन क्र.१०१ (मुख्य इमारत), मंत्रालय, मुंबई येथे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची यादी सोबतजोडली आहे.(परिशिष्ट-"अ")

२. बैठकीत झालेली चर्चा व मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	विषय	बैठकीत झालेली चर्चा व निर्णय	अंमलबजावणी करणारे संबंधित विभाग/कार्यालय
१	सिंधी विस्थापितांच्या विविध प्रश्नांबाबत बैठक	नागपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सिंधी विस्थापितांच्या वसाहतीमधील सिंधी अतिक्रमण धारकांच्या नावे ते धारण करीत असलेले पट्टे त्यांचे नावे करण्याबाबत सदरील बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीत दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांनी याबाबतचा प्राथमिक सर्वे केला असून त्याबाबतचा अहवाल त्यांचेकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. दि.२०.०७.१९८२ च्या शासन निर्णयाप्रमाणे सदरील अतिक्रमणधारकाचे पट्टे नियमानूकुल करण्यासंदर्भात सविस्तार सर्वेक्षण करुन रहिवासी, वाणिज्यक पट्टेधारकाची माहिती शासनास दि.३१.०१.२०२४ अखेर सादर करणेबाबत मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी दोन्ही जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या. ज्या विस्थापितांकडे कोणतेही पुरावे नाहीत त्यांची पडताळणी सिंधी पंचायत यांच्याकडून करता येईल का? याबाबत कायदेविषयक व कायदेविषयक बाब तपासून अभिप्रायासह अहवाल शासनास देण्यात यावा. अशा सूचना अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी दिल्या.	१) जिल्हाधिकारी, नागपूर २) जिल्हाधिकारी, गडचिरोली

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

****

महाराष्ट्र शासन

क्र.जमीन-२०२४/प्रक्र.५२ /ज-८
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक-२५.०६.२०२४.

प्रति,
विभागीय आयुक्त,नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे /कोकण

विषय: सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करणेबाबत

महोदय/ महोदया,

अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली "सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करणेबाबत" गुरुवार दि.२०.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता अपर मुख्य सचिव(महसूल) यांचे मंत्रालयीन दालन, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

(सुनिल स.सामंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-
१) जिल्हाधिकारी, नागपूर /अकोला/ गडचिरोली /जळगाव / ठाणे/ मुंबई शहर /मुंबई उपनगर
२) सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) उपसचिव (र-६) मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय,मुंबई

प्रत माहितीस्तव :-
१) अपर मुख्य सचिव, (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) सह सचिव (ज-८), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३) निवडनस्ती-ज-८

२०१

[redacted] महसूल विभाग/ज-८

दिनांक- २०.०६.२०२४
स्थळ-मंत्रालय, मुंबई

विषय: सिंधी विस्थापितांचे पट्टे [illegible] करणेबाबत.
बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त विषयाबाबतच्या अ.मु.स (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२०.०६.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या बैठकीस खालीलप्रमाणे लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

१) सर्व विभागीय आयुक्त (व्ही.सी.द्वारे उपस्थित)
२) जिल्हाधिकारी, नागपूर. (व्ही.सी.द्वारे)
३) जिल्हाधिकारी, ठाणे. (व्ही.सी.द्वारे)
४) जिल्हाधिकारी, अकोला. (व्ही.सी.द्वारे)
५) जिल्हाधिकारी,गडचिरोली. (व्ही.सी.द्वारे)
६) जिल्हाधिकारी, जळगाव. (व्ही.सी.द्वारे)
७) जिल्हाधिकारी, मुंबई शहर. (व्ही.सी.द्वारे)
८) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. (व्ही.सी.द्वारे)
९) श्री.संजय इंगळे, सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) श्री.प्रसनजीत प्रधान, उपजिल्हाधिकारी, गडचिरोली
११) श्री.विजयानंद शर्मा, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर
१२) श्रीमती शिल्पा शंकर कामथे, तहसिलदार मुंबई जिल्हा
१३) श्री.किशोर बहिरम, सहा अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर
१४) श्री. जेसा मोटवानी, माजी नगराध्यक्ष, वडसा, गडचिरोली.
१५) श्री. विरेंद्र कुकरेजा, माजी स्थायी समिती सदस्य, नागपूर महानगर पालिका,नागपूर
१६) डॉ.विंकी रुंजवानी, प्रशासक, महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिल
१७) श्री.सुरेश एच सनतारी, जनसेवक, अकोला
१८) श्री.सुरेश जग्यासी, अध्यक्ष नागपूर विदर्भ प्रदेश सिंधी पंचायत
१९) श्री.रामकुमार हरियानी, जनसेवक
२०) श्री. उमेश नरहरी सोना, श्री कुमार आयलानी, मा.वि.स.स. यांचे खाजगी सचिव

[illegible]

अ. क्र.	विषय	बैठकीत झालेली चर्चा व निर्णय	कार्यवाही करणारे संबंधित विभाग /कार्यालय
१	सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करणेबाबत	सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करणे व तदनुषंगाने येणा-या अडचणीबाबत सिंधी समाजाच्या प्रतिनिधींनी यांनी बैठकीत कथन केले. प्रस्तुत विषयी सर्व प्रतिनिधींनी विस्थापितांच्या मालमत्ता सर्वेक्षण करुन, पट्टे नियमित करणे व त्यांचा धारणाधिकार वर्ग-१ करण्याची विनंती केली. या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्त व उपस्थित जिल्हाधिकारी यांचेकडून याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेण्यात आली. चर्चेअंती या संदर्भात खालील अडचणी दिसून आल्या:- विहित दिनांकापूर्वीचे अभिलेख उपलब्ध नसल्याने तसेच सर्वेक्षणादरम्यान मिळकत पत्रिका व नकाशा क्षेत्र आणि ताबा असलेला भूखंड यामध्ये तफावत असल्याने तसेच काही ठिकाणी संकोच मालमत्ता घोषित न केलेल्या क्षेत्रावर पुनर्वसन झाले असल्याने, निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम, १९५४ हा केंद्र शासनाने निरसित केला असल्याने, याबाबत अडचणी निर्माण होत आहेत. अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांना सिंधी समाजाच्या वसाहतीतील भूखंडधारकांच्या येणा-या अडचणींचे निराकरण करण्याबाबत व उचित उपाययोजना करण्याबाबत खालील मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत सूचित केले. • विषयांकीत जिल्हयातील सिंधी विस्थापित क्षेत्राचे सर्वेक्षण पूर्ण करुन निवासी, अनिवासी, विगर सिंधी अधिसूचित क्षेत्र व अधिसूचित क्षेत्राबाहेरील निर्वासित व [illegible] निवासी धारणाधिकार किती ? • सदर विस्थापितांचे पट्टे नियमित करण्याबाबत उपाययोजना व शिफारशी दि.१५.०७.२०२४ पर्यंत सादर करण्यात याव्यात. सदर उपाययोजनांचा पडताळणी करुन याबाबत योग्य तो प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येईल.	सर्व विभागीय आयुक्त

बैठकीअंती उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

****

महाराष्ट्र शासन

क्र.जमीन-२०२४/प्र.क्र.५२/ज-८
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक-१०/०२/२०२५

प्रति,

सहसचिव (ल-७)
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय:- <u>आश्वासनाच्या पूर्ततेबाबत</u>
सिंधी समाजाचे राज्यामध्ये तीस ठिकाणी असलेले
अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत.

महोदय,

विषयांकित आश्वासनास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, १०० दिवसाचा तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यामध्ये अनुक्रमांक १२ येथे "सिंधी समाजाचे राज्यामध्ये तीस ठिकाणी असलेले अतिक्रमण नियमानुकूल करणे" हा मुद्दा विचाराधिन असून विषयांकित आश्वासनाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

२. "निर्वासित सिंधी समाजाच्या विस्थापितांना देण्यात आलेले पट्टे नियमित करण्यासंदर्भात दिनांक २१/०१/२०२५ रोजी मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन सदरचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याचे संकल्पित आहे. त्यानुसार या प्रकरणाची नस्ती ज-८ या कार्यासनाकडून सादर करण्यात आली असून मा.मंत्री (महसूल) यांच्या स्तरावर विचाराधीन आहे".

आपला,

(दामोधर दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

आश्वासन क्रमांक ५६

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
महसूल शाखा

ई-मेल आयडी-dcraurangabad@gmail.com Phone- 0240 2353562 2324434

जा.क्र.2022/मशाका-1/आस्था-चौ/प्र.क्र.07 दिनांक – १५.09.2022

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,(महसूल)
महसूल व वन विभाग, (ई-4),
मंत्रालय,मुंबई – 32.

विषय - विभागीय चौकशी बाबत
श्री राजेश श्रीपतराव काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी
संदर्भ – जिल्हाधिकारी परभणी यांचे पत्र जा.क्र.२०२२/अ-२/आस्था-२/सीआर-५८ दि. ०२.०९.२०२२

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्रान्वये जिल्हाधिकारी परभणी यांनी श्री राजेश श्रीपतराव काटकर, हे जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी, परभणी या पदावर कार्यरत असतांना त्यांनी अर्धन्यायीक प्रकरणे, गौण खनिज, वक्फ जमीन विषयक कामकाजात झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ अन्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर केला आहे.

विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोप जोडपत्र 1 ते 4 कागदपत्रांसह प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) 1979 चे नियम 6 अन्वये जबर शिक्षेचे अधिकार नियुक्ती प्राधिकरणास आहे. श्री राजेश श्रीपतराव काटकर, हे अपर जिल्हाधिकारी वर्ग-1 संवर्गाचे राजपत्रीत अधिकारी असून त्यांचे नियुक्ती प्राधिकारी शासन आहेत.

करिता, जिल्हाधिकारी, परभणी यांनी श्री राजेश श्रीपतराव काटकर,यांचेविरुध्द प्राप्त झालेला महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 चे नियम 8 अन्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास यासोबत सादर करण्यांत येत आहे.

(मा.विभागीय आयुक्त यांचे मान्यतेने)

आपला विश्वासू,

(पराग सोमण)
उपआयुक्त (महसूल)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

प्रतिलीपी –

1. कक्ष अधिकारी (महसूल), महसूल व वन विभाग, (ई-4) मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
2. जिल्हाधिकारी परभणी यांना कळविण्यात येते की, उक्त प्रकरणांतील संबंधित अधिकारी यांचा सेवातपशिल शासनास व या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

आस्थापना शाखा

ईमेल- estpbn@gmail.com

विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद. ई-शाखा
06 SEP 2022
शाखा :
Inward Number 45037

दूरध्वनी क्र.०२४५२-२३३०२२

दिनांक-०२/०९/२०२२

06 Sep 2022

जा.क्र.२०२२/अ-२/आस्था-२/सीआर ५८

प्रति,

मा.विभागीय आयुक्त
औरंगाबाद

विषय - विभागीय चौकशी बाबत..

श्री राजेश श्रीपतराव काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेविरुध्दचे

महोदय,

उपरोक्त विषयी श्री राजेश श्रीपतराव काटकर, हे जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी परभणी या पदावर कार्यरत असतांना त्यांनी अर्धन्यायीक प्रकरणे, गौण खनिज, वक्फ जमीन विषयक कामकाजात झालेल्या अनियमितेबाबत खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्री राजेश श्रीपतराव काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी अर्धन्यायीक प्रकरणात आदेश पारित करतांना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०२१/प्र.क्र.११६/ज-१अ दि.१८.०१.२०२२ मधील सूचनांचे पालन न करणे.

२. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१ दि. २९.०३.२०१२ नुसार या कार्यालयाचे आदेश क्रमांक जा.क्र.२०२२/अ-२/आस्था-१/सिआर दि.०४.०३.२०२२ अन्वये "गौण खनिजे व त्या विषयक बाबी" हा विषय श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे सोपविण्यात आले आहे. तसेच यापूर्वी सुध्दा गौणखनिज विषयाचे सर्व कामकाज व अपिल प्रकरण हे अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे चालविली जात होते. सन २०२१-२०२२ या कालावधीत अपर जिल्हाधकारी यांचे पटलावर तहसीलदार/उपविभागीय अधिकारी यांनी गौणखनिज विषयक साधारण २० अपीलीय प्रकरणामध्ये दंडाचे आदेश पारीत केले होते, सदर निर्णयाच्या नाराजीने अपर जिल्हाधिकारी परभणी यांचे पटलावर अपील दाखल झाली होती. उपरोक्त २० अपीलीय प्रकरणामध्ये कनिष्ठ न्यायालयाने रक्कम रु. ३,९४,३५,२८१/- एवढ्या दंडाचे आदेश पारीत केले होते. त्यापैकी अपर जिल्हाधिकारी यांनी १६ प्रकरणात अपीलार्थींचे अपील मान्य करून कनिष्ठ न्यायालयाचे आदेश रद्द केले. ज्यामुळे शासनाचे सुमारे रक्कम रु.२,५०,८८,७९८/- एवढे शासनाचे नुकसान झाले आहे.

३. श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी मौ. देवगाव ता.सेलू येथील गट क्रमांक ५७,५८,५९ व ६० मधील पाझर तलावामधून व मौ. गिरगाव बु. ता.सेलू येथील गट क्रमांक १८९ मधील पाझर तलावामधून मुरुम उत्खननाची परवानगी शासन महसूल व वन विभाग यांचे पत्र क्रं.गौखनि-१०/१२२१/प्र.क्र. ३२०/ख-२, दि.२४-०३-२०२२ मध्ये दिलेले निर्देश विचारात न घेता त्यांचे आदेश क्र.२०२२/महसूल/गौ.ख./मुरुम/परवाना/प्र.क्र.-६३,दि.२८-०४-२०२२ व आदेश क्रं. २०२२/महसूल/गौ.ख./मुरुम/परवाना/प्र.क्र.-६४, दि.०६-०५-२०२२ पारीत केले असल्याचे निदर्शनास

५. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२०२०/रोहयो/रोभूसं/जन-३/कावी, दि.२१-०९-२०२१ अन्वये भूसंपादन विषयक कामकाज अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आले आहे. परंतु भूसंपादन विषयक कामकाजाच्या बाबतीत अपर जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केली नाही तसेच अंतिम अहवाल मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना सादर केला नाही. तसेच वक्फ जमीन विषयक कामकाजाची जबाबदारी अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आली आहे. परंतु श्री राजेश काटकर यांनी वक्फ विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेतला नाही ज्यामुळे मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अंतिम अहवाल सादर करता आला नाही. यावरुन त्यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केले नाही.

६. रजा मंजुर करून न घेता मुख्यालय सोडणे व अनाधिकृत रजा उपभोगणे.

उपरोक्त प्रमाणे श्री.राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी शासकीय कामात निष्काळजीपणा करुन कर्तव्यात कसूर केल्याने त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम ३ भंग केला असून ते महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ खाली विभागीय चौकशीस पात्र आहेत.

(आंचल गोयल)
जिल्हाधिकारी परभणी

(२५७)

(२५०)

९८

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
महसूल शाखा
ई-मेल आयडी-deraurangabad@...mail.com Phone- 0240 2353562 2324434

जा.क्र.२०२२/मशाका-१/आस्था-चौ/प्र.क्र.०७ दिनांक – १८.११.२०२२

प्रति,

जिल्हाधिकारी,
परभणी.

विषय:- विभागीय चौकशी बाबत
श्री राजेश श्रीपतराव काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी

संदर्भ:- १. आपले कार्यालयीन पत्र क्र.२०२२/अ-२/आस्था-२/सीआर-५८ दि. ०२.०९.२०२२
२. या कार्यालयाचे समक्रमांकित पत्र दि. १५.०९.२०२२
३. शासन पत्र क्र.विभाचौ-२५२२/प्र.क्र.१२७/ई-४ अ दि. ०३.११.२०२२

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. १ अन्वये प्राप्त श्री राजेश श्रीपतराव काटकर, जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी, परभणी या पदावर कार्यरत असतांना त्यांनी अर्धन्यायीक प्रकरणे, गौण खनिज, वक्फ जमीन विषयक कामकाजात केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ अन्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ अन्वये शासनास सादर केला आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये सदर प्रस्तावाची योग्य ती छाननी करुन जर वित्तीय अनियमिततेच्या अनुषंगाने विभागीय चौकशी प्रस्तावित केली असेल तर, शासनाचे एकूण किती आर्थिक नुकसान झाले किंवा कसे याबाबत अधिक स्पष्टपणे नमुद करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तसेच संबंधिताच्या संपूर्ण सेवा तपशीलासह/कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव १५ दिवसांच्या आत शासनास सादर करणेबाबत सुचित केले आहे.

करिता श्री राजेश श्रीपतराव काटकर, अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावातील दोषारोपांचे अनुषंगाने दोषारोपनिहाय आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर करावे. ही विनंती.

सोबत: शासन पत्राची प्रत.
(मा.विभागीय आयुक्त यांचे मान्यतेने)

(परीक्षित सोमण)
उपआयुक्त (महसूल)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

क्रमांक २०२२/अ-२/आस्था-२/सी.आर-५८
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
दिनांक - २१/११/२०२२

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
औरंगाबाद

विषय- विभागीय चौकशी बाबत. पाने ०१ ते ०८
श्री राजेश श्रीपतराव काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी

संदर्भ - (१) आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक २०२२/मशाका-१/आस्था-चौ/प्र.क्र.०७, दि. १८-११-२०२२.
(२) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र दि. ०२-०९-२०२२
(३) या कार्यालयाचे समक्रमांकी पत्र दि. १४-०९-२०२२

महोदय,

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये श्री राजेश श्रीपतराव काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेविरुद्धच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये त्यांचे सेवातपशील सादर करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आपले कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.१ च्या अनुषंगाने श्री राजेश श्रीपतराव काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेविरुद्धच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावातील दोषारोपाचे अनुषंगाने दोषारोपनिहाय अभिप्राय खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहेत.

दोषारोप क्रमांक	दोषारोप	अभिप्राय
१	अर्धन्यायीक प्रकरणात आदेश पारित करतांना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०२१/ प्र.क्र.११६/ ज-१अ,दि.१८.०१.२०२२ मधील सूचनांचे पालन न करणे.	सदर दोषारोपांचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, अर्धन्यायीक प्रकरणात आदेश पारित करतांना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०२१/प्र.क्र.११६/ज-१अ,दि.१८.०१.२०२२ परिपत्रकान्वये अपिल/पुर्नरिक्षण/पुर्नाविलोकन आदेश निर्गमित झाल्यानंतर जो अनुज्ञेय अपील कालावधी आहे तो संपुष्टात आल्यावरच प्रकरणी आदेशाची अंमलबजावणी करावी जेणेकरून प्रकरणात अधिक गुंतागुत होणार नाही असे नमुद केले आहे. श्री राजेश काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी अपील प्रकरण क्रमांक क्र.२०२१/अे-२/आरओआर/१२, निर्णय दि.३१.०३.२०२२, क्र.२०२१/अे-२/आरओआर/१२३ निर्णय दि.३०.०५.२०२२, क्रमांक क्र.२०२१/अे-२/आरओआर/१२९ निर्णय दि.०१.०२.२०२२ व क्रमांक क्र.२०२२/अे-२/आरओआर/१४ निर्णय दि.३०.०५.२०२२ चे अवलोकन केले असता श्री राजेश काटकर यानी उपरोक्त शासन परिपत्रकातील

1

		सूचनांची अंमलबजावणी न करता अपील / रिव्हीजन कालावधी संपण्यापूर्वीच त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेशित केले आहे जे परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन करणारे आहे. तसेच सदर विषयाच्या अनुषंगाने मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३०/म-८ दि.२६ मे, २०२२ अन्वये सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता महसूल विभागातील क्षेत्रीय महसूल कार्यालयासाठी महत्वाची फलनिष्पत्ती क्षेत्र KRA निश्चीत करण्यात आले असलेबाबत मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.२०२२/सरासकार/रक्कम/कावी दि.२७.०७.२०२२ कळविले आहे. सदर पत्रातील मुद्दा क्र.०७ चे उल्लंघन केले आहे.
२	शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१ दि. २९.०३.२०१२ नुसार या कार्यालयाचे आदेश क्रमांक जा.क्र.२०२२/अ-२/आस्था-१/सिआर ०४.०३.२०२२ अन्वये "गौण खनिजे व त्या विषयक बाबी" हा विषय श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे सोपविण्यात आले आहे. तसेच यापूर्वी सुध्दा गौणखनिज विषयाचे सर्व कामकाज व अपिल प्रकरण हे अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे चालविली जात होते. सन २०२१-२०२२ या कालावधीत अपर जिल्हाधकारी यांचे पटलावर तहसीलदार/उपविभागीय अधिकारी यांनी गौणखनिज विषयक साधारण २० अपीलीय प्रकरणामध्ये दंडाचे आदेश पारीत केले होते, सदर निर्णयाच्या नाराजीने अपर जिल्हाधिकारी परभणी यांचे पटलावर अपील दाखल झाली होती. उपरोक्त २० अपीलीय प्रकरणामध्ये कनिष्ठ न्यायालयाने रक्कम रु. २,०४,२०,२८१/- , ७८ व्या दंडाचे आदेश पारीत केले होते. त्यापैकी अपर जिल्हाधिकारी यांनी १६ प्रकरणात अपीलार्थीचे अपील मान्य करून कनिष्ठ न्यायालयाचे आदेश रद्द्द केले. ज्यामुळे शासनाचे सुमारे रक्कम रु.२,५०,८८,७९८/- एवढे शासनाचे नुकसान झाले आहे.	सन २०२१-२०२२ या कालावधीत अपर जिल्हाधकारी यांचे पटलावर तहसीलदार/उपविभागीय अधिकारी यांनी गौणखनिज विषयक प्रस्तुत दोषारोपमध्ये नमुद साधारण २० अपीलीय प्रकरणामध्ये दंडाचे आदेश पारीत केले होते. सदर निर्णयाच्या नाराजीने अपर जिल्हाधिकारी परभणी यांचे पटलावर अपील दाखल झाली होती. अपर जिल्हाधिकारी परभणी यांचे पटलावर रु.३,९५,३७,२८१/- रुपयाचे दंडाचे आदेश विरुध्द अपील प्राप्त झाले होते, त्यापैकी रु.१,११,६६,९६३/- दंडाची रक्कम कायम केली तर रु.३१,७९,५२०/- ऐवढे दंडाच्या रक्कमेबाबत फेरचौकशी आदेशीत केली आहे. उपरोक्त रक्कम वजा जाता सुमारे रक्कम रु.२,५०,८८,७९८/- एवढे रक्कमेच्या दंडाचे आदेश रद्द्द करुन शासनाचे नुकसान केले आहे.

3	श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी मौ. देवगाव ता.सेलू येथील गट क्रमांक ५७,५८,५९ व ६० मधील पाझर तलावामधून व मौ. गिरगाव बु. ता.सेलू येथील गट क्रमांक १८९ मधील पाझर तलावामधून मुरुम उत्खननाची परवानगी शासन महसूल व वन विभाग यांचे पत्र क्रं.गौखनि-१०/१२२१/प्र.क्र. ३२०/ख-२, दि.२४-०३-२०२२ मध्ये दिलेले निर्देश विचारात न घेता त्यांचे आदेश क्रं.२०२२/महसूल/गौ.ख./मुरुम/परवाना/प्र.क्र.-६३,दि.२८-०४-२०२२ व आदेश क्रं. २०२२/महसूल/ गौ.ख./मुरुम/ परवाना /प्र.क्र.-६४,दि.०६-०५-२०२२ पारीत केले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेश क्र.२०२२/स्वीयसहा/पाझरतलाव/आदेश/सिआर-१११ दि.०५.०७.२०२२ अन्वये उपरोक्त दोन्ही आदेश रद्द करण्यात आले आहेत.	सदर खोकरांचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, श्री राजेश खोपसराव काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी त्यांचे आदेश क्र.२०२२महसूल/ गौ.ख./मुरुम/परवाना/प्र.क्र.-६३ दि.२८.०४.२०२२ अन्वये मौजे देवगाव ता. सेलू येथील गट नंबर ५७, ५८, ५९ व ६०, मधील पाझर तलावामधुन ५०,००० ब्रास मुरुम उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे. तसेच त्यांचे दुसरे आदेश क्र. २०२२महसूल/गौ.ख./मुरुम/परवाना/प्र.क्र.-६४ ,दि.०६.०५.२०२२ अन्वये मौजे गिरगाव बु. ता.सेलू येथील गट नंबर १८९ मधील पाझर तलावातुन ५०,००० ब्रास मुरुम उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे. सदर दोन्ही पाझर तलावातील मुरुम उत्खनाची परवानगी ही शासनाच्या नियमाप्रमाणे रॉयल्टीची रक्कम भरणा करून न घेता किंवा शुल्क सदरची परवानगी दिल्याचे दिसून येत आहे. उपरोक्त दोन्ही प्रकरणातील एकूण १,००,००० ब्रास मुरुमाची ६०० रुपये प्रतीब्रास बाजारभावाप्रमाणे रक्कम रु. ६०,०००,०००/- (अक्षरी एकूण रुपये साठ कोटी) शासनाचे नुकसान झाले आहे. वरील दोन्ही प्रकरणाच्या मुळ संचिकेतील कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत. वरील समुद आदेशान्वये परवानगी देत असतांना दि.२९.११.२०१७ च्या शासन निर्णयाचा आधार घेतल्याचे दिसून येत आहे. संदर्भीय शासन निर्णयातील तरतुद क्रं.१ व २ मध्ये गौण खनिज शाखा यांनी असे काही शेततळे यांची यादी तयार केलेली दिसत नाही, किती प्रमाणात उत्खनन सक्य आहे याचा कोणताही आधार दिसत नाही. तहसिलदार सेलू यांचे पत्र अगोदर तर संबंधित विभागाचे पत्र नंतर घेतल्याचे दिसते. उदा. देवगाव, गावासाठी तहसिलदार सेलूचा प्रस्ताव दि.२५.०४.२०२२ रोजीचा तर जिल्हा जलसंधारण अधिकारी याचा प्रस्ताव दि.२८.०४.२०२२ रोजीचा आहे. याचा अर्थ असा की, संदर्भीय शासन निर्णय लागु करण्याचा केविलवाना प्रयत्न केल्याचे दिसते. सदर आदेशामध्ये राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण खंडपीठ, पुणे यांचे न्यायालय दाखा अर्ज क्रं.६८/२०२१ (W.Z) दि.१७.०२.२०२२ मधील आदेश बाबत विचारणा करण्यात आली नाही.महसूल व वन विभाग

		यांचे पत्र क्र.गौखनि-१०/१२२१/प्र.क्र.३२०/ख-२ दि. २४.०३.२०२२ रोजीचे पत्रामध्ये नमुद पर्यावरण अनुमती विषय तात्पुरते गौण खनिज उत्खनन परवाने देण्यात येवू नयेत असे निर्देश दिलेले असल्याने मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण यांनी केलेल्या आदेशाची अवहेलना होणार नाही ही बाब विचारात घेतली नाही.
४	परभणी जिल्ह्यातील विविध गौणखनिज विषयक तक्रारवजा बातम्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्या असतांना त्या अनुषंगाने तसेच कर्तव्याचा भाग म्हणून अपर जिल्हाधिकारी यांनी परभणी जिल्ह्यातील एकाही रेती घाटाची अचानक भेट देवून तपासणी करुन वरीष्ठांना अहवाल सादर केला नाही. तसेच श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांना सन २०२१-२२ रेती घाट लिलावामध्ये (पहिल्या व दुस-या फेरीमध्ये) गेलेल्या रेती घाटांच्या ETS मोजणी अहवाल सादर केला नाही.	सदर दोषारोपांचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, पोलीस विभागामार्फत परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील मोहळा, गंगाखेड तालुक्यातील महातपुरी व पुर्णा तालुक्यातील वझूर येथे मोठ्या प्रमाणात दंडात्मक व फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली असताना महसूल विभागामार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसले बाबत वापुर्वी संदर्भीय पत्रासोबत सादर करण्यात आलेल्या दोषारोपामध्ये नमुद केलेल्या वर्तमानपत्रामध्ये बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. ज्यामुळे महसूल विभागाची प्रतिमा मलिन झाली. सदर प्रसिध्द झालेल्या विविध बातम्यांचे अनुषंगाने जिल्हाधिकारी यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक २०२२/स्वीय सहा/गौख/कावी-७९ दि.२०-०५-२०२२ अन्वये परभणी जिल्ह्यातील अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंधकरणे संदर्भात अपर जिल्हाधिकारी यांचेस्तरावर काय नियोजन करण्यात आले आहे तसेच महसूल विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर लेखी अहवाल तात्काळ सादर करणे बाबत सुचित करण्यात आले आहे. परंतु श्री राजेश काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी यांनी कोणत्याही लेखी अहवाल सादर केला नाही. श्री राजेश काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी यांनी माहे मे २०२२ व जुन २०२२ या महिण्याच्या सादर केलेल्या मासीक दैनंदिनी चे अवलोकन केले असता गौणखनिज विषयक कामकाज हा विषय त्यांचेकडे सोपविलेला असतांना त्यांनी उपरोक्त प्रसिद्ध होणा-या बातम्यांचे अनुषंगाने जिल्ह्यातील रेतीघाटास अचानक भेटी देऊन तपासणी करणे अनिवार्य होते. परंतु त्यांनी त्याअनुषंगाने कोणत्याही तपासण्या केलेल्या नाहीत. तसेच श्री राजेश काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी यांना सन २०२१-२२ रेती घाट लिलावामध्ये (पहिल्या फेरीमध्ये) गेलेल्या रेती घाटांच्या प्राप्त ETS मोजणी अहवाला बाबत या कार्यालयाचे पत्र क्र.

		२०२३/स्विय सहा/गौख/अहवाल/कावी-८३, दि.२४-०५-२०२२ अन्वये व पत्र क्र. २०२३/स्विय सहा./ गौख/अहवाल/कावी-८२, दि.२४-०५-२०२२ अन्वये सन २०२१-२२ रेती घाट लिलावामध्ये (दुस-या) केरीत गेलेल्या रेती घाटांची EIS / ड्रोनव्दारे मोजणी करून अहवाल सादर करणे बाबत कळविण्यात आले आहे. परंतु सदर पत्राच्या अनुषंगाने त्यांनी वेळीच कार्यवाही केली नाही व अहवाल सादर केला नाही.
५	मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२०२०/रोहयो/सेभूसं/जम-३/कावी, दि.२१-०९-२०२१ अन्वये भूसंपादन विषयक कामकाज अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आले आहे. परंतु भूसंपादन विषयक कामकाजाच्या बाबतीत अपर जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केली नाही तसेच अंतिम अहवाल मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना सादर केला नाही. तसेच वक्फ जमीन विषयक कामकाजाची जबाबदारी अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आली आहे. परंतु श्री राजेश काटकर यांनी वक्फ विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेतला नाही ज्यामुळे मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अंतिम अहवाल सादर करता आला नाही. यावरून त्यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केले नाही.	सदर दोषारोपांचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्रमांक २०२०/रोहयो/सेभूसं/जम-३/कावी, दि. २१-०९-२०२१ अन्वये भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम १८ अंतर्गत मा. दिवाणी न्यायालयाने निर्णय दिलेल्या प्रकरणात/कलम २८ अ अंतर्गत निवाडा/खाजगी वाटाघाटीने खेट खरेदी/ सन २०१३ च्या कायद्यानुसार निवाडा/तसेच लोक अदालतीत झालेल्या तडजोडी प्रकरणी तात्काळ निधी मागणी प्रस्ताव सादर करणे बाबत अपर जिल्हाधिकारी परभणी यांची सनियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर आदेशानूसार मा.लोकन्यायालयात झालेल्या तडजोडीनूसार सर्व प्रकरणामध्ये निधी मागणीचे प्रस्ताव सादर करणे, रिट पिटीशन, अवमान याचिका, प्रथम अपील, दिवानी न्यायालय व लोकअदालतीमधील आदेशांचे तात्काळ पालन करणे बाबत सनियंत्रण अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी यांना आवश्यक ते निर्देश देण्यात आले होते त्यानूसार अपर जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी निहाय आढावा घेणे, प्रकरणांची संख्या निश्चित करणे व निवाडयानूसार / संमती पत्रानूसार निधी मागणीचे प्रस्ताव का सादर केले जात नाहीत याची कारणे जाणून घेणे तसेच तात्काळ निधी मागणी सादर करणे बाबत, सर्व संबंधितांना निर्देश देणे, मार्गदर्शन करणे व प्रपत्र १ ते ५ मध्ये माहिती मा.विभागीय आयुक्त यांना सादर करणे बाबतची जबाबदारी अपर जिल्हाधिकारी यांच्याकर सोपविण्यात आली आहे परंतू उपरोक्त आदेशानूसार अपर जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी बैठका घेऊन सदर कामाचा आढावा घेणे अनिवार्य असतांना तत्कालीन अपर जिल्हाधिकारी श्री राजेश काटकर यांनी वरिष्ठांना माहिती सादर केली नाही. तसेच मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद

		यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक २०२१/मशाका/इनाम/ कावि-१८५५ दि.१३-१२-२०२१, पत्र क्रमांक २०२२/मशाका/ इनाम/कावि-१ दि. ३-०१-२०२२, पत्र क्रमांक २०२२/मशाका/ इनाम/कावि- दि. १३-०५-२०२२, पत्र क्रमांक २०२२/मशाका/इनाम/कावि- दि.०८-०६-२०२२ अन्वये परभणी जिल्हयातील वक्फ संबंधी माहिती सादर करणे बाबत पाठपुरावा करण्यात आला आहे. परंतु श्री. राजेश काटकर यांनी वक्फ विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेतला नाही ज्यामुळे मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अंतिम अहवाल सादर करता आला नाही. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबास पर्यवेक्षीय अधिकारी म्हणून श्री राजेश काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी हे जबाबदार आहेत.
६.	रजा मंजुर करून न घेता मुख्यालय सोडणे व अनाधिकृत रजा उपभोगणे.	सदर दोषारोपांचे अनुषंगाने सादर करण्यात येते की श्री.राजेश काटकर, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी दि.१३.०६.२०२२ रोजी एक दिवसाची किरकोळ मंजूर करण्यात आली होती, तथापि दि.१४.०६.२०२२ ते १६.०६.२०२२ या तीन दिवसाच्या कालावधीत पूर्वपरवानगी न घेता कार्यालयात गैरहजर होते. त्यामुळे श्री राजेश काटकर यांना या कार्यालयाची दि.१६.०६.२०२२ नोटिस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. श्री.राजेश काटकर यांनी दि.२०.०६.२०२२ अन्वये यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. तदनंतर श्री.राजेश काटकर यांची दि.१०.०८.२०२२ ते २६.०८.२०२२ या १७ दिवसाच्या कालावधीची अर्जीत रजा तसेच रजेच्या पुढे दि.२७ व २८.०८.२०२२ या शासकीय सुट्टीच्या उपभोगासह अर्जीत रजा मंजूर करण्यात आली. परंतू त्यानंतर रजा मंजूर करून न घेता ते दि.२९.०८.२०२२ पासून गैरहजर राहीले होते.

उपरोक्त प्रमाणे श्री.राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी शासकीय कामात निष्काळजीपणा करुन कर्तव्यात कसूर केल्याने त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम ३ भंग केला असून ते महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ खाली विभागीय चौकशीस पात्र आहेत.

सोबत - या कार्यालयाचे पत्र दि. १४-०९-२०२२ व
त्यासोबत सादर केलेला सेवातपशीलाची प्रत

आपली विश्वासू,

(आंचल गोयल भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, परभणी

दुरध्वनी क्र. ०२४५२- २२३ ७०२
संकेतस्थळ www.parbhani.nic.in

फॅक्स क्र.०२४५२-२२३७७४
E-mail ID- estpbn@gmail.com

जा.क्र.२०२२/अ-२/आस्था-२/सीआर- ५८

दि. २०/११/२०२३

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव
महसूल व विभाग
मंत्रालय मुंबई

विषय :- **विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.१९०९८**
श्री राजेश श्रीपतराव काटकर, तत्का.अपर जिल्हाधिकारी परभणी

संदर्भः शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.बैठक- १०/११२३/प्र.क्र.४२६/ख-२ दि.१७ नोव्हेंबर, २०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रकान्वये विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.१९०९८ अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.२१.११.२०२३ रोजी दुपारी ३.३० वा बैठक आयोजित केली आहे. सदर बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सुचना आहेत.

श्री राजेश श्रीपतराव काटकर, तत्का.अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.२०२२/अ-२/आस्था-२/सीआर-५८ दि.०२.०९.२०२२ अन्वये प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना सादर करण्यात आला आहे. ज्यामध्ये खालील प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले.

१. श्री राजेश श्रीपतराव काटकर, तत्का.अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी अर्धन्यायीक प्रकरणात आदेश पारित करतांना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०२१/प्र.क्र.११६/ज-१अ दि.१८.०१.२०२२ मधील सूचनांचे पालन न करणे.

२. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१ दि. २९.०३.२०१२ नुसार या कार्यालयाचे आदेश क्रमांक जा.क्र.२०२२/अ-२/आस्था-१/सिआर दि.०४.०३.२०२२ अन्वये "गौण खनिजे व त्या विषयक बाबी" हा विषय श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे सोपविण्यात आले आहे. तसेच यापूर्वी सुध्दा गौणखनिज विषयाचे सर्व कामकाज व अपिल प्रकरण हे अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे चालविली जात होते. सन २०२१-२०२२ या कालावधीत अपर जिल्हाधकारी यांचे पटलावर तहसीलदार/उपविभागीय अधिकारी यांनी गौणखनिज विषयक साधारण २० अपीलीय प्रकरणामध्ये दंडाचे आदेश पारीत केले होते, सदर निर्णयाच्या नाराजीने अपर जिल्हाधिकारी परभणी यांचे पटलावर अपील दाखल झाली होती. उपरोक्त २० अपीलीय प्रकरणामध्ये कनिष्ठ न्यायालयाने रक्कम रु. ३,९४,३५,२८१/- एवढ्या दंडाचे आदेश पारीत केले होते. त्यापैकी अपर जिल्हाधिकारी यांनी १६ प्रकरणात अपीलार्थीचे अपील मान्य करून कनिष्ठ

जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
आस्थापना विभाग

दुरध्वनी क्र. ०२४५२- २२३ ७०२
संकेतस्थळ www.parbhani.nic.in

फॅक्स क्र.०२४५२-२२३७७४
E-mail ID- estpbn@gmail.com

२७

न्यायालयाचे आदेश रद्द केले. ज्यामुळे शासनाचे सुमारे रक्कम रु.२,५०,८८,७९८/- एवढे शासनाचे नुकसान झाले आहे.

३. श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी मौ. देवगाव ता.सेलू येथील गट क्रमांक ५७,५८,५९ व ६० मधील पाझर तलावामधून व मौ. गिरगाव बु. ता.सेलू येथील गट क्रमांक १८९ मधील पाझर तलावामधून मुरुम उत्खननाची परवानगी शासन महसूल व वन विभाग यांचे पत्र क्रं.गौखनि-१०/१२२१/प्र.क्र. ३२०/ख-२, दि.२४-०३-२०२२ मध्ये दिलेले निर्देश विचारात न घेता त्यांचे आदेश क्रं.२०२२/महसूल/गौ.ख./ मुरुम/परवाना/प्र.क्र.-६३,दि.२८-०४-२०२२ व आदेश क्रं. २०२२/महसूल/गौ.ख./मुरुम/परवाना/प्र.क्र.-६४, दि.०६-०५-२०२२ पारीत केले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेश क्र.२०२२/स्वीय सहा/पाझर तलाव/आदेश/सिआर-१११ दि.०५.०७.२०२२ अन्वये उपरोक्त दोन्ही आदेश रदद करण्यात आले आहेत.

४. परभणी जिल्ह्यातील विविध गौणखनिज विषयक तक्रारवजा बातम्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्या असतांना त्या अनुषंगाने तसेच कर्तव्याचा भाग म्हणून अपर जिल्हाधिकारी यांनी परभणी जिल्ह्यातील एकाही रेती घाटाची अचानक भेट देवून तपासणी करून वरीष्ठांना अहवाल सादर केला नाही. तसेच श्री राजेश काटकर, अपर जिल्हाधिकारी परभणी यांना सन २०२१-२२ रेती घाट लिलावामध्ये (पहिल्या व दुस-या फेरीमध्ये) गेलेल्या रेती घाटांच्या ETS मोजणी अहवाल सादर केला नाही.

५. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२०२०/रोहयो/रोभूसं/जन-३/कावी, दि.२१-०९-२०२१ अन्वये भूसंपादन विषयक कामकाज अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आले आहे. परंतु भूसंपादन विषयक कामकाजाच्या बाबतीत अपर जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केली नाही तसेच अंतिम अहवाल मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना सादर केला नाही. तसेच वक्फ जमीन विषयक कामकाजाची जबाबदारी अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आली आहे. परंतु श्री राजेश काटकर यांनी वक्फ विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेतला नाही ज्यामुळे मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अंतिम अहवाल सादर करता आला नाही. यावरुन त्यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केले नाही.

वरील प्रमाणे विभागीय चौकशीचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.२०२२/मशाका-१/आस्था-चौ/प्र.क्र.७ दि.१५.०९.२०२२ अन्वये शासनास सादर केला आहे.

प्रकरणी शासन महसूल व वन विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.२५२२/प्र.क्र.१२७/ई-४ अ दि.०३.११.२०२२ चे अनुषंगाने मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०२२/मशाका-१/आस्था-चौ/प्र.क्र.०७ दि.१८.११.२०२२ अन्वये प्रकरणात शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र दि.२१.११.२०२२ नुसार

दुरध्वनी क्र. ०२४५२- २२३ ७०२
संकेतस्थळ www.parbhani.nic.in
फॅक्स क्र.०२४५२-२२३७७४
E-mail ID- estpbn@gmail.com

अभिप्राय सादर करण्यात आले आहेत. प्रकरणात शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. (सोबत पत्र दि.०३.११.२०२२, दि.१८.११.२०२२ व दि.२१.११.२०२२ ची प्रत सलंग्न)

शासन पत्र दि.२७ जुन, २०२३ चे अनुषंगाने **विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.१९०९८** उत्तर व पुरक टिपणी या कार्यालयाचे पत्र दि.३०.०६.२०२३ अन्वये शासनास सादर करण्यात आले आहे.

शासन पत्र दि. २६.०७.२०२२ अन्वये प्रकरणात श्री काटकर यांच्यासह अन्य कोणी जाबाबदार आहे किंवा कसे याबाबत तपासणी करुन अहवाल सादर करणे बाबत सुचित करण्यात आले होते. सदर विभागीय चौकशी प्रकरणात श्री काटकर तत्का.अपर जिल्हाधिकारी परभणी यांनी घेतलेले निर्णय हे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अर्धन्यायीक प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी या नात्याने त्यांच्या अधिकार क्षेत्रात घेतलेले आहेत. सदर अर्धन्यायीक प्रकरणात श्री काटकर तत्का.अपर जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून निर्णय घेतलेले असल्याने उक्त प्रकरणामध्ये अन्य कोणी जबाबदार ठरत नाही असा अहवाल या कार्यालयाचे पत्र दि.२७.०७.२०२३ सादर करण्यात आला आहे. प्रकरणात शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

करिता माहितीस्तव सविनय सादर.

(रघुनाथ गावडे,आ.प्र.से)
जिल्हाधिकारी परभणी

H 3170.pdf - 32

आश्वासन क्रमांक ५७

क्र.विसआ-५७/०८२४/प्र.क्र.३०४/ख-२

मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : ०९ जून, २०२५

विषय:- सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक.५७.

"त्याबाबतत शासन निश्चितपणे जो काही १-२ महिन्यांच्या कालावधी लागेल त्यामध्ये एक धोरण लवकरच जाहिर करणार आहे.

महोदय,

सन २०१३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने एकत्रित झालेल्या तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांनी आश्वासन क्रमांक-५७ असे आश्वासन दिले आहे. सदर आश्वासन पाहता सक्षम प्राधिकारी यांचेकडे दाखल आपले निश्चित वेळेत निकाली काढण्यात कालमर्यादा निश्चित कराव्यात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मध्ये असलेल्या तरतूदी बाबत वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील प्रकरण तेरा "अपिले पुनरीक्षण व पुनर्विलोकन" याबाबतची तरतूद नमुद केलेली आहे. सदर संहितेच्या कलम २४७ अन्वये (अपील व अपील प्राधिकारी) क्षेत्रीय महसूल अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशविरुध्द अपिल करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच कलम २५७ व २५८ अन्वये पुनरीक्षण व पुनर्विलोकन याबाबत तरतूद नमूद आहे. तसेच सक्षम प्राधिकारी यांच्याकडे दाखल अपील व पुनरिक्षण अर्ज हे विहीत कालावधीत निकाली काढण्याची सुधारणा दिनांक ११.०४.२०१६ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये करण्यात आलेली आहे.

अपील/पुनरिक्षण अर्ज विहीत वेळेत निकाली काढण्यासाठीची सदर सुधारणा ही दिनांक ११.०४.२०१६ च्या अधिसूचनेन्वये करण्यात आलेली आहे. त्यामुळे मा. मंत्री (महसूल) यांच्याकडून देण्यात आलेल्या आश्वासनाची पूर्तता होत आहे.

तरी, वरील वस्तुस्थिती पाहता, सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.५७ वगळण्यात यावे ही विनंती.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

मा. श्री. श्रीकांत भारती, विधानपरिषद सदस्य
मा.समिती प्रमूख, विधानपरिषद आश्वासन समिती,
विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

नोंदणीकृत (स्पीड पोस्ट)
दि. ०९.०६.२०२५

392

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभागप, मंत्रालय (मुख्य इमारत, पहिला मजला),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
Email ID:- j4a-revenue@mah.gov.in

क्रमांक:-विपआ २०२३/प्र.क्र.४६४/ज-४अ

दूरध्वनी क्रमांक:- ०२२ २२०४७९०१

दिनांक:- २९ जुलै, २०२५

प्रति,

कक्ष अधिकारी,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

Received
Vidhi
30.06.2025

विषय:-महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.२४८.
(मौजे वांद्रे (ता. मुरुड, जि. रायगड) येथील वांद्रे ग्रामस्थांकडे असलेल्या शासकीय जमिनीवरील शेत जमिनीचे निष्कासन रद्द करून शेती प्रयोजनासाठी जमीन प्रदान करणेबाबत...
श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेली सूचना क्र.१३)

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनातील **विधानपरिषद आश्वासन क्र.२४८** च्या पुर्ततेबाबत विवरणपत्राच्या **प्रत्येकी ३५ प्रती** पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र :- वरीलप्रमाणे

O/C

(संदीपान देवणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) कक्ष अधिकारी, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
३) निवडनस्ती (ज-४अ)

आश्वासन क्रमांक २४८

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग, मंत्रालय
(मुख्य इमारत, पहिला मजला),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२
Email ID:- j4a-revenue@mah.gov.in
दूरध्वनी क्रमांक:- ०२२ २२०४७९०१

क्रमांक:-विपआ-२०२३/प्र.क्र.४६४/ज-४अ
दिनांक:- ०९ जुलै, २०२५

प्रति,

१) विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण
२) जिल्हाधिकारी, रायगड,
जि.रायगड

विषय:- विधानपरिषद आश्वासन क्र. २४८ च्या अनुषंगाने
मौजे वांद्रे (ता.मुरुड जि.रायगड येथील वांद्रे ग्रामस्थांकडून असलेल्या शासकीय जमिनीवरील शेत जमिनीचे निष्कासन रद्द करुन शेती प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याबाबत बैठक

महोदय,

विषयांकीत प्रकरणी मा.मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.०६.२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार व मा.मंत्री (महसूल) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

(विनायक लवटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. श्री. जयंत पाटील, माजी वि.प.स , सुशिला सदन, आंबेपूर पेझारी, पो.पोयनाड, ता. अलिबाग, जि.रायगड-४०२१०८
२) मा. मंत्री (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३) मा.अपर मुख्य सचिव (महसूल विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) सह सचिव, ज-४अ (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५) निवडनस्ती ज-४अ

महसूल व वन विभाग / ज-४अ

" मौजे वांद्रे (ता. मुरुड जि रायगड) येथील वांद्रे ग्रामस्थांकडे असलेल्या शासकीय जमिनीवरील शेतजमिनीचे निष्कासन रद्द करुन शेती प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याबाबत" मा. मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.०६.२०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे:-

अ. क्र.	विषय	मा. मंत्री (महसूल) महोदयांनी दिलेले निर्देश	संबंधित विभाग
१	मौजे वांद्रे (ता. मुरुड जि रायगड) येथील वांद्रे ग्रामस्थांकडे असलेल्या शासकीय जमिनीवरील शेतजमिनीचे निष्कासन रद्द करुन शेती प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याबाबत	१) मौजे वेळास्ते ता. मुरुड जि. रायगड येथील गट क्र १८४, १८६,१८७,१९१ व १९२ या मिळकतीवर ६६ व्यक्तींनी केलेल्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने मा. श्री. जयंत पाटील, माजी वि.प.स. व जिल्हाधिकारी रायगड यांनी संयुक्तीक बैठक घेऊन अतिक्रमण करण्यात आलेल्या क्षेत्राच्या अनुषंगाने उपस्थित करण्यात येणाऱ्या कागदपत्रांची छाननी करण्यात यावी. २) मौजे वेळास्ते ता. मुरुड जि. रायगंड येथील गट क्र १८४, १८६,१८७,१९१ व १९२ या मिळकतीवर ६६ व्यक्तींनी केलेले अतिक्रमण नियमानुकूल करता येणे शक्य असल्यास तसा प्रस्ताव शासनास सादर करावा किंवा अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र नसल्यास त्याबाबतचा प्रस्ताव, प्रचलित शासकीय धोरण, शासन निर्णय इ.विचारात घेऊन मा. मंत्री मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव शासनास सादर करावा.	जिल्हाधिकारी, रायगड

उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

******

आश्वासन क्रमांक २६८

क्रमांक :विपआ-२६२३/ प्र.क्र.३०/ ज-३,

मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : १९/०३/२०२५

विषय :- **"मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमिपत्रांच्या समस्यांबाबत."**
श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी सन-२०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दि. ०३/०८/ २०२३ रोजी उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम-२८९ च्या सूचनेच्या अनुषंगाने तत्का. मा. मंत्री (महसूल) यांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार निवेदनाच्या प्रती सर्व विधानपरिषद सदस्य यांना वितरीत करण्यास अनुमती देण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.३४३८/म.वि.स./विपआस, दि.०२/०३/२०२५

महोदय,

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, सन्मा. विधानपरिषद सदस्य यांनी सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ०३/०८/२०२३ रोजी "मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमिपत्रांच्या समस्यांबाबत." या विषयाची महाराष्ट्र विधानपरिषद नियम-२८९ अन्वये सूचना उपस्थित केली होती. सदर सूचनेबाबत मा. उपसभापती यांनी "शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन निवेदन करावे" असे निर्देश दिले होते. त्यानुसार तत्का. मा. मंत्री (महसूल) यांनी "सभापती महोदया होय", असे उत्तर/ आश्वासन सभागृहात दिले होते. तथापि, सन-२०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात निवेदन झाले नाही.

सदर आश्वासन क्र.२६८ बाबत दिनांक १३/०२/२०२५ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या आश्वासन समितीसमोर अ.मु.स. (महसूल) यांची साक्ष झाली आहे. या साक्षीवेळी आश्वासन समिती प्रमुख यांनी आश्वासन पूर्ततेकरीता सभागृहात मा. मंत्री (महसूल) यांनी निवेदन करावे असे निदेश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाने "आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उक्त आश्वासनानुषंगाने विधान परिषद सभागृहात निवेदन करावे, प्रकरणी सभागृहात निवेदन होईपर्यंत सदर आश्वासन (क्र.२६८) प्रलंबित ठेवण्यात येईल" असे दिनांक ०२/०३/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(कृ.मा.प.)

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, सन्मा. विधानपरिषद सदस्य यांनी सन-२०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ०३/०८/२०२३ रोजी उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम-२८९ च्या सूचनेच्या निवेदनाच्या प्रती सर्व सन्मा. विधानपरिषद सदस्य यांना वितरीत करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात यावेत, ही विनंती.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

प्रत,

१) सचिव (प्र.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालाय, विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
२) कक्ष अधिकारी (ई-१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
३) निवड नस्ती (कार्यासन ज-३)

20/3/2025

महाराष्ट्र विधानपरिषद

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील दि.०३/०८/२०२३ रोजीचे कार्यवृत्त

श्री. भाई जगताप, मा. विधानपरिषद सदस्य यांनी "मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमीपुत्रांच्या समस्या" महाराष्ट्र विधानपरिषद नियम २८९ अन्वये दिलेली सूचना :-

सभापती महोदया, "गोराई बेटावर राहणारे भूमीपुत्र तेथील मूळ रहिवासी आहेत. शेकडो वर्षापासून ते लोक तेथे राहत आहेत. माझी माहिती अशी आहे की, या प्रत्येकाकडे ५०-६० वर्षाचे रहिवासी असल्याचे पुरावे आहेत. गोरई बेट येथे सुरुवातीला एन डी झोन होता. आता तेथे ग्रीन झोन झाला आहे. तेथील गावठाण्याची कक्षा वाढली आहे. या गावठाणांमध्ये राहणारे मूळ रहिवासी आहेत, त्यांची घरे ६०-१००-२०० वर्षापासूनची आहेत. आज त्यांना तेथून हलविण्यात येत आहे. कोणी एक विकासक तेथे जातो, त्या सर्व जागा खरेदी करतो आणि या सर्व गरीब लोकांना हटविले जाते.... (अडथळा) .... तो यांच्या सरकारमधील मंत्री आहे. मी नाव घेऊ का, मग नोटीस दिली नाही असे म्हणाल ? नियम ३५ ची नोटीस दिली नाही म्हणून मी नाव घेत नाही. तुम्हाला सर्वांना माहित आहे. ताण वाढलेला असता. त्यामुळे सर्व गरिबांचे वाटोळे होत आहे. ५०-६० वर्षांची सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे असताना त्यांना फक्त पोलिसांचा, जिल्हाधिकाऱ्यांचा, यंत्रणांचा वापर करुन हटवित आहात आणि त्या विकासकांच्या घशामध्ये ही जमीन घालत आहात या संदर्भातील हा विषय आहे.

सभापती महोदया, येथील मूळ रहिवासी सर्व कोळी समाज आणि मच्छिमारी करुन उदरनिर्वाह करणारा समाज आहे. मी विशेषत: मुंबईबाबत यासाठी म्हणत आहे की, आमचे कोळीवाडे व गावठाणे येथे आहेत, तेथील ते मूळ रहिवासी आहेत.आम्ही सर्वजण बाहेरुन आलो आहोत, आम्ही जर कोकणातून आलो तरी आम्ही सुध्दा बाहेरुन आलो आहोत. या मूळ रहिवाशांवर अशा पध्दतीने अन्याय होत असेल तर याची नुसती दखल न घेता त्याबाबत सरकारने कांय कार्यवाही केली आहे याचा अहवाल त्यांनी सभागृहाला द्यावा नाही तर याची चर्चा करावी. आम्ही या विषयी डिटेलमध्ये चर्चा करुन त्यांना हवी असलेली सर्व कागदपत्रे देऊ. परंतु येथील रहिवाशांना, कोळी समाजाला, मच्छीमार समाजाला, तेथील गावठाणांमध्ये राहणा-या मूळ रहिवाशांना न्याय द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो."

मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नगर भूमापन गोराई, ता. बोरीवली येथे गांवठाण अस्तित्वात असून त्यांचे, स्वतंत्र नगर भूमापन अभिलेख सन-१९६८ साली (नगर भूमापन मिळकत पत्रिका व नक़ाशे) तयार करण्यात आलेले आहेत. नगर भूमापन गोराई, ता. बोरीवली येथील मूळ नगर भूमापन अभिलेख पाहता न.भू.क्र.१०९२ ते १५५८ असे नगर भूमापन क्रमांक देण्यात आलेले आहेत. त्यापैकी साधारणत: ४०२ मिळकती गांवठाणाच्या हद्दीमध्ये येत असल्याचे दिसून येतात. तसेच न.भू.क्र.१४३८ व १४३८/१ या मिळकतीस सत्ता प्रकार 'सी' अशी नोंद असून उर्वरीत मिळकतपत्रिका पाहता त्यावर धारक सदरी विकासकाच्या नावाची नोंद दिसून येत नाही. गावठाण लगतचे अन्य न.भू.क्र. च्या मिळकतपत्रिकेत "शेती" अशी नोंद दाखल आहे.

उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) बोरीवली-१ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेल्या अहवालानुसार, मौजे गोराई ता. बोरीवली स.नं.५३, न.भू.क्र.१ पै., सर्वे नं.५७, न.भू.क्र.८८ व समुद्रालगतची विनानंबर शासकीय मिळकतीवर अनधिकृत बांधकामाबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

२-

सदरची जागा महाराष्ट्र पर्यटन विभागास जरी भाडेपट्टयाने दिलेली असली तरी या जमिनीचे मूळ मालक "महाराष्ट्र शासन" असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० अन्वये अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना रितसर नोटीस बजावून माहे फेब्रुवारी ते मार्च २०२३ दरम्यान संबंधितांना सुनावणीची संधी देण्यात आली. तथापि, सुनावणी दरम्यान कोणत्याही अतिक्रमणधारकांने ठोस पुरावे सादर न केल्याने, सदरची अतिक्रमणे ७ दिवसांच्या आत स्वत:हून काढून घेणेबाबत अर्धन्यायिक स्वरुपातील आदेश माहे एप्रिल व मे २०२३ मध्ये पारीत करण्यात आले. अतिक्रमणधारक यांनी दि.०५/०६/२०२३ रोजी मा. उच्च न्यायालयात दावे दाखल केले. मा. उच्च न्यायालयाने वरील प्रकरणात कोणतीही स्थगिती न देता वादी यांचेवरील सर्व दावे दि.०६/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आले आहेत. तसेच दरम्यान मा. श्री. मंगलप्रभात लोढा, पालकमंत्री मुंबई उपनगर यांनी जिल्हा व तत्कालिन पर्यटन मंत्री यांनी दिनांक २६/०५/२०२३ रोजी बैठक घेऊन, मौजे गोराई गावातील अतिक्रमणाबाबत कारवाई करण्याचे निर्देश दिलेले होते. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी कोणत्याही न्यायालयाची स्थगिती/ मनाई आदेश नसल्याने १) कोकण पट्टी २) पिकनिक आणि बगीचा हॉटेल ३) दादू का ढाबा ४) पिक्सी हिल रिसॉर्ट ५) दर्या किनारा ६) लकी ट्रेडर्स सदर अनधिकृत बांधकामाचे निष्कासन करण्यात आले आहे.

सदरबाबत अतिक्रमणधारकांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार सुनावणीची योग्य संधी देण्यात आलेली होती तसेच सदरची सर्व अतिक्रमणे ही विनापरवाना अनिवासी कारणास्तव वापरात असलेली अतिक्रमणे होती. सुनावणी दरम्यान अतिक्रमणधारकांनी सादर केलेले फोटोपास हे अनिवासी हॉटेलचे नसून गोराई गावातील त्यांच्या राहत्या घराचे असल्याचे या कार्यालयाच्या पडताळणी अंती निदर्शनास आले. याचाच अर्थ अन्य ठिकाणच्या फोटोपासचा वापर अतिक्रमणधारक त्यांचे अनिवासी अतिक्रमण वाचविण्याकरीता करुन मा. न्यायालयाची दिशाभूल करीत असल्याचे संबंधित आदेशात नमूद करण्यात आल्याने उप जिल्हाधिकारी (अति./ निष्का.) बोरीवली-१ कार्यालयाकडूनं अतिक्रमण निष्कासनाची केलेली कार्यवाही कायदेशीर आहे.

सदर प्रकरणी दि. ३१/१०/२०१८ रोजी तत्कालिन मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेले निर्देश व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. न.भू.अ.३/ कोळीवाडे/ सिमांकन/ २०१८/ ५६०८ वांद्रे, दिनांक ०१/११/२०१८ मधील निर्देशानुसार नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी दि.१३/११/२०१८ ते दि.१५/११/२०१८ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोळीवाड्यांचे संयुक्त सिमांकन मोजणी केली असून त्यामध्ये गोराई कोळीवाडा समाविष्ट आहे. याबाबत उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश मुंबई यांना दिनांक १०/१२/२०१८ रोजी अहवाल सादर केला आहे. तसेच उपप्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सदर हद्दी विकास नियोजन आराखडा-२०३४ मध्ये परावर्तीत केल्याचे कळविले आहे.

सन्मा. विधान परिषद सदस्य यांनी सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात या सूचनेबरोबर दिनांक ०४/०८/२०२३ रोजी विशेष उल्लेख उपस्थित केला होता. या विशेष उल्लेख सूचनेबाबत तत्कालिन मा. मंत्री (महसूल) यांनी दिनांक २५/०७/२०२४ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती श्री. अशोक उर्फ भाई जगताप, सन्मा. विधान परिषद सदस्य यांना कळविण्यात आलेली आहे.

****

03-08-2023 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) Q - 1
MSK/KTG प्रथम श्रीमतीकरंदीकर 14:00

श्री. भाई जगताप ....

आता तेथे ग्रीन झोन झाला आहे. तेथील गावठाणांची कक्षा वाढली आहे. या गावठाणांमध्ये राहणारे मूळ रहिवासी आहेत, त्यांची घरे ६०-१००-२०० वर्षांपासूनची आहेत. आज त्यांना तेथून हलविण्यात येत आहे. कोणी तरी एक विकासक तेथे जातो, त्या सर्व जागा खरेदी करतो आणि या सर्व गरीब लोकांना हटविले जाते. ....(अडथळा).... तो यांच्या सरकारमधील मंत्री आहे. मी नाव घेऊ का, मग नोटीस दिली नाही असे म्हणाल ? नियम ३५ ची नोटीस दिली नाही म्हणून मी नाव घेत नाही. तुम्हाला सर्वांना माहीत आहे. ताण वाढलेला असतो. त्यामुळे सर्व गरिबांचे वाटोळे होत आहे. ५०-६० वर्षांची सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे असताना त्यांना फक्त पोलिसांचा, जिल्हाधिकाऱ्यांचा, यंत्रणांचा वापर करुन हटवित आहात आणि त्या विकासकाच्या घशामध्ये ही जमीन घालत आहात या संदर्भातील हा विषय आहे.

सभापती महोदया, येथील मूळ रहिवासी सर्व कोळी समाज आणि मच्छीमारी करुन उदरनिर्वाह करणारा समाज आहे. मी विशेषत: मुंबईबाबत यासाठी म्हणत आहे की, आमचे कोळीवाडे व गावठाणे येथे आहेत, तेथील ते मूळ रहिवासी आहेत. आम्ही सर्वजण बाहेरुन आलो आहात. आम्ही जरी कोकणातून आलो तरी आम्ही सुध्दा बाहेरुन आलो आहोत. या मूळ रहिवाशांवर अशा पध्दतीने अन्याय होत असेल तर याची नुसती दखल न घेता त्याबाबत सरकारने काय कार्यवाही केली आहे याचा अहवाल त्यांनी सभागृहाला द्यावा नाही तर याची चर्चा करावी. आम्ही या विषयी डिटेलमध्ये चर्चा करुन त्यांना हवी असलेली सर्व कागदपत्रे देऊ. परंतु येथील रहिवाशांना, कोळी समाजाला, मच्छीमार समाजाला, तेथील गावठाणांमध्ये राहणाऱ्या मूळ रहिवाशांना न्याय द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

उप सभापती : शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन निवेदन करावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : (सभापती महोदया, होय.)

H 3170.pdf - 33 a

सद्य: स्थिती

२	२०२३ (पावसाळी)	**विधानपरिषद आश्वासन क्र. २६८** मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमिपुत्रांच्या समस्या याबाबत.. श्री. भाई जगताप वि.प.स.	आश्वासन समितीच्या निर्देशानुसार सन २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दि. २०/०३/२०२५ रोजी सर्व सन्मा. विधानपरिषद सदस्यांना सभागृहात मा. मंत्री (महसूल) यांच्या निवेदनाच्या प्रती वितरीत करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID : dollcell.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक : आश्वासन-२०२५/प्र.क्र.४८३/भूमापन दिनांक:- २० एप्रिल, २०२६

प्रति,
कार्यासन अधिकारी,
संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय : सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील
विधानपरिषद आश्वासन क्र. ५० बाबत.

महोदय,

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्र. ५० बाबत शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधी विवरणाच्या ३५ प्रती यांसोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत – वरीलप्रमाणे

आपली

शीतल माने
२०.४.२०२६

(शीतल माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२. कक्ष अधिकारी (समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवडनस्ती/भूमापन.

आश्वासन क्रमांक ५०

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३७१६ E Mail:dol1cell.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक : विपताप्र-२०२५/प्र.क्र.११४/ल-१ दिनांक : ०१ जुलै २०२५.

प्रति,

१. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
४. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महा. राज्य, पुणे.
५. अतिरिक्त पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई तथा विशेष तपास पथक प्रमुख.

विषय : मुंबईत पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणावरील १०२ नकाशे बनावट असल्याबाबत.

महोदय,

वरील विषयाबाबत मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त यासोबत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

आपला,

(प्रतापसिंह खरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत: वरीलप्रमाणे

प्रत,

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. निवडनस्ती (ल-१).

महसूल व वन विभाग/ल-१.

विषय:- मुंबईत पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणावरील १०२ नकाशे बनावट असल्याच्या प्रकरणात विधि व न्याय विभागासोबत चर्चेसाठी आयोजित बैठक.

विषयाधीन प्रकरणी मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली बुधवार, दि. २८ मे , २०२५ रोजी दुपारी ०३.३० वा. बैठक पार पाडली, सदर बैठकीस खालील मान्यवर लोक प्रतिनिधी, अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी व्ही.सी. व्दारे उपस्थित होते.

अ.क्र.	अधिकारी/प्रतिनिधींचे नाव	पदनाम व विभाग
१.	श्री. प्रविण दरेकर	मा.वि.प.स.
२.	श्री. शाम घुगे	पोलीस उपायुक्त, मुंबई.
३.	श्री.संजय बनकर	सह सचिव, महसूल व वन विभाग.
४.	श्रीम. मनिषा कदम	उप सचिव, विधि व न्याय विभाग.
५.	डॉ. भाग्यश्री कापसे	उप आयुक्त (परि. ४), बृहन्मुंबई महानगरपालिका.
६.	श्री. संजय कुऱ्हाडे	उप आयुक्त (परि. ७), बृहन्मुंबई महानगरपालिका.
७.	श्री. के.एम. कणसे	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर.

२. उपरोक्त विषयी सदर बैठकीत सांगोपांग चर्चा करण्यात आली. चर्चेच्या अनुषंगाने मा. अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

अ.क्र	मुद्दा	मा.मंत्री महोदयांचे निर्देश	संबंधित विभाग	कालमर्यादा
१.	जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालात नमूद बांधकामांव्यतिरिक्त अन्य बांधकामांबाबत.	जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालात बनावट नकाशांच्या आधारे केलेल्या बांधकामांबाबत नमूद करण्यात आले आहे. तसेच त्याबाबत पोलीसांकडे चार गुन्हे देखील दाखल आहेत. सदर बाधकामांव्यतिरिक्त अन्य बांधकामांची चौकशी करण्यासाठी पोलीस उपायुक्त (SIT), बृहन्मुंबई यांनी त्यांना आवश्यक असलेले भूमि अभिलेख विभागाचे मुळ आलेख, नकाशे आणि स्कॅनिंग केलेले दस्तऐवज यांची मागणी जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडे करावी व जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी सदर मागणीप्रमाणे अभिलेख त्यांना उपलब्ध करून द्यावेत.	जमाबंदी आयुक्त, पुणे/ अतिरिक्त पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई तथा विशेष तपास पथक प्रमुख.	१ महिना.
		पोलीस उपायुक्त (SIT), बृहन्मुंबई यांनी त्यांच्याकडे वरीलप्रमाणे प्राप्त अभिलेखाच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेशी चर्चा करून तसेच	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका / अतिरिक्त पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई	१ महिना.

		सर्व्हे करून तुलनात्मकरित्या तपासून अन्य काही बांधकामे आहेत किंवा कसे?, याबाबत तपासणी करावी. तसेच अशाप्रकारचे बांधकामे आढळल्यास त्याबाबत कायदेशीर कारवाई करावी.	तथा विशेष तपास पथक प्रमुख.	
२.	बनावट नकाशांच्या आधारे अनधिकृत बांधकाम केलेल्यांविरूध्द कारवाई करणेबाबत.	जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या बनावट नकाशांच्या आधारे झालेल्या बांधकामांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नोटीस बजावण्यात आली असून काही बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित बांधकामांविरूध्द कालबध्द कार्यक्रम निश्चित करून तोडक कारवाई करण्यात यावी.	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका	१५ दिवस
३.	बनावट नकाशांच्या आधारे अनधिकृत बांधकाम केलेल्यांविरूध्द न्यायीक कार्यवाही करणेबाबत.	बनावट नकाशांच्या आधारे बांधकाम परवानगी मिळवून केलेल्या बांधकामांबाबत निष्कासन कार्यवाहीस स्थगिती मिळविलेल्या न्यायालयीन प्रकरणांची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेने विधि व न्याय विभागास तात्काळ उपलब्ध करून द्यावी व विधि व न्याय विभागाने सदर देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही करता येईल याबाबतचे अभिप्राय बृहन्मुंबई महानगरपालिकेस द्यावेत.	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका/ विधि व न्याय विभाग.	१५ दिवस
४.	विधानमंडळात अहवाल सादर करणे.	सदर प्रकरणी सन २०२५ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात उपस्थित झालेल्या तारांकित प्रश्न क्र. १५२ संदर्भात विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेवेळी मा.मंत्री (महसूल) यांनी आश्वासित केल्यानुसार सदर प्रकरणाचा अहवाल विधानपरीषद सभागृहात सादर करण्यासाठी सर्व संबंधितांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action taken report) दि.२० जून २०२५ पूर्वी महसूल विभागास सादर करावा.	जमाबंदी आयुक्त, पुणे/ आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका / अतिरिक्त पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई तथा विशेष तपास पथक प्रमुख.	-

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID : dol1cell.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक : वि.प. आश्वासन-२०२५/प्र.क्र.४८२/भूमापन दिनांक:- १३ एप्रिल, २०२६

प्रति,
कार्यासन अधिकारी,
संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय : सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील
विधानपरिषद आश्वासन क्र. ४९ बाबत.

महोदय,

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्र. ४९ बाबत शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधी विवरणाच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

आपली

शीतल माने
१३.४.२०२६

(शीतल माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२. कक्ष अधिकारी (समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवडनस्ती/भूमापन.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ४६ अन्वये

मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री (महसूल) यांचे

मुंबईतील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवरील १०२ नकाशे बनावट असणे या विषयाबाबत निवेदन

श्री.विक्रांत पाटील व इतर विधान परिषद सदस्य यांनी अर्थसंकल्पिय अधिवेशन २०२५ मध्ये तारांकित प्रश्न क्र.१५२ हा दि.१०.०३.२०२५ रोजी विधानपरिषद सभागृहात चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रश्नाचा विषय हा "मुंबईतील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवरील १०२ नकाशे बनावट असल्याबाबत" असा आहे. सदर प्रश्नाच्या उत्तरावेळी या प्रकरणाचा संपूर्ण अहवाल पुढील अधिवेशनात सभागृहात मांडण्यात येईल, असे विधानपरिषद सभागृहास आश्वासित करण्यात आले होते.

त्यास अनुसरून सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

- सन २०२१ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात श्री. प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचना क्र. ३४० वरील चर्चेवेळी आश्वस्त केल्यानुसार जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली गठित चौकशी समितीने दि.२२.०४.२०२२ रोजी शासनास सादर केलेला चौकशी अहवाल मान्य करण्यात आला आहे.
- चौकशी अहवालामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुळ ८८४ हद्द कायम नकाशांपैकी १६५ नकाशांमध्ये च नगर भूमापन अधिकारी, गोरेगाव यांच्या अभिलेखातील नगर भूमापन चौकशीच्या वेळेचे ९ आलेखात छेडछाड झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.
- चौकशी समितीने त्यांच्या अहवालामध्ये दिसून आलेल्या अनियमितता, त्यासाठी जबाबदार असलेले भूमि अभिलेख विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिका मधील अधिकारी/कर्मचारी आणि अशा प्रकारे अनियमितता होऊ नये याकरिता करावयाच्या उपाययोजनांबाबत शिफारशी केल्या आहेत. त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे तसेच नगरविकास विभागास कळविण्यात आले आहे.
- दरम्यानच्या कालावधीत गोरेगाव पोलिस ठाणे येथे गु.र.क्र. ८२/२०२०, गु.र.क्र. ९७/२०२१, गु.र.क्र.९८/२०२१ आणि खेरवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४९०/२०२१, असे चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

❖ **विशेष तपास पथक (SIT) स्थापना:-**

- श्री. वैभव ठाकूर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे Criminal Writ Petition (ST) No. १३५५२ of २०२४ दाखल केली आहे.

जोडा H/5519 (350 - 4 - 25)

- सदर याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२३.१०.२०२४ रोजी अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचे नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करणेबाबत निर्देश दिले आहेत.
- गोरेगाव पोलिस ठाणे येथे दाखल गु.र.क्र. ८२/२०२०, गु.र.क्र. ९७/२०२१, गु.र.क्र.९८/२०२१ आणि खेरवाडी पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र. ४९०/२०२१ चा तपास विशेष तपास पथकाकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले आहेत.

❖ **सदरहू विषयाच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०१.२०२५, दि.०२.०४.२०२५ व दि.२८.०५.२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकांमध्ये मा.मंत्री (महसूल) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठकांचे इतिवृत्त आवश्यक कार्यवाही करण्यासाठी निर्गमित केले आहे.**

❖ **जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेली कार्यवाही-**

- नगर भूमापन आलेखाच्या नकला देताना करावयाच्या कार्यवाहीबाबत दि.२०.०१.२०२५ रोजी संविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.
- सदर प्रकरणी श्रीम.मिना पांढरे, तत्का. उप अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांच्याविरूद्ध शासन ज्ञापन दि.०७.०३.२०२५ अन्वये आणि श्री. शंभूराजे वाबळे, तत्का. नगर भूमापन अधिकारी, गोरेगाव यांच्याविरूद्ध शासन स्तरावरून ज्ञापन दि.१८.०२.२०२५ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.
- त्याचप्रमाणे सदरहू प्रकरणातील उर्वरित वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांबाबतीत शिस्तभंगविषयक प्राधिकारी असलेले उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून दि.२१.०१.२०२५ व दि.२२.०१.२०२५ च्या ज्ञापनान्वये नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव कार्यालयातील एकूण ११ कर्मचारी व उप अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालयातील ८ कर्मचारी असे एकूण १९ कर्मचारी यांच्याविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.
- सदर प्रकरणी दोषारोपांच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही पूर्ण होवून दि.३१.०५.२०२५ अखेरपर्यंत एकूण १६ कर्मचाऱ्यांच्या बाबत चौकशी अहवाल प्राप्त झाले असून सदर अहवालाच्या अनुषंगाने संबंधित कर्मचारी यांनी निवेदन सादर केले आहे. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने ७ कर्मचारी यांना शिक्षा पूर्व ज्ञापन बजावण्यात आले असून सबंधित कर्मचारी यांचे निवेदन प्राप्त होताच अंतिम शिक्षा आदेश पारित करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

[illegible] केलेली कार्यवाही -

- जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेली चौकशी समितीने दि.२२.०४.२०२२ रोजी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालात नमूद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १० वॉर्डमध्ये ३०९ सीटीएस भूक्रमांकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, १०९३ बांधकामे आढळून आली आहेत.
- यापैकी ७८३ बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत आणि ४४ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
- अनेक प्रकरणांमध्ये कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

❖ **विशेष तपास पथकाने केलेली कार्यवाही-**

- सदर चारही गुन्ह्यांच्या तपासामध्ये खालीलप्रमाणे आरोपींना अटक करण्यात आली आहे.

  १) भूमि अभिलेख विभागाचे अधिकारी - ०२,

  २) भूमि अभिलेख विभागाचे कर्मचारी - ०७,

  ३) भूमि अभिलेख विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी - ०२,

  ४) खाजगी व्यक्ती - १२.

  असे एकूण २३ आरोपींना अटक करण्यात आली असून ३ आरोपींना अटक करणे बाकी आहे.
- विशेष तपास पथकाकडून वेळोवेळी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे अहवाल सादर करण्यात येतो.

****

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
पहिला मजला (मुख्य इमारत), मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
Email : desktrev.mu-mh@gov.in

क्रमांक:-आश्वासन-०८२५/प्र.क्र.४४/दक्षता (टी) दिनांक:- २० एप्रिल,२०२६

प्रति,

सह सचिव,
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय :-ॲड निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११० च्या संदर्भात..
विधान परिषद सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्र.३०.

महोदय,

विधान परिषद सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्र.३० च्या पूर्ततेबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या ३५ प्रती व विहित नमुन्यातील विवरणपत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

२४/०४/२०२६

(ज्ञा.ल.सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरीलप्रमाणे.

प्रत,

कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवडनस्ती (दक्षता).

आश्वासन क्रमांक ३०

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्र. मुंउजि/नात/व.शा./लक्षवेधी सुचना/कावि-१५५९/२०२६
दिनांक :१५/०४/२०२६

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग मंत्रालय,
मुंबई- ४०००३२

विषय :- ॲड. निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.११० च्या संदर्भात.

संदर्भ :- १) शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.लवेसु-०३२५/प्र.क्र.१२/दक्षता (टी) दिनांक २९/०९/२०२५ व दिनांक ३०/०१/२०२६
२) या कार्यालयाचे पत्र दिनांक २७/११/२०२५ व दिनांक ०४/०२/२०२३
३) शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.लवेसु-०३२५/प्र.क्र.१२/दक्षता (टी) दिनांक ११/०४/२०२६

महोदय,

मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९/०३/२०२५ रोजी "महारेरा कडून जिल्हाधिकारी कार्यालयांकडे प्राप्त झालेल्या महसूल वसुली प्रमाणपत्रांच्या वसुलीची सद्यस्थिती आणि बनावट कागदपत्रांव्दारे महारेराचे प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील ६५ इमारतीसंदर्भात झालेली कार्यवाही" या विषयाबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने महसूल वसुली प्रलंबित ५४६ प्रकरणात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयाने दिनांक २७/११/२०२५ व दिनांक ०४/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वये सादर केलेला आहे.

उक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयाकडील महसूल वसुली प्रलंबित ५४६ प्रकरणांपैकी उर्वरीत ३३ प्रकरणांमध्ये पहिला लिलाव अयशस्वी झाल्यामुळे पुढील लिलाव दिनांक १७/०२/२०२६ व दि.१८/०२/२०२६ रोजी आयोजित करणेत आला. त्यापैकी ११ प्रकरणांमध्ये समझोता करार करणेत आला आहे. उर्वरीत २२ प्रकरणांपैकी ३ प्रकरणांत ३ वेळा लिलाव आयोजित करणेत आले, परंतू, ते अयशस्वी झाले आहेत. उर्वरीत १९ प्रकरणांमध्ये तिसरा लिलाव दिनांक ३०/०४/२०२६ रोजी आयोजित करणेत आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाने कसुरदाराची स्थावर मालमत्ता आढळ न होणारी प्रकरणे तसेच, न्यायालयीन स्थगिती असणारी प्रकरणे, लिलाव यशस्वी न झालेली प्रकरणे व अंशत: वसुली झालेली प्रकरणे हे महारेरा यांचेकडे परत पाठविण्यात आली होती. त्यामध्ये मा. अध्यक्ष, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी दिनांक ११/०२/२०२६ रोजीचे पत्रान्वये जमीन, नोंदणी व मुद्रांक विभाग, प्रादेशिक

10081441/2026/MRF(DESKT2)

परिवहन विभाग व महानगर पालिकेकडील कर अभिलेख, रजिस्टरर ऑफ कंपनीस, मिनीस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेर्स, आयकर विभाग, वार्षिक परतावा याबाबत पडताळणी करणे / विचारात घेणेबाबत कळविले आहे.

तद्नुषंगाने, या कार्यालयाने दिनांक २४/०२/२०२६ रोजीचे पत्रान्वये तहसीलदार अंधेरी, तहसीलदार बोरीवली व तहसीलदार कुर्ला यांना निर्देश दिलेले असून त्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे. सदरची कार्यवाही त्वरीत पुर्ण करण्याची दक्षता घेणेत येत आहे. सदरची बाब आपले माहितीस्तव सादर करणेत येत आहे.

(सौरभ कटियार)
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

परिशिष्ट

लिलाव आयोजित प्रकरणांचा तपशिल (निव्वळ वसुलीचे शिल्लक प्रकरणे)

Sr. No	Original Sr. No	Respondent Name	Complaint No.	Amt.Of Recovery (in Crores)	Remark
1	2	3	4	5	6
1	470	TRIVENI DEVELOPERS	CC006000000057262	0.12	लिलाव दि. 24/11/2025, 27/01/2026 व दि.18/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाले आहेत.
2	471	Triveni Developers	CC006000000057262	0.88	लिलाव दि. 24/11/2025, 27/01/2026 व दि.18/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाले आहेत.
3	525	Vijaykamal Properties Pvt Ltd	CC006000000055314	0.08	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
4	218	Monarch & Qureshi Builders	CC006000000054571	1.99	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
5	219	Monarch & Qureshi Builders	CC006000000055433	0.51	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
6	224	Monarch & Qureshi Builders	CC006000000100482	1.00	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
7	225	Monarch & Qureshi Builders	CC006000000056541	0.15	समझोता करार झाला आहे.
8	226	Monarch & Qureshi Builders	CC006000000056544	0.15	समझोता करार झाला आहे.
9	500	VIDHI REALTORS	CC006000000171636	0.26	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
10	505	Vidhi Realtors	CC006000000044393	0.46	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
11	506	Vidhi Realtors	CC006000000055354	0.39	समझोता करार झाला आहे.
12	507	Vidhi Realtors	CC006000000023909	0.80	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
13	508	Vidhi Realtors	CC006000000044123	0.15	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
14	509	Vidhi Realtors	CC006000000056826	0.27	समझोता करार झाला आहे.
15	510	Vidhi Realtors	CC006000000023577	1.47	समझोता करार झाला आहे.
16	511	Vidhi Realtors	CC006000000056886	0.21	समझोता करार झाला आहे.
17	513	Vidhi Realtors	CC006000000078982	0.40	समझोता करार झाला आहे.
18	514	Vidhi Realtors	CC006000000055968	0.53	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
19	515	Vidhi Realtors	CC006000000079323	1.01	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.

20	517	Vidhi Relators	CC006000000110726	0.19	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
21	518	Vidhi Relators	CC006000000171586	0.17	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
22	519	Vidhi Relators	CC006000000001064	4.46	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
23	520	Vidhi Relators	CC006000000057025	0.01	समझोता करार झाला आहे.
24	521	Vidhi Relators	CC006000000100512	0.53	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
25	522	Vidhi Relators	CC006000000000522	0.18	समझोता करार झाला आहे.
26	523	Vidhi Relators	CC006000000000947	0.18	समझोता करार झाला आहे.
27	524	Vidhi Relators	CC006000000055649	0.13	समझोता करार झाला आहे.
28	532	Vijaykamal Properties Pvt Ltd	CC006000000001593	0.12	लिलाव 12-01-2026 व दि.17/02/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
29	214	Mishal Construction	CC006000000090151	0.26	यापुर्वीचे 3 लिलाव अयशस्वी झाले असल्याने, अर्जदाराचे विनंतीनुसार दिनांक 30/04/2026 रोजी 4था लिलाव आयोजित करण्यात आला आहे.
30	308	Pankaj Chawla	CC006000000055403	0.30	दिनांक 30/04/2026 रोजी 3 रा लिलाव आयोजित करण्यात आला आहे.
31	309	Pankaj Shyam Chawla	CC006000000056353	2.92	दिनांक 30/04/2026 रोजी 3 रा लिलाव आयोजित करण्यात आला आहे.
32	334	Rohinton Mehta Builders And Developers	CC006000000193134	0.84	दिनांक 06/11/2025, 13/01/2026 रोजी लिलाव आयोजित करणेत आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
33	17	Cordcon Builders Pvt Ltd	CC006000000100297	1.10	कसुरदार यांची जप्त मालमत्तेवर लिलाव 18/02/2026, दि.17/03/2026 रोजी आयोजित करण्यात आला. सदरचे लिलाव अयशस्वी झाल्यामुळे 3रा लिलाव दि.30/04/2026 रोजी आयोजित केला आहे.
			Total amount Rs.	**22.22**	

(सौरभ कटियार)
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड 402 201
दुरध्वनी क्रमांक :02141-222118/222097 फॅक्स:02141-227451,ईमेलtahasildarmahasul@gmail.com

क्र.मशा/वसुली/अ-४/लक्षवेधी सूचना क्र.११०/२०२६ दि. २३/०४/२०२६

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२

विषय:- महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहामध्ये प्रलंबित असलेल्या आश्वासनांची पुर्तता होण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या साक्ष संदर्भात.

संदर्भ:-आपलेकडील पत्र क्रमांक-लवेसु-0325/प्र.क्र.12/दक्षता (टी), दि.11//2026.

मा.महोदय,

ॲड.निरंजन डावखरे व इतर मा.वि.प.स. यांनी सन 2025 चे प्रथम अधिवेशनात महाराष्ट्र विधान परिषद नियम, 101 अनुसार लक्षवेधी सुचना क्र.110 उपस्थित केली असून सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी विधानपरिषदेत "महारेराकडून प्राप्त झालेल्या महसूल वसुली प्रमाणपत्रांसंदर्भात शासनातर्फे कडक कारवाई करुन 1124 प्रकरणांमध्ये सर्व शक्यता तपासून तीन महीन्यांच्या आतमध्ये याची सर्व वसुली पूर्ण करण्यात येईल. तसेच यासदंर्भातील संपूर्ण अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे. सदर आश्वासनासंदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहामध्ये प्रलंबित आश्वासनांची पुर्तता होण्याच्या दृष्टीने दि.22 एप्रिल, 2026 रोजी साक्ष होणार असल्याचे कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अद्ययावत अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

लक्षवेधी सूचना क्र.110 च्या अनुषंगाने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांचेकडून या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या 157 महसूल वसुली प्रमाणपत्र प्रकरणांपैकी **या कार्यालयाकडे एकुण 40 प्रकरणे प्रलंबित** असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

महारेरा कार्यालयाकडील दि.०१/०४/२०२४ रोजी प्रलंबीत असलेली आरआरसी प्रकरणे		महारेरा कार्यालयाकडील दि.०१/०४/२०२४ ते २४/०२/२०२५ या कालावधीत नव्याने प्राप्त झालेली प्रकरणे		एकूण प्रकरणे		एकूण प्रकरणांपैकी वसुली झालेली / कार्यालयास परत केलेली RRC प्रकरणे		एकूण प्रकरणांपैकी शिल्लक प्रकरणे	
प्रकरणांची संख्या	रक्कम (लाखात)	प्रकरणांची संख्या	रक्कम (लाखात)	प्रकरणांची संख्या	रक्कम (लाखात)	प्रकरणांची संख्या	रक्कम (लाखात)	प्रकरणांची संख्या	रक्कम (लाखात)
१३८	४४९१.६७	१९	४५०.१९	१५७	४९४२.५८	११७	३८९०.०८	४०	१०५२.५०

उक्त प्रलंबित 40 महसूल वसुली प्रमाणपत्र प्रकरणांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तपशिलवार माहिती सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	थकबाकीदार	प्रलंबित प्रकरणे
1.	आदित्य एन्टरप्रायझेस	2

H 3170.pdf - 35

2.	श्री.भूपेशबाबू करप्पन निल्लीपारंबिल, मे.एनके गार्डन	31
3.	वेदांत रिलेटर्स	1
4.	मे.एक्झर्बिया वरई डेव्हलपर्स	1
5.	कोरडेलिया रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड	5
	एकुण	40

1. **थकबाकीदार आदित्य एन्टरप्रायझेस यांच्या 2 प्रकरणांमध्ये,** वसुली करण्याकरीता पनवेल तालुक्यात मिळकत नसल्याने सदर आरआरसी प्रकरणे पत्र क्र.मशा/वसुली/अ-4/आरआरसी वसुली/4494481/2025, दि.11/03/2025 अन्वये परत पाठविली आहे. परंतु थकबाकीदार यांची मिळकत मौजे कर्जुले हर्या, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर येथे असल्याबाबत कळविले असल्याने, महारेरा कार्यालयाने सदरची प्रकरणे या कार्यालयामार्फत अहिल्यानगर(अहमदनगर) जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/वसुली/अ-4/आरआरसी वसुली/5035108/2025, दि.05/06/2025 अन्वये, सदरची प्रकरणे मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे वसुलीच्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहेत.
2. **थकबाकीदार श्री.भूपेशबाबू करप्पन निल्लीपारंबिल, मे.एनके गार्डन यांची एकूण 31 प्रकरणांमध्ये** थकबाकीदार यांचे नावे असलेल्या मौजे मोर्बे, ता.पनवेल येथील स.नं.93/8 क्षेत्र 0.71.00 हे.आर. हया मिळकतीची लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली असून, सदर लिलाव प्रक्रीयेमध्ये सर्वाधिक र.रु.1,96,11,780/- ची बोली श्री.रामदास वामण शेवाळे यांनी लावल्यामुळे सदर जमिन श्री.रामदास वामन शेवाळे यांनी खरेदी केली असल्याचे जाहिर करण्यात आले व त्यानुसार बोलीधारकानी लिलावाची रक्कम अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा केलेली आहे. सदर रक्कमेचा धनादेश प्रबंधक महारेरा मुंबई यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता. तथापि, प्रबंधक, महारेरा यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.महारेरा/वॉरंट/93/2026, दि.24/03/2026 अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत."रिअल इस्टेट (नियमण आणि विकास) कायदा 2016 कलम 40(1) अन्वये सदर रक्कम महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि नियमाव्दारे वसुल करावयाची आहे आणि लाभार्थी शासन नव्हे तर तक्रार ग्राहक असल्याने, तहसिलदार यांनी तक्रारदार ग्राहकांना त्याच्याच स्तरावर सदरची रक्कम वाट करावयाची आहे." त्याअनुषंगाने सदरची रक्कम तक्रारदार यांना कशाप्रकारे? किती प्रमाणात? व कशा पध्दतीने वाटप करावी व त्याबाबत तक्रारदार यांचे बँक खात्याचा व इतर अनुषंगिक तपशिल मिळणेबाबत अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालयाकडून प्रबंधक, महारेरा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा मुंबई यांना या कार्यालयाकडून दिनांक 01/04/2026 रोजी कळविण्यात आले आहे.

   तसेच यापूर्वी सन 2023 मध्ये सदर थकबाकीदार यांचे नावे असलेल्या मौजे मोर्बे येथील स.नं.93/9, 93/11, 93/3, 93/5, 93/6 या मिळकर्तीचा लिलाव लावण्यात येऊन, र.रु.4,82,00,000/- वसुल करण्यात येऊन, लिलावाचा खर्च वजा करुन उर्वरित र.रु.4,78,19,775/- ही रक्कम माहे जून 2023 पर्यंत महारेराकडून प्राप्त महसूल वसुली प्रमाणपत्रातील तक्रारदार यांना अंशत: वाटप करण्यात आलेली आहे.

3. **थकबाकीदार वेदांत रिलेटर्स यांचे 1 प्रकरणामध्ये** मौजे देवळोली बु.ता.पनवेल येथील स.नं.68/ब, या मिळकतीमधील थकबाकीदार श्री.संतोष कुमार जयप्रकाश सिंग यांचे हिश्याचे क्षेत्र 45-70-00 आर.चौ.मी. करीता लिलावाची प्रक्रीया राबविण्यात आली, परंतु सदर लिलाव प्रक्रियेमध्ये सदर जमिन मिळकत लिलावाने विकत घेण्याकरीता कोणीही अर्ज दाखल न केल्याने सदरची मिळकत उक्त क्षेत्रापुरती महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 220 अन्वये एक रुपया नाममात्र बोलीने शासनजमा करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 183 अन्वये कसुरदारास अटक करण्याकरीता किंवा स्थानबध्द करण्याच्या कार्यवाहीकरीता उपविभागीय अधिकारी पनवेल यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

तसेच अपर जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील पत्र क्र.गृह/कात-1/टे-3/बोईसर/पो.स्टे./एमपीआयडी/इओ-8029058/25, दि.23/12/2025 अन्वये मौजे देवळोली बु., ता.पनवेल येथील ग.नं./68/ब या जमिन मिळकतीबाबत बोइसर पो.स्टे.गु.रजि.नं.294/2020 नुसार कलम 420, 467, 468, 471, 34 भा.दं.वि.सं.सह कलम 3 व 4 महाराष्ट्र ठेविदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधाचे संरक्षण अधिनियम 1999 चे कलम 3, 4 व 13 महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट ॲक्ट 1963 अन्वये गुन्हा दाखल असलेबाबत अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालयास कळविले आहे.

4. **थकबाकीदार मे.एक्झर्बिया वरई डेव्हलपर्स यांचे 1 प्रकरणामध्ये** थकबाकीदार कंपनीचे नावे असलेल्या मौजे माडप, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत पत्रिका क्र.386/3, क्षेत्र 1180 चौमी व 386/4, क्षेत्र 327.80 चौ.मी. (क्लब हाऊस 1 व 2) या मिळकतीचा जाहिर लिलाव करणेकामी, सदरहू थकबाकीदार यांचे जमिन मिळकतीचे मुल्यांकन प्राप्त करुन सदरचा प्रस्ताव अपसेट प्राईससाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. मात्र सदर जागेत बांधकाम असल्याने, संबधित ग्राम महसूल अधिकारी यांना स्थळपाहणी करणेकामी अवगत केलेले होते. त्याअंती सदर जागेत अपूर्ण बांधकाम असल्याचा अहवाल संबधित ग्राम महसूल अधिकारी यांनी या कार्यालयात सादर केलेला आहे. तद्नंतर ग्राम महसूल अधिकारी माडप व ग्रामपंचायत अधिकारी माडप यांना मालमत्ता क्र.386/3, क्षेत्र 1180 चौमी व 386/4, क्षेत्र 327.80 चौ.मी. हे बांधकाम कोणत्या स.नं. मध्ये समाविष्ठ आहे, याबाबत स्थळपाहणी करुन अहवाल सादर करणेचे अवगत केलेले होते. तथापि, सदरचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याने, सदरचे बांधकाम सलग नसल्याने ते एकाच स.नं. मध्ये असल्याचे निश्चित होत नाही. याबाबत तहसिलदार खालापूर यांनी या कार्यालयाकडे अहवाल सादर केला होता. परंतु तहसिलदार खालापूर यांना सदर महसूल वसुली प्रमाणपत्राच्या थकबाकीची वसुलीबाबतची कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार तहसिलदार खालापूर यांनी सदरहू कंपनीस नव्याने नमुना-4 नोटीस काढणेत आलेली आहे. तसेच सदरहू जमिनीचे मुल्यांकन प्राप्त करुन घेण्यात आले असून, अपसेट प्राईज ठरविण्याकामी प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याबाबत तहसिलदार खालापूर यांनी कळविले आहे.

5. **थकबाकीदार कोरडेलिया रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या 5 प्रकरणांमध्ये**, थकबाकीदार मे.कोरडेलिया रिअल्टी प्रा.लि. संचालक श्री.बॉबी सुरेंद्रनाथ व इतर यांचेकडून मौजे विहूर, ता.मुरुड येथील भूमापन क्र.20/1, क्षेत्र 400 चौ.मी., 21/1 क्षेत्र 1000 चौ.मी. जमिनीच्या भोगवटयाच्या दुमाला

File No. आस्थास्न-0825/प्र.क्र.44/दक्षता (Computer No. 1624726)

762

H 3170.pdf - 35 a

धारण जमीनीच्या बाबतीत वाढीव व्याजासह जमीन महसूलाची थकबाकी वसुल करावयाच्या पध्दतीप्रमाणे वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. वसुली प्रक्रियेकामी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार नमुना - 4 स्थावर मालमत्तेच्या जप्तीचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेसाठी सदर मिळकतीचे मुल्यांकनानुसार येणाऱ्या किंमतीप्रमाणे लिलावाची प्रक्रिया पूर्ण करणेसाठी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडे अपसेट प्राईज ठरविण्याचा प्रस्ताव तहसिलदार मुरुड यांनी सादर केला आहे.

तरी लक्षवेधी सूचना क्र.110 च्या अनुषंगाने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेल्या 157 प्रकरणांपैकी प्रलंबित असलेल्या 40 प्रकरणांमध्ये वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु असून सदर प्रलंबित प्रकरणांमध्ये लवकरात लवकर कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता घेत आहोत. हे आपले माहितीस्तव सविनय सादर.

(किशन ना.जावळे)
जिल्हाधिकारी रायगड

File No. [illegible] (Computer No. 16347326)

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.महसूल/क-१/टे-७/ई-४३५३७०७/२०२५ दि.१३/०४/२०२६

प्रति,

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग (कार्यासन-टी)
मंत्रालय मुंबई

विषय :- ॲड.निरजंन डावखरे व इतर वि.प.स. यांनी नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.११० संदर्भात

संदर्भ :- आपलेकडील पत्र क्रमांक-लवेसू-०३२५/प्र.क्र.१२/दक्षता (टी) दि.२५/०३/२०२६ व समक्रमांक दि.११/०४/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयांकित पत्रान्वये ॲड.निरजंन डावखरे व इतर वि.प.स. यांनी नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.११० च्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने महारोरा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या ३४२ प्रकरणांचा सद्यस्थिती अहवाल सादर करणेबाबत उक्त संदर्भिय पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

(अ), व (ब) व यथास्थिती (क) अनुसार येथील सूत्रानुसार सुधारित भूईभाडे निश्चित करण्यात यावे.

(इ) भुईभाडयांची रक्कम निश्चित करुन त्याची मागणी भाडेपट्टे धारकाकडे करण्यापूर्वी या संदर्भात मा. उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेऊन भुईभाड्याच्या रकमेची परिगणना करण्यासाठी बाजारमुल्य कसे विचारात घेण्यात आले व या बाजारमुल्याच्या आधारे भुईभाडयाची रक्कम कशी निश्चित करण्यात आली, याची माहिती संबंधित भाडेपट्टेधारकास लेखी स्वरुपात कळविण्यात यावी व बाजारमुल्य अथवा भुईभाडयाच्या रकमेबाबत भाडेपट्टाधारकाचे काही आक्षेप असल्यास सदर आक्षेप लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांत नोंदविण्याबाबत भाडेपट्टा धारकास सूचित करण्यात यावे. भाडेपट्टाधारकाचे आक्षेप प्राप्त झाल्यानंतर असे आक्षेप निर्णित करण्यापूर्वी भाडेपट्टेधारकास सुनावणीची रास्त व वाजवी संधी देण्यात यावी. सुनावणी अंती भाडेपट्टाधारकाचे आक्षेप कोणत्या कारणास्तव स्वीकारण्यात अथवा यथास्थिती नाकारण्यात येत आहेत, याची सविस्तर कारणे नमूद करुन जिल्हाधिका-यांनी स्वयंस्पष्ट आदेश शासन पूर्वमान्यतेने पारीत करावेत. तसे आदेश पारीत केल्याअंती निश्चित होणारी भुईभाडयाची रक्कम वसूल करण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

(ई) ज्या प्रकरणांमध्ये भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात आलेली नाही, अशा प्रकरणात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात येण्याच्या दिनांकापावतो जुन्या दराने भुईभाडे वसूल करण्यात यावे. अशा प्रकरणात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात आल्यानंतरच्या दिनांकापासून सुधारित दराने भुईभाडयाची आकारणी करण्यात यावी.

(फ) बृहन्मुंबई मधील भाडेपट्टयानें धारण केलेल्या जमिनीपैकी काही प्रकरणात बांधकामावर निर्बंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार जेवढया क्षेत्रफळावर बांधकाम अनुज्ञेय आहे (Buildable Area) तेवढेच क्षेत्रफळासाठी भुईभाडे आकारण्यात यावे. (उदाहारणार्थ मनोरंजन मैदान, मोकळया जागा, इत्यादी) . अर्थातच विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अशा प्रकरणांमध्ये ज्या दिनांकापासून अधिकचे बांधकाम अनुज्ञेय होईल, त्या दिनांकापासून एकूण बांधकाम योग्य क्षेत्रासाठी भुईभाडे आकारण्यात यावे.

(भ) दिनांक १ जानेवारी २०१२ पासून अथवा यथास्थिती भविष्यात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात आल्यानंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण केल्याच्या दिनांकापासून ज्या प्रकरणात भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यात येईल, त्या प्रकरणात जिल्हाधिका-यांनी भाडेपट्टाधारकासमवेत नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा (Lease Deed) निष्पादित करावा. भाडेपट्टा करारनामा निष्पादित करताना मूळ भाडेपट्टा करारातील अटी व शर्तींदेखील विचारात घेण्यात याव्यात.

(क) <u>भाडेपट्टयांचे हस्तांतरण व वापरातील बदलाचे नियमन</u>

(१) भाडेपट्टयाच्या हक्कांचे हस्तांतरण करण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. भाडेपट्टयांच्या हक्कांचे हस्तांतरण करण्याची पुर्व परवानगी भाडेपट्टे धारकाने मागितल्यास अशी पूर्व परवानगी देताना अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा म्हणून ५० टक्के इतकी रक्कम वसूल करण्याचा शासनास अधिकार आहे. तथापि दीर्घ कालावधीसाठी भाडेपट्टयाने जमिनी दिलेल्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाचे निर्णय विचारात घेता अशा मिळकतीमध्ये जमीन मालकांचा २५ टक्के व भाडेपट्टे धारकाचा ७५ टक्के इतका हिस्सा असतो. ही बाब विचारात घेता अनर्जित

H 3170.pdf - 42 a

उत्पन्नातील शासनाचा ५० टक्के इतका हिस्सा परिगणित करताना अशा जमिनीच्या मुल्यांकनामधील शासनाच्या २५ टक्के इतक्या हिश्श्याच्या रकमेचाच विचार करण्यात यावा. अशा २५ टक्के हिश्श्याने परिगणित होणा-या रक्कमेच्या ५० टक्के इतकी रक्कम अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा म्हणून वसूल करुन हस्तांतरणाची परवानगी देता येईल.

(२) ज्या प्रकरणात भाडेपट्टयाच्या हक्कांचे शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण करण्यात आले आहे, अशा प्रकरणात असे विना-परवानगी हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी प्रचलित शासन धोरणातील तरतुदीनुसार अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा वसूल करण्यात यावा.

(३) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी तसेच अशा जमिनीवर हस्तांतरणीय विकास हक्क वापरण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशी परवानगी देताना वेळोवेळी प्रचलित असलेल्या शासन धोरणानुसार अधिमूल्य आकारुन अशी परवानगी देण्यात येईल. तथापि अशा वापरातील बदलासाठी तसेच हस्तांतरणीय विकास हक्क वापरण्यासाठी स्थानिक नियोजन प्राधिकरणाची शिफारस असणे आवश्यक राहील.

(४) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व त्यासाठी वेळोवेळी प्रचलित असलेल्या धोरणातील तरतुदी भाडेपट्टा धारकावर बंधनकारक राहतील.

(५) काही भाडेपट्टा करारनाम्यात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात येण्यापूर्वी विविक्षीत कालावधीच्या आत भाडेपट्टयाचे नुतनीकरण करुन घेण्यासाठी भाडेपट्टाधारक इच्छुक आहे किंवा नाही, हे जिल्हाधिका-यांना कळविण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकरणात भाडेपट्टाधारकांनी विविक्षीत कालावधीत मध्ये नुतनीकरणासाठी विकल्प दिला नसल्यास अशा प्रकरणात भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यापूर्वी प्रचलित बाजारमूल्याच्या १० टक्के इतका दंड आकारण्यात यावा व या दंडाची वसूली झाल्यानंतरच नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

(६) शासकीय जमिनीवरील जिमखाने व क्रिडांगणे यांच्या भाडेपट्टयाच्या नुतनीकरणाचे धोरण शासनाच्या विचाराधीन असून, त्यासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

(७) बृहन्मुंबईतील अस्थायी भाडेपट्टयांना हे धोरण लागू असणार नाही.

५. हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने (त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४/०२/व्यय-९, दिनांक २९.११.२०१२) निर्गमित करण्यात आला आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक संकेतांक २०१२१२१११४२१४५६२१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एस. एस. पाटील)
शासनाचे उप सचिव

प्रत,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर / मुंबई उपनगर
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (गृहनिर्माण विभाग), मंत्रालय, मुंबई
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई / महाराष्ट्र (२), नागपूर
प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा), महाराष्ट्र (१), मुंबई / महाराष्ट्र (२), नागपूर
सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती ज-२ कार्यासन, महसूल व वन विभाग

महसूल विभागाने भाडेपट्टयाने/ कब्जेहक्काने दिलेल्या जमिनीच्या पुनर्विकासास / पुनर्बांधकामास परवानगी देण्याबाबत धोरण

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१२/०७/प्र.क्र.३०/ज-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: :- १३ एप्रिल, २०१७

प्रस्तावना :-

स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही शासनाने दीर्घ मुदतीच्या जसे ५० वर्षे, ९९ वर्षे व ९९९ वर्षे मुदतीच्या भाडेपट्टयाने व कब्जेहक्काने शासकीय जमिनी विविध प्रयोजनार्थ मंजूर केलेल्या आहेत. या जमिनींवर भाडेपट्टेधारकाने किंवा भोगवटादाराने बांधलेल्या इमारती आता अनेक ठिकाणी मोडकळीस आलेल्या आहेत. शहरांच्या विकास आराखडयात व विकास नियंत्रण नियमावली मध्येही अनेक बदल होऊन अनेक ठिकाणी भूखंडांवर जादा बांधकाम अनुज्ञेय झालेले आहे. शासकीय जमिनी भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिल्यानंतर अनेकदा वापराच्या प्रयोजनातही बदल करण्याची संबंधित भाडेपट्टाधारकाची/भोगवटादाराची इच्छा निदर्शनास येते. या सर्व कारणांमुळे अशा जमिनींचा पुनर्विकास करण्यास परवानगी मागण्यासाठीचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होत आहेत. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनींचा पुनर्विकास करण्यास परवानगी देण्याबाबत व त्यासाठी अधिमूल्य आकारण्याबाबत **महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६** च्या **कलम ३७ अ** अन्वये खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट करण्यात आलेली आहे:-

१) "अमरावती व नागपूर महसूल विभागातील नझूल जमिनी तसेच मुंबई शहरसह राज्यातील महसूल विभागातील कोणतीही शासकीय जमीन जी, या संहितेखालील तरतूदीनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार किंवा या संहितेच्या प्रारंभापूर्वी जमीन महसूलासंबंधीच्या कोणत्याही कायद्यानुसार विभिन्न प्रयोजनासाठी प्रदान केलेली असेल, अशा जमिनींची प्रत्येक विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफ.एस.आय.) वापर, हस्तांतरणीय विकास हक्कांचे (टी.डी.आर.) हस्तांतरण किंवा वापरातील बदल, राज्य शासनाची पुर्वपरवानगी घेण्याच्या अधीन राहून करण्यात येईल".

२) राज्य शासन पोट कलम (१) अन्वये आवश्यक असलेली अशी परवानगी देताना शासनाकडून वेळोवेळी काढण्यात येणाऱ्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे नजराणा मुल्य किंवा आकार व अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा, अशा अटी व शर्तींना अधीन राहून, वसूल करील....."

उक्त तरतूदीच्या अनुषंगाने भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीच्या पुनर्विकासाला परवानगी देण्याकामी धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याकामी

दि.२३.३.२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीतील मान्यतेस अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

१. शासनाने भाडेपट्टयाने /कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या पुनर्विकासासाठी प्रचलित विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा व संबंधित विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत असा पुनर्विकास अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच व खालील प्रमाणे विहित अधिमूल्य आकारुनच प्रकरणपरत्वे अशा पुनर्विकासास परवानगी देण्यासंदर्भात निर्णय घेण्याबाबत शासन याद्वारे पुढीलप्रमाणे धोरणात्मक निर्देश देत आहे:-

१.१ (अ) बृहन्मुंबई करीताच्या सन १९९१ च्या विकास नियंत्रण नियमावलीतील "विनियम ३३(९) - समुह पुनर्विकास" व "विनियम ३३(१०) - झोपडपट्टी पुनर्वसन" यामध्ये संबंधित शासकीय जमिनीच्या **प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील** दराने येणाऱ्या बाजार मुल्यांकनाच्या **२५%** या प्रमाणात अधिमूल्य आकारण्याची तरतुद पुर्वीच अस्तित्वात असल्याने शासनाने प्रदान केलेल्या जमिनीवर या दोन्ही विनियमांखालील पुनर्विकास करण्यास परवानगी देतांना सदर विनियमातील तरतूदीनुसार आकारावयाच्या अधिमूल्याव्यतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात येऊ नये.

(ब) बृहन्मुंबईमध्ये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (९) व ३३ (१०) हे **विनियम** वगळता अन्य विनियमाअंतर्गत पुनर्विकासाच्या प्रकरणात परवानगी देताना निवासी/ वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनासाठी संबंधित शासकीय जमिनीच्या **प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील** दराने येणाऱ्या बाजार मुल्याच्या **२५%** दराने व शैक्षणिक/धर्मादाय प्रयोजनासाठी संबंधित जमिनीच्या अशा बाजारमूल्याच्या **१२.५%** अशा दराने अधिमूल्य आकारण्यात यावे.

(क) राज्यातील अन्य भागातही शासकीय जमिनीवरील पुनर्विकासास परवानगी देताना निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनासाठी अशा शासकीय जमिनीच्या **प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील** दराने येणाऱ्या बाजार मुल्याच्या **२५%** दराने व शैक्षणिक/धर्मादाय प्रयोजनासाठी संबंधित जमिनीच्या अशा बाजारमूल्याच्या **१२.५%** अशा दराने अधिमूल्य आकारण्यात यावे.

१.२ भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीचा पुनर्विकास करताना जमीन प्रदानाच्या मूळ मंजूर प्रयोजनात बदल होणार असेल तर पुनर्विकासापोटी शासनास वरीलप्रमाणे देय अधिमूल्याबरोबरच **वापरातील अशा बदलासाठी** प्रचलित धोरणाप्रमाणे **स्वतंत्रपणे अधिमूल्यही** आकारण्यात यावे.

१.३ भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीचा पुनर्विकास फक्त हस्तांतरणीय विकास हक्क किंवा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक विकत घेऊन होणार असेल तर वरीलप्रमाणे देय अधिमूल्याबरोबरच अशा हस्तांतरणीय विकास हक्क किंवा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यासाठी विकासकास **प्रचलित धोरणाप्रमाणे** अधिमूल्याची रक्कमही स्वतंत्रपणे आकारण्यात येऊन वसूल करण्यात यावी.

पृष्ठ ५ पैकी २

२. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनींचा पुनर्विकास करतांना मूळ वापरात बदल होत नसल्यास आणि असा पुनर्विकास संबंधित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी सुसंगत असल्यास **महानगर प्रदेश क्षेत्राबाहेरील** अशा जमिनींचा पुनर्विकास करण्यास परवानगी देण्याचे अधिकार **संबधित जिल्हाधिकारी** यांना प्रदान करण्यात येत आहेत, मात्र **महानगर प्रदेश क्षेत्रातील** अशा जमिनींचा पुनर्विकास करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने परवानगी देण्यापूर्वी **शासनाची मान्यता** घेणे आवश्यक राहील.

३. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीच्या पुनर्विकासाची परवानगी घेऊन जर परवानगीच्या तारखेपासून **३ वर्षात** काम सुरु केले नाही तर उक्त ३ वर्षाचा कालावधी संपल्यापासून काम सुरु होईपावेतो पुढील प्रत्येक वर्षासाठी अशा जमिनीच्या त्या-त्या वर्षी लागू असलेल्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराने येणाऱ्या मुल्यांकनाच्या **१% (एक टक्के)** या दराने अधिमूल्य आकारून जिल्हाधिकारी मुदतवाढ देऊ शकतील.

४. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनींच्या पुनर्विकासास सक्षम प्राधिकाऱ्याची **पूर्व परवानगी न घेता** पुनर्विकास करण्यात आला असेल किंवा पुनर्विकासास सुरुवात करण्यात आली असेल तर वर नमूद केल्याप्रमाणे अधिमूल्य आकारण्याबरोबरच असा पुनर्विकास नियमानुकूल करण्याचे आदेश पारित करण्याच्या वर्षासाठी लागू असलेल्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराप्रमाणे येणाऱ्या अशा जमिनीच्या किंमतीच्या **५% इतके वाढीव अधिमूल्य** वसूल करण्यात यावे.

५. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या पुनर्विकासास द्यावयाची परवानगी खालील तरतुदीस / अटीस अधीन राहील:-

अ) भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवर असलेल्या मूळ भाडेपट्टेधारकाचे/भोगवटादाराचे दायित्व संबंधित विकासकाला/ नियोजित संस्थेला स्वीकारावे लागेल. त्याबाबत शासन कोणतीही बांधिलकी स्विकारणार नाही.

ब) पुनर्विकासामुळे अशा जमिनीवरील भाडेकरुमध्ये बदल होत असल्यास त्याकरीता तसेच पुनर्विकासानंतर धारण केलेल्या सदनिका अथवा गाळे भविष्यात हस्तांतर / विक्री करण्यास अथवा पोटभाड्याने देण्यास परवानगी देण्याकरीता शासनाच्या प्रचलित धोरणातील तरतुदीनुसार हस्तांतरण शुल्क / अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात येईल. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्था जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी पुर्वानुमतीशिवाय सदर जमीन गहाण ठेवू शकणार नाही, तसेच हस्तांतरण करु शकणार नाही. अशा प्रस्तावित हस्तांतरणावर शासनाच्या महसूल व वन विभागाच्या प्रचलित धोरणातील तरतूदीनुसार अनर्जित उत्पन्न वसूल केल्याखेरीज अशा जमिनीच्या कोणत्याही हस्तांतरण प्रस्तावास मान्यता देता येणार नाही. त्याचप्रमाणे अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्याकडून होणाऱ्या त्याच्या सदनिकेच्या हस्तांतरणापोटी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण शुल्क जमा करणे अनिवार्य राहिल. तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्यास जिल्हाधिकारी यांच्या लेखी पुर्वानुमतीशिवाय त्याची सदनिका गहाण ठेवता येणार नाही.

पृष्ठ ५ पैकी ३

क) भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी देण्यात आली तरी मूळ जमीन प्रदान आदेशातील/भाडेपट्टाकरारातील, पुनर्विकास परवानगी आदेशातील शर्तीशी विसंगत नसलेल्या अटी व शर्ती संबंधितांवर बंधनकारक राहतील.

ड) पुनर्विकासाच्या प्रस्तावाला संबंधित नियोजन प्राधिकरण यांची मान्यता घेणे आवश्यक राहील व आवश्यकतेनुसार हेरीटेज कमिटीचेही "ना हरकत प्रमाणपत्र" घेणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकरणांनी मान्यता देतांना या संदर्भात विविध न्यायालयांनी दिलेले निर्देश विचारात घेणे आवश्यक राहील.

६. **पुनर्विकासाचे प्रस्तुत धोरण शासनाने बृहन्मुंबई क्षेत्रात व राज्यातील इतर जिल्ह्यात ज्या शासकीय जमिनी कब्जेहक्काने किंवा दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत, अशा शासकीय जमिनींना लागू राहील.**

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३४१/२०१६/व्यय-९, दिनांक ७.१२.२०१६ नुसार त्या विभागाच्या सहमतीने व नगर विकास विभागाच्या सहमतीने व दिनांक २३ मार्च, २०१७ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०४१३११३३१२८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2017.04.13 18:48:43 +05'30'

(मनु कुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)

प्रत,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.मुख्य संचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-३२

पृष्ठ ५ पैकी ४

अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग), मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव (नगरविकास-१), मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१)- मुंबई/महाराष्ट्र (२)- नागपूर
प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा) महाराष्ट्र (१)- मुंबई/महाराष्ट्र (२) -नागपूर
सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती, कार्यासन/ज-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय मिळकतींच्या हस्तांतरणास परवानगी देणे व अशा मिळकतींच्या विना परवाना हस्तांतरणामुळे झालेले शर्तभंग नियमानुकूल करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१६/प्र.क्र.१६/ज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १४ जून, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/प्र.क.४०५/ज-२, दि.१२.१२.२०१२

२) शासन राजपत्र दि.२२.८.२०१६ मधील अधिसूचित सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या प्रकरण चौदा मध्ये मुंबई शहर जिल्ह्यातील जमीन महसुलासाठी विशेष तरतुदींचा अंतर्भाव आहे. त्यातील कलम २९५ हे मुंबई शहर जिल्ह्यातील राज्य शासनाकडे निहित असलेल्या जमिनीची किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशाची विल्हेवाट लावण्याशी संबंधित आहे. उक्त संहिता अंमलात येण्यापूर्वीदेखील मुंबई शहर जिल्ह्यात शासनाचे अनेक भूखंड विविध प्रयोजनांसाठी विविध व्यक्ती आणि संस्था यांना भाडेपट्टयावर देण्यात आले आहेत. यातील बऱ्याच प्रकरणांत, असे पट्टे हस्तांतरीत किंवा अभिहस्तांकित करण्यात आलेले आहेत.

सध्या, अशा शासकीय जमिनींच्या पट्टेदारी अधिकारांच्या अभिहस्तांकनाच्या किंवा हस्तांतरणाच्या प्रकरणातील अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा हा राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आकारला जातो आणि वसूल केला जातो. संबंधित पट्टेदारी अधिकारांच्या हस्तांतरणाच्या किंवा अभिहस्तांकनाच्या कोणत्याही प्रकरणात अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा वसूल करण्याच्या शासनाच्या अधिकारांबाबत कोणतीही शंका घेण्यास वाव राहू नये या उद्देशाने, अशा कोणत्याही शासकीय जमिनीतील आपला पट्टेदारी अधिकार हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करण्यापूर्वी पट्टाधारकास जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य असेल, जिच्यासाठी शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या दराने अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा शासनास देय असेल अशा विनिर्दिष्ट तरतुदींचा, तसेच अशा पट्टयांच्या हस्तांतरणाच्या किंवा अभिहस्तांकनाच्या आधीच्या व्यवहारांना, शासन विनिर्दिष्ट करेल अशा दराने अतिरिक्त शास्तीची रक्कम आकारुन त्याद्वारे ते नियमाधीन करण्यासंबंधातील तरतुदींचा समावेश महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९५ मधील तरतूदीत सदंर्भाधीन क्र.२ येथे नमूद महाराष्ट्र अधिनियम क्र.२९/२०१६ अन्वये करण्यात आलेला आहे. यामध्ये असे पट्टामुल्य व हस्तांतरण शुल्क किंवा आकार शासनाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील असे नमूद केलेले आहे. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९५ मध्ये महाराष्ट्र अधिनियम क्र.२९/२०१६ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. यामध्ये शासकीय जमिनीच्या पट्टेदारी अधिकारांच्या अभिहस्तांकनाच्या किंवा हस्तांतरणाच्या प्रकरणातील पट्टामुल्य व हस्तांतरण शुल्क किंवा आकार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

१) शासनाने प्रदान केलेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे हस्तांतरण शासनाच्या किंवा जिल्हाधिका-यांच्या पूर्वपरवानगीने झालेले असेल किंवा भाडेपट्टा करारामध्ये केलेल्या तरतुदीनुसार विहित कालावधीत जिल्हाधिकारी यांना हस्तांतरणाबाबत सूचित करण्यात आलेले असेल अशा प्रकरणी अशा जमिनीच्या **प्रचलित वार्षिक मुल्य दर तक्त्यातील** किंमतीच्या **२५%** एवढी रक्कम **अनर्जित उत्पन्नापोटी पट्टामूल्य** म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी व अशा किंमतीच्या **१%** एवढी रक्कम **हस्तांतरण शुल्क** म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

२) ज्या प्रकरणांत भाडेपट्टयाच्या हक्कांच्या हस्तांतरणासाठी शासनाची पुर्वपरवानगी आवश्यक असल्याची अट भाडेपट्टाकरारात असतानाही शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय भाडेपट्टयाचे हस्तांतरण करण्यात आले आहे, अथवा ज्या भाडेपट्टाकरारामध्ये असे हस्तांतरण झाल्यानंतर ठराविक कालावधीत अशा हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्याची किंवा सुचना देण्याची तरतुद असून सुद्धा अशा हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी यांना भाडेपट्टा करारात नमूद केलेल्या विहित कालावधीत कळविण्यात किंवा सुचित करण्यात आले नसेल अशा प्रकरणात असे अनियमित हस्तांतरण नियामानुकूल करण्यासाठी **दस्त झाल्याच्या दिनांकाच्या वार्षिक मुल्य दर तक्त्यातील** दराप्रमाणे येणारी सदर जमिनीची किंमत किंवा प्रत्यक्ष व्यवहारातील जमिनीची किंमत यापैकी **जी जास्त असेल त्या किंमतीच्या २५%** एवढी रक्कम अनर्जित उत्पन्नापोटी शासनास देय पट्टामूल्य म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी व **तेवढीच रक्कम शास्तीपोटी** आकारण्यात व वसूल करण्यात यावी व अशा किंमतीच्या **१%** एवढी रक्कम **हस्तांतरण शुल्क** म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

३) मुंबई शहर जिल्ह्यामध्ये या पूर्वी शासनाने भाडेपट्टयानेच बहुतांश जमिनींचे प्रदान केले आहे. अशा जमिनींपैकी काही जमिनींचे रुपांतरण संदर्भाधीन शासन निर्णय क्र. जमीन-२५०५/प्र.क.४०५/ज-२, दि.१२.१२.२०१२ मधील तरतुदीप्रमाणे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर होऊ शकते. अशा रुपांतरीत झालेल्या शासकीय जमिनींचे हस्तांतरण जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वानुमतीने होत असल्यास **प्रचलित वार्षिक मुल्य दर तक्त्यातील** दरानुसार येणाऱ्या अशा जमिनीच्या किंमतीच्या **१२.५%** एवढी रक्कम अनर्जित रकमेपोटी शासनाचा हिस्सा म्हणून व अशा किंमतीच्या **१%** रक्कम हस्तांतरण शुल्क म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

पृष्ठ ४ पैकी २

अशा रुपांतरीत धारणाधिकाराच्या जमिनींचे **विनापरवाना हस्तांतरण** झाले असल्यास ते नियमानुकूल करीत असतांना **अशा बेकायदेशीर हस्तांतरणाच्या दिनांकास लागू वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे** होणाऱ्या अशा जमिनीच्या किंमतीच्या **६२.५%** एवढी रक्कम अनर्जित रकमेपोटी शासनाचा हिस्सा म्हणून व अशा किंमतीच्या **२.५%** रक्कम हस्तांतरण फी म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१५९/व्यय-९, दिनांक ३.६.२०१७ अन्वये व त्या विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाने दि.७.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१७०६१४१६४८२५५२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2017.06.14 19:32:59 +05'30'

(मनु कुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१०) प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१२) नोंदणी महानिरिक्षक, मुद्रांक विभाग, पुणे.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

१४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
१५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
१८) सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) सर्व "ज" समूह कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (कार्यासन ज-२).

जमीन-मुंबई शहर
मुंबई शहरातील भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील भाडेपट्टा करारातील अटी व शर्तींचे शर्तभंग नियमित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१८/प्र.क्र.५/ज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ नोव्हेंबर, २०१८

वाचा :-

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलबीआर.२५९४/प्र.क्र.४४४/ज-२, दि.३१.७.१९९५.

प्रस्तावना :-

०१. मुंबई शहर जिल्ह्याच्या हद्दीमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने दिल्या आहेत. भाडेपट्टाकरारनामा व प्रचलित कायदे, नियम यांच्या आधारे या जमिनींचा वापर, हस्तांतरण, त्यावरील बांधकाम, त्रयस्थ पक्षांचे हितसंबंध, भाडेपट्ट्याचे नुतणीकरण, पुनर्विकास व इतर सर्व बाबी नियंत्रित केल्या जातात. भाडेपट्ट्याने अशा प्रकारे दिलेल्या शासकीय जमिनींबाबत झालेले बव्हंश शर्तभंग नियमित करण्यासाठी किंवा अशा शर्तभंगाच्या अनुषंगाने भाडेपट्टाधारकांवर कार्यवाही करण्यासाठी शासनाची धोरणे, नियम, कायद्यातील तरतुदी अस्तित्वात आहेत. मात्र ज्या प्रकारच्या शर्तभंगाबाबत शासनाचे विवक्षित धोरण नाही, अशा शर्तभंगाबाबत काय कार्यवाही करावी या बाबत महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलबीआर२५९४/प्र.क्र.४४४/ज-२, दि.३१.७.१९९५ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अध्यक्षतेखाली "ब्रिचेस कमिटीची" स्थापना करण्यात आलेली आहे. सदर ब्रिचेस कमिटीने झालेल्या शर्तभंगाचा प्रकरणनिहाय आढावा घेऊन अशा शर्तभंगासाठी दंड निश्चित करणे व सदर दंड आकारणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनास मान्यतेस्तव पाठविणे दि.३१.७.१९९५ च्या या शासन निर्णयान्वये अपेक्षित आहे. या शासन निर्णयान्वये कोणत्या प्रकारच्या शर्तभंगासाठी किती दंड आकारावा या बाबतची मार्गदर्शक तत्त्वे विहित केलेली नाहीत. त्याचबरोबर अशा शर्तभंगाच्या प्रत्येक प्रकरणामध्ये ब्रिचेस कमिटीच्या शिफारशीला शासनाने मान्यता देणे प्रशासकीय सुलभता व उद्योग सुगमतेच्या शासनाच्या धोरणाशी सुसंगत नाही, त्यामुळे दि.३१.७.१९९५ चा उपरोक्त शासन निर्णय अधिक्रमित करुन मुंबई शहरात भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींबाबत ज्या शर्तभंगाबाबत विवक्षित धोरण/नियम/तरतूद नसल्याने असे शर्तभंग नियमित करतांना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी कोणत्या तत्त्वांचा विचार करावा याबाबत निर्देश देण्याचे तसेच असे शर्तभंग नियमित करण्याचे अधिकार

सन निर्णय क्रमांकः जमीन-२५१८/प्र.क्र.५/ज-२

ाल्हाधिकारी, मुंबई शहर यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन आता ालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

ासन निर्णय :-

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलबीआर.२५९४/प्र.क.४४४/ज-२, दि.३१.७.१९९५ द्वारे रद्द करण्यात येत आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील भाडेपट्टा करारातील अटी व र्तींचे शर्तभंगांच्या प्रकरणांमध्ये अशा शर्तभंगाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी खालीलप्रमाणे डाची रक्कम आकारून शर्तभंग नियमित करावा.

.क्र.	शर्तभंगाचा प्रकार	शर्तभंग नियमित करण्यासाठी करावयाची कार्यवाही
	विनापरवानगी बांधकाम : - भाडेपट्टा करारनाम्यामध्ये नमूद असल्यास त्यापेक्षा जादाचे किंवा सक्षम प्राधिकारी अथवा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची पूर्वपरवानगी न घेता केलेले बांधकाम.	सक्षम प्राधिकाऱ्याच्या अथवा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय करण्यात आलेल्या अशा बांधकामाच्या प्रचलित वार्षिक बाजारमुल्यदर तक्त्यानुसार येणा-या किंमतीच्या २% इतकी रक्कम दंड म्हणून आकारुन असा शर्तभंग नियमित करण्यात यावा. मात्र, अशा प्रकारचे शर्तभंग नियमित करतांना भाडेपट्टेधारकाने सदर बांधकामास संबंधित नियोजन प्राधिकरणाची वेगळी मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच शर्तभंग नियमित करण्यात आल्यानंतरही अशा बांधकामासाठी नियोजन प्राधिकरणाची परवानगी आवश्यक राहील.
२	भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींवरील रहिवाशी सदनिकांचा वाणिज्यिक वापर सक्षम प्राधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय होत असल्यास.	सक्षम प्राधिकाऱ्याच्या अथवा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींवरील रहिवाशी सदनिकांचा अनुज्ञेय वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापर केला असल्यास अशा सदनिकेच्या प्रचलित वार्षिक बाजार मूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या किंमतीच्या २% इतकी रक्कम दंड म्हणून आकारून शर्तभंग नियमित करण्यात यावा.

शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१८/प्र.क्र.५/ज-२

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३३०/व्यय-०९/२०१८ दिनांक ७.९.२०१८ व त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८११०६१२१८५३८२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679f8cd85d90c6149Sae8b4592fBdcc5b8a85136, serialNumber=aa3985b8c1804418574f1871e99089341b35fbd2a70Saaf56c57fbd437a59270d, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2018.11.06 14:16:49 +05'30'

(राजेंद्र क्षीरसागर)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६) अप्पर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
७) विभागीय आयुक्त, कोकण विभाग
८) जिल्हाधिकारी, मुंबई शहर
९) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१०) प्रधान सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
११) नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र रांज्य, पुणे
१२) प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई/महाराष्ट्र (२),नागपूर
१३) प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा), महाराष्ट्र (१), मुंबई/ महाराष्ट्र (२), नागपूर
१४) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) निवडनस्ती, ज-२ कार्यासन, महसूल व वन विभाग

****

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुख्य इमारत, १ ला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र.०२२-२२८२ १३७३ ई-मेल:- j2.revenue@maharashtra.gov.in

क्र.विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, दि. १० एप्रिल, २०२६.

प्रति,

कक्ष अधिकारी
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई.

13/04/26

विषय : सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक १५६

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ च्या तृतीय हिवाळी अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र. १५६ च्या पुर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्रामधील ३५ प्रती सोबत जोडल्या आहेत.

आपला,

(मिलिंद वि. दुबे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. कक्ष अधिकारी (समन्वय-१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. निवडनस्ती (जमिन-२)

आश्वासन क्रमांक १५६

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्र : सी/कार्या-३ डी/आश्वासन क्र.१५३ ते १५८/२०२५

दिनांक : 12 FEB 2025 /०२/२०२५

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय

विषय : जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
विधानपरीषद आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ (सन २०२३ चे ३रे हिवाळी आधिवेशन)

- मुंबई उपनगर जिल्ह्यात शासकीय भाडेपट्ट्याच्या एकुण ३५९ मिळकती आहेत.
- त्यापैकी २२३ मिळकर्तीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला होता:
- सदर २२३ मिळकतीपैकी एकुण ४२ मिळकतीच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करणेत आले आहे.
- तसेच २० मिळकर्तीचे भोगवटादार वर्ग -२ मध्ये रुपांतरण करणेत आले आहे.
- तसेच ३३ मिळकर्तीचे वर्ग-१ मध्ये रूपांतरण करणेत आले आहे.
- भाडेपट्ट्याचे नूतनीकरण व भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करतेवेळी ११ प्रकरणांमध्ये शर्तभंग आढळून आलेले आहेत. सदर शर्तभंग नियमानुकूल करणेत येवून खालील प्रमाणे रक्कम वसूल करणेत आलेली आहे.

अ.क्र.	तपशील	रकम रु.
१.	विनापरवाना हस्तांतरण नियमानुकूल करणे	३१,९१,१०,८३०/-
२.	विनापरवाना पुनर्विकास नियमानुकूल करणे	निरंक
३.	विनापरवाना वापर बदल नियमानुकूल करणे	निरंक
४.	नूतनीकरणाबाबत विहित मुदतीत न कळविल्याने दंड आकारणी करणे	निरंक
५.	विनापरवानगी अतिरिक्त बांधकाम नियमानुकूल	निरंक
	एकूण :-	३१,९१,१०,८३०/-

शासन पत्र दिनांक २४/०२/२०२३ नुसार शासकीय भाडेपट्ट्याच्या मिळकतीमधील शर्तभंग नियामानुकूल करणेकरीता शासन सक्षम प्राधिकारी आहे.

शासन पत्र दि.१२/०२/२०२५ अन्वये शर्तभंग तपासणी करणेकरीता विशेष मोहिम राबविण्याबाबत निर्देश दिलेनूसार या कार्यालयामार्फत विशेष मोहीम राबवून पुढील तीन महिन्यात सर्व शासकीय भाडेपट्ट्याच्या मिळकतींची तपासणी करणेत येऊन आढळून आलेल्या शर्तभंगाच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेची तजविज ठेवण्यात येत आहे.

सदरील माहिती या कार्यालयातील उपलब्ध अभिलेखावरुन देण्यात आलेली आहे.

12/02/25

(सतीश बागल)
निवासी उपजिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
(महसूल शाखा)

स्पीड पोस्ट

क्र.सीएसएलआर/मशा-१/टे-२/माझगाव/भु. क्र.३६५व ३६९/२०२५/3353
दिनांक - २७/०२/२०२५.

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव (महसूल),
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- विधानपरिषद आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ (सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन)
माझगांव येथील भुखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणेबाबत..

संदर्भ : - आपेकडील पत्र क्र. विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२,दि.२७.०२.२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये, सर्वश्री सचिन अहीर व इतर वि. प. स. यांनी म. वि. प. नियम १०१ अन्वये दिलेल्या सूचना क्र. ५४८ अन्वये माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी सन २०२३ च्या तृतीय हिवाळी अधिवेशनात मा. मंत्री (महसूल) यांनी आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ यासंबंधी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक ११.०२.२०२५ रोजी अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ चा प्रस्ताव मा. मंत्री (महसूल) यांना सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्तावामध्ये मा. मंत्री (महसूल) यांनी सदर प्रकरणाबाबत सद्यस्थिती मागवावी असे निर्देश दिलेले आहेत. तरी आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ बाबतची सद्यस्थिती आजच उपलबध करुन देण्यात यावी असे कळविले आहे.

त्याअनुषंगाने, महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ बाबतच्या सद्यस्थितीचा अहवाल / विवरणपत्र आपणांकडे माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

सोबत : विवरण पत्र अहवाल व सहपत्रे.

(संजय यादव),
O/C जिल्हाधिकारी, मुंबई शहर.

विधान परिषदेने दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीसंबधी विवरणपत्र

सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पुर्ण करण्यात आले. त्याबाबतचे आदेश, निर्णय असल्यास त्याचा दिनांक (प्रत सोबत जोडावी)	आश्वासन पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन पूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासन पूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ-या अधिकाऱ-यांवर केलेली कारवाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१५३ १५४ १५५ १५६ १५७ १५८	विधानपरिषद कामकाज खंड :- २०३ क्रमांक :- ७ दिनांक :- १५ डिसेंबर २०२३ माननीय मंत्री/राज्यमंत्री श्री. यांनी दिलेले उत्तर	माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यासंबधी... सर्वश्री. सचिन अहीर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५४८	मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५३. सभापती महोदया, नियमाचे उल्लघंन झाले आहे. अनधिकृत वापर होत आहे. अशा सर्व जमिनींच्या बाबतीत विशेष मोहिम घेऊन सर्व जमिनी शासनाकडे जमा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५४.सदर विषयाबाबतची संपूर्ण माहिती घेऊन लोकहिताच्या दृष्टीने त्यांच्याही पुनर्वसनाच्या बाबतीत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५५.सर्व प्रकरणांमध्ये दिरंगाई का झाली, दोषी कोण आहेत, नियमबाहय पध्दतीने नुतनीकरणाचे अधिकार नसताना परवानगी देणारे कोण आहेत याची चौकशी केली जाईल आणि दोषीवर कारवाई केली जाईल. मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५६.विशेष मोहिम घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५७.जे लोक आहेत त्यांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल.	मुंबई शहर जिल्हयात शासकीय भाडेपट्टयाच्या एकूण १३०७ मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी ६९१ मिळकर्तींचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या मिळकतीपैकी २८५ मिळकर्तींची तपासणी करण्यात आलेली असून त्यामध्ये २२८ प्रकरणांमध्ये शर्तभंग आढळून आलेला आहे. २८५ तपासणी करण्यात आलेल्या प्रकरणांपैकी १२१ प्रकरणांत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टा नुतनीकरण करुन एकूण थुईभाडे रक्कम रुपये ८९,२३,०४,०९३/- इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर १२१ प्रकरणांपैकी ६४ प्रकरणांत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शर्तभंग नियमानुकूल करण्यात आलेला आहे. व त्यामधून शासनास रक्कम रुपये २११,१२,५२,१८९/- इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. तसेच ७९ प्रकरणांत भाडेपट्टयाच्या मिळकतीचे भोगवटादार वर्ग – १ मध्ये रुपांतरणाच्या प्रकरणातून शासनास रक्कम रुपये ८३०,६९,४३,५६६/- इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. उर्वरित एकूण १६४ शर्तभंगाची प्रकरणे शासनास सादर करण्यात आलेली आहेत. तसेच	- - - - -	- - - - -	- - - - -	- - - - -	- - - - -

			मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५८.सभापती महोदया, आपण ज्या सूचना केल्या त्यानुसार सर्व जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येतील. अशा सर्व शासकीय भूखंडासंदर्भात जेथे अतिक्रमण झाले असेल बेकायदेशीर कब्जा घेतला असेल, मुदत संपली असेल, त्यासाठी जी कारवाई करण्याची आवश्यकता आहे ती करण्यात येईल.	शर्तभंगाखाली ६ प्रकरणे सरकार जमा करण्यात आलेली आहेत. त्याबाबत उच्च न्यायालय व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ या दोन्ही निवडणूकींच्या कामकाजामुळे उर्वरित राहिलेले भाडेपट्टयाच्या मिळकर्तीच्या शर्तभंगाची तपासणी पुर्ण होवू शकली नाही. उर्वरित मिळकर्तीच्या तपासणीकरिता शासनाने दिलेल्या निर्देशानुसार विशेष मोहिम हाती घेण्यात आलेली असून जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील दिनांक १२.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शर्तभंग तपासणीकरिता ५ पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार आजतागायत एकूण २७६ इतक्या मिळकर्तीची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी २४ प्रकरणांत ७- मोबाईल टॉवर, १७- विना परवाना बांधकाम आढळून आलेले आहे. नुतनीकरणाची कार्यवाही करतेवेळी कागदपत्रे तपासून विनापरवाना हस्तांतरणाबाबतचा शर्तभंगाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेची तजविज ठेवण्यात येत आहे.					

(संजय यादव)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
(महसूल शाखा)

क्र.सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तांव भाडेपट्टा नुतनीकरण/भू.क्र. ३६५ व ३६९/२०२५, दिनांक :- १२/०६/२०२५ /१५०६

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव (महसूल),
महसूल व वन विभाग,
पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

संक्र. 22e/24/51-2
20/6/25

विषय : माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या मिळकतीचे भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत..

संदर्भ :-
१) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, दिनांक २४.०३.२०२५.
२) या कार्यालयाकडील नोटीस क्र.सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६५/२०२५/६९९, दि.२८.०३.२०२५.
३) या कार्यालयाकडील नोटीस क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/ हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६९/६९८, दिनांक २८.०३.२०२५.
४) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. विपआ-२५२४/प्र.क्र. ०२/ज-२, दिनांक ०७.०४.२०२५.
५) जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांचेकडील दि. १५.०३.२०२५ रोजीचा अर्ज.
६) श्री किरीट साधू, विभाग प्रमुख, मलबार हिल काँग्रेस कमिटी यांचेकडील दि. २५.४.२०२५ रोजीचा अर्ज.
७) या कार्यालयाकडील ज्ञाप दिनांक २८.०४.२०२५.
८) परिरक्षण भूमापक यांचेकडील दिनांक ०२.०५.२०२५ रोजीचा अहवाल.
९) या कार्यालयाकडील नोटीस क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव /हस्तां व भाडेपट्टा व नुतनीकरण/भु.क्र.३६५ व ३६९/२०२५/११७४, दि. ०६.०५.२०२५

अ. मु. स. (महसूल) क्रमांक:२३२ दिनांक: २३/०६/२०२५

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्रमांक १ व ४ च्या अनुषंगाने, सदर पत्रासोबत दिनांक २५.०३.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तानुसार माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या भाडेपट्टयाच्या शासकीय

मिळकतीबाबत मा. मंत्री (महसूल) महोदय यांच्याकडे दिनांक २५.०३.२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा. मंत्री (महसूल) महोदय यांनी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना सात दिवसांची लेखी नोटीस देवून भाडेपट्टाधारक यांचा खुलासा घेऊन अहवाल स्वयंस्पष्ट शिफारशीसह सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

मिळकतीची पार्श्वभूमी :-

माझगांव महसूल विभागातील भुकर क्र. ३६५, क्षेत्र ७२५.७६ चौ. मी. ही मिळकत शासनाने दि.१२/०४/१९१० रोजीचे भाडेपट्टयाने दिनांक ०१/०१/१९०३ पासून ९९ वर्षासाठी Bai Mithibai Wife Of Merwanji Dhunjibhoy Merwanji Jeejeebhoy यांना भाडेपट्टयानी दिलेली होती.

माझगांव महसूल विभागातील भूकर क्र. ३६९, क्षेत्र ९१५४.१० चौ. मी. ही मिळकत शासनाने दि. ०४/०९/१९०९ रोजीचे भाडेपट्टयाने दिनांक ०१/०१/१९०३ पासून ९९ वर्षासाठी Bai Mithibai Wife Of Merwanji Dhunjibhoy Merwanji Jeejeebhoy यांना भाडेपट्टयानी दिलेली होती. दोन्ही मिळकतींचा भाडेपट्टा दि. ३१/१२/२००२ रोजी संपुष्टात आलेला आहे.

शासन निर्णय दिनांक १२.१२.२०१२ अन्वये भाडेपट्टा नुतनीकरण धोरण जाहीर करण्यात आले असून माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या मिळकतीबाबत भाडेपट्टाधारक Awabai W/o Muncherji Musserwanji Cama, व इतर ३ यांना दिनांक १५/०६/२०१३ अन्वये सदर मिळकतीच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण / भाडेपट्टयाचे रुपांतरण कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या सत्ताप्रकाराने धारण करणेबाबतचा विकल्प या कार्यालयास सादर करणेविषयी कळविले होते. त्यानुसार जे. पी.एम.जीजाभॉय ट्रस्ट यांनी दिनांक २२/१०/२०१६ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीचा भाडेपट्टा नुतनीकरणाकरिता विकल्प सादर केलेला आहे.

त्यानुषंगाने सदर मिळकतीचे भाडेपट्टाधारक जे.पी.एम.जीजाभॉय ट्रस्ट यांना दिनांक १५/१०/२०१८, दिनांक ०४/०१/२०१९ व दिनांक २१/०१/२०१९ रोजी सुनावणी देणेत आली. सदर सुनावणीच्या अनुषंगाने भुकर क्रमांक ३६५ या मिळकतीबाबत अंतरिम आदेश क्र. सीएसएलआर/मशा-४/टे-२/माझगांव/भु.क्र.३६५ /भा.नु./२०१९ /१५९५८, दिनांक १५.१०.२०१९ अन्वये मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबतचे रक्कम रुपये ८२,२९,६७८/- शासनखाती भरणा करणेकामी आदेश पारित करण्यात आले. तसेच भुकर क्रमांक ३६९ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील आदेश क्र. सीएसएलआर/मशा-४/टे-२/माझगांव/भु.क्र. ३६९/भा.नु. /२०१९ /१५९५९, दिनांक १५.१०.२०१९ अन्वये मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबतचे रक्कम रुपये ५,६१,७३,८१०/- भरणा करणेकामी आदेश पारित करण्यात आले आहेत.

प्रकरणी, भुकर क्र. ३६५ व ३६९ या मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या आदेशातील रक्कम विहित कालावधीत शासनखाती भरणा न केल्याने या कार्यालयाकडील दिनांक १५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, जमीन महसूल वसूली शाखा यांना सदर आदेशातील रक्कम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७, २६८ व २६९ मधील तरतूदी नुसार सक्तीने वसुल करणेकामी कळविणेत आलेले होते. त्याअनुषंगाने सदर मिळकतींबाबत तहसिलदार जमीन महसूल वसूली शाखा यांनी दिनांक ०६.०८.२०२१ रोजी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७ अन्वये नोटीस दिली होती. त्यावर एल. आर. अॅण्ड असोसिएट यांचेकडील दिनांक ०३.०९.२०२१ रोजीचा अर्जान्वये कोविड महामारीमुळे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल करण्यास विलंब झाला असे नमूद केले आहे.

तहसिलदार जमीन महसूल वसूली शाखा यांनी दिनांक २७.०९.२०२१ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७ अन्वये वॉरंट निर्गमित केले. भुकर क्रमांक ३६५ या मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या आदेशातील रक्कम विहित कालावधीत भरणा न केल्यामुळे या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण /भु. क्र. ३६५/२०२१, दिनांक २१.१२.२०२१ अन्वये भुईभाडयाची रक्कम व्याजासह रक्कम रुपये १,११,५५,५०६/- शासनखाती भरण्याबाबत अर्जदारास कळविण्यात आले होते. तसेच भुकर क्र. ३६९ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण /भु. क्र. ३६५/२०२१, दिनांक २१.१२.२०२१ अन्वये भुईभाडयाची रक्कम व्याजासह रुपये ८,४५,६६,१९१/- शासनखाती भरण्याबाबत अर्जदारास कळविण्यात आले होते. तद्नंतर जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट यांच्यावतीने अॅड आसीफ फयाझ खान यांनी दिनांक ०८.०२.२०२२ रोजी रक्कम भरणाकरणेकामी तहसिलदार, जमीन महसूल वसूली शाखा यांच्याकडे हमीपत्राव्दारे हमी दिली होती.

प्रकरणी एल. आर. अॅण्ड असोसिएट यांचेकडील दिनांक २१.०३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये भूकर क्र. ३६५ या मिळकतीबाबत धनादेश क्र. २१३१९९, दिनांक २१.०३.२०२२ अन्वये रक्कम रुपये ५०,००,०००/- शासनखाती भरण्यात आल्याचे कळविण्यात आले होते. या कार्यालयाकडील अभिलेख पाहता चलन क्र. GRN MH०१५०१७०२४२०२१२२M, दिनांक २२.०३.२०२२ अन्वये रक्कम रुपये ५०,००,०००/- भरण्यात आली आहे.

प्रकरणी या कार्यालयाकडील दिनांक ०२.०१.२०२३ अन्वये अर्जदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७ अन्वये प्रलंबित रक्कम विहित कालावधीत भरण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू अर्जदार यांनी उर्वरित रक्कम शासनखाती भरणा न केल्याने या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-१/टे-२/माझगांव/भु. क्र. ३६५/शा. ज./२०२३/ २१६४७, दिनांक ०५.१२.२०२३ व या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-१/टे-२/माझगांव/भु. क्र. ३६५/शा. ज./२०२३/ २१६४७, दिनांक ०५.१२.२०२३ अन्वये भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना अंतिम नोटीस देवून माझगांव महसूल विभागातील भुकर क्र.

३६५ व ३६९ या मिळकती महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३ व ५४ नुसार सरकार जमा करणेत का ेऊ नये ? याबाबतचा खुलासा नोटीस मिळालेपासून ७ दिवसाचे आत करावा व लेखी खुलाशासह दिनांक १२.१२.२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने, दिनांक २२.१२.२०२३ रोजीच्या सुनावणीस भाडेपट्टाधारकाच्या वतीने ॲड. लेवी रुबेल्स हे उपस्थित राहून त्यांनी लेखी म्हणणे सादर केले असून लेखी म्हणण्यानुसार भाडेपट्टाधारक / रोजी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट हे शासकीय मिळकतीचे भाडेपट्टा नुतनीकरण करण्यास तयार असून नुतनीकरणाबाबतची अंतिम रक्कम कळविल्यापासून १० दिवसाच्या आत सदरची रक्कम शासनखाती भरण्याबाबत तयार आहोत असे लेखी म्हणण्यात नमूद करण्यात आले आहे.

प्रकरणी मा. श्री सचिन अहिर, वि. प. स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५०४ व मा. श्री सचिन अहिर, मा. श्री अमोल मिटकरी, मा. श्री विक्रम काळे, वि. प. स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५४८ च्या लक्षवेधी (महाराष्ट्र विधानपरिषद, सन २०२३ चे तृतीय अधिवेशनात) मध्ये माझगांव महसूल विभागातील भूकर क्र. ३६५, ७२५.७६ चौ. मी. व भूकर क्र. ३६९, क्षेत्र ९१५४.१० या शासकीय मिळकतीच्या अनुषंगाने अधिवेशना दरम्यान लक्षवेधी केली होते. सदर लक्षवेधीच्या अनुषंगाने मा. महसूल मंत्री महोदय यांनी मिळकत सरकार जमा करणेचे सभागृहामध्ये आश्वासित केले होते.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक १०.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास माझगांव महसूल विभागातील भुकर क्र. ३६५ व भुकर क्र. ३६९ या शासकीय मिळकतींचे भाडेपट्टाधारक यांनी सुनावणी दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने भाडेपट्टा नुतनीकरणाची रक्कम भरणा करुन घ्यावी ? किंवा सदरची मिळकत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३ व ५४ नुसार शासन जमा करण्यात यावी याबाबत शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत कळविण्यात आले होते.

मा. आ. अमोल मिटकरी, म. वि. स. यांचेकडील दिनांक ०४.०१.२०२४ व दिनांक ०३.०६.२०२४ तसेच मा. आ. सचिन अहिर, म. वि. स. यांचेकडील दिनांक ०५.०१.२०२४ व दिनांक १८.०३.२०२४ रोजीच्या निवेदनांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र दिनांक ३०.०१.२०२४, दिनांक १६.०४.२०२४ व दिनांक २६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांनी विनंती केल्यानुसार शासनखाती रक्कम जमा करुन घ्यावी किंवा सदरची मिळकत शासन जमा करण्यात यावी, याबाबत शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. जमीन-२५२४/२४/प्र.क्र.०४/ज-२, दिनांक २८.०८.२०२४ व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. जमीन-२५२४/२४/प्र.क्र.०५/ज-२, दिनांक २८.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अनुक्रमे भुकर क्रमांक ३६५, क्षेत्र ७२५.७६ चौ. मी. व भुकर क्रमांक ३६९, क्षेत्र ९१५४.१० चौ. मी. या भाडेपट्टयाच्या शासकीय मिळकतीचे भाडेपट्टाधारक यांची विनंती विचारात घेऊन शासनाच्या

H 3170.pdf - 45 a

प्रचलित धोरणानुसार नुतनीकरणाची रक्कम भरणा करुन भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात यावी असे शासन स्तरावरुन कळविण्यात आले होते.

प्रकरणी, भुकर क्रमांक ३६५ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील दिनांक १२.०९.२०२४ रोजीच्या सुनावणी नोटीस अन्वये सदर मिळकतीच्या नुतनीकरणाकरिता रक्कम रुपये ९५,७४,२७०/- व भुकर क्र. ३६९ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील दिनांक १२.०९.२०२४ रोजीच्या सुनावणी नोटीस अन्वये सदर मिळकतीच्या नुतनीकरणाकरिता रक्कम रुपये १३,२८,६९,१४०/- एवढे शासनखाती भरणा करणे आवश्यक असून सदर आकारणीबाबत आपणांस काही आक्षेप असल्यास लेखी खुलाश्यासह दिनांक २०.०९.२०२४ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत अर्जदार यांना निर्देशित करण्यात आले होते. दिनांक ०१.१०.२०२४ रोजीच्या सुनावणीत जे.पी.एम.जी. जीजाभॉय ट्रस्ट यांचे वतीने ॲड. लेवी रुबेल्स यांनी सदर मिळकतीच्या नुतनीकरण करणेकामी आवश्यक असलेले शुल्क शासनखाती भरण्यास तयार असल्याबाबत सांगितले असून त्याबाबतचे लेखी निवेदन देखील सादर केले आहे.

प्रकरणी, या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६५/२०२४/१७०५३, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये भूकर क्र. ३६५ या भाडेपट्टयाच्या शासकीय मिळकतीबाबत भविष्यात शासनाचे आदेश अंतिम राहतील या अटीच्या अधीन राहून सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाकरिता व्याजासह एकूण रक्कम रुपये ९५,७४,२७०/- व या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६९/ २०२४/१७०५२, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये भूकर क्र. ३६९ या भाडेपट्टयाच्या शासकीय मिळकतीबाबत भविष्यात शासनाचे आदेश अंतिम राहतील या अटीच्या अधीन राहून सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाकरिता व्याजासह एकूण रक्कम रुपये १३,२८,६९,१४०/- हे हे शासनाच्या तिजोरीत RDC Mumbai city यांचे नांवे शासकीय जमा लेखांकन (GRAS) प्रणालीद्वारे भरणा करण्यात यावी. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे र. रुपये ५००/- च्या मुद्रांक पेपरवर हमीपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

प्रकरणी मा. राहूल रमेश शेवाळे, माजी खासदार यांचेकडील दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांना प्रतिलिपीत करण्यात आलेल्या निवेदनाच्या मुखपृष्टावर मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी "प्र. स. विधी व न्याय चौकशीसह सादर करावी" अशी निवेदनाची प्रत निवेदनासोबत संलग्न केलेली आहे. (प्रत संलग्न) सदर निवेदनान्वये, माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकतीबाबत शासनाची परवानगी शिवाय जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट व खाजगी विकासक यांच्या मध्ये अंतर्गत करारनामा नोंदणीकृत दस्तऐवज झाल्याचे निर्दशनास आले आहे. शासनाची जमीन सदर ट्रस्टने खाजगी विकासक प्रतिक जैन यांना ४०० कोटी रुपयांना विकल्याचे स्थानिक नागरिकांच्या माध्यमातून निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी शासनाचा करोडो रुपयांच्या महसूल बुडाला असून याबाबत आपण तातडीने सखोल चौकशी करुन जे.

जे. एम. जीजीभॉय ट्रस्ट व खाजगी विकासक प्रतिक जैन यांच्यावर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करावा व भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ हे दोन्ही भूखंड शासन जमा हेतू तातडीने कार्यवाही करावी असे नमूद केले आहे. (सोबत प्रत संलग्न)

सदर निवेदनाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक १८.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास माझगांव महसूल विभागातील भुकरं क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकतीचे भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मार्गदर्शन होण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच सह जिल्हा निबंधक वर्ग -२, निबंधक कार्यालय १ ते ५ यांना दिनांक १७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकतीमध्ये जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट व विकासक प्रतीक जैन किंवा इतर व्यक्ती यांच्यामध्ये कुलमुखत्यार, करारनामा किंवा मिळकतीशी संबंधित इतर नोंदणीकृत दस्त झाले असल्यास सदरचे दस्त इकडील कार्यालयास तात्काळ उपलब्ध करुन कळविण्यात आलेले आहे.

भाडेपट्टाधारक यांचेवतीने ॲड. लेवी रुबेलस यांचेकडील दिनांक २५.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, भु. क्र. ३६५ करिता रक्कम रुपये ९५,७४,२७०/- व भु. क्र. ३६९ करिता रक्कम रुपये १,७५,००,०००/- दिनांक १६.१०.२०२४ व रक्कम रुपये ११,५३,६९,१४०/-, दिनांक १८.१०.२०२४ अशी एकूण र. रु. १३,२८,६९,१४०/- रोजी ही शासनखाती भरणा केली असल्याबाबत व चलनाची प्रत सोबत जोडली असल्याबाबत इकडील कार्यालयास कळविलेले होते. त्याअनुषंगाने इकडील कार्यालयाकडील दिनांक ०७.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भाडेपट्टाधारक यांना शासनखाती भरणा करण्यात आलेल्या चलनाची प्रत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

भाडेपट्टाधारक यांचेकडील दिनांक ३०.०१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाची रक्कम अर्जदार / भाडेपट्टाधारक जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट C/O कामा नॉरटन ॲन्ड कंपनी यांचेवतीने Aikya Realty Pvt. Ltd यांनी भरणा केलेली आहे असे कळविलेले आहे. तसेच Aikya Realty Pvt. Ltd. यांचेकडील दिनांक ३०.०१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये, जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट C/O कामा नॉरटन ॲन्ड कंपनी यांचेवतीने Aikya Realty Pvt. Ltd यांनी भाडेपट्टा नुतनीकरणाबाबतची रक्कम शासनखाती भरणा केलेली आहे असे कळविलेले आहे.

अर्जदार यांनी सादर केलेले चलन तपासले असता सदरचे चलन हे Aikya Realty Pvt. Ltd या नावाने भरणा केलेले दिसून येते. वास्तविक पाहता सदरचे चलन भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांच्या नावाने भरणा करणे आवश्यक होते. सदर प्रकरणी भरणा केलेले चलन कायदेशीरदृष्टया योग्य नाही. सबब, Aikya Realty Pvt. Ltd. यांचा सदर मिळकतीशी काय संबंध आहे. तसेच सदर मिळकतीबाबत Aikya Realty Pvt. Ltd. व इतर विकासकांशी कुलमुखत्यार, विकसन करारनामा किंवा मिळकतीशी संबंधित इतर नोंदणीकृत दस्त केले आहे किंवा

(१) मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हयात शासकीय जमीन भाडेपट्टयाने धारण केलेल्या सर्व प्रकरणात दोन्ही जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ या सत्ताप्रकाराने धारण करण्याचा विकल्प या आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षे भाडेपट्टेधारकास उपलब्ध असल्याची बाब लेखी स्वरुपात प्रत्येक भाडेपट्टेधारकास अवगत करावी. अशा प्रकरणांत भाडेपट्टे धारकास द्यावयाच्या पत्राचा नमुना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी तयार करावा. हाच नमुना मुंबई उपनगर जिल्हयामध्ये देखील वापरण्यात यावा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी प्रत्येक भाडेपट्टेधारकास भाडेपट्टयाने धारण केलेली जमीन रुपांतरण शुल्काच्या अदायगी नंतर कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराने नियमित अटी व शर्तींवर धारण करण्याचा विकल्प उपलब्ध असल्याचे लेखी पत्र दिनांक १ फेब्रुवारी २०१३ ते दिनांक ३१ मार्च २०१३ या कालावधीत द्यावे व त्याची पोहोच दप्तरी ठेवावी. विकल्प उपलब्ध असल्याचे लेखी पत्र, सर्व भाडेपट्टेधारकांना देण्यात यावे.

(२) भाडेपट्टाधारकास जमीन कब्जेहक्काने घेण्याचा पर्याय उपलब्ध असल्याचे लेखी पत्र देण्याची कार्यवाही दिनांक ३१ मार्च २०१३ पर्यन्त पूर्ण केल्यानंतर असे विकल्प सादर करण्यासाठी दिनांक ३१ मे २०१३ पर्यन्तची मुदत विहित करण्यात यावी. विकल्प उपलब्ध असल्याबाबतचे लेखी पत्र भाडेपट्टेधारकास देतानाच भाडेपट्टे धारकाने त्याचा विकल्प कोणत्या नमुन्यात सादर करावयाचा आहे, तो नमुना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी विहित करावा व हाच नमुना मुंबई उपनगर जिल्हयात वापरण्यात यावा. दिनांक ३१ मे २०१३ पर्यन्त ज्या भाडेपट्टे धारकांचे विकल्प प्राप्त होणार नाहीत, अशा भाडेपट्टाधारकांनी जमीन कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ या सत्ताप्रकारात रुपांतरीत करण्याची इच्छा नसून त्यांना धारण जमीन भाडेपट्टयानेच धारण करावयाची आहे, असे ग्राहय धरण्यात येईल, याचा स्पष्ट उल्लेख विकल्प उपलब्ध असल्याच्या लेखी पत्रात करण्यात यावा.

येथे असे स्पष्ट करण्यात येते की, भाडेपट्टयाचे नुतनीकरण घेतल्यानंतरही दिनांक १.१२.२०१४ पूर्वी असा भाडेपट्टाधारक वरील विकल्प देऊ शकेल.

(३) दिनांक ३१ मे २०१३ पर्यन्त ज्या भाडेपट्टेधारकांचे कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराने जमीन धारण करण्यासाठीचे विकल्प प्राप्त होतील, अशा प्रकरणांत संबंधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ते रुपांतरण शुल्क वसूल करुन भाडेपट्टयाने धारण केलेली जमीन कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराने नियमित अटी व शर्तींवर रुपांतरीत करुन देण्याचे आदेश दिनांक ३१ डिसेंबर २०१३ पर्यन्त पारीत करावेत.

(४) <u>रुपांतरण शुल्क</u> :- ज्या भाडेपट्टाधारकांना भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी भाडेपट्टयाऐवजी कब्जेहक्काने (Occupancy Rights) भोगवटदार वर्ग-२ या सत्ताप्रकारात रुपांतरीत करुन घ्यावयाच्या असतील, अशा भाडेपट्टे धारकांची रुपांतरणाची विनंती मंजूर करण्याचे आदेश पारीत करण्याच्या दिनांकास जिल्हाधिका-यांनी खालीलप्रमाणे रुपांतरण शुल्क भरुन घ्यावे :-

अ.क्र.	भाडेपट्टा मंजूर करताना अनुज्ञेय केलेले प्रयोजन	रुपांतरण शुल्काची टक्केवारी
१	केवळ निवासी	वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील खुल्या जमिनीच्या किंमतीच्या २० टक्के
२	केवळ औद्योगिक	वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील खुल्या जमिनीच्या किंमतीच्या २५ टक्के
३	केवळ वाणिज्यिक	वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील खुल्या जमिनीच्या किंमतीच्या ३० टक्के
४	संयुक्त निवासी व वाणिज्यिक	निवासी व वाणिज्यिक वापराच्या क्षेत्राप्रमाणे वर नमूद केलेल्या दरानुसार
५	शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय / रुग्णालय या सारखे धर्मादाय प्रयोजन	वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील खुल्या जमिनीच्या किंमतीच्या २० टक्के

(५) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराने नियमित अटी व शर्तीसह रुपांतरीत करण्याच्या आदेशाचा नमुना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी विहित करावा. हा नमुना विहित करताना जिल्हाधिका-यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदी तसेच या संहिते अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी, त्याचप्रमाणे भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराच्या जमिनी संदर्भातील प्रचलित धोरणे / शासन निर्णय / स्थायी आदेशातील तरतुदी विचारात घ्याव्यात. तसेच मूळ भाडेपट्टयातील अटी व शर्तीदेखील विचारात घेण्यात याव्यात. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी विहित केलेला नमुना मुंबई उपनगर जिल्हयात वापरण्यात यावा.

(६) भाडेपट्टे धारकाचा जमीन कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराने धारण करण्याचा विकल्प ज्या दिवशी प्राप्त होईल, त्या दिवसांपर्यन्तची भुईभाडयाची आकारणी करुन त्याची वसूली झाल्यानंतरच रुपांतरणाचे आदेश जिल्हाधिका-यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या पूर्वमान्यतेने पारीत करावेत. ज्या प्रकरणांत भाडेपट्टयाची मुदत अद्याप संपुष्टात आलेली नाही, अशा प्रकरणांत अर्थातच जुन्याच दराने भुईभाडयाची आकारणी करण्यात यावी. ज्या प्रकरणात भाडेपट्टयाची मुदत या पूर्वीच संपुष्टात आलेली आहे. अशा प्रकरणात दिनांक ३१ डिसेंबर २०११ पर्यन्त जुन्या दराने व दिनांक १ जानेवारी २०१२ पासून या शासन निर्णयात विहित केल्यानुसार नवीन दराने भुईभाडयाची आकारणी करुन विकल्प प्राप्त होण्याच्या दिनांकापर्यन्तच्या थकित भुईभाडयाची रक्कम वसूल करण्यात यावी.

(७) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ या सत्ताप्रकारात रुपांतरीत केल्यानंतर अशा जमिनीवर अर्थातच त्यापुढे भुईभाडयाची आकारणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि अशा जमिनींवर वेळोवेळी प्रचलित असलेल्या दराने अकृषिक सा-याची आकारणी करुन ती रक्कम दरवर्षी वसूल करण्यात यावी.

(ब) **<u>भाडेपट्टयांचे नुतनीकरण करणे व भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करणे</u>**

(१) ज्या भाडेपट्टा धारकांची भाडेपट्टयाची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०११ पूर्वी संपुष्टात आली आहे, अशा प्रकरणांत भाडेपट्टाधारकाने जमीन कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ताप्रकाराने रुपांतरीत करुन घेण्याचा विकल्प विहित मुदतीत सादर केला नसल्यास अशा प्रकरणात भाडेपट्टयाचे नुतनीकरण व सुधारित दराने भाडेपट्टा आकारण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(अ) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीचे मुल्य परिगणित करताना मुद्रांक शुल्क विभागातर्फे दरवर्षी प्रसिध्द केल्या जाणा-या वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्यांचा वापर करावा. वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्यानुसार संबंधित मिळकतीचे खुल्या जमिनीच्या दराने एकूण मुल्य परिगणित करावे मुल्यापैकी जमीन मालक व भाडेपट्टाधारक यांचा हिस्सा अनुक्रमे २५ टक्के व ७५ टक्के इतका असल्याचा निर्णय मा. उच्च न्यायालयाने या पूर्वीच दिलेला आहे. त्यानुसार जमीन मालक म्हणजे शासनाचा अशा मुल्यांकनातील २५ टक्के इतका हिस्सा विचारात घेण्यात यावा. या २५ टक्के इतक्या रक्कमेवर निवासी, औद्योगिक, वाणिज्यक या प्रयोजनासाठी आणि निवासी व वाणिज्यिक या मिश्र प्रयोजनासाठी अनुक्रमे दोन टक्के, चार टक्के, पाच टक्के व पाच टक्के या दराने भाडेपट्टयाची आकारणी करण्यात यावी.

(ब) शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय / रुग्णालय यासारख्या धर्मादाय प्रयोजनांसाठी भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करताना निवासी प्रयोजनासाठी आकारण्यात येणा-या भुईभाडयाप्रमाणेच भाडेपट्टा निश्चित करण्यात यावा.

(क) ज्या मिळकतींचा भाडेपट्टा दिनांक ३१ डिसेंबर २०११ पूर्वी केव्हाही संपुष्टात आला आहे, अशा मिळकतींच्या भाडेपट्टयाचे दिनांक ३१ डिसेंबर २०११ पर्यन्त जुन्या दराने भुईभाडे आकारुन व त्याची वसूली करुन मानीव नुतनीकरण करण्यात यावे. त्यानंतर दिनांक १ जानेवारी २०१२ पासून ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टा नुतनीकरण करुन देण्यात यावा. जेणेकरुन दिनांक ३१ डिसें २०११ पूर्वी मुदत संपुष्टात आलेल्या सर्व भाडेपट्टयाचे दिनांक १ जानेवारी २०१२ या दिनांकापासून ३० वर्षांच्या कालावधीसाठी नुतनीकरण होईल व १ जानेवारी २०१२ या एकाच दिनांकास नुतनीकरण करण्यात आल्याने अशा प्रकरणांचा आढावा घेणे जिल्हयाधिका-यांना सुकर होईल.

(ड) ज्या मिळकर्तीचा भाडेपट्टा दिनांक ३१ डिसेंबर २०११ पूर्वी संपुष्टात आलेला आहे, अशा भाडेपट्टयाचे दिनांक ३१ डिसेंबर २०११ पर्यन्त तात्पुरते मानीव नुतनीकरण व दिनांक १ जानेवारी २०१२ पासून ३० वर्षांच्या कालावधीसाठी नुतनीकरण केल्यानंतर भुईभाडयाच्या रक्कमेमध्ये दर पाच वर्षांनी सुधारणा करण्यात यावी. अशी सुधारणा करताना सुधारणा करण्याच्या दिनांकाचे मिळकतीचे बाजारमूल्य विचारात घेऊन वरील (अ), (ब) व यथास्थिती (क) अनुसार भूईभाडे निश्चित करण्यात यावे. (उदाहरणार्थ ज्या मिळकतीच्या भाडेपट्टयाचे दिनांक १ जानेवारी २०१२ पासून ३० वर्षांच्या कालावधीसाठी नुतनीकरण करण्यात आले आहे, अशा मिळकतीच्या भुईभाडयाच्या दरामध्ये दिनांक १ जानेवारी २०१७, १ जानेवारी २०२२ रोजीचे मुल्यांकन विचारात घेऊन वरील

(अ), व (ब) व यथास्थिती (क) अनुसार येथील सूत्रानुसार सुधारित भूईभाडे निश्चित करण्यात यावे.

(इ) भुईभाडयाची रक्कम निश्चित करुन त्याची मागणी भाडेपट्टे धारकाकडे करण्यापूर्वी या संदर्भात मा. उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेऊन भुईभाडयाच्या रकमेची परिगणना करण्यासाठी बाजारमुल्य कसे विचारात घेण्यात आले व या बाजारमुल्याच्या आधारे भुईभाडयाची रक्कम कशी निश्चित करण्यात आली, याची माहिती संबंधित भाडेपट्टेधारकास लेखी स्वरुपात कळविण्यात यावी व बाजारमुल्य अथवा भुईभाडयाच्या रकमेबाबत भाडेपट्टाधारकाचे काही आक्षेप असल्यास सदर आक्षेप लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांत नोंदविण्याबाबत भाडेपट्टा धारकास सूचित करण्यात यावे. भाडेपट्टाधारकाचे आक्षेप प्राप्त झाल्यानंतर असे आक्षेप निर्णित करण्यापूर्वी भाडेपट्टेधारकास सुनावणीची रास्त व वाजवी संधी देण्यात यावी. सुनावणी अंती भाडेपट्टाधारकाचे आक्षेप कोणत्या कारणास्तव स्वीकारण्यात अथवा यथास्थिती नाकारण्यात येत आहेत, याची सविस्तर कारणे नमूद करुन जिल्हाधिका-यांनी स्वयंस्पष्ट आदेश शासन पूर्वमान्यतेने पारीत करावेत. तसे आदेश पारीत केल्याअंती निश्चित होणारी भुईभाडयाची रक्कम वसूल करण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

(ई) ज्या प्रकरणांमध्ये भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात आलेली नाही, अशा प्रकरणात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात येण्याच्या दिनांकापावतो जुन्या दराने भुईभाडे वसूल करण्यात यावे. अशा प्रकरणात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात आल्यानंतरच्या दिनांकापासून सुधारित दराने भुईभाडयाची आकारणी करण्यात यावी.

(फ) बृहन्मुंबई मधील भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीपैकी काही प्रकरणात बांधकामावर निर्बंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार जेवढया क्षेत्रफळावर बांधकाम अनुज्ञेय आहे (Buildable Area) तेवढेच क्षेत्रफळासाठी भुईभाडे आकारण्यात यावे. (उदाहारणार्थ मनोरंजन मैदान, मोकळया जागा, इत्यादी) . अर्थातच विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अशा प्रकरणांमध्ये ज्या दिनांकापासून अधिकचे बांधकाम अनुज्ञेय होईल, त्या दिनांकापासून एकूण बांधकाम योग्य क्षेत्रासाठी भुईभाडे आकारण्यात यावे.

(भ) दिनांक १ जानेवारी २०१२ पासून अथवा यथास्थिती भविष्यात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात आल्यानंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण केल्याच्या दिनांकापासून ज्या प्रकरणात भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यात येईल, त्या प्रकरणात जिल्हाधिका-यांनी भाडेपट्टाधारकासमवेत नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा (Lease Deed) निष्पादित करावा. भाडेपट्टा करारनामा निष्पादित करताना मूळ भाडेपट्टा करारातील अटी व शर्तींदेखील विचारात घेण्यात याव्यात.

(क) **<u>भाडेपट्टयांचे हस्तांतरण व वापरातील बदलाचे नियमन</u>**

(१) भाडेपट्टयाच्या हक्कांचे हस्तांतरण करण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. भाडेपट्टयांच्या हक्कांचे हस्तांतरण करण्याची पुर्व परवानगी भाडेपट्टे धारकाने मागितल्यास अशी पूर्व परवानगी देताना अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा म्हणून ५० टक्के इतकी रक्कम वसूल करण्याचा शासनास अधिकार आहे. तथापि दीर्घ कालावधीसाठी भाडेपट्टयाने जमिनी दिलेल्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाचे निर्णय विचारात घेता अशा मिळकतीमध्ये जमीन मालकांचा २५ टक्के व भाडेपट्टे धारकाचा ७५ टक्के इतका हिस्सा असतो. ही बाब विचारात घेता अनर्जित

H 3170.pdf - 49

उत्पन्नातील शासनाचा ५० टक्के इतका हिस्सा परिगणित करताना अशा जमिनीच्या मुल्यांकनामधील शासनाच्या २५ टक्के इतक्या हिश्श्याच्या रकमेचाच विचार करण्यात यावा. अशा २५ टक्के हिश्श्याने परिगणित होणा-या रक्कमेच्या ५० टक्के इतकी रक्कम अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा म्हणून वसूल करुन हस्तांतरणाची परवानगी देता येईल.

(२) ज्या प्रकरणात भाडेपट्टयाच्या हक्कांचे शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण करण्यात आले आहे, अशा प्रकरणात असे विना-परवानगी हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी प्रचलित शासन धोरणातील तरतुदीनुसार अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा वसूल करण्यात यावा.

(३) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी तसेच अशा जमिनीवर हस्तांतरणीय विकास हक्क वापरण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशी परवानगी देताना वेळोवेळी प्रचलित असलेल्या शासन धोरणानुसार अधिमूल्य आकारुन अशी परवानगी देण्यात येईल. तथापि अशा वापरातील बदलासाठी तसेच हस्तांतरणीय विकास हक्क वापरण्यासाठी स्थानिक नियोजन प्राधिकरणाची शिफारस असणे आवश्यक राहील.

(४) भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व त्यासाठी वेळोवेळी प्रचलित असलेल्या धोरणातील तरतुदी भाडेपट्टा धारकावर बंधनकारक राहतील.

(५) काही भाडेपट्टा करारनाम्यात भाडेपट्टयाची मुदत संपुष्टात येण्यापूर्वी विविक्षीत कालावधीच्या आत भाडेपट्टयाचे नुतनीकरण करुन घेण्यासाठी भाडेपट्टाधारक इच्छुक आहे किंवा नाही, हे जिल्हाधिका-यांना कळविण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकरणात भाडेपट्टाधारकांनी विविक्षीत कालावधीत मध्ये नुतनीकरणासाठी विकल्प दिला नसल्यास अशा प्रकरणात भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यापूर्वी प्रचलित बाजारमुल्याच्या १० टक्के इतका दंड आकारण्यात यावा व या दंडाची वसूली झाल्यानंतरच नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

(६) शासकीय जमिनीवरील जिमखाने व क्रिडांगणे यांच्या भाडेपट्टयाच्या नुतनीकरणाचे धोरण शासनाच्या विचाराधीन असून, त्यासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

(७) बृहन्मुंबईतील अस्थायी भाडेपट्टयांना हे धोरण लागू असणार नाही.

५. हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने (त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४/०२/व्यय-९, दिनांक २९.११.२०१२) निर्गमित करण्यात आला आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक संकेतांक २०१२१२१११४२१४५६२१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एस. एस. पाटील)
शासनाचे उप सचिव

प्रत,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर / मुंबई उपनगर
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (गृहनिर्माण विभाग), मंत्रालय, मुंबई
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई / महाराष्ट्र (२), नागपूर
प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा), महाराष्ट्र (१), मुंबई / महाराष्ट्र (२), नागपूर
सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती ज-२ कार्यासन, महसूल व वन विभाग

महसूल विभागाने भाडेपट्टयाने/ कब्जेहक्काने दिलेल्या जमिनीच्या पुनर्विकासास / पुनर्बांधकामास परवानगी देण्याबाबत धोरण

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१२/०७/प्र.क्र.३०/ज-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: :- १३ एप्रिल, २०१७

<u>प्रस्तावना</u> :-

स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही शासनाने दीर्घ मुदतीच्या जसे ५० वर्षे, ९९ वर्षे व ९९९ वर्षे मुदतीच्या भाडेपट्टयाने व कब्जेहक्काने शासकीय जमिनी विविध प्रयोजनार्थ मंजूर केलेल्या आहेत. या जमिनींवर भाडेपट्टेधारकाने किंवा भोगवटादाराने बांधलेल्या इमारती आता अनेक ठिकाणी मोडकळीस आलेल्या आहेत. शहरांच्या विकास आराखडयात व विकास नियंत्रण नियमावली मध्येही अनेक बदल होऊन अनेक ठिकाणी भूखंडांवर जादा बांधकाम अनुज्ञेय झालेले आहे. शासकीय जमिनी भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिल्यानंतर अनेकदा वापराच्या प्रयोजनातही बदल करण्याची संबंधित भाडेपट्टाधारकाची/भोगवटादाराची इच्छा निदर्शनास येते. या सर्व कारणांमुळे अशा जमिनींचा पुनर्विकास करण्यास परवानगी मागण्यासाठीचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होत आहेत. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनींचा पुनर्विकास करण्यास परवानगी देण्याबाबत व त्यासाठी अधिमूल्य आकारण्याबाबत **महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६** च्या **कलम ३७ अ** अन्वये खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट करण्यात आलेली आहे:-

१) "अमरावती व नागपूर महसूल विभागातील नझूल जमिनी तसेच मुंबई शहरसह राज्यातील महसूल विभागातील कोणतीही शासकीय जमीन जी, या संहितेखालील तरतूदीनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार किंवा या संहितेच्या प्रारंभापूर्वी जमीन महसूलासंबंधीच्या कोणत्याही कायद्यानुसार विभिन्न प्रयोजनासाठी प्रदान केलेली असेल, अशा जमिनींची प्रत्येक विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफ.एस.आय.) वापर, हस्तांतरणीय विकास हक्कांचे (टी.डी.आर.) हस्तांतरण किंवा वापरातील बदल, राज्य शासनाची पुर्वपरवानगी घेण्याच्या अधीन राहून करण्यात येईल".

२) राज्य शासन पोट कलम (१) अन्वये आवश्यक असलेली अशी परवानगी देताना शासनाकडून वेळोवेळी काढण्यात येणाऱ्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे नजराणा मुल्य किंवा आकार व अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा, अशा अटी व शर्तींना अधीन राहून, वसूल करील....."

उक्त तरतूदीच्या अनुषंगाने भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीच्या पुनर्विकासाला परवानगी देण्याकामी धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याकामी

दि.२३.३.२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीतील मान्यतेस अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

१. शासनाने भाडेपट्टयाने /कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या पुनर्विकासासाठी प्रचलित विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा व संबंधित विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत असा पुनर्विकास अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच व खालील प्रमाणे विहित अधिमूल्य आकारुनच प्रकरणपरत्वे अशा पुनर्विकासास परवानगी देण्यासंदर्भात निर्णय घेण्याबाबत शासन याद्वारे पुढीलप्रमाणे धोरणात्मक निर्देश देत आहे:-

१.१ (अ) बृहन्मुंबई करीताच्या सन १९९१ च्या विकास नियंत्रण नियमावलीतील "विनियम ३३(९) - समुह पुनर्विकास" व "विनियम ३३(१०) - झोपडपट्टी पुनर्वसन" यामध्ये संबंधित शासकीय जमिनीच्या **प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील** दराने येणाऱ्या बाजार मुल्यांकनाच्या **२५%** या प्रमाणात अधिमूल्य आकारण्याची तरतुद पुर्वीच अस्तित्वात असल्याने शासनाने प्रदान केलेल्या जमिनीवर या दोन्ही विनियमांखालील पुनर्विकास करण्यास परवानगी देतांना सदर विनियमातील तरतूदीनुसार आकारावयाच्या अधिमूल्याव्यतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात येऊ नये.

(ब) बृहन्मुंबईमध्ये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (९) व ३३ (१०) हे विनियम वगळता अन्य विनियमाअंतर्गत पुनर्विकासाच्या प्रकरणात परवानगी देताना निवासी/ वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनासाठी संबंधित शासकीय जमिनीच्या **प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील** दराने येणाऱ्या बाजार मुल्याच्या **२५%** दराने व शैक्षणिक/धर्मादाय प्रयोजनासाठी संबंधित जमिनीच्या अशा बाजारमूल्याच्या **१२.५%** अशा दराने अधिमूल्य आकारण्यात यावे.

(क) राज्यातील अन्य भागातही शासकीय जमिनीवरील पुनर्विकासास परवानगी देताना निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनासाठी अशा शासकीय जमिनीच्या **प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील** दराने येणाऱ्या बाजार मुल्याच्या **२५%** दराने व शैक्षणिक/धर्मादाय प्रयोजनासाठी संबंधित जमिनीच्या अशा बाजारमूल्याच्या **१२.५%** अशा दराने अधिमूल्य आकारण्यात यावे.

१.२ भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीचा पुनर्विकास करताना जमीन प्रदानाच्या मूळ मंजूर प्रयोजनात बदल होणार असेल तर पुनर्विकासापोटी शासनास वरीलप्रमाणे देय अधिमूल्याबरोबरच **वापरातील अशा बदलासाठी** प्रचलित धोरणाप्रमाणे **स्वतंत्रपणे अधिमूल्यही** आकारण्यात यावे.

१.३ भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीचा पुनर्विकास फक्त हस्तांतरणीय विकास हक्क किंवा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक विकत घेऊन होणार असेल तर वरीलप्रमाणे देय अधिमूल्याबरोबरच अशा हस्तांतरणीय विकास हक्क किंवा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यासाठी विकासकास **प्रचलित धोरणाप्रमाणे** अधिमूल्याची रक्कमही स्वतंत्रपणे आकारण्यात येऊन वसूल करण्यात यावी.

पृष्ठ ५ पैकी २

अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग), मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव (नगरविकास-१), मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१)- मुंबई/महाराष्ट्र (२)- नागपूर
प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा) महाराष्ट्र (१)- मुंबई/महाराष्ट्र (२) -नागपूर
सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती, कार्यासन/ज-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनींचा पुनर्विकास करतांना मूळ वापरात बदल होत नसल्यास आणि असा पुनर्विकास संबंधित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी सुसंगत असल्यास **महानगर प्रदेश क्षेत्राबाहेरील** अशा जमिनींचा पुनर्विकास करण्यास परवानगी देण्याचे अधिकार **संबधित जिल्हाधिकारी** यांना प्रदान करण्यात येत आहेत, मात्र **महानगर प्रदेश क्षेत्रातील** अशा जमिनींचा पुनर्विकास करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने परवानगी देण्यापूर्वी **शासनाची मान्यता** घेणे आवश्यक राहील.

३. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीच्या पुनर्विकासाची परवानगी घेऊन जर परवानगीच्या तारखेपासून **३ वर्षात** काम सुरु केले नाही तर उक्त ३ वर्षाचा कालावधी संपल्यापासून काम सुरु होईपावेतो पुढील प्रत्येक वर्षासाठी अशा जमिनीच्या त्या-त्या वर्षी लागू असलेल्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराने येणाऱ्या मुल्यांकनाच्या **१% (एक टक्के)** या दराने अधिमूल्य आकारून जिल्हाधिकारी मुदतवाढ देऊ शकतील.

४. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनींच्या पुनर्विकासास सक्षम प्राधिकाऱ्याची **पूर्व परवानगी न घेता** पुनर्विकास करण्यात आला असेल किंवा पुनर्विकासास सुरुवात करण्यात आली असेल तर वर नमूद केल्याप्रमाणे अधिमूल्य आकारण्याबरोबरच असा पुनर्विकास नियमानुकूल करण्याचे आदेश पारित करण्याच्या वर्षासाठी लागू असलेल्या वार्षिक दर विवरणपत्रातील दराप्रमाणे येणाऱ्या अशा जमिनीच्या किंमतीच्या **५% इतके वाढीव अधिमूल्य** वसूल करण्यात यावे.

५. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या पुनर्विकासास द्यावयाची परवानगी खालील तरतुदीस / अटीस अधीन राहील:-

अ) भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवर असलेल्या मूळ भाडेपट्टेधारकाचे/भोगवटादाराचे दायित्व संबंधित विकासकाला/ नियोजित संस्थेला स्वीकारावे लागेल. त्याबाबत शासन कोणतीही बांधिलकी स्विकारणार नाही.

ब) पुनर्विकासामुळे अशा जमिनीवरील भाडेकरुमध्ये बदल होत असल्यास त्याकरीता तसेच पुनर्विकासानंतर धारण केलेल्या सदनिका अथवा गाळे भविष्यात हस्तांतर / विक्री करण्यास अथवा पोटभाड्याने देण्यास परवानगी देण्याकरीता शासनाच्या प्रचलित धोरणातील तरतुदीनुसार हस्तांतरण शुल्क / अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात येईल. भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्था जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी पुर्वानुमतीशिवाय सदर जमीन गहाण ठेवू शकणार नाही, तसेच हस्तांतरण करु शकणार नाही. अशा प्रस्तावित हस्तांतरणावर शासनाच्या महसूल व वन विभागाच्या प्रचलित धोरणातील तरतूदीनुसार अनर्जित उत्पन्न वसूल केल्याखेरीज अशा जमिनीच्या कोणत्याही हस्तांतरण प्रस्तावास मान्यता देता येणार नाही. त्याचप्रमाणे अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्याकडून होणाऱ्या त्याच्या सदनिकेच्या हस्तांतरणापोटी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण शुल्क जमा करणे अनिवार्य राहिल. तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्यास जिल्हाधिकारी यांच्या लेखी पुर्वानुमतीशिवाय त्याची सदनिका गहाण ठेवता येणार नाही.

पृष्ठ ५ पैकी ३

क) भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी देण्यात आली तरी मूळ जमीन प्रदान आदेशातील/भाडेपट्टाकरारातील, पुनर्विकास परवानगी आदेशातील शर्तीशी विसंगत नसलेल्या अटी व शर्ती संबंधितांवर बंधनकारक राहतील.

ड) पुनर्विकासाच्या प्रस्तावाला संबंधित नियोजन प्राधिकरण यांची मान्यता घेणे आवश्यक राहील व आवश्यकतेनुसार हेरीटेज कमिटीचेही "ना हरकत प्रमाणपत्र" घेणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकरणांनी मान्यता देतांना या संदर्भात विविध न्यायालयांनी दिलेले निर्देश विचारात घेणे आवश्यक राहील.

६. **पुनर्विकासाचे प्रस्तुत धोरण शासनाने बृहन्मुंबई क्षेत्रात व राज्यातील इतर जिल्ह्यात ज्या शासकीय जमिनी कब्जेहक्काने किंवा दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत, अशा शासकीय जमिनींना लागू राहील.**

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३४१/२०१६/व्यय-९, दिनांक ७.१२.२०१६ नुसार त्या विभागाच्या सहमतीने व नगर विकास विभागाच्या सहमतीने व दिनांक २३ मार्च, २०१७ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे..

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०४१३११३३१२८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2017.04.13 18:48:43 +05'30'

(मनु कुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)

प्रत,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-३२

पृष्ठ ५ पैकी ४

भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय मिळकतींच्या हस्तांतरणास परवानगी देणे व अशा मिळकतींच्या विना परवाना हस्तांतरणामुळे झालेले शर्तभंग नियमानुकूल करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१६/प्र.क्र.१६/ज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १४ जून, २०१७

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/प्र.क.४०५/ज-२, दि.१२.१२.२०१२
२) शासन राजपत्र दि.२२.८.२०१६ मधील अधिसूचित सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२९

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या प्रकरण चौदा मध्ये मुंबई शहर जिल्ह्यातील जमीन महसुलासाठी विशेष तरतुदींचा अंतर्भाव आहे. त्यातील कलम २९५ हे मुंबई शहर जिल्ह्यातील राज्य शासनाकडे निहित असलेल्या जमिनीची किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशाची विल्हेवाट लावण्याशी संबंधित आहे. उक्त संहिता अंमलात येण्यापूर्वीदेखील मुंबई शहर जिल्ह्यात शासनाचे अनेक भूखंड विविध प्रयोजनांसाठी विविध व्यक्ती आणि संस्था यांना भाडेपट्टयावर देण्यात आले आहेत. यातील बऱ्याच प्रकरणांत, असे पट्टे हस्तांतरीत किंवा अभिहस्तांकित करण्यात आलेले आहेत.

सध्या, अशा शासकीय जमिनींच्या पट्टेदारी अधिकारांच्या अभिहस्तांकनाच्या किंवा हस्तांतरणाच्या प्रकरणातील अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा हा राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आकारला जातो आणि वसूल केला जातो. संबंधित पट्टेदारी अधिकारांच्या हस्तांतरणाच्या किंवा अभिहस्तांकनाच्या कोणत्याही प्रकरणात अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा वसूल करण्याच्या शासनाच्या अधिकारांबाबत कोणतीही शंका घेण्यास वाव राहू नये या उद्देशाने, अशा कोणत्याही शासकीय जमिनीतील आपला पट्टेदारी अधिकार हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करण्यापूर्वी पट्टाधारकास जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य असेल, जिच्यासाठी शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या दराने अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा शासनास देय असेल अशा विनिर्दिष्ट तरतुदींचा, तसेच अशा पट्टयांच्या हस्तांतरणाच्या किंवा अभिहस्तांकनाच्या आधीच्या व्यवहारांना, शासन विनिर्दिष्ट करेल अशा दराने अतिरिक्त शास्तीची रक्कम आकारुन त्याद्वारे ते नियमाधीन करण्यासंबंधातील तरतुदींचा समावेश महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९५ मधील तरतूदीत सदंर्भाधीन क्र.२ येथे नमूद महाराष्ट्र अधिनियम क्र.२९/२०१६ अन्वये करण्यात आलेला आहे. यामध्ये असे पट्टामुल्य व हस्तांतरण शुल्क किंवा आकार शासनाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील असे नमूद केलेले आहे. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९५ मध्ये महाराष्ट्र अधिनियम क्र.२९/२०१६ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. यामध्ये शासकीय जमिनीच्या पट्टेदारी अधिकारांच्या अभिहस्तांकनाच्या किंवा हस्तांतरणाच्या प्रकरणातील पट्टामुल्य व हस्तांतरण शुल्क किंवा आकार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

१) शासनाने प्रदान केलेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे हस्तांतरण शासनाच्या किंवा जिल्हाधिका-यांच्या पूर्वपरवानगीने झालेले असेल किंवा भाडेपट्टा करारामध्ये केलेल्या तरतुदीनुसार विहित कालावधीत जिल्हाधिकारी यांना हस्तांतरणाबाबत सूचित करण्यात आलेले असेल अशा प्रकरणी अशा जमिनीच्या **प्रचलित वार्षिक मुल्य दर तक्त्यातील** किंमतीच्या **२५%** एवढी रक्कम **अनर्जित उत्पन्नापोटी पट्टामूल्य** म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी व अशा किंमतीच्या **१%** एवढी रक्कम **हस्तांतरण शुल्क** म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

२) ज्या प्रकरणांत भाडेपट्टयाच्या हक्कांच्या हस्तांतरणासाठी शासनाची पुर्वपरवानगी आवश्यक असल्याची अट भाडेपट्टाकरारात असतानाही शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय भाडेपट्टयाचे हस्तांतरण करण्यात आले आहे, अथवा ज्या भाडेपट्टाकरारामध्ये असे हस्तांतरण झाल्यानंतर ठराविक कालावधीत अशा हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्याची किंवा सुचना देण्याची तरतुद असून सुद्धा अशा हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी यांना भाडेपट्टा करारात नमूद केलेल्या विहित कालावधीत कळविण्यात किंवा सुचित करण्यात आले नसेल अशा प्रकरणात असे अनियमित हस्तांतरण नियामानुकूल करण्यासाठी **दस्त झाल्याच्या दिनांकाच्या वार्षिक मुल्य दर तक्त्यातील** दराप्रमाणे येणारी सदर जमिनीची किंमत किंवा प्रत्यक्ष व्यवहारातील जमिनीची किंमत यापैकी **जी जास्त असेल त्या किंमतीच्या २५%** एवढी रक्कम अनर्जित उत्पन्नापोटी शासनास देय पट्टामूल्य म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी व **तेवढीच रक्कम शास्तीपोटी** आकारण्यात व वसूल करण्यात यावी व अशा किंमतीच्या **१%** एवढी रक्कम **हस्तांतरण शुल्क** म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

३) मुंबई शहर जिल्ह्यामध्ये या पूर्वी शासनाने भाडेपट्टयानेच बहुतांश जमिनींचे प्रदान केले आहे. अशा जमिनींपैकी काही जमिनींचे रुपांतरण संदर्भाधीन शासन निर्णय क्र. जमीन-२५०५/प्र.क.४०५/ज-२, दि.१२.१२.२०१२ मधील तरतुदीप्रमाणे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर होऊ शकते. अशा रुपांतरीत झालेल्या शासकीय जमिनींचे हस्तांतरण जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वानुमतीने होत असल्यास **प्रचलित वार्षिक मुल्य दर तक्त्यातील** दरानुसार येणाऱ्या अशा जमिनीच्या किंमतीच्या **१२.५%** एवढी रक्कम अनर्जित रकमेपोटी शासनाचा हिस्सा म्हणून व अशा किंमतीच्या **१%** रक्कम हस्तांतरण शुल्क म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

अशा रुपांतरीत धारणाधिकाराच्या जमिनींचे **विनापरवाना हस्तांतरण** झाले असल्यास ते नियमानुकूल करीत असतांना **अशा बेकायदेशीर हस्तांतरणाच्या दिनांकास लागू वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे** होणाऱ्या अशा जमिनीच्या किंमतीच्या **६२.५%** एवढी रक्कम अनर्जित रकमेपोटी शासनाचा हिस्सा म्हणून व अशा किंमतीच्या **२.५%** रक्कम हस्तांतरण फी म्हणून आकारण्यात व वसूल करण्यात यावी.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१५९/व्यय-९, दिनांक ३.६.२०१७ अन्वये व त्या विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाने दि.७.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१७०६१४१६४८२५५२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2017.06.14 19:32:59 +05'30'

(मनु कुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१०) प्रधान सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१२) नोंदणी महानिरिक्षक, मुद्रांक विभाग, पुणे.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

१४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
१५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
१८) सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) सर्व "ज" समूह कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (कार्यासन ज-२).

जमीन-मुंबई शहर
मुंबई शहरातील भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील भाडेपट्टा करारातील अटी व शर्तींचे शर्तभंग नियमित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२५१८/प्र.क्र.५/ज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ नोव्हेंबर, २०१८

वाचा :-

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलबीआर.२५९४/प्र.क्र.४४४/ज-२, दि.३१.७.१९९५.

प्रस्तावना :-

०१. मुंबई शहर जिल्ह्याच्या हद्दीमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने दिल्या आहेत. भाडेपट्टाकरारनामा व प्रचलित कायदे, नियम यांच्या आधारे या जमिनींचा वापर, हस्तांतरण, त्यावरील बांधकाम, त्रयस्थ पक्षांचे हितसंबंध, भाडेपट्ट्याचे नुतणीकरण, पुनर्विकास व इतर सर्व बाबी नियंत्रित केल्या जातात. भाडेपट्ट्याने अशा प्रकारे दिलेल्या शासकीय जमिनींबाबत झालेले बव्हंश शर्तभंग नियमित करण्यासाठी किंवा अशा शर्तभंगाच्या अनुषंगाने भाडेपट्टाधारकांवर कार्यवाही करण्यासाठी शासनाची धोरणे, नियम, कायद्यातील तरतुदी अस्तित्वात आहेत. मात्र ज्या प्रकारच्या शर्तभंगाबाबत शासनाचे विवक्षित धोरण नाही, अशा शर्तभंगाबाबत काय कार्यवाही करावी या बाबत महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलबीआर२५९४/प्र.क्र.४४४/ज-२, दि.३१.७.१९९५ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अध्यक्षतेखाली "ब्रिचेस कमिटीची" स्थापना करण्यात आलेली आहे. सदर ब्रिचेस कमिटीने झालेल्या शर्तभंगाचा प्रकरणनिहाय आढावा घेऊन अशा शर्तभंगासाठी दंड निश्चित करणे व सदर दंड आकारणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनास मान्यतेस्तव पाठविणे दि.३१.७.१९९५ च्या या शासन निर्णयान्वये अपेक्षित आहे. या शासन निर्णयान्वये कोणत्या प्रकारच्या शर्तभंगासाठी किती दंड आकारावा या बाबतची मार्गदर्शक तत्त्वे विहित केलेली नाहीत. त्याचबरोबर अशा शर्तभंगाच्या प्रत्येक प्रकरणामध्ये ब्रिचेस कमिटीच्या शिफारशीला शासनाने मान्यता देणे प्रशासकीय सुलभता व उद्योग सुगमतेच्या शासनाच्या धोरणाशी सुसंगत नाही, त्यामुळे दि.३१.७.१९९५ चा उपरोक्त शासन निर्णय अधिक्रमित करुन मुंबई शहरात भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींबाबत ज्या शर्तभंगाबाबत विवक्षित धोरण/नियम/तरतूद नसल्याने असे शर्तभंग नियमित करतांना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी कोणत्या तत्त्वांचा विचार करावा याबाबत निर्देश देण्याचे तसेच असे शर्तभंग नियमित करण्याचे अधिकार

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

शासन निर्णय :-

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलबीआर.२५९४/प्र.क.४४४/ज-२, दि.३१.७.१९९५ याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील भाडेपट्टा करारातील अटी व शर्तींचे शर्तभंगांच्या प्रकरणांमध्ये अशा शर्तभंगाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी खालीलप्रमाणे दंडाची रक्कम आकारून शर्तभंग नियमित करावा.

अ.क्र.	शर्तभंगाचा प्रकार	शर्तभंग नियमित करण्यासाठी करावयाची कार्यवाही
१	**विनापरवानगी बांधकाम :** - भाडेपट्टा करारनाम्यामध्ये नमूद असल्यास त्यापेक्षा जादाचे किंवा सक्षम प्राधिकारी अथवा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची पूर्वपरवानगी न घेता केलेले बांधकाम.	सक्षम प्राधिकाऱ्याच्या अथवा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय करण्यात आलेल्या अशा बांधकामाच्या प्रचलित वार्षिक बाजारमुल्यदर तक्त्यानुसार येणा-या किंमतीच्या २% इतकी रक्कम दंड म्हणून आकारुन असा शर्तभंग नियमित करण्यात यावा. मात्र, अशा प्रकारचे शर्तभंग नियमित करतांना भाडेपट्टेधारकाने सदर बांधकामास संबंधित नियोजन प्राधिकरणाची वेगळी मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच शर्तभंग नियमित करण्यात आल्यानंतरही अशा बांधकामासाठी नियोजन प्राधिकरणाची परवानगी आवश्यक राहील.
२	भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीं वरील रहिवाशी सदनिकांचा वाणिज्यिक वापर सक्षम प्राधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय होत असल्यास.	सक्षम प्राधिकाऱ्याच्या अथवा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींवरील रहिवाशी सदनिकांचा अनुज्ञेय वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापर केला असल्यास अशा सदनिकेच्या प्रचलित वार्षिक बाजार मूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या किंमतीच्या २% इतकी रक्कम दंड म्हणून आकारून शर्तभंग नियमित करण्यात यावा.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३३०/व्यय-०९/२०१८ दिनांक ७.९.२०१८ व त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८११०६१२१८५३८२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c61495ae8b4592f8dcc5b8a85128, serialNumber=aa3985b8c1804418574f1872e9908934b35fbd2a705aaf56c57fbd437a59270d, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2018.11.06 14:16:49 +05'30'

(राजेंद्र क्षीरसागर)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६) अप्पर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
७) विभागीय आयुक्त, कोकण विभाग
८) जिल्हाधिकारी, मुंबई शहर
९) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१०) प्रधान सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
११) नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई/महाराष्ट्र (२),नागपूर
१३) प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा), महाराष्ट्र (१), मुंबई/ महाराष्ट्र (२), नागपूर
१४) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) निवडनस्ती, ज-२ कार्यासन, महसूल व वन विभाग

****

आश्वासन क्रमांक १५२

मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : २४/०३/२०२६

विषयः- सन २०२३ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. १५२.

महोदय,

सन २०२३ च्या तिसऱ्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सुचना क्र.५४८ उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सभागृहात दिलेल्या आश्वासनापैकी आश्वासन क्र. १५२ खालीलप्रमाणे:-

"शासनाची भूमिका या संदर्भात स्पष्ट आहे की, या प्रकरणात त्यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करुन जमीन शासनाकडे ताबडतोब घेण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील. पुढील तीन महिन्यामध्ये सर्व ट्रस्टची चौकशी मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांनी ताबडतोब पूर्ण करावी. शासनाची जेथे अशी फसवणूक झाली असेन त्या सर्व ट्रस्ट वर कारवाई करण्यात येईल, जे भाडेकरु तेथे अनेक वर्ष राहतात, त्यांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. शासन निश्चितपणे त्या संदर्भात देखील विचार करेल."

२. उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.१०.०१.२०२४ रोजी सदर जमिन शासन जमा करावी अथवा नुतनीकरण करावे याबाबत शासनास अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार माझगाव महसूल विभागातील भू.क्र. ३६५ व ३६९ या मिळकतीबाबत नुतनीकरणाचा निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार यापुर्वीचे तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या दि.२४.०९.२०२४ च्या अ.शा.पत्रान्वये आश्वासन क्र.१५२ वगळण्याबाबत मा. समिती प्रमुख, विधानपरिषद आश्वासन समिती यांना विनंती करण्यात आली होती.तथापि, विधानपरिषद आश्वासन समिती यांनी दि.०२.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर आश्वासन वगळण्याबाबतची विनंती अमान्य केली आहे.

३. त्यानुषंगाने, सदर आश्वासनाबाबत माझ्या अध्यक्षतेखाली दि.२५.०३.२०२५, दि.२९.१०.२०२५, व दि.२२.०१.२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेल्या होत्या. दि.२२.०१.२०२६ रोजीच्या बैठकीत याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याबाबत अ.मु.स. (महसूल) यांना निर्देश दिलेले होते. यानुसार माझगाव महसूल विभागातील भू.क्र. ३६५ व ३६९ या भाडेपट्ट्याच्या मिळकतीसंदर्भात विधि व न्याय विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय उपलब्ध करून दिले आहेत.

Final Opinion: In view of the settled legal position laid down in the above judgments relied upon by the Trust, and the factual circumstances of the case, this Department is of the considered opinion that the lease in respect of Survey No. 365 and Survey No. 369, Mazgaon Revenue Division, may be renewed in the name of J.P.M. Jeejeebhoy Trust. The amount deposited by Aikya Realty Pvt. Ltd., acting as a duly authorised Power of Attorney holder, may be treated as valid payment made on behalf of

the Trust. Such renewal would not amount to recognition of any transfer of leasehold rights, nor would it result in any loss to Government revenue. Therefore, this department **does concur** with the above view expressed by the Revenue and forest Department.

४. उक्त विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार माझगाव महसूल विभागातील भू.क्र. ३६५ व ३६९ या भाडेपट्ट्याच्या मिळकतीसंदर्भात नुतनीकरणाचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यास्तव, सदर आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक कोणतीही कार्यवाही संभवत नसल्याने सन २०२३ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्र. १५२ वगळण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

१. मा. समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई-३२.

25/3/26

स्वीय सहायक
समिती प्रमुख
विधानपरिषद आश्वासन समिती
विधान भवन, मुंबई / नागपूर

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुख्य इमारत, १ ला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र.०२२-२२८२ १३७३ ई-मेल:- j2.revenue@maharashtra.gov.in

क्र.विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, दि. १० एप्रिल, २०२६.

प्रति,

कक्ष अधिकारी
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई.

13/04/26

विषय : सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक १५३

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ च्या तृतीय हिवाळी अधिवेशनात विधानपरिषदेत देण्यात आलेले आश्वासन क्र. १५३ च्या पुर्ततेबाबतच्या विहित विवरणपत्रामधील ३५ प्रती सोबत जोडल्या आहेत.

आपला,

(मिलिंद वि. दुबे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. कक्ष अधिकारी (समन्वय-१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. निवडनस्ती (जमिन-२)

आश्वासन क्रमांक १५३

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्र : सी/कार्या-३ डी/आश्वासन क्र.१५३ ते १५८/२०२५
दिनांक : /०२/२०२५ 12 FEB 2025

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय

विषय : जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
विधानपरीषद आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ (सन २०२३ चे ३रे हिवाळी आधिवेशन)

- मुंबई उपनगर जिल्ह्यात शासकीय भाडेपट्ट्याच्या एकुण ३५९ मिळकती आहेत.
- त्यापैकी २२३ मिळकतींचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला होता.
- सदर २२३ मिळकतीपैकी एकुण ४२ मिळकतीच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करणेत आले आहे.
- तसेच २० मिळकर्तीचे भोगवटादार वर्ग -२ मध्ये रुपांतरण करणेत आले आहे.
- तसेच ३३ मिळकर्तीचे वर्ग-१ मध्ये रूपांतरण करणेत आले आहे.
- भाडेपट्ट्याचे नूतनीकरण व भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करतेवेळी ११ प्रकरणांमध्ये शर्तभंग आढळून आलेले आहेत. सदर शर्तभंग नियमानुकूल करणेत येवून खालील प्रमाणे रक्कम वसूल करणेत आलेली आहे.

अ.क्र.	तपशील	रकम रु.
१.	विनापरवाना हस्तांतरण नियमानुकूल करणे	३१,९१,१०,८३०/-
२.	विनापरवाना पुनर्विकास नियमानुकूल करणे	निरंक
३.	विनापरवाना वापर बदल नियमानुकूल करणे	निरंक
४.	नूतनीकरणाबाबत विहित मुदतीत न कळविल्याने दंड आकारणी करणे	निरंक
५.	विनापरवानगी अतिरिक्त बांधकाम नियमानुकूल	निरंक
	एकूण :-	३१,९१,१०,८३०/-

शासन पत्र दिनांक २४/०२/२०२३ नुसार शासकीय भाडेपट्ट्याच्या मिळकतीमधील शर्तभंग नियामानुकूल करणेकरीता शासन सक्षम प्राधिकारी आहे.

शासन पत्र दि.१२/०२/२०२५ अन्वये शर्तभंग तपासणी करणेकरीता विशेष मोहिम राबविण्याबाबत निर्देश दिलेनूसार या कार्यालयामार्फत विशेष मोहीम राबवून पुढील तीन महिन्यात सर्व शासकीय भाडेपट्ट्याच्या मिळकर्तीची तपासणी करणेत येऊन आढळून आलेल्या शर्तभंगाच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेची तजविज ठेवण्यात येत आहे.

सदरील माहिती या कार्यालयातील उपलब्ध अभिलेखावरुन देण्यात आलेली आहे.

12/02/25

(सतीश बागल)
निवासी उपजिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
(महसूल शाखा)

स्पीड पोस्ट

क्र.सीएसएलआर/मशा-१/टे-२/माझगाव/भु. क्र.३६५व ३६९/२०२५/3353
दिनांक - २७/०२/२०२५.

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव (महसूल),
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- विधानपरिषद आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ (सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन)
माझगांव येथील भुखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणेबाबत..

संदर्भ : - आपेकडील पत्र क्र. विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२,दि.२७.०२.२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये, सर्वश्री सचिन अहीर व इतर वि. प. स. यांनी म. वि. प. नियम १०१ अन्वये दिलेल्या सूचना क्र. ५४८ अन्वये माझगांव येथील भूखंडाचा भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यांसंबंधी सन २०२३ च्या तृतीय हिवाळी अधिवेशनात मा. मंत्री (महसूल) यांनी आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ यासंबंधी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक ११.०२.२०२५ रोजी अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ चा प्रस्ताव मा. मंत्री (महसूल) यांना सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्तावामध्ये मा. मंत्री (महसूल) यांनी सदर प्रकरणाबाबत सद्यस्थिती मागवावी असे निर्देश दिलेले आहेत. तरी आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ बाबतची सद्यस्थिती आजच उपलबध करुन देण्यात यावी असे कळविले आहे.

त्याअनुषंगाने, महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन क्रमांक १५३ ते १५८ बाबतच्या सद्यस्थितीचा अहवाल / विवरणपत्र आपणांकडे माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

सोबत : विवरण पत्र अहवाल व सहपत्रे.

(संजय यादव),
O/C जिल्हाधिकारी, मुंबई शहर.

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पुर्ण करण्यात आले. त्याबाबतचे आदेश, निर्णय असल्यास त्याचा दिनांक (प्रत सोबत जोडावी)	आश्वासन पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन पूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासन पूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणा-या अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१५३ १५४ १५५ १५६ १५७ १५८	विधानपरिषद कामकाज खंड :- २०३ क्रमांक :- ७ दिनांक :- १५ डिसेंबर २०२३ माननीय मंत्री/राज्यमंत्री श्री. यांनी दिलेले उत्तर	माझगांव येथील भूखंडाची भाडेपट्टा रक्कम न भरता परस्पर खाजगी विकासकास विक्री करणे यासंबधी... सर्वश्री. सचिन अहीर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५४८	मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५३. सभापती महोदया, नियमाचे उल्लघंन झाले आहे. अनधिकृत वापर होत आहे. अशा सर्व जमिनींच्या बाबतीत विशेष मोहिम घेऊन सर्व जमिनी शासनाकडे जमा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.	मुंबई शहर जिल्हयात शासकीय भाडेपट्टयाच्या एकूण १३०७ मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी ६९१ मिळकर्तीचा भाडेपट्टा संपुष्टात आलेला आहे. भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या मिळकतीपैकी २८५ मिळकर्तींची तपासणी करण्यात आलेली असून त्यामध्ये २२८ प्रकरणांमध्ये शर्तभंग आढळून आलेला आहे. २८५ तपासणी करण्यात आलेल्या प्रकरणांपैकी १२१ प्रकरणांत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टा नुतनीकरण करुन एकूण भुईभाडे रक्कम रुपये ८९,२३,०४,०९३/- इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर १२१ प्रकरणांपैकी ६४ प्रकरणांत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शर्तभंग नियमानुकूल करण्यात आलेला आहे. व त्यामधून शासनास रक्कम रुपये २११,१२,५२,१८९/- इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. तसेच ७९ प्रकरणांत भाडेपट्टयाच्या मिळकतीचे भोगवटादार वर्ग – १ मध्ये रुपांतरणाच्या प्रकरणातून शासनास रक्कम रुपये ८३०,६९,४३,५६६/- इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. उर्वरित एकूण १६४ शर्तभंगाची प्रकरणे शासनास सादर करण्यात आलेली आहेत. तसेच	-	-	-	-	-
			मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५४.सदर विषयाबाबतची संपुर्ण माहिती घेऊन लोकहिताच्या दृष्टीने त्यांच्याही पुनर्वसनाच्या बाबतीत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.		-	-	-	-	-
			मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५५.सर्व प्रकरणांमध्ये दिरंगाई का झाली, दोषी कोण आहेत, नियमबाहय पध्दतीने नुतनीकरणाचे अधिकार नसताना परवानगी देणारे कोण आहेत याची चौकशी केली जाईल आणि दोषीवर कारवाई केली जाईल.		-	-	-	-	-
			मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५६.विशेष मोहिम घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.		-	-	-	-	-
			मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५७.जे लोक आहेत त्यांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल.		-	-	-	-	-

			मा. मंत्री/ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील:- १५८.सभापती महोदया, आपण ज्या सूचना केल्या त्यानुसार सर्व जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येतील. अशा सर्व शासकीय भूखंडासंदर्भात जेथे अतिक्रमण झाले असेल बेकायदेशीर कब्जा घेतला असेल, मुदत संपली असेल, त्यासाठी जी कारवाई करण्याची आवश्यकता आहे ती करण्यात येईल.	शर्तभंगाखाली ६ प्रकरणे सरकार जमा करण्यात आलेली आहेत. त्याबाबत उच्च न्यायालय व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ या दोन्ही निवडणूकींच्या कामकाजामुळे उर्वरित राहिलेले भाडेपट्टयाच्या मिळकर्तींच्या शर्तभंगाची तपासणी पुर्ण होवू शकली नाही. उर्वरित मिळकर्तींच्या तपासणीकरिता शासनाने दिलेल्या निर्देशानुसार विशेष मोहिम हाती घेण्यात आलेली असून जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील दिनांक १२.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शर्तभंग तपासणीकरिता ५ पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार आजतागायत एकूण २७६ इतक्या मिळकर्तींची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी २४ प्रकरणांत ७- मोबाईल टॉवर, १७- विना परवाना बांधकाम आढळून आलेले आहे. नुतनीकरणाची कार्यवाही करतेवेळी कागदपत्रे तपासून विनापरवाना हस्तांतरणाबाबतचा शर्तभंगाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेची तजविज ठेवण्यात येत आहे.					

(संजय यादव)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
(महसूल शाखा)

क्र.सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तांव भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र. ३६५ व ३६९/२०२५, दिनांक :- 92 /०६/२०२५ /१५०६

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव (महसूल),
महसूल व वन विभाग,
पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

संक्र. 2Le/24/ST-2
20/6/25

विषय : माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या मिळकतीचे भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत..

संदर्भ :- १) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. विपआ-२५२४/प्र.क्र.०२/ज-२, दिनांक २४.०३.२०२५.
२) या कार्यालयाकडील नोटीस क्र.सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६५/२०२५/६९९, दि.२८.०३.२०२५.
३) या कार्यालयाकडील नोटीस क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/ हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६९/६९८, दिनांक २८.०३.२०२५.
४) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. विपआ-२५२४/प्र.क्र. ०२/ज-२, दिनांक ०७.०४.२०२५.
५) जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांचेकडील दि. १५.०३.२०२५ रोजीचा अर्ज.
६) श्री किरीट साधू, विभाग प्रमुख, मलबार हिल काँग्रेस कमिटी यांचेकडील दि. २५.४.२०२५ रोजीचा अर्ज.
७) या कार्यालयाकडील ज्ञाप दिनांक २८.०४.२०२५.
८) परिरक्षण भूमापक यांचेकडील दिनांक ०२.०५.२०२५ रोजीचा अहवाल.
९) या कार्यालयाकडील नोटीस क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव /हस्तां व भाडेपट्टा व नुतनीकरण/भु.क्र.३६५ व ३६९/२०२५/११७४, दि. ०६.०५.२०२५

अ. मु. स. (महसूल) क्रं.क्र.289 दिनांक: 23/06/2025

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्रमांक १ व ४ च्या अनुषंगाने, सदर पत्रासोबत दिनांक २५.०३.२०२५ रोजीच्या वैठकीचे इतिवृत्तानुसार माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या भाडेपट्टयाच्या शासकीय

ळकतीबाबत मा. मंत्री (महसूल) महोदय यांच्याकडे दिनांक २५.०३.२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत ा. मंत्री (महसूल) महोदय यांनी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना सात दिवसांची लेखी नोटीस देवून भाडेपट्टाधारक ांचा खुलासा घेऊन अहवाल स्वयंस्पष्ट शिफारशीसह सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

मिळकतीची पार्श्वभूमी :-

माझगांव महसूल विभागातील भुकर क्र. ३६५, क्षेत्र ७२५.७६ चौ. मी. ही मिळकत शासनाने दे.१२/०४/१९१० रोजीचे भाडेपट्टयाने दिनांक ०१/०१/१९०३ पासून ९९ वर्षासाठी Bai Mithibai Wife Of Merwanji Dhunjibhoy Merwanji Jeejeebhoy यांना भाडेपट्टयानी दिलेली होती.

माझगांव महसूल विभागातील भूकर क्र. ३६९, क्षेत्र ९१५४.१० चौ. मी. ही मिळकत शासनाने दि. ०४/०९/१९०९ रोजीचे भाडेपट्टयाने दिनांक ०१/०१/१९०३ पासून ९९ वर्षासाठी Bai Mithibai Wife Of Merwanji Dhunjibhoy Merwanji Jeejeebhoy यांना भाडेपट्टयानी दिलेली होती. दोन्ही मिळकतीचा भाडेपट्टा दि. ३१/१२/२००२ रोजी संपुष्टात आलेला आहे.

शासन निर्णय दिनांक १२.१२.२०१२ अन्वये भाडेपट्टा नुतनीकरण धोरण जाहीर करण्यात आले असून माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या मिळकतीबाबत भाडेपट्टाधारक Awabai W/o Muncherji Musserwanji Cama, व इतर ३ यांना दिनांक १५/०६/२०१३ अन्वये सदर मिळकतीच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण / भाडेपट्टयाचे रुपांतरण कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या सत्ताप्रकाराने धारण करणेबाबतचा विकल्प या कार्यालयास सादर करणेविषयी कळविले होते. त्यानुसार जे. पी.एम.जीजाभॉय ट्रस्ट यांनी दिनांक २२/१०/२०१६ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीचा भाडेपट्टा नुतनीकरणाकरिता विकल्प सादर केलेला आहे.

त्यानुषंगाने सदर मिळकतीचे भाडेपट्टाधारक जे.पी.एम.जीजाभॉय ट्रस्ट यांना दिनांक १५/१०/२०१८, दिनांक ०४/०१/२०१९ व दिनांक २१/०१/२०१९ रोजी सुनावणी देणेत आली. सदर सुनावणींच्या अनुषंगाने भुकर क्रमांक ३६५ या मिळकतीबाबत अंतरिम आदेश क्र. सीएसएलआर/मशा-४/टे-२/माझगांव/भु.क्र.३६५ /भा.नु./२०१९ /१५९५८, दिनांक १५.१०.२०१९ अन्वये मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबतचे रक्कम रुपये ८२,२९,६७८/- शासनखाती भरणा करणेकामी आदेश पारित करण्यात आले. तसेच भुकर क्रमांक ३६९ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील आदेश क्र. सीएसएलआर/मशा-४/टे-२/माझगांव/भु.क्र. ३६९/भा.नु. /२०१९ /१५९५९, दिनांक १५.१०.२०१९ अन्वये मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबतचे रक्कम रुपये ५,६१,७३,८१०/- भरणा करणेकामी आदेश पारित करण्यात आले आहेत.

प्रकरणी, भुकर क्र. ३६५ व ३६९ या मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या आदेशातील रक्कम विहित कालावधीत शासनखाती भरणा न केल्याने या कार्यालयाकडील दिनांक १५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, जमीन महसूल वसूली शाखा यांना सदर आदेशातील रक्कम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७, २६८ व २६९ मधील तरतूदी नुसार सक्तीने वसुल करणेकामी कळविणेत आलेले होते. त्याअनुषंगाने सदर मिळकतींबाबत तहसिलदार जमीन महसूल वसूली शाखा यांनी दिनांक ०६.०८.२०२१ रोजी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७ अन्वये नोटीस दिली होती. त्यावर एल. आर. ॲण्ड असोसिएट यांचेकडील दिनांक ०३.०९.२०२१ रोजीचा अर्जान्वये कोविड महामारीमुळे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल करण्यास विलंब झाला असे नमूद केले आहे.

तहसिलदार जमीन महसूल वसूली शाखा यांनी दिनांक २७.०९.२०२१ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७ अन्वये वॉरंट निर्गमित केले. भुकर क्रमांक ३६५ या मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या आदेशातील रक्कम विहित कालावधीत भरणा न केल्यामुळे या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण /भु. क्र. ३६५/२०२१, दिनांक २१.१२.२०२१ अन्वये भुईभाडयाची रक्कम व्याजासह रक्कम रुपये १,११,५५,५०६/- शासनखाती भरण्याबाबत अर्जदारास कळविण्यात आले होते. तसेच भुकर क्र. ३६९ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण /भु. क्र. ३६५/२०२१, दिनांक २१.१२.२०२१ अन्वये भुईभाडयाची रक्कम व्याजासह रुपये ८,४५,६६,१९१/- शासनखाती भरण्याबाबत अर्जदारास कळविण्यात आले होते. तद्नंतर जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट यांच्यावतीने ॲड आसीफ फयाझ खान यांनी दिनांक ०८.०२.२०२२ रोजी रक्कम भरणाकरणेकामी तहसिलदार, जमीन महसूल वसूली शाखा यांच्याकडे हमीपत्राव्दारे हमी दिली होती.

प्रकरणी एल. आर. ॲण्ड असोसिएट यांचेकडील दिनांक २१.०३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये भूकर क्र. ३६५ या मिळकतीबाबत धनादेश क्र. २१३१९९, दिनांक २१.०३.२०२२ अन्वये रक्कम रुपये ५०,००,०००/- शासनखाती भरण्यात आल्याचे कळविण्यात आले होते. या कार्यालयाकडील अभिलेख पाहता चलन क्र. GRN MH०१५०१७०२४२०२१२२M, दिनांक २२.०३.२०२२ अन्वये रक्कम रुपये ५०,००,०००/- भरण्यात आली आहे.

प्रकरणी या कार्यालयाकडील दिनांक ०२.०१.२०२३ अन्वये अर्जदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २६७ अन्वये प्रलंबित रक्कम विहित कालावधीत भरण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू अर्जदार यांनी उर्वरित रक्कम शासनखाती भरणा न केल्याने या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-१/टे-२/माझगांव/भु. क्र. ३६५/शा. ज./२०२३/ २१६४७, दिनांक ०५.१२.२०२३ व या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-१/टे-२/माझगांव/भु. क्र. ३६५/शा. ज./२०२३/ २१६४७, दिनांक ०५.१२.२०२३ अन्वये भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना अंतिम नोटीस देवून माझगांव महसूल विभागातील भुकर क्र.

066(25)/14/2025-MRF(DESK12)-Revenue and Forest (Computer No. 1263011)

,५ व ३६९ या मिळकती महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३ व ५४ नुसार सरकार जमा करणेत का
ऊ नये ? याबाबतचा खुलासा नोटीस मिळालेपासून ७ दिवसाचे आत करावा व लेखी खुलाशासह दिनांक
१.१२.२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने, दिनांक २२.१२.२०२३
जीच्या सुनावणीस भाडेपट्टाधारकाच्या वतीने ॲड. लेवी रुबेल्स हे उपस्थित राहून त्यांनी लेखी म्हणणे सादर केले
ासून लेखी म्हणण्यानुसार भाडेपट्टाधारक / रोजी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट हे शासकीय मिळकतीचे भाडेपट्टा
ुतनीकरण करण्यास तयार असून नुतनीकरणाबाबतची अंतिम रक्कम कळविल्यापासून १० दिवसाच्या आत सदरची
क्कम शासनखाती भरण्याबाबत तयार आहोत असे लेखी म्हणण्यात नमूद करण्यात आले आहे.

प्रकरणी मा. श्री सचिन अहिर, वि. प. स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५०४ व मा. श्री सचिन अहिर, मा. श्री अमोल मिटकरी, मा. श्री विक्रम काळे, वि. प. स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ५४८ च्या लक्षवेधी (महाराष्ट्र विधानपरिषद, सन २०२३ चे तृतीय अधिवेशनात) मध्ये माझगांव महसूल विभागातील भूकर क्र. ३६५, ७२५.७६ चौ. मी. व भूकर क्र. ३६९, क्षेत्र ९१५४.१० या शासकीय मिळकतीच्या अनुषंगाने अधिवेशना दरम्यान लक्षवेधी केली होते. सदर लक्षवेधीच्या अनुषंगाने मा. महसूल मंत्री महोदय यांनी मिळकत सरकार जमा करणेचे सभागृहामध्ये आश्वासित केले होते.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक १०.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास माझगांव महसूल विभागातील भुकर क्र. ३६५ व भुकर क्र. ३६९ या शासकीय मिळकतींचे भाडेपट्टाधारक यांनी सुनावणी दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने भाडेपट्टा नुतनीकरणाची रक्कम भरणा करुन घ्यावी ? किंवा सदरची मिळकत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३ व ५४ नुसार शासन जमा करण्यात यावी याबाबत शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत कळविण्यात आले होते.

मा. आ. अमोल मिटकरी, म. वि. स. यांचेकडील दिनांक ०४.०१.२०२४ व दिनांक ०३.०६.२०२४ तसेच मा. आ. सचिन अहिर, म. वि. स. यांचेकडील दिनांक ०५.०१.२०२४ व दिनांक १८.०३.२०२४ रोजीच्या निवेदनांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र दिनांक ३०.०१.२०२४, दिनांक १६.०४.२०२४ व दिनांक २६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांनी विनंती केल्यानुसार शासनखाती रक्कम जमा करुन घ्यावी किंवा सदरची मिळकत शासन जमा करण्यात यावी, याबाबत शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. जमीन-२५२४/२४/प्र.क्र.०४/ज-२, दिनांक २८.०८.२०२४ व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. जमीन-२५२४/२४/प्र.क्र.०५/ज-२, दिनांक २८.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अनुक्रमे भुकर क्रमांक ३६५, क्षेत्र ७२५.७६ चौ. मी. व भुकर क्रमांक ३६९, क्षेत्र ९१५४.१० चौ. मी. या भाडेपट्ट्याच्या शासकीय मिळकतीचे भाडेपट्टाधारक यांची विनंती विचारात घेऊन शासनाच्या

H 3170.pdf - 52 a

प्रचलित धोरणानुसार नुतनीकरणाची रक्कम भरणा करुन भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात यावी असे शासन स्तरावरुन कळविण्यात आले होते.

प्रकरणी, भुकर क्रमांक ३६५ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील दिनांक १२.०९.२०२४ रोजीच्या सुनावणी नोटीस अन्वये सदर मिळकतीच्या नुतनीकरणाकरिता रक्कम रुपये ९५,७४,२७०/- व भुकर क्र. ३६९ या मिळकतीबाबत या कार्यालयाकडील दिनांक १२.०९.२०२४ रोजीच्या सुनावणी नोटीस अन्वये सदर मिळकतीच्या नुतनीकरणाकरिता रक्कम रुपये १३,२८,६९,१४०/- एवढे शासनखाती भरणा करणे आवश्यक असून सदर आकारणीबाबत आपणांस काही आक्षेप असल्यास लेखी खुलाश्यासह दिनांक २०.०९.२०२४ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत अर्जदार यांना निर्देशित करण्यात आले होते. दिनांक ०१.१०.२०२४ रोजीच्या सुनावणीत जे.पी.एम.जी. जीजाभॉय ट्रस्ट यांचे वतीने ॲड. लेवी रुबेल्स यांनी सदर मिळकतीच्या नुतनीकरण करणेकामी आवश्यक असलेले शुल्क शासनखाती भरण्यास तयार असल्याबाबत सांगितले असून त्याबाबतचे लेखी निवेदन देखील सादर केले आहे.

प्रकरणी, या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६५/२०२४/१७०५३, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये भूकर क्र. ३६५ या भाडेपट्टयाच्या शासकीय मिळकतीबाबत भविष्यात शासनाचे आदेश अंतिम राहतील या अटीच्या अधीन राहून सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाकरिता व्याजासह एकूण रक्कम रुपये ९५,७४,२७०/- व या कार्यालयाकडील पत्र क्र. सीएसएलआर/मशा-२/टे-२/माझगांव/हस्तां व भाडेपट्टा नुतनीकरण/भु.क्र.३६९/ २०२४/१७०५२, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये भूकर क्र. ३६९ या भाडेपट्टयाच्या शासकीय मिळकतीबाबत भविष्यात शासनाचे आदेश अंतिम राहतील या अटीच्या अधीन राहून सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाकरिता व्याजासह एकूण रक्कम रुपये १३,२८,६९,१४०/- हे हे शासनाच्या तिजोरीत RDC Mumbai city यांचे नांवे शासकीय जमा लेखांकन (GRAS) प्रणालीद्वारे भरणा करण्यात यावी. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे र. रुपये ५००/- च्या मुद्रांक पेपरवर हमीपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

प्रकरणी मा. राहूल रमेश शेवाळे, माजी खासदार यांचेकडील दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांना प्रतिलिपीत करण्यात आलेल्या निवेदनाच्या मुखपृष्टावर मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी "प्र. स. विधी व न्याय चौकशीसह सादर करावी" अशी निवेदनाची प्रत निवेदनासोबत संलग्न केलेली आहे. (प्रत संलग्न) सदर निवेदनान्वये, माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकतीबाबत शासनाची परवानगी शिवाय जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट व खाजगी विकासक यांच्या मध्ये अंतर्गत करारनामा नोंदणीकृत दस्तऐवज झाल्याचे निर्दशनास आले आहे. शासनाची जमीन सदर ट्रस्टने खाजगी विकासक प्रतिक जैन यांना ४०० कोटी रुपयांना विकल्याचे स्थानिक नागरिकांच्या माध्यमातून निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी शासनाचा करोडो रुपयांच्या महसूल बुडाला असून याबाबत आपण तातडीने सखोल चौकशी करुन जे.

एम. जीजीभॉय ट्रस्ट व खाजगी विकासक प्रतिक जैन यांच्यावर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा ब्रल करावा व भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ हे दोन्ही भूखंड शासन जमा हेतू तातडीने कार्यवाही करावी से नमूद केले आहे. (सोबत प्रत संलग्न)

सदर निवेदनाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक १८.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास माझगांव हसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या शासकीय भाडेपट्ट्याच्या मिळकतीचे भाडेपट्टा तनीकरणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मार्गदर्शन होण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच सह जल्हा निबंधक वर्ग -२, निबंधक कार्यालय १ ते ५ यांना दिनांक १७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माझगांव महसूल वेभागातील भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या शासकीय भाडेपट्ट्याच्या मिळकतीमध्ये जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट व विकासक प्रतीक जैन किंवा इतर व्यक्ती यांच्यामध्ये कुलमुखत्यार, करारनामा किंवा मिळकतीशी संबंधित इतर नोंदणीकृत दस्त झाले असल्यास सदरचे दस्त इकडील कार्यालयास तात्काळ उपलब्ध करुन कळविण्यात आलेले आहे.

भाडेपट्टाधारक यांचेवतीने ॲड. लेवी रुबेल्स यांचेकडील दिनांक २५.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, भु. क्र. ३६५ करिता रक्कम रुपये ९५,७४,२७०/- व भु. क्र. ३६९ करिता रक्कम रुपये १,७५,००,०००/- दिनांक १६.१०.२०२४ व रक्कम रुपये ११,५३,६९,१४०/-, दिनांक १८.१०.२०२४ अशी एकूण र. रु. १३,२८,६९,१४०/- रोजी ही शासनखाती भरणा केली असल्याबाबत व चलनाची प्रत सोबत जोडली असल्याबाबत इकडील कार्यालयास कळविलेले होते. त्याअनुषंगाने इकडील कार्यालयाकडील दिनांक ०७.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भाडेपट्टाधारक यांना शासनखाती भरणा करण्यात आलेल्या चलनाची प्रत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

भाडेपट्टाधारक यांचेकडील दिनांक ३०.०१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाची रक्कम अर्जदार / भाडेपट्टाधारक जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट C/O कामा नॉरटन ॲन्ड कंपनी यांचेवतीने Aikya Realty Pvt. Ltd यांनी भरणा केलेली आहे असे कळविलेले आहे. तसेच Aikya Realty Pvt. Ltd. यांचेकडील दिनांक ३०.०१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये, जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट C/O कामा नॉरटन ॲन्ड कंपनी यांचेवतीने Aikya Realty Pvt. Ltd यांनी भाडेपट्टा नुतनीकरणाबाबतची रक्कम शासनखाती भरणा केलेली आहे असे कळविलेले आहे.

अर्जदार यांनी सादर केलेले चलन तपासले असता सदरचे चलन हे Aikya Realty Pvt. Ltd या नावाने भरणा केलेले दिसून येते. वास्तविक पाहता सदरचे चलन भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांच्या नावाने भरणा करणे आवश्यक होते. सदर प्रकरणी भरणा केलेले चलन कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही. सबब, Aikya Realty Pvt. Ltd. यांचा सदर मिळकतीशी काय संबंध आहे. तसेच सदर मिळकतीबाबत Aikya Realty Pvt. Ltd. व इतर विकासकांशी कुलमुखत्यार, विकसन करारनामा किंवा मिळकतीशी संबंधित इतर नोंदणीकृत दस्त केले आहे किंवा

कसे ? याबाबतचा खुलासा ७ दिवसांच्या आत सादर करण्याबाबत इकडील कार्यालयाकडील दिनांक २५.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट कळविण्यात आलेले होते.

भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना विहित मुदत दिल्यानंतर देखील त्यांच्याकडून विषयांकीत प्रकरणी खुलासा प्राप्त न झाल्याने इकडील कार्यालयाकडील दिनांक १३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५, क्षेत्र ७२५.७६ चौ. मी. व भुकर क्रमांक ३६९, क्षेत्र ९१५४.१० चौ. मी. या शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकती शासन जमा करणे योग्य होईल. सबब, भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या शासकीय मिळकती सरकार जमा करणेकामी शासनस्तरावरुन आदेश होण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तद्नंतर भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट वतीने ॲड. लेवी रुबेल्स यांनी त्यांचेकडील दिनांक १३.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये भुकर क्रमांक ३६५ व ३६९ च्या अनुषंगाने खुलासा केलेला असून सदर खुलाशामध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहेत.

Legal Relationship Between J.P.M. Jeejeebhoy Trust and Aikya Realty Pvt. Ltd.

In direct response to your query about the relationship between Aikya Realty Pvt. Ltd. and the Trust, we, on behalf of our client, say that our client has executed a Limited Power of Attorney in favour of Aikya Realty Pvt. Ltd. and Mr. Pratik Jain, authorizing them to act on behalf of the Trust specifically for matters related to lease renewals and related administrative processes.

Our client, states that this Limited Power of Attorney was duly executed and is legally valid. We are enclosing a certified copy of this document for your perusal, which clearly establishes the authority of Aikya Realty Pvt. Ltd. to make payments and undertake other actions in connection with the lease renewal process on behalf of the Trust.

Specific Authorization for Making Payments :-

On behalf of our client, we would like to draw your attention to the following specific provisions in the Limited Power of Attorney that explicitly authorize Aikya Realty Pvt. Ltd. to make payments for lease renewal on behalf of the Trust:

Clause १: Authorizes correspondence with government authorities, including the Collector of Mumbai, regarding renewal of the lease of the said property.

Clause ८: Specifically permits carrying on correspondence with authorities "in connection with ıe said property and for renewal of lease/conversion of the said property from leasehold to eehold."

Clause १५: Explicitly authorizes "pay[ing] necessary charges, deposits, premiums... and/or any mounts payable whatsoever to the concerned authorities."

Our client, states that these provisions unequivocally establish that Aikya Realty Pvt. Ltd. was ıcting within the scope of its authority when making the lease renewal payment.

Legal Validity of Payments Made Through an Authorized Agent :-

Our client, respectfully submits that under established principles of agency law, actions taken by an authorized agent (Aikya Realty Pvt. Ltd.) within the scope of their authority are legally binding on the principal (the Trust).

Our client, respectfully submits that the Limited Power of Attorney created a valid principal-agent relationship, and all actions taken by Aikya Realty Pvt. Ltd. within the scope of this authority directly bind the Trust.

Our client, respectfully submits that all communications from Aikya Realty Pvt. Ltd. clearly disclosed the agency relationship by explicitly stating they were acting "at the request of and on behalf of J.P.M. Jeejeebhoy Trust," fulfilling all requirements of transparent agency representation.

उक्त खुलाशासोबत Limited Power of Attorney (₹. रु. ५००/- च्या मुद्रांक पेपरवरील), Minutes of the Meeting of The Board of Directors (Aikya Realty), J. P. M. Jeejeebhoy Trust (Resolution) सादर केलेले आहे.

श्री जितेंद्र कुंदलमल सुराणा यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना प्रतिलिपित केलेल्या अर्जाची प्रत इकडील कार्यालयास दिनांक १७.०३.२०२५ रोजी प्राप्त झालेली आहे. सदर अर्जान्वये भुकर क्र. ३६५ व ३६९ या मिळकतीचे मालक जे. पी. एम. जी. जीजीभॉय ट्रस्ट हे गेली २० वर्षापासुन आर्थिक स्थिती सक्षम असतानाही देय थकीत नुतनीकरण, भुईभाडे, दंड रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्याने सदरहू मिळकत जप्त करुन शासनाने शासन जमा करावी आणि सदरची मिळकत खाजगी विकासकास न देता रहिवाशी सदनिकाधारकांच्या नियोजित गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरीत करण्याबाबतचे निर्देश देण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच श्री सागर रोगे, सोशल जस्टीस फाऊंडेशन यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर मिळकत धारकाचे नाव दाखल करण्यास हरकत असल्याबाबत तक्रार केली आहे.

सह दुय्यम निबंधक मुंबई -१ यांचे कार्यालयाकडील दिनांक २४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये जे. जी. एम. जीजीभॉय ट्रस्ट चे ट्रस्टी मेहरवानजी रुस्तमजी कामा, नुस्सेरवानजी कामा हे सर्व ट्रस्टी व बेनिफिशरी व ऐक्या रिऍल्टी प्रा. लि. तर्फे संचालक प्रतिक जैन, शांतीलाल जैन यांना मुखत्यारनामा देण्यात आलेला असून सदर मुखत्यारनामा हा त्यांनी दस्तावर सही केलेला दस्त फक्त कबुली जबाब देण्यासाठी दिलेला असून सदर मुखत्यारनामा व्दारे मिळकत ही हस्तांतरण झालेली नसून केवळ Admit and Excution म्हणजेच कबुली जबाबासाठी देण्यात आलेला दस्त आहे. सदर दस्तान्वये कोणतीही मालमत्ता हस्तांतरित होत नाही. सदरील कुलमुखत्यारनामा हा केवळ कबुली जबाब बाबत असून लिहून देणार यांनी भविष्यात निष्पादीत करुन दिल्यानंतर देण्यासाठी आहे. कबुली जबाबसाठी देण्यात आलेल्या कुलमुखत्यार पत्रान्वये मालमत्ता हस्तांतरीत होत नाही. पक्षकार यांनी कोणतेही Sale Deed, Lease Deed व इतर कोणतेही दस्त केल्यांनतर त्यावर यथोचित मुद्रांक शुल्काचा भरणा करुन मा. जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेऊन नोंदणीची कार्यवाही करण्यात येईल असे कळविल आहे. सदर पत्रासोबत Power of Attorney, दस्त क्रमांक बबई-१/७९०७/२०२३, दिनांक ०८.१२.२०२३ ची प्रत जोडून या कार्यालयाकडे सादर केलेली आहे.

मा. मंत्री (महसूल) महोदय यांच्याकडे सदर मिळकतीबाबत दिनांक २५.०३.२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट च्यावतीने ॲड. लेवी रुबेल्स हे उपस्थित होते. सदर बैठकीत मा. मंत्री (महसूल) महोदय यांनी जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना सात दिवसांची लेखी नोटीस देवून भाडेपट्टाधारक यांचेकडून खुलासा घेऊन सदर मिळकतीबाबतचा अहवाल स्वयंस्पष्ट शिफारशीसह शासनास सादर करण्याबाबत निर्देश दिलेले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने भाडेपट्टाधारक यांना या कार्यालयाकडून दिनांक २८.०३.२०२५ रोजी नोटीस देण्यात येऊन खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. भाडेपट्टाधारक जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांनी दिनांक १५.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर नोटीसच्या अनुषंगाने दस्तऐवज / कागदपत्रांचे संकलन करित असून सदर नोटीसच्या अनुषंगाने काही कालावधीत कळविण्यात येईल असे कळविले होते.

प्रकरणी, संदर्भ क्र. ६ च्या अर्जान्वये, अर्जदार श्री किरीट साधू, विभाग प्रमुख, मलबार हिल काँग्रेस कमिटी यांनी भाडेपट्टाधारक जीजाभॉय ट्रस्ट यांनी माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या भाडेपट्टयाच्या शासकीय मिळकतीवर अनधिकृतपणे बांधकाम सुरु असल्याची तक्रार प्राप्त झाली. त्याअनुषंगाने या कार्यालयाकडील ज्ञाप दिनांक २८.०४.२०२५ अन्वये परिरक्षण भूमापक यांना सदर मिळकतीवर जाऊन स्थळ परीक्षण व चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परिरक्षण भूमापक यांचेकडील दिनांक ०२.०५.२०२५ रोजीच्या स्थळ पाहणी अहवालान्वये माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६९ या मिळकतीवर सदरचे अनधिकृत बांधकाम सुरु आहे. सदर मिळकतीवर उपस्थित इसम बिरजू चाचा व मुंबई समाचार चे प्रतिनिधी सबीर अली यांना

ारणा केली असता श्री प्रतिक जैन या बिल्डरने सदरचे बांधकाम चालू केले आहे असे स्थळपाहणी अहवालात नमूद है.

प्रकरणी, संदर्भ क्र. ९ च्या नोटीस अन्वये, भाडेपट्टाधारक जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांना दिनांक ..०५.२०२५ रोजीच्या नोटीस अन्वये दि.०८.०५.२०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले ते. त्यानुसार सदर सुनावणीस भाडेपट्टाधारक जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांचेवतीने कुलमुखत्यारधारक श्री तेक जैन उपस्थित होते. त्यांनी सुनावणीमध्ये खालील प्रमाणे लेखी म्हणणे सादर केले आहे.

We had in the meeting informed you that Aikya Realty Pvt. Ltd. Being the onstituted Power of Attorney holder of J. P. M. Jeejeebhoy Trust, had on behalf of he trust made online payments for renewal of the lease in compliance of the order dated ०७th October २०२४ and there for the Chalans were issued in the Name of Aikya Realty Pvt. Ltd. . However, as directed by you in the meeting, we i.e. J. P. M. Jeejeebhoy Trust are ready and willing to once again pay all amounts towards Renewal of the Lease alongwith interest / penalty thereon, if any, form the bank account of J. P. M. Jeejeebhoy Trust. You are therefore requested to issue a fresh order / demand notice and intimate the amount payble by us at the earliest.

Further, upon payment being made by us, you are requested to refund the amount of rupees १४,२४,४३,४१०/- (Rupees Fourteen Crores Twenty Four Lakhs Forty Three Thousand Four Hundred and Ten Only) paid by the Aikya Realty Pvt. Ltd. On our behalf to Aikya Realty Pvt. Ltd. And transfer the same to their bank account, at the earliest.

उपरोक्त प्रमाणे खुलासा केलेला असून मिळकतीवर केलेले भिंतीचे बांधकाम स्वत:हून निष्कासित करतो व सदर बांधकाम निष्कासित केलेबाबत छायाचित्रासह लेखी कळविण्यात येईल असे समक्ष सांगितले.

प्रकरणी, सह जिल्हा निबंधक वर्ग -२ यांना या कार्यालयाकडील दिनांक २८.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भुकर क्र. ३६५ व ३६९ या मिळकतीबाबत आजतागायतपर्यंत भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट यांनी सदरची मिळकत विकासक प्रतीक जैन यांच्याकडे किंवा इतर व्यक्तीकडे / धारकाकडे विकसन करारनामा, अभिहस्तांतरण दस्त, करारनामा, हस्तांतरण किंवा इतर दस्ताव्दारे अथवा आर्थिक मोबदल्याव्दारे मिळकत हस्तांतरीत केलेली आहे किंवा कसे याबाबतची माहिती दस्तासह या कार्यालयास विनाविलंब तात्काळ उपलबध करुन देण्यात यावी असे कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सह दुय्यम निबंधक, मुंबई शहर क्र. १ यांनी दिनांक ०९.०६.२०२५

रोजीच्या पत्रान्वये संगणिकीय अभिलेखाचा भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या मिळकतीचा शोध घेतला असता, दस्त क्रमांक बबई-१/७९०७/२०२३ च्या व्यतिरिक्त कोणत्याही दस्ताची नोंद झाल्याचे या कार्यालयात दिसून येत नाही असे कळविलेले आहे.

उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता खालील प्रमाणे बाबी निर्दशनास आणून देण्यात येत आहेत.

१. श्री जितेंद्र कुंदलमल सुराणा यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना प्रतिलिपित केलेल्या अर्जान्वये सदरहू मिळकत जप्त करुन शासनाने शासन जमा करावी आणि सदरची मिळकत खाजगी विकासकास न देता रहिवाशी सदनिकाधारकांच्या नियोजित गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरीत करण्याबाबतचे निर्देश देण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच श्री सागर रोगे, सोशल जस्टीस फाऊंडेशन यांनी दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर मिळकत धारकाचे नाव दाखल करण्यास हरकत असल्याबाबत तक्रार केली आहे.

२. मा. राहूल रमेश शेवाळे, माजी खासदार यांचेकडील दिनांक ०४.१०.२०२४ रोजीचे निवेदनाच्या मुखपृष्टावर मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी "प्र. स. विधी व न्याय चौकशीसह सादर करावी" असे नमूद केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दिनांक १८.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सदर मिळकतीचे भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मार्गदर्शन होण्यास विनंती करण्यात आलेली आहे.

३. सन २०२३ च्या तृतीय हिवाळी अधिवेशनात मा. मंत्री (महसूल) यांनी आश्वासन क्र. १५२ ते १५८ दिले असून ते प्रलंबित आहे.

४. भाडेपट्टाधारक / जे. पी. एम. जी. जीजाभॉय ट्रस्ट यांनी Aikya Realty Pvt. Ltd. यांच्यासोबत Limited Power of Attorney केलेली असल्याचे कळविलेले आहे. सदर खुलाशासोबत Limited Power of Attorney (रु. रु. ५००/- च्या मुद्रांक पेपरवरील), Minutes of the Meeting of The Board of Directors (Aikya Realty), J. P. M. Jeejeebhoy Trust (Resolution) सादर केलेले आहे. सदर Limited Power of Attorney (अनोंदणीकृत) मधील मुद्दा क्रमांक १५ अन्वये सदर मिळकतीच्या अनुषंगाने संबंधित प्राधिकरणाकडे आवश्यक असलेल्या परवानगी कामी रक्कम भरण्यास Aikya Realty Pvt. Ltd. यांना Limited Power of Attorney व्दारे प्राधिकृत केलेले असल्याचे दिसून येते.

५. सह दुय्यम निबंधक मुंबई - १ यांचे कार्यालयाकडील दिनांक २४.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये जे. पी. एम. जीजीभॉय ट्रस्ट चे ट्रस्टी मेहरवानजी रुस्तमजी कामा, नुस्सेरवानजी कामा हे सर्व ट्रस्टी व बेनिफिशरी व ऐक्या रिऍल्टी प्रा. लि. तर्फे संचालक प्रतिक जैन, शांतीलाल जैन यांच्यात Power of Attorney, दस्त क्रमांक बबई-१/७९०७/२०२३, दिनांक ०८.१२.२०२३ अन्वये नोंदणीकृत केला असल्याचे कळविले आहे.

सदर मुखत्यारनामा हा त्यांनी दस्तावर सही केलेला दस्त फक्त कबुली जबाब देण्यासाठी दिलेला असून सदर मुखत्यारनामा व्दारे मिळकत ही हस्तांतरण झालेली नसून केवळ Admit and Excution म्हणजेच कबुली जबाबासाठी देण्यात आलेला दस्त आहे. सदर दस्तान्वये कोणतीही मालमत्ता हस्तांतरित होत नाही.

६. या कार्यालयाकडील दिनांक ०८.०५.२०२५ रोजीच्या सुनावणीत श्री प्रतिक जैन यांनी सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत शासनखाती भरणा करण्यात आलेली रक्कम ही अनवधनाने Aikya Realty Pvt. Ltd. या नावाने भरणा करण्यात आलेली आहे. ट्रस्टच्या बँक खात्यातून सर्व रक्कम व्याजासह भरणा करणेस तयार आहोत तशी नोटीस देण्यात यावी तसे लेखी म्हणणे देखील सादर केले. तसेच अर्जदार यांनी भुकर क्रमांक ३६५ व भुकर क्रमांक ३६९ या मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत शासनखाती भरणा करण्यात आलेली रक्कम रुपये १४,२४,४३,४१०/- ही अनवधनाने Aikya Realty Pvt. Ltd. या नावाने भरणा करण्यात आलेली रक्कम परत करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

सबब, माझगांव महसूल विभागातील भुकर क्रमांक ३६५ व ३६९ या मिळकतीबाबत उपरोक्त प्रमाणे असलेली वस्तुस्थिती शासनाच्या निर्देशनास आणून देण्यात येत आहे. सदर वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन उचित आदेश होण्यास विनंती आहे. पुढील निर्देश प्राप्त झाल्यानंतरच विषयांकीत मिळकतीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(संलग्न : पृष्ठ क्र. १ ते २७०)

12/6.

(आंचल गोयल),
जिल्हाधिकारी, मुंबई शहर.

आदेशाचा क्रमांक २१०

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत कलम १४३ नुसार पूर्वीचा रस्ता असेल तर दुसरा रस्ता देण्यापासून प्रतिबंध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : विपआ-२०२६/प्र.क्र.६८(E १६२४३९६)/पाणंद रस्ते

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २० एप्रिल, २०२६.

संदर्भ : १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : जमीन-२०५/प्र.क्र.४७/ज-१अ, दि.२२.०५.२०२५

२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३.

प्रस्तावना :-

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनामध्ये दि. १०.०७.२०२५ रोजी राज्यव्यापी सार्वत्रिक शेतजमीन मोजणी मोहिम राबविणे यासंबंधी मा. श्री. शिवाजीराव गर्जे व इतर विधानपरिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम, १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.८७ उपस्थित केली होती. त्यामध्ये मा. श्री. शशिकांत शिंदे, विधानपरिषद सदस्य यांनी "पूर्वीचा एखादा रस्ता योग्य पध्दतीने असेल तरी दुसरा रस्ता तयार करण्याचा प्रकार होतो. दुसरा रस्ता तयार करण्याची मागणी होते. ती मागणी अयोग्य असेल तर ती तत्काळ फेटाळली पाहिजे." असा मुद्दा उपस्थित केला होता. त्याअनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांनी पूर्वीचा रस्ता असेल तर दुसरा रस्ता देण्याची गरज नाही. या संदर्भात कडक आदेश देण्यात येतील, असे सभागृहाला आश्वासन दिले होते. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने दुहेरी रस्त्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन परिपत्रक : -

राज्यात शेतजमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी शेत रस्त्यांची आवश्यकता लक्षात घेता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ अंतर्गत रस्ते उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४३ अंतर्गत रस्त्याचा हक्क देण्याचा मुख्य उद्देश म्हणजे संबंधित जमिनीला योग्य व वाजवी प्रवेश (reasonable access) उपलब्ध करून देणे हा आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, एखाद्याशेतक-याला त्याच्या शेतामध्ये जाण्याकरीता रस्ता अस्तित्वात असतानाही नव्याने दुसरा रस्ता मागण्याचे प्रकार होत आहेत. याअनुषंगाने जर शेतक-याला त्याच्या शेतजमिनीमध्ये जाण्यासाठी रस्ता असेल अशा परिस्थितीत नवीन

किंवा पर्यायी रस्ता कोणत्याही परिस्थितीत मंजूर करण्यात येवू नये. एखाद्या शेतक-याच्या केवळ अधिक सोयीसाठी, कमी अंतरासाठी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी नवीन रस्ता मंजूर करू नये.

२. तहसीलदार यांनी शेत रस्त्याच्या मागणीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी (spot inspection) करुन शेतक-याला त्याच्या शेतामध्ये जाण्याकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध असल्यास नवीन रस्ता मंजूर करु नये. दुहेरी रस्त्याबाबतच्या मागण्या तात्काळ फेटाळाव्यात.

३. या परिपत्रकातील सूचनांचे पालन न केल्यास संबंधित अधिका-यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४. मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ च्या कलम ५ नुसार करण्यात येणा-या कार्यवाहीला सदर परिपत्रकातील तरतूदी लागू नसतील.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२०१७५०३७८९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAPSINH MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf27836 0d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB37730598769 20F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.04.20 17:51:30 +05'30'

(प्रतापसिंह मच्छिंद्र खरात)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत.

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
७. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. विभागीय आयुक्त (सर्व).
१४. जिल्हाधिकारी (सर्व).
१५. पोलिस अधीक्षक (सर्व).
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व).

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID : panandraste-rev@mah.gov.in

क्रमांक : विपआ-२०२६/प्र.क्र.६८/पाणंद रस्ते

दिनांक : २०एप्रिल, २०२६.

प्रति,
कार्यासन अधिकारी,
संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय : सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.२१० बाबत.

महोदय,

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्र.२१० बाबत शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधी विवरणाच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

आपला,

(प्रतापसिंह खरात)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२. कक्ष अधिकारी (समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवडनस्ती/पाणंद रस्ते.

(६७)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID : panandraste-rev@mah.gov.in

क्रमांक : विपआ-२०२६/प्र.क्र.६७/पाणंद रस्ते दिनांक : १५ एप्रिल, २०२६.

प्रति,
कार्यासन अधिकारी,
संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय : सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.२११ बाबत.

महोदय,

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्र.२११ बाबत शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधी विवरणाच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

आपला,

(प्रतापसिंह खरात)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२. कक्ष अधिकारी (समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवडनस्ती/पाणंद रस्ते.

आरक्षण क्रमांक २११

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक २८(१३)] बुधवार, डिसेंबर ३१, २०२५/पौष १०, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ७८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४.— मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. पृष्ठे १-२

दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सुप्रिया धावरे,
प्रारूपकार-नि-सहसचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९०६ चा मुंबई २.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मामलतदार न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ यामध्ये नवीन कलम १४अ समाविष्ट करणे.

२. मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९०६ चा मुंबई २.

नोटीस बजाविण्याची रीत.

"**१४अ.** (१) या अधिनियमाच्या आणि त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, या अधिनियमाखालील प्रत्येक नोटीस, ती ज्या व्यक्तीवर बजावयाची असेल त्या व्यक्तीस किंवा तिच्या प्राधिकृत अभिकर्त्यास, एकतर, तिची प्रत देऊन किंवा स्वाधीन करून किंवा अशी प्रत, डाकेने पाठवून, बजाविता येईल, अथवा जर उपरोक्त रीतीने ती बजाविता येऊ शकत नसेल तर, त्याच्या माहित असलेल्या शेवटच्या राहण्याच्या जागी किंवा नोटीस ज्या जमिनीशी संबंधित असेल ती जमीन ज्या गावामध्ये स्थित असेल किंवा ज्या गावात उक्त जमिनीवर लागवड करण्यात येत असेल त्या गावातील एखाद्या सार्वजनिक राबत्याच्या जागी तिची प्रत लावून, किंवा इलेक्ट्रॉनिक मेल सेवेने ती बजाविता येईल.

(२) अशी कोणतीही नोटीस, त्यामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नावामध्ये किंवा पदनामामध्ये, किंवा कोणत्याही जमिनीच्या वर्णनामध्ये, कोणतीही चूक झाल्यामुळे, अशा चुकीमुळे मोठ्या प्रमाणात अन्याय झाला नसेल तर, निरर्थक झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.".

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २१ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(५) **पोलीस सुरक्षा.**— शेत रस्त्यांच्या किंवा वहिवाटीच्या मार्गांच्या वापराच्या प्रकरणांमध्ये, जर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्याने, मामलतदाराच्या निर्णयाचे पालन करण्यात कसूर केली तर, अर्जदारास मोफत पोलीस सुरक्षा पुरविणे अनिवार्य असेल.".

सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २३ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये,—

(एक) पोट-कलम (२अ) मधील, "डेप्युटी कलेक्टर" या मजकुरानंतर, ", उपविभागीय अधिकारी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) पोट-कलम (३) मधील, "डेप्युटी कलेक्टर" या मजकुरानंतर, ", उपविभागीय अधिकारी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वष ११, अंक ४८(१३)] बुधवार, डिसेंबर ३१, २०२५/पौष १०, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक १२९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Mamlatdar's Courts (Amendment) Act, 2025 (Mah. Act No. LXIV of 2025), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUPRIYA DHAWARE,
Draftsman-*cum*-Joint Secretary to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. LXIV OF 2025.

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 31st December 2025).

An Act further to amend the Mamlatdar's Courts Act, 1906.

Bom. II of 1906.

WHEREAS it is expedient further to amend the Mamlatdar's Courts Act, 1906 for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Seventy-sixth Year of the Republic of India as follows :–

1. This Act may be called the Mamlatdar's Courts (Amendment) Act, 2025. Short title.

Insertion of new section 14A in Bom. II of 1906.

2. After section 14 of the Mamlatdar's Courts Act, 1906 (hereinafter referred to as "the principal Act"), the following section shall be inserted, namely :– Bom. II of 1906.

Mode of serving notice.

"14A (*1*) Subject to the provisions of this Act and the rules made thereunder, every notice under this Act may be served either by tendering or delivering a copy thereof, or sending such copy by post to the person on whom it is to be served or his authorised agent, or if service in the manner aforesaid cannot be made, by affixing a copy thereof at his last known place of residence or at some place of public resort in the village in which the land to which the notice relates is situated or from which the land is cultivated or by electronic mail service.

(*2*) No such notice shall be deemed to be void on account of any error in the name or designation of any person, or in the description of any land, referred to therein, unless such error has produced substantial injustice.".

Amendment of section 21 of Bom. II of 1906.

3. In section 21 of the principal Act, after sub-section (*4*), the following sub-section shall be inserted, namely :–

"(*5*) **Police Security.–** In cases of use of farm roads or customary ways, if the encroaching farmer fails to respond to the decision of Mamlatdar, then it shall be mandatory to provide free police security to the applicant.".

Amendment of section 23 of Bom. II of 1906.

4. In section 23 of the principal Act,–

(*i*) in sub-section (2A), after the words "Deputy Collector" the words ", Sub-Divisional Officer" shall be inserted ;

(*ii*) in sub-section (*3*), after the words "Deputy Collector" the words ", Sub-Divisional Officer" shall be inserted.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS 21-A. NETAJI SUBHASH ROAD. CHARNI ROAD MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

आश्वासन क्रमांक १२८

क्र.विपआ-१२८/११२५/प्र.क्र.३१५/ख-२

मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : 23/07/2025

विषय:- सन २०२५ चे दसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक १२८.

महोदय,

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनामध्ये श्री. अमोल मिटकरी, श्री. विक्रम काळे व श्री. सतिश चव्हाण, विधानपरिषद सदस्य यांनी "येळवण आणि पिंपळखुटा (ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) येथून गौण खनिजाची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत" या विषयाच्या अनुषंगाने विधानपरिषद ~~तारांकित प्रश्न क्रमांक २७६४ उपस्थित केला होता. सदर प्रश्नाच्या अनुषंगाने दिनांक ०८.०७.२०२५ रोजी~~ सभागृहात झालेल्या चर्चेवेळी मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने झालेल्या मंत्री (महसूल) महोदयांनी "सन्मानीय सदस्यांकडे अधिकची माहिती असेल तर या प्रकरणात अधिक खोलात जाऊन निश्चितपणे संबंधितावर कारवाई केली जाईल" असे आश्वासन दिले आहे.

०२. सदर आश्वासन पाहता, विधानपरिषद सदस्यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात मं. मंत्री (महसूल) महोदयांनी दिलेल्या प्रश्नाचे उत्तरावेळी चर्चा करता विधानपरिषद सदस्य यांनी शासनाचा महसूल बुडवून अवैधरित्या गौण खनिजांची चोरी करणारे अनेक लोक आहेत. शासनाचा करोडो रूपयांचा महसूल बुडवून वाहतूक करणाऱ्या टिप्पर व संबंधित कंपन्यांच्याविरूध्द महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्याकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असता, मा. मंत्री (महसूल) महोदयांनी उपरोक्त प्रमाणे आश्वासन दिले आहे. सदर आश्वासन विचारात घेता, प्रश्न उपस्थित केलेल्या कोणत्याही विधानपरिषद सदस्यांनी प्रस्तुत तारांकित प्रश्नाच्या विषयाच्या अनुषंगाने अधिकची माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे सदर आश्वासनाच्या अनुषंगाने कार्यवाही करून त्याची पूर्तता करणे शक्य होणार नाही.

०३. तरी, वरील वस्तुस्थिती पाहता सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्रमांक १२८ वगळण्यात यावे, ही विनंती

आपला,

(चंद्रशेखर बावनकुळे)

प्रति,

1) मा.श्री. प्रविण दरेकर, विधानपरिषद सदस्य,
मा.समिती प्रमुख,
विधानपरिषद आश्वासन समिती,
विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

2) कक्ष अधिकारी (संसदीय कार्य विभाग)

विधानपरिषदेने दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरणपत्र
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

विभागाचा फाईल क्र. .....दिनांक..... विभागाचे नांव :- (महसूल) व वन विभाग

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्ती बाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केल्या पूर्ण करण्यात आले, त्याबाबतचे आदेश, निर्णय असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करावा. (प्रत सोबत जोडावी)	आश्वासन पूर्ती केल्याचा दिनांक (फक्त दिनांक नमूद करावा.)	आश्वासन पूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासन पूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१२८	विधानपरिषद कामकाज खंड :- २१० क्रमांक :- ०७ दिनांक :- ०८ जुलै, २०२५ माननीय मंत्री/ राज्यमंत्री श्री. यांनी दिलेले उत्तर	येळवण आणि पिपळखुटा (ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) येथून गौण खनिज नाही अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत.. सर्वश्री. अमोल मिटकरी व इतर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २७६४.	मा. मंत्री/ श्री. चंद्रशेखर बावनकुळे :- सन्माननीय सदस्यांकडे अधिकची माहिती असेल तर या प्रकरणाच्या अधिक खोलात जाऊन निश्चितपणे संबंधितांवर कारवाई केली जाईल.						

२१११/२५

येळवण आणि पिंपळखुटा (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथून गौण खनिजांची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत

(७) * २७६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येळवण आणि पिंपळखुटा (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) शिवारातून रात्रीच्या वेळी रस्ते कंत्राटदाराकडून गौण खनिजांचे उत्खनन करून उक्त खनिजाची सुमारे ५० ते ७० टिप्परमधून वाहतूक करण्यात येत असल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला जात असल्याचे तसेच सदर प्रकरणी महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध गौण खनिजांचे उत्खनन करणारे कंत्राटदार तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) तक्रारदार यांनी मौजे विझोरा येथे दिनांक ०५/०६/२०२५ रोजी टिप्पर ने विना रॉयल्टीने मुरूम या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याची तक्रार तहसिलदार, बार्शिटाकळी यांच्याकडे प्राप्त झाली. त्यानुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत विकासक हे सदर सात टिप्पर मधून विनापरवाना अवैध रित्या मुरूम या गौण खनिजाची वाहतूक करत असल्याचे दिसून आले. सदर वाहतूक ही विनापरवानगी व अवैध असल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ अन्वये संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव तहसिलदार, बार्शिटाकळी यांनी उपविभागीय अधिकारी, मुर्तिजापूर यांना दिनांक १३/०६/२०२५ सादर केला आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

श्री. अमोल मिटकरी : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी मान्य केले असल्याचे उत्तर दिलेले आहे. येळवण आणि पिंपळखुटा (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) शिवारातून रात्रीच्या वेळी रस्ते कंत्राटदाराकडून गौण खनिजांचे उत्खनन करून उक्त खनिजाची सुमारे ५० ते ७० टिप्परमधून वाहतूक करण्यात येत असल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविलेला आहे.

ता.प्र.क्र. २७६४.....
श्री. अमोल मिटकरी.....
यावर मंत्री महोदयांनी टिप्पर ने विना रॉयल्टीने मुरूम या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याची तक्रार तहसिलदार, बार्शिटाकळी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे उत्तर दिले आहे.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री. चंद्रकांत बावनकुळे यांच्याकडे हे खाते आहे. मंत्री महोदयांनी सदरहू कारवाई किती दिवसांमध्ये पूर्ण करणे अपेक्षित होते आणि जर उशिर झाला असेल तर त्याची कारणे काय आहेत ?

सभापती महोदय, शासनाचा महसूल बुडवून अवैधरित्या गौण खनिजांची चोरी करणारी अनेक लोक आहेत. यांच्या विरोधात कायमस्वरुपी कठोर कारवाई करण्याकरिता शासनाकडून कोणती पावले उचलली जाणार आहेत ?

सभापती महोदय, शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवून वाहतूक करणाऱ्या टिप्पर व संबंधित कंपन्यांच्या विरुद्ध महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध कारवाई केली जाईल काय आणि कारवाईचे आदेश आजच दिले जातील काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, अकोला बोरगांव-काकड या रस्त्याचे बांधकाम करताना स्वामी समर्थ इंजिनिअर कंपनी पुणे यांनी एकूण ८ ब्रास मुरुमाने भरलेला... टोटल ५६ ब्रास मुरुमाची तक्रार तहसीलदार आणि मंडल अधिकाऱ्यांना प्राप्त झाली होती. सदरहू तक्रार श्री. काशिराम जामनी आणि श्री. विशाल गवई यांनी केली होती. बार्शी-टाकळीमध्ये अडीच हजार ब्रास, अकोला तहसीलमध्ये २२,६०० ब्रास अशा प्रकारे १ कोटी ६८ लाख रुपयांची रॉयल्टी भरलेली आहे. सन्माननीय सदस्यांचेनी अवैध वाहतूक होत असल्याचे सांगितले आहे. तहसीलदार, मंडल अधिकारी आणि तलाठ्यांनी स्पॉटवर जाऊन सदरहू अवैध वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले नाही. हे एका व्हिडीओ आणि कोणत्यातरी माहितीच्या आधारावर संबंधित कंपनीच्या विरुद्ध दंड आकारला होता. त्यानंतर उप विभागीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर असा प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले नाही. त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांनी कामे करीत असताना अशी विनंती केली होती की, माझ्या शेतात पाणी जात असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयीकरीता मलबा मोठ्या

08-07-2025 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) P - 6
SGS/KTG प्रथम श्री.गागरे 12:40

ता.प्र.क्र. २७६४.....
श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....
प्रमाणात उचललेला आहे आणि तो मलबा दुसरीकडे शिफ्ट केलेला आहे. त्याच्यावर कारवाई केलेली आहे. या प्रकरणी सन्माननीय सदस्यांकडे अधिकची माहिती असेल तर मी पुन्हा एकदा चौकशी करतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मला अधिकची माहिती द्यावी अशी त्यांना विनंती करतो. या प्रकरणात आज तरी जे काही झालेले आहे, ते सांगण्यावरुन झालेले आहे. म्हणजे यांनी सांगितल्यानंतर त्यांनी कारवाई केली. सन्माननीय सदस्यांकडे अधिकची माहिती असेल तर या प्रकरणात अधिक खोलात जाऊन निश्चितपणे संबंधितांवर कारबाई केली जाईल.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
१ ला मजला, मुख्य ईमारत, दालन क्र.१०१,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८१३६२३ Email ID :- j५a-mh@mah.gov.in

क्रमांक : विपआ-३५२६/प्र.क्र.११/ज-५अ (ई-१५६८७१६) दिनांक :१५/०४/२०२६.

प्रति,

कार्यासन अधिकारी,
संसदीयकार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.२९८: "कोरेगांव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत."

महोदय,

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात दिलेल्या विधानपरिषद आश्वसन क्र.२९८ बाबत शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधी विवरणाच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

आपला,

१५/४/२०२६

(सतिश रेंगे)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत: १) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) कक्ष अधिकारी (समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवडनस्ती जमीन-०५-अ.

आश्वासन क्रमांक २९८

COLSAT-25011(12)/2838/2025-REV

I/1601383/2025

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा,

ईमेल आयडी- dcrsataracollectoroffice@gmail.com दूरध्वनी क्र.-०२१६२- २३२१७५

****

पत्र क्र.कुका/अधिअभि-कावि - १८३५ /२०२५
Comp.No. ६३४९९६६
दिनांक - 13/12/२०२५

प्रति,

उपसचिव ,
महसूल व वनविभाग ,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

विषय - सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र..२९८ व २९९ कोरेगाव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या पोटपाट असलेल्या जागेची विक्री करण्यात येत असलेबाबत.

संदर्भ - १)कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन , महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्रमांक – File No.R & FD -२५०२५ (२६) /१/२०२५ RF (DESKJ५A)(E-१४२४०९३ दिनांक १३/११/२०२५
२)या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मह/३/कुळकायदा/अधिअभि/Comp No. ६३२९५२६ दि. १३/११/२०२५
३) उपविभागीय अधिकारी कोरेगाव, उपविभाग कोरेगाव यांचेकडील पत्र पत्र क्र. आस्था/वि.प.ता .प्रश्न २९६३/Comp No. २३६६७७६/२०२५ दिनांक १७/११/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करणेत येते की , श्री. शशिकांत शिंदे, मा. विधानपरिषद सदस्य यांनी सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. २९६३ चे अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान मा. श्री शशिकांत शिंदे, विधान परिषद सदस्य यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदय यांनी दिलेल्या आश्वासन क्र. २९८ व आश्वासन क्रमांक २९९ चे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल तात्काळ शासनास सादर करण्यात यावा. " या प्रमाणे संदर्भ क्र. १ अन्वये या कार्यालयास निर्देश प्राप्त झालेले आहेत . त्याअनुषंगाने उकत् प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करणेस उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांना संदर्भ क्र. २ अन्वये कळविणेत आले होते .

COLSAT-25011(12)/2836/2025-REV

1/16813/2025

त्यास अनुसरुन उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी त्यांचेकडील पत्र क्र. आस्था/वि.प.ता .प्रश्न २९६३/Comp No. २३६६७७६/२०२५ दिनांक १७/११/२०२५ अन्वये सादर केलेल्या अहवालाची प्रत अवलोकनार्थ सोबत सादर केली आहे.

उपविभागीय अधिकारी यांनी उक्त प्रकरणी सादर केलेला अहवाल, महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतचा अधिनियम व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा याचे अवलोकन करुन उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –ब दिनांक १४ मार्च २०२४ मध्ये प्रसिध्द करणेत आलेली महाराष्ट्र शासन , महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसुचना क्रमांक संकीर्ण २०२२/ प्र.क्र.२८७/ल-१ दिनांक १४ मार्च २०२४ अन्वये मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत नियम १९५९ मधील नियम २७ मध्ये सुधारणा करणेत आलेली असुन त्यानुसार विहिर /कुपनलिका, शेतरस्ते , सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर शिल्लक राहीलेली लगतची जमीन प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असले तर , आणि व्यक्तीगत लाभार्थ्यांसाठी केंद्र किंवा राज्य ग्रामीण घरकून योजनांच्या प्रयोजनासाठी आवश्यकता असेल अशा प्रकरणी विहीत अटी शर्तीचे पालन करुन अल्प क्षेत्र विक्री परवानगी देण्याचे अधिकार शासनाने जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत तसेच सदर अधिकार उपजिल्हाधिकारी-याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिका-यास प्रदान करणेचे अधिकार जिल्हाधिकारीसो यांना प्रदान केलेले आहे.

उपरोक्त अधिकारानुसार विहिर /कुपनलिका, शेतरस्ते , सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर शिल्लक राहीलेली लगतची जमीन प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असले तर , आणि व्यक्तीगत लाभार्थ्यांसाठी केंद्र किंवा राज्य ग्रामीण घरकून योजनांच्या प्रयोजनासाठी आवश्यकता असेल अशा प्रकरणी अल्पक्षेत्र विक्री परवानगी देण्याचे जिल्हाधिकारीसो यांचे अधिकार या कार्यालयाकडील आदेश क्र.कुका/अधिअभि/ ई –ऑफीस क्र. ४५६९६६/२०२४ दिनांक २७/०३/२०२४ अन्वये संबंधित उपविभागाचे उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करणेत आलेले आहेत.

दिनांक १४ मार्च २०२४ रोजीचे अधिसुचनेमध्ये अल्पक्षेत्र विक्री परवानगी देताना पालन करावयाच्या अटीशर्ती नमुद आहेत त्यामधील थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे.

विहिरीकरिता / कुपनलिकेसाठी जमीन हस्तांतरित करण्यासंबंधी अटी-शर्ती (Rule २७ – २अ)

१. अर्ज नमुना–बारा मध्येच दाखल करणे आवश्यक.
२. अर्जासोबत भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरण (GSDA) यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) तसेच प्रस्तावित विहिरीसाठी लागणाऱ्या जमिनीचे भू-सहनिर्देशक (Geo-coordinates). असणे आवश्यक
३. प्रस्तावित खरेदीदाराकडे किमान प्रमाणभूत क्षेत्र असणे बंधनकारक.
४. विहिरीकरिता जमीन हस्तांतरणाची कमाल मर्यादा: पाच आर (५ Are).पर्यंत.
५. मंजुरी आदेशात प्रस्तावित जमिनीचे भू-सहनिर्देशक अनिवार्यपणे समाविष्ट असतील
६. विक्रीखतासोबत जिल्हाधिकाऱ्याचा मंजुरी आदेश जोडणे बंधनकारक
७. विक्रीखत नोंदविल्यानंतर ७/१२ उताऱ्यावर "विहिरीच्या वापराकरिता मर्यादित अशी "नोंद करणे बंधनकारक .

कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या अभिप्रायामधील अटीशर्तीपैकी काही प्रमुख अटी

१. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या पाणी पुरवठा स्त्रोतापासुन ५०० मी. अंतर सोडणे बंधनकारक राहील. तसेच ५०० मी. अंतरावर सार्वजनिक स्त्रोत नाही असे तलाठी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे.
२. प्रस्तावित विहीरीचे ठिकाण हे क्षेत्रातील अन्य खाजगी सिंचन विहिरीपासुन १५०.०० मी. अंतरावर असावे , जेणेकरुन दोन विहिरीमध्ये भूजल विभागून जाणार नाही.

शेत रस्त्यासाठी जमीन हस्तांतरित करण्यासंबंधी अटी-शर्ती (Rule २७ — २ब)

१. अर्ज नमुना—बारा मध्ये करणे
२. अर्जासोबत प्रस्तावित शेत रस्त्याचा कच्चा नकाशा, ज्या जमिनीवर रस्ता प्रस्तावित आहे तिचे भू-सहनिर्देशक तसेच विद्यमान (existing) जवळच्या रस्त्याचा तपशील व जोडणी (connectivity data). इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक.
३. रस्ता वापरण्याकरिता लाभार्थी/खरेदीदाराकडे त्या रस्त्यास लागून किमान प्रमाणभूत क्षेत्र असणे आवश्यक
४. प्रस्तावित रस्ता जाणाऱ्या क्षेत्राचे भू-सहनिर्देशक व विद्यमान रस्त्याशी जोडणीचा नकाशा असलेबाबतचा तहसिलदार यांचा अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक.
५. मंजुरी आदेशात प्रस्तावित रस्ता क्षेत्राचे भू-सहनिर्देशक नमूद करणे बंधनकारक
६. विक्रीखतासोबत हा मंजुरी आदेश जोडणे आवश्यक
७. विक्रीखत नोंदविल्यानंतर ७/१२ उताऱ्याच्या "इतर हक्क" स्तंभात "नजिकच्या जमीन धारकांच्या वापराकरिता शेत रस्ता खुला राहील." अशी नोंद करणे आवश्यक राहील.

उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी दिनांक १७/११/२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसुन येत आहे.

अ.क्र.	विक्री परवानगी देणेत आलेल्या प्रकरणाचा तपशील	तपासणी अंती आढळून आलेल्या त्रुटी
१	दि.२७/१२/२०२४ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/०३/२०२५ दि.१३/०१/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील अर्जदार यांचे नावे असणा-या क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.११.०० हे.आर.चौमी क्षेत्र रस्ता व	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.रस्त्यासंबंधी कच्चा नकाशा प्रकरणी समाविष्ट नाही.तसेच तहसिलदार यांचा अहवाल घेतलेचे दिसुन येत नाही. ३.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ४.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन

	कुपनलीकेसाठी, हस्तांतरण करणेस श्रीमती आशा भास्कर लवळे वगैरे ३ यांना अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ५. प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "कुपनलिकेच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नॉंद घेणेत आलेली नाही. ६.७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालवयाकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
२	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/२१/२०२५ दि.१४/०१/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०२.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस विनोद बाळकृष्ण पाटील यांना विहिरीसाठी, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहिरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नॉंद घेणेत आलेली नाही.
३	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/१२/२०२५ दि.२७/०१/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०२.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस गणेश संपत शेडगे यांना विहिरीसाठी, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही२.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहिरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नॉंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.

४	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्रविक्री/ एसआर/२५/२०२५ दि.०३/०२/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी **०.०३.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.प्रशांत गजानन घाडगे यांना कुपनलीकेसाठी**, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रस्तुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "कुपनलिकेच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
५	दि.०६/०२/२०२५ रोजीचे नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/६७/२०२५ दि.१७/०३/२०२५ नुसार नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधीलक्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०२.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस **श्री.योगेश सुरेश माळवदे यांना विहिरीसाठी**, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहीरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही. ६. प्रस्तावित खरेदीदार यांचे नावे गट नं. १०२/१/२/२ मध्ये ०.०१.३९ हे. आर चौमी क्षेत्र असलेचे दिसून येत सबब प्रस्तुत खरेदीदार यांनी प्रमाणभुत क्षेत्र धारण केलेले दिसुन येत नाही.

६	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ **जगन्नाथ मगर** यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्रविक्री/**एसआर/६८/२०२५** दि.२७/०३/२०२५ नुसार श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर. चौमी क्षेत्रापैकी **०.०१.५०** हे.आर. चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री. **बाळासाहेब लक्ष्मण बंडगर** यांना कुपनलिकेसाठी अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे	विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "कुपनलिकेच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
७	दि.०५/०२/२०२५ रोजीचे नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/ **एसआर/६९/२०२५दि.०३/०४/२०२५** नुसार नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे मालकीचे **कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२** मधील **क्षेत्र** ०.५६.७५ हे.आर. चौमी क्षेत्रापैकी **०.०१.५० हे.आर. चौमी** क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.विकास बळवंत शिंदे यांना **विहिरीसाठी**, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे	विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहीरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
८	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/ अल्पक्षेत्रविक्री/एसआर/७४/२०२५ दि.११/०४/२०२५ नुसार श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे **कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२**क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी **०.०३.०० हे.आर.चौमी** क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.**राजू लक्ष्मण चव्हाण** यांना **रस्त्यासाठी**, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	विहीत नमुन्यात अर्ज नाही २.रस्त्यासंबंधी कच्चा नकाशा प्रकरणी समाविष्ट नाही. ३. तहसिलदार यांचा अहवाल घेतलेचे दिसुन येत नाही ४. प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "नजिकच्या जमीन धारकांच्या वापराकरिता शेत रस्ता खुला राहील " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ६. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालवयाकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.

उपरोक्त अहवालाचे अवलोकन करता श्री अभिजीत नाईक , तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी सन २०२५ मध्ये कसबे कोरेगाव ता.जि.सातारा येथील जमीन गट नंबर १४६/२/२ या क्षेत्रामध्ये एकुण ८ अल्पक्षेत्र विक्री परवानगी आदेश निर्गमित केलेले आहेत. यापैकी ७ प्रकरणांमध्ये एकाच गटामध्ये विहीर /कुपनलिका या प्रयोजनासाठी अल्प क्षेत्र विक्रीपरवानगी दिल्याचे दिसुन येत आहे.

अभिप्राय -

१. उकत प्रकरणी महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसुचना दिनांक १४ मार्च २०२४ मधील नमुना बारा – (नियम २७ (२अ), (२ब) व (२ ड) मधील तरतुदीनुसार विहीत नमुन्यामील अर्ज प्राप्त करुन घेणेत आलेले नाहीत.

२. विक्री परवानगी देणेत आलेल्या क्षेत्राची मुळ स्थिती - कसबे कोरेगांव येथील जमीन गट नं.१४६/२/२ , धारणाधिकार वर्ग-१ , एकुण क्षेत्र १.१३.५० हे.आर.चौमी. पो.ख.००. आकार २.१५ रु.पै.
यामधील खातेदार - खाते क्र. (३२११३४)- नाझिया शहानूर आतार व शिवाजी नारायण शेडगे समाईक क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी (फेरफार क्र.१४०७५)
खातेदार - खाते क्र. (३२११३५) - नवनाथ जगन्नाथ मगर क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौ.मी
इतर हक्कात- धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी (फेरफार क्र.१६२३९) अशा ७/१२ वर नोंद आहे तथापि उक्त क्षेत्राचे संपादन झाल्याचे दिसुन येत नाही.

३. सदर प्रकरणी महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसुचना दिनांक १४ मार्च २०२४ मधील नियम क्र. २क (अ) व (ब) नुसार इतर हक्कातील नोंदीचे अनुषंगाने पाटबंधारे विभागाची मंजुरी अथवा नाहकरत प्रमाणपत्र घेतलेचे दिसुन येत नाही.

४. भुजल सर्वेक्षण विभाग यांचेकडील दिनांक ०४/०७/२०२४ रोजीचे अभिप्रायामधील अट क्र. ५ - सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या पाणी पुरवठा स्त्रोतापासुन ५०० मी. अंतर सोडणे बंधनकारक राहील तसेच ५०० मी. अंतरावर सार्वजनिक स्त्रोत नाही, असे तलाठी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे तसेच अट क्र. ६ - प्रस्तावित विहिरीचे ठिकाण हे क्षेत्रातील अन्य खाजगी सिंचन विहीरीपासुन १५०.०० मी. अंतरावर असावे. उक्त प्रकरणी भूजल सर्वेक्षण विभाग यांचेकडील अट क्र. ५ व ६ या अटींचे पालन केलेचे दिसुन येत नाही.

५. प्रस्तुत प्रकरणांपैकी रस्ता या प्रयोजनार्थ अल्पक्षेत्र विक्री परवानगी दिलेल्या प्रकरणी तहसिलदार कोरेगाव यांचे ऐवजी मंडल अधिकारी कोरेगाव यांचा अहवाल घेऊन अल्पक्षेत्र विक्री परवानगी आदेश पारित केलेने यामध्ये शासनाने अल्पक्षेत्र विक्री परवानगी संदर्भात घालून दिलेल्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसुन येते.

६. उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी दिनांक १७/११/२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणांसदर्भात कार्यालयीन टिपणी मध्ये अव्वल कारकून, नायब तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांची नावे नमूद आहेत तथापि त्यावर अव्वल कारकून व नायब तहसिलदार यांची स्वाक्षरी नाही. फक्त तत्कालीन उपविभागीय अधिकारी श्री.अभिजित नाईक यांची स्वाक्षरी आहे. यावरुन आदेश पारित करताना कार्यालयीन कार्यपध्दतीचा अवलंब केलेचे दिसून येत नाही.

539

७. महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ मध्ये दिनांक १५ जुलै २०२५ रोजीचे अधिसुचनेन्वये सुधारणा करणेत आलेली असून याद्वारे प्रत्येक जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यांमधील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या हद्दीमधील क्षेत्र तुकडेबंदी कायद्यामधून वगळणेत आलेले आहे. उपरोक्त सर्व विक्रीपरवानगी आदेशांचे अवलोकन करता कसबे कोरेगाव ता. कोरेगाव येथील जमीन गट नं. १४६/२/२ हे क्षेत्र कोरेगाव नगर पंचायतीचे हद्दीमध्ये समाविष्ट असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येत असलेबाबत उपविभागीय अधिकारी यांनी कळवीले आहे

उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता श्री अभिजीत नाईक , तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी तुकडेजोड- तुकडेबंदी कायद्याअंतर्गत विक्री परवानगी आदेश पारित करताना नियमांचे उल्लंघन केले आहे तसेच कार्यालयीन कार्यपध्दतीचा अवलंब केलेचे दिसून येत नाही त्यामुळे सदर प्रकरणी अनियमितता झालेली असुन श्री अभिजीत नाईक , तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव दोषी असलेचे दिसुन येत आहे. तरी उक्त् प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी आदेश होणेस विनंती आहे.

सोबत उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचा अहवाल पृष्ठ क्र.१ ते सादर करीत आहे

Digitally signed by
SANTOSH CHANDRAKANT PATIL
Date: [illegible]

(संतोष पाटील) भा.प्र.से
जिल्हाधिकारी सातारा

प्रत -- मा.विभागीय आयुक्त सो पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

१ ला मजला, मुख्य ईमारत, दालन क्र.१०१,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८१३६२३ Email ID :- j५a-mh@mah.gov.in

क्रमांक : विपआ-३५२६/प्र.क्र.११/ज-५अ (ई-१५६८७१६) दिनांक :२०/०४/२०२६.

प्रति,

कार्यासन अधिकारी,
संसदीयकार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र.२९९: "कोरेगांव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत."

महोदय,

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात दिलेल्या विधानपरिषद आश्वसन क्र.२९९ बाबत शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधी विवरणाच्या ३५ प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

आपला,

20/04/2026

(सतिश रेंगे)

कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत: १) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) कक्ष अधिकारी (समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवडनस्ती जमीन-०५-अ.

आश्वासन क्रमांक २९९

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा,
ईमेल आयडी- dcrsataracollectoroffice@gmail.com दूरध्वनी क्र.-०२१६२- २३२१७५

****

पत्र क्र.कुका/अधिअभि-कावि - १८३५ /२०२५
Comp.No. ६३४९९६६
दिनांक - 13/12/२०२५

प्रति,

उपसचिव ,
महसूल व वनविभाग ,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

विषय - सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र..२९८ व २९९ कोरेगाव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या पोटघाट असलेल्या जागेची विक्री करण्यात येत असलेबाबत.

संदर्भ - १)कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन , महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्रमांक -- File No.R & FD -२५०२५ (२६) /१/२०२५ RF (DESK५A)(E-१४२४०९३ दिनांक १३/११/२०२५
२)या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मह/३/कुळकायदा/अधिअभि/Comp No. ६३२९५२६ दि. १३/११/२०२५
३) उपविभागीय अधिकारी कोरेगाव, उपविभाग कोरेगाव यांचेकडील पत्र पत्र क्र. आस्था/वि.प.ता .प्रश्न २९६३/Comp No. २३६६७७६/२०२५ दिनांक १७/११/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करणेत येते की , श्री. शशिकांत शिंदे, मा. विधानपरिषद सदस्य यांनी सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. २९६३ चे अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान मा. श्री शशिकांत शिंदे, विधान परिषद सदस्य यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदय यांनी दिलेल्या आश्वासन क्र. २९८ व आश्वासन क्रमांक २९९ चे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा वस्तूस्थितीदर्शक अहवाल तात्काळ शासनास सादर करण्यात यावा. " या प्रमाणे संदर्भ क्र. १ अन्वये या कार्यालयास निर्देश प्राप्त झालेले आहेत . त्याअनुषंगाने उकत् प्रकरणी चोकशी करुन अहवाल सादर करणेस उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांना संदर्भ क्र. २ अन्वये कळविणेत आले होते .

त्यास अनुसरुन उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी त्यांचेकडील पत्र क्र. आस्था/वि.प.ता .प्रश्न २९६३/Comp No. २३६६७७६/२०२५ दिनांक १७/११/२०२५ अन्वये सादर केलेल्या अहवालाची प्रत अवलोकनार्थ सोबत सादर केली आहे.

उपविभागीय अधिकारी यांनी उक्त प्रकरणी सादर केलेला अहवाल, महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतचा अधिनियम व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा याचे अवलोकन करुन उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –ब दिनांक १४ मार्च २०२४ मध्ये प्रसिध्द करणेत आलेली महाराष्ट्र शासन , महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसुचना क्रमांक संकीर्ण २०२२/ प्र.क्र.२८७/ल-१ दिनांक १४ मार्च २०२४ अन्वये मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत नियम १९५९ मधील नियम २७ मध्ये सुधारणा करणेत आलेली असुन त्यानुसार विहिर /कुपनलिका, शेतरस्ते , सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर शिल्लक राहीलेली लगतची जमीन प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असले तर , आणि व्यक्तीगत लाभार्थ्यासाठी केंद्र किंवा राज्य ग्रामीण घरकूल योजनांच्या प्रयोजनासाठी आवश्यकता असेल अशा प्रकरणी विहीत अटी शर्तीचे पालन करुन अल्प क्षेत्र विक्री परवानगी देण्याचे अधिकार शासनाने जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत तसेच सदर अधिकार उपजिल्हाधिकारी-याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिका-यास प्रदान करणेचे अधिकार जिल्हाधिकारीसो यांना प्रदान केलेले आहे.

उपरोक्त अधिकारानुसार विहिर /कुपनलिका, शेतरस्ते , सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर शिल्लक राहीलेली लगतची जमीन प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असले तर , आणि व्यक्तीगत लाभार्थ्यासाठी केंद्र किंवा राज्य ग्रामीण घरकूल योजनांच्या प्रयोजनासाठी आवश्यकता असेल अशा प्रकरणी अल्पक्षेत्र विक्री परवानगी देण्याचे जिल्हाधिकारीसो यांचे अधिकार या कार्यालयाकडील आदेश क्र.कुका/अधिअभि/ ई –ऑफीस क्र. ४५६९६६/२०२४ दिनांक २७/०३/२०२४ अन्वये संबंधित उपविभागाचे उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करणेत आलेले आहेत.

दिनांक १४ मार्च २०२४ रोजीचे अधिसुचनेमध्ये अल्पक्षेत्र विक्री परवानगी देताना पालन करावयाच्या अटीशती नमुद आहेत त्यामधील थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे.

विहिरीकरिता / कुपनलिकेसाठी जमीन हस्तांतरित करण्यासंबंधी अटी-शर्ती (Rule २७ — २अ)

१. अर्ज **नमुना–बारा** मध्येच दाखल करणे आवश्यक.
२. अर्जासोबत **भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरण (GSDA)** यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) तसेच प्रस्तावित विहिरीसाठी लागणाऱ्या **जमिनीचे भू-सहनिर्देशक (Geo-coordinates)**. असणे आवश्यक
३. प्रस्तावित खरेदोदाराकडे **किमान प्रमाणभूत क्षेत्र** असणे बंधनकारक.
४. विहिरीकरिता जमीन हस्तांतरणाची कमाल मर्यादा: **पाच आर (५ Are)**.पर्यंत.
५. मंजुरी आदेशात प्रस्तावित जमिनीचे **भू-सहनिर्देशक अनिवार्यपणे समाविष्ट** असतील
६. विक्रीखतासोबत जिल्हाधिकाऱ्याचा मंजुरी आदेश जोडणे बंधनकारक
७. विक्रीखत नोंदविल्यानंतर ७/१२ उताऱ्यावर "**विहिरीच्या वापराकरिता मर्यादित अशी** "नोंद करणे बंधनकारक .

कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या अभिप्रायामधील अटीशर्तीपैकी काही प्रमुख अटी

१. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या पाणी पुरवठा स्त्रोतापासुन ५०० मी. अंतर सोडणे बंधनकारक राहील. तसेच ५०० मी. अंतराबर सार्वजनिक स्त्रोत नाही असे तलाठी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे.

२. प्रस्तावित विहीरीचे ठिकाण हे क्षेत्रातील अन्य खाजगी सिंचन विहिरीपासुन १५०.०० मी. अंतराबर असावे , जेणेकरुन दोन विहिरीमध्ये भूजल विभागून जाणार नाही.

शेत रस्त्यासाठी जमीन हस्तांतरित करण्यासंबंधी अटी-शर्ती (Rule २७ — २ब)

१. अर्ज नमुना—धारा मध्ये करणे

२. अर्जासोबत प्रस्तावित शेत रस्त्याचा कच्चा नकाशा, ज्या जमिनीवर रस्ता प्रस्तावित आहे तिचे भू-सहनिर्देशक तसेच विद्यमान (existing) जवळच्या रस्त्याचा तपशील व जोडणी (connectivity data), इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक.

३. रस्ता वापरण्याकरिता लाभार्थी/खरेदीदाराकडे त्या रस्त्यास लागून किमान प्रमाणभूत क्षेत्र असणे आवश्यक

४. प्रस्तावित रस्ता जाणाऱ्या क्षेत्राचे भू-सहनिर्देशक व विद्यमान रस्त्याशी जोडणीचा नकाशा असलेबाबतचा तहसिलदार यांचा अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक.

५. मंजुरी आदेशात प्रस्तावित रस्ता क्षेत्राचे भू-सहनिर्देशक नमूद करणे बंधनकारक

६. विक्रीखतासोबत हा मंजुरी आदेश जोडणे आवश्यक

७. विक्रीखत नोंदविल्यानंतर ७/१२ उताऱ्याच्या "इतर हक्क" स्तंभात "नजिकच्या जमीन धारकांच्या वापराकरिता शेत रस्ता खुला राहील." अशी नोंद करणे आवश्यक राहील.

उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी दिनांक १७/११/२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसुन येत आहे.

अ.क्र.	विक्री परवानगी देणेत आलेल्या प्रकरणाचा तपशील	तपासणी अंती आढळून आलेल्या त्रुटी
१	दि.२७/१२/२०२४ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/०३/२०२५ दि.१३/०१/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील अर्जदार यांचे नावे असणा-या क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.११.०० हे.आर.चौमी क्षेत्र रस्ता व	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.रस्त्यासंबंधी कच्चा नकाशा प्रकरणी समाविष्ट नाही.तसेच तहसिलदार यांचा अहवाल घेतलेचे दिसुन येत नाही. ३.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ४.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन

	कुपनलीकेसाठी, हस्तांतरण करणेस श्रीमती आशा भास्कर लवळे वगैरे ३ यांना अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ५. प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "कुपनलिकेच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ६.७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालवयाकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
२	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/२१/२०२५ दि.१४/०१/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०२.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस विनोद बाळकृष्ण पाटील यांना विहिरीसाठी, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहिरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही.
३	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/१२/२०२५ दि.२७/०१/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०२.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस गणेश संपत शेडगे यांना विहिरीसाठी, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही२.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहिरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.

४	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्रविक्री/ एसआर/२५/२०२५ दि.०३/०२/२०२५ नुसार नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०३.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.प्रशांत गजानन घाडगे यांना कुपनलीकेसाठी, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रस्तुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "कुपनलिकेच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नॉंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
५	दि.०६/०२/२०२५ रोजीचे नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/एसआर/६७/२०२५ दि.१७/०३/२०२५ नुसार नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधीलक्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी ०.०२.०० हे.आर.चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.योगेश सुरेश माळवदे यांना विहिरीसाठी, अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	१.विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहीरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नॉंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही. ६. प्रस्तावित खरेदीदार यांचे नावे गट नं. १०२/१/२/२ मध्ये ०.०१.३९ हे. आर चौमी क्षेत्र असलेचे दिसून येत सबब प्रस्तुत खरेदीदार यांनी प्रमाणभुत क्षेत्र धारण केलेले दिसुन येत नाही.

६	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ **जगन्नाथ मगर** यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्रविक्री/**एसआर/६८/२०२५** दि.२७/०३/२०२५ नुसार श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२ मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर. चौमी क्षेत्रापैकी **०.०१.५०** हे.आर. चौमी क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री. **बाळासाहेब लक्ष्मण बंडगर** यांना **कुपनलिकेसाठी** अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे	विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "कुपनलिकेच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
७	दि.०५/०२/२०२५ रोजीचे नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/अल्पक्षेत्र विक्री/ **एसआर/६९/२०२५दि.०३/०४/२०२५** नुसार नाझिया शाहानूर अत्तार व शिवाजी नारायण शेडगे यांचे मालकीचे **कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२** मधील क्षेत्र ०.५६.७५ हे.आर. **चौमी क्षेत्रापैकी ०.०१.५० हे.आर. चौमी** क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.विकास बळवंत शिंदे यांना **विहिरीसाठी,** अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे	विहीत नमुन्यात अर्ज नाही २.भू- सह निर्देशांक घेतलेले नाहीत. ३.कुपनलिकेसंबंधी वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचेकडील जा.क्र. वभूवै/भूसवियं/स्थाभुस- विहिर खुदाई जमीन विक्री/७३४/२०२४ दि. ०४/०७/२०२४ रोजीचे पत्राचा आदेशात उल्लेख केला आहे. तथापि त्यामधील अटीशर्तीचे पालन केलेचे दिसुन येत नाही. ४.प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "विहीरीच्या वापराकरिता मर्यादित अशी " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ५. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.
८	दि.०३/०१/२०२५ रोजीचे श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे अर्ज प्रकरणी आदेश क्र.जमीन/ अल्पक्षेत्रविक्री/**एसआर/७४/२०२५** दि.११/०४/२०२५ नुसार श्री.नवनाथ जगन्नाथ मगर यांचे मालकीचे **कसबे कोरेगाव येथील गट नंबर १४६/२/२**क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी क्षेत्रापैकी **०.०३.०० हे.आर.चौमी** क्षेत्र हस्तांतरण करणेस श्री.**राजू लक्ष्मण चव्हाण** यांना **रस्त्यासाठी,** अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.	विहीत नमुन्यात अर्ज नाही २.रस्त्यासंबंधी कच्चा नकाशा प्रकरणी समाविष्ट नाही. ३. तहसिलदार यांचा अहवाल घेतलेचे दिसुन येत नाही ४. प्रसतुत जमिनीचे अभिलेखाचे सदरी इतर हक्कामध्ये "प्लजिकच्या जमीन धारकांच्या वापराकरिता शेत रस्ता खुला राहील " अशी नोंद घेणेत आलेली नाही. ६. ७/१२ सदरी इतर हक्कात - धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी नमूद असताना संबंधित विभागाचे अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाही.

उपरोक्त अहवालाचे अवलोकन करता श्री अभिजीत नाईक , तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी सन २०२५ मध्ये कसबे कोरेगाव ता.जि.सातारा येथील जमीन गट नंबर १४६/२/२ या क्षेत्रामध्ये एकुण ८ अल्पक्षेत्र विक्री परवानगी आदेश निर्गमित केलेले आहेत. यापैकी ७ प्रकरणांमध्ये एकाच गटामध्ये विहीर /कुपनलिका या प्रयोजनासाठी अल्प क्षेत्र विक्रीपरवानगी दिल्याचे दिसुन येत आहे.

अभिप्राय -

१. उकत प्रकरणी महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसुचना दिनांक १४ मार्च २०२४ मधील नमुना बारा – (नियम २७ (२अ), (२ब) व (२ ड) मधील तरतुदीनुसार विहीत नमुन्यामील अर्ज प्राप्त करुन घेणेत आलेले नाहीत.

२. विक्री परवानगी देणेत आलेल्या क्षेत्राची मुळ स्थिती - कसबे कोरेगांव येथील जमीन गट नं.१४६/२/२ , धारणाधिकार वर्ग-१ , एकुण क्षेत्र १.१३.५० हे.आर.चौमी. पो.ख.००. आकार २.१५ रु.पै.
यामधील खातेदार - खाते क्र. (३२११३४)- नाझिया शहानूर आतार व शिवाजी नारायण शेडगे समाईक क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौमी (फेरफार क्र.१४०७५)
खातेदार - खाते क्र. (३२११३५) - नवनाथ जगन्नाथ मगर क्षेत्र ०.५६.७५ हे.आर.चौ.मी
इतर हक्कात- धोम डाव्या कालव्याकडे संपादित करावयाचे क्षेत्र ०.०३ हे.आर चौमी (फेरफार क्र.१६२३९) अशा ७/१२ वर नोंद आहे तथापि उक्त क्षेत्राचे संपादन झाल्याचे दिसुन येत नाही.

३. सदर प्रकरणी महसूल व वनविभाग यांचेकडील अधिसुचना दिनांक १४ मार्च २०२४ मधील नियम क्र. २क (अ) व (ब) नुसार इतर हक्कातील नोंदीचे अनुषंगाने पाटबंधारे विभागाची मंजुरी अथवा नाहकरत प्रमाणपत्र घेतलेचे दिसुन येत नाही.

४. भुजल सर्वेक्षण विभाग यांचेकडील दिनांक ०४/०७/२०२४ रोजीचे अभिप्रायामधील अट क्र. ५ - सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या पाणी पुरवठा स्त्रोतापासुन ५०० मी. अंतर सोडणे बंधनकारक राहील तसेच ५०० मी. अंतरावर सार्वजनिक स्त्रोत नाही, असे तलाठी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे तसेच अट क्र. ६ - प्रस्तावित विहिरीचे ठिकाण हे क्षेत्रातील अन्य खाजगी सिंचन विहीरीपासुन १५०.०० मी. अंतरावर असावे. उक्त प्रकरणी भूजल सर्वेक्षण विभाग यांचेकडील अट क्र. ५ व ६ या अटींचे पालन केलेचे दिसुन येत नाही.

५. प्रस्तुत प्रकरणांपैकी रस्ता या प्रयोजनार्थ अल्पक्षेत्र विक्री परवानगी दिलेल्या प्रकरणी तहसिलदार कोरेगाव यांचे ऐवजी मंडल अधिकारी कोरेगाव यांचा अहवाल घेऊन अल्पक्षेत्र विक्री परवानगी आदेश पारित केलेने यामध्ये शासनाने अल्पक्षेत्र विक्री परवानगी संदर्भात घालून दिलेल्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसुन येते.

६. उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी दिनांक १७/११/२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणांसदर्भात कार्यालयीन टिपणी मध्ये अव्वल कारकून, नायब तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांची नावे नमूद आहेत तथापि त्यावर अव्वल कारकून व नायब तहसिलदार यांची स्वाक्षरी नाही. फक्त तत्कालीन उपविभागीय अधिकारी श्री.अभिजित नाईक यांची स्वाक्षरी आहे. यावरुन आदेश पारित करताना कार्यालयीन कार्यपध्दतीचा अवलंब केलेचे दिसून येत नाही.

७. महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ मध्ये दिनांक १५ जुलै २०२५ रोजीचे अधिसुचनेन्वये सुधारणा करणेत आलेली असुन याद्वारे प्रत्येक जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यांमधील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या हद्दीमधील क्षेत्र तुकडेबंदी कायद्यामधून वगळणेत आलेले आहे. उपरोक्त सर्व विक्रीपरवानगी आदेशांचे अवलोकन करता कसबे कोरेगाव ता. कोरेगाव येथील जमीन गट नं. १४६/२/२ हे क्षेत्र कोरेगाव नगर पंचायतीचे हद्दीमध्ये समाविष्ट असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येत असलेबाबत उपविभागीय अधिकारी यांनी कळवीले आहे

उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता श्री अभिजीत नाईक , तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी तुकडेजोड- तुकडेबंदी कायद्याअंतर्गत विक्री परवानगी आदेश पारित करताना नियमांचे उल्लंघन केले आहे तसेच कार्यालयीन कार्यपध्दतीचा अवलंब केलेचे दिसून येत नाही त्यामुळे सदर प्रकरणी अनियमितता झालेली असुन श्री अभिजीत नाईक , तत्कालीन उपविभागीय अधिकारी कोरेगाव दोषी असलेचे दिसुन येत आहे. तरी उक्त् प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी आदेश होणेस विनंती आहे.

सोबत उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचा अहवाल पृष्ठ क्र.१ ते सादर करीत आहे

Digitally signed by
SANTOSH CHANDRAKANT PATIL
Date: 12-12-2025 13:45:23

(संतोष पाटील) भा.प्र.से
जिल्हाधिकारी सातारा

प्रत — मा.विभागीय आयुक्त सो पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा,
ईमेल आयडी- dcrsataracollectoroffice@gmail.com दूरध्वनी क्र.-०२१६२- २३२१७५

****

पत्र क्र.मह-३/कुका /अधिअभि-कावि-७०० /२०२६
दिनांक -१५ /०४/२०२६

प्रति,

उपसचिव ,
महसूल व वनविभाग ,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२

विषय - सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. २९९ कोरेगाव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या पोटपाट असलेल्या जागेची विक्री करण्यात येत असलेबाबत.

संदर्भ - १)कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन , महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्रमांक – File No.R & FD -२५०२५ (२६) /१/२०२५ RF (DESKJ५A)(E-१४२४०९३ दिनांक-१३/११/२०२५

२) या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मह/३/कुळकायदा/अधिअभि/Comp No. ६३२९५२६ दि. १३/११/२०२५

३) उपविभागीय अधिकारी कोरेगाव, उपविभाग कोरेगाव यांचेकडील पत्र क्र. आस्था/वि.प.ता .प्रश्न २९६३/Comp No. २३६६७७६/२०२५ दिनांक १७/११/२०२५

४) या कार्यालयाकडील पत्र क्र.कुका/अधिअभि/कावि-१८३५/२०२५ ,Comp No. ६३४९९६६ दि. १३/१२/२०२५

५) आपले कार्यालयाकडील पत्र पत्र क्रमांक File No.R & FD –२५०२५ (२६) /१/२०२५ RF (DESKJ५A)(E-१४२४०९३ दिनांक ०९/०३/२०२६

६) या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मह/३/कुळकायदा/अधिअभि/कावि-५९/२०२६ दि. ११/०३/२०२६

७) उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचेकडील पत्र क्रमांक /जमीन/कावि-१३०/२०२६ दि.१२/०३/२०२६ (या संकलनास प्राप्त दि.०९/०४/२०२६)

८) तहसिलदार कोरेगाव यांचेकडील पत्र क्रमांक /जमीन/कावि-१७१/२०२६ दि.१५/०४/२०२६ (या संकलनास प्राप्त दि.१५/०४/२०२६)

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करणेत येते की , श्री. शशिकांत शिंदे, मा. विधानपरिषद सदस्य यांनी सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. २९६३ चे अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान मा. श्री शशिकांत शिंदे, विधान परिषद सदस्य यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदय यांनी दिलेल्या आश्वासन क्र. २९८ व आश्वासन क्रमांक २९९ चे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा वस्तूस्थितीदर्शक अहवाल तात्काळ शासनास सादर करण्यात यावा. " या प्रमाणे संदर्भ क्र. १ अन्वये या कार्यालयास निर्देश प्राप्त झालेले होते.

सदर आश्वासनाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचेकडून चौकशी अहवाल उपलब्ध करुन घेणेत आलेला आहे. उपविभागीय अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालावर अनुसरुन या कार्यालयाकडील पत्र क.कुका/अधिअभि/कावि-१८३५/२०२५ .Comp No. ६३४९९६६ दि. १३/१२/२०२५ अन्वये आलाहिदा अहवाल सादर करणेत आलेला आहे.

तसेच संदर्भ क्र. ५ अन्वये उपस्थित करणेत आलेली त्रुटी व त्याबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

अ.क्र.	उपस्थित त्रुटी	त्रुटीपूर्तता अहवाल
१	मा. मंत्री (महसूल) महोदयांनी (आश्वासन क्र.२९९) अन्वये सदर प्रकरणी विभागीय चौकशीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील तसेच कायदा हातामध्ये घेऊन चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर कारवाई केली जाईल. सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटची पोलिसामार्फत चौकशी केली जाईल. सदर चौकशी मध्ये आमच्या विभागातील अधिका-याचा समावेश असल्यास त्यांचेवर देखील कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले आहे. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने आपल्या उक्त संदर्भाधीन पत्रान्वये शासनास अहवाल प्राप्त झाला आहे .सदर अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये" सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटची पोलिसांमार्फत चौकशी केली जाईल" याबाबत काहीही भाष्य केलेचे दिसुन येत नाही.	उक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त करुन घेणेत आलेला आहे . उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी संदर्भ क्र. ७ अन्वये पुढील प्रमाणे अहवाल सादर केला आहे. "अल्प क्षेत्र विक्री परवानगी प्रकरणांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकरणी एजंटांबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. अल्प क्षेत्र विक्री परवानगी बाबत पडताळणी केली असता एजंट बाबत कुठलीही माहिती आढळून आली नाही. तसेच या प्रकरणी कुठलीही तक्रार देखील या कार्यालयास प्राप्त नाही " याप्रमाणे उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी अहवाल सादर केला आहे. तहसिलदार कोरेगाव यांचेकडून देखील चौकशी करुन अहवाल प्राप्त झालेला आहे. तहसिलदार कोरेगाव यांनी संदर्भ क्र. ८ अन्वये पुढील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे. "अल्प क्षेत्र विक्री परवानगी आदेशाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकरणी एजंटाबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच अल्प क्षेत्र विक्री परवानगी बाबात पडताळणी केली असता एजंट बाबत कुठलीही माहिती आढळून आलेली नाही. तसेच या प्रकरणी कुठलीही तक्रार देखील या कार्यालयास प्राप्त नाही." याप्रमाणे तहसिलदार कोरगाव यांनी अहवाल सादर केला आहे. जिल्हा स्तरावर देखील अभिलेखाची पडताळणी केलेली असून अल्प क्षेत्र विक्री परवानगी बाबत कोरेगाव तालुक्यामध्ये एजंट बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही. तहसिलदार कोरेगाव, उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता तसेच जिल्हा स्तरावरील अभिलेख पडताळणी करता कोरेगाव तालुक्यामध्ये अल्पक्षेत्र विक्री परवानगी प्रकरणांमध्ये एजंटांचा समाबेश असलेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही. तसेच उक्त प्रकरणी एजंट बाबत कुठलीही माहिती आढळून आली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे "सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटची पोलिसांमार्फत चौकशी केली जाईल", या मुद्दयांचे अनुषंगाने अहवाल निरंक समजणेस विनंती आहे.

(संतोष पाटील) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी सातारा

महाराष्ट्र शासन
उपविभागीय अधिकारी कोरेगांव उपविभाग कोरेगांव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मुख्य मुख्यालय मार्ग, कोरेगाव, ता. कोरेगाव जि. सातारा
फोन नं. : ०२१६३-२२१३००
ई-मेल: sdokoregaon@gmail.com

क्रमांक /जमीन /कावि-130/ 2026

दिनांक –12/03 /2026

प्रति,

मा.जिल्हाधिकारी सो.(महसूल शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा

विषय:- सन 2025 च्या पावसाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन 299 कोरेगांव जि.सातारा येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत.

संदर्भ :- 1.मा.कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. File No.R&FD-25025(26) /1/ 2025RF(DESKJ5A)(E-1424093)दिनांक 09/03/2026.
2.या कार्यालयाकडील पत्र क्र.आस्था/वि.प.ता.प्रश्न-2963/Comp No.2366776/2025 दिनांक 17/11/2025.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सविनय सादर करणेत येते की, सन 2025 च्या पावसाळी अधिवेशामध्ये विधानपरिषदेत झालेल्या चर्चेदरम्यान मा.शशिकांत शिंदे,विधानपरिषद सदस्य यांनी विषयांकित प्रकरणी चौकशी करण्यांची मागणी मा.मंत्री (महसूल) यांना केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) महोदयांना (आश्वासन क्र.299)सदर प्रकरणी विभागीय दोषीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील तसेच कायदा हातामध्ये घेऊन चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर कारवाई केली जाईल.सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटचीं पोलिसामार्फत चौकशी केली जाईल. सदर चौकशी मध्ये या कार्यालयाच्या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्यास त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले आहे.

तरी याबाबत सविनय सादर करणेत येते की, सदर आश्वासनाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र क्र.आस्था/वि.प.ता.प्रश्न-2963/ Comp No.2366776/2025 दिनांक 17/11/2025 अन्वये अलाहीदा अहवाल सविनय सादर करणेत आलेला आहे. अल्प क्षेत्र विक्री परवानगी प्रकरणांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकरणी एजंटांबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

अल्प क्षेत्र विक्री परवानगी बाबत पडताळणी केली असता एजंट वाबत कुठलीही माहिती आढळुन आली नाही. तसेच या प्रकरणी कुठलीही तक्रार देखील या कार्यालयास प्राप्त नाही.

आपला विश्वासु

Digitally signed by
PRAMOD DATTATRAY KUDALE
Date: 13-03-2026 15:11:52
उपविभागीय अधिकारी कोरेगाव
उपविभाग कोरेगांव

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
तहसिल कार्यालय कोरेगांव

दूरध्वनी क्र: ०२१६३- २२०२४०
Email ID : tahsilkoregaon@gmail.com
पत्ता जुन्या मोटार स्थानकाजवळ, रहिमतपूर रस्ता -: कोरेगाव पिन को, सातारा जि.४१५५०१

क्र.जमीन/कावि- १७१/२०२६

दि – १५/०४/२०२६

प्रति,

मा. जिल्हाधिकारी सो, सातारा
(महसुल शाखा)

विषयः- सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन २९९ कोरेगांव जि. सातारा येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत.

संदर्भः मा. कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. File No. R&FD-२५०२५ (२६)/१/२०२५RF(DESKISA) (E-१४२४०९३) दिनांक ०९/०३/२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सविनय सादर करणेत येते की, सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशामध्ये विधानपरिषदेत झालेल्या चर्चेदरम्यान मा.शशिकांत शिंदे, विधानपरिषद सदस्य यांनी विषयांकित प्रकरणी चौकशी करण्याची मागणी मा. मंत्री (महसूल) यांना केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) महोदयांना (आश्वासन क्र.२९९) सदर प्रकरणी विभागीय दोषीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील तसेच कायदा हातामध्ये घेऊन चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर कारवाई केली जाईल. सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटची पोलिसामार्फत चौकशी केली जाईल. सदर चौकशी मध्ये या कार्यालयाच्या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्यास त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले आहे.

तरी याबाबत सविनय सादर करणेत येते की, सदर आश्वासनाच्या अनुषंगाने मा.उपविभागीय अधिकारी, कोरेगांव यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. आस्था/वि.प.ता.प्रश्न-२९६३/ Comp No.२३६६७७६/२०२५ दिनांक १७/११/२०२५ अन्वये अलाहोदा अहवाल सविनय सादर करणेत आलेला आहे. अल्प क्षेत्र विक्री परवानगी प्रकरणांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकरणी एजंटांबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

अल्प क्षेत्र विक्री परवानगी बाबत पडताळणी केली असता एजंट वाबत कुठलीही माहिती आढळून आली नाही. तसेच या प्रकरणी कुठलीही तक्रार देखील या कार्यालयास प्राप्त नाही.

आपला विश्वासु

15/4/26

(डॉ.संगमेश कोडे)
तहसिलदार कोरेगांव

प्रत- मा.उपविभागीय अधिकारी, कोरेगांव यांना माहितीसाठी सविनय सादर.

विधानपरि[illegible]ले दिलेल्या आश्वासनांवरील शासकीय कार्यवाह[illegible]बंधी विवरणपत्र

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

विभागाचा फाईल क्र. .....दिनांक..... ..... विभागाचे नांव :- (महसूल) व वन विभाग

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले, त्याबाबतचे आदेश, निर्णय असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करावा. (प्रत सोबत जोडावी)	आश्वासन पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासन पूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासन पूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
२९८	विधानपरिषद कामकाज तारांकित :- २९७ क्रमांक :- ९२ दिनांक :- १५ जुलै, २०२५	कोरेगांव (जि. सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत.....	मा. मंत्री/ श्री. चंद्रशेखर बावनकुळे :- मी या सर्वांची चौकशी करतो आणि विभागीय चौकशी करुन जो दोषी असेल त्याच्यावर [illegible] महिन्याभराच्या आत कारवाई करु.						
२९९	माननीय मंत्री/ राज्यमंत्री श्री. यांनी दिलेले उत्तर	श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेला तारांकित प्रश्न क्र. २९६३	मा. मंत्री/ श्री. चंद्रशेखर बावनकुळे :- सदर प्रकरणी विभागीय दोषीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील तसेच कायदा हातामध्ये घेऊन चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर कारवाई केली जाईल. सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटची पोलिसांमार्फत चौकशी केली जाईल. सदर चौकशीमध्ये आमच्या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्यास त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल.						

जमीन- ०५ अ 11/11/25

15-07-2025 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) O - 5
GRB/KTG प्रथम श्री.खर्चे 12:30

ता.प्र.क्र.२९६३.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

(२) हे खरे नाही.
(३) यापूर्वी मा.विधानपरिषद सदस्य यांनी विधानपरिषदेमध्ये "विशेष उल्लेख" सूचना क्रमांक-२१८ उपस्थित केली होती. सदर विशेष उल्लेख सूचनेच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, कोरेगाव यांचे कार्यालयाकडून अल्पक्षेत्र विक्री बाबत देण्यात आलेल्या आदेशांची तपासणी करणे तसेच दुय्यम निबंधक कार्यालय, कोरेगाव यांचेकडे झालेल्या सर्व खरेदी-विक्री दस्तांची तपासणी करुन यामध्ये तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन होईल असे दस्त झाले किंवा कसे? याबाबतची तपासणी करणे याकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांचे आदेश क्र.कुका/अधिअभि/-कावि १४१६/२०२५ Comp.No.१९४१८०५/२०२५, दिनांक १२/०६/२०२५ अन्वये अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली असून, तपासणी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझी तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तराला हरकत आहे. "सदर बेकायदेशीर विक्री ही प्रांत, दुय्यम निबंधक, इरिगेशन विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने सुरु असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय," असा लेखी प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला "हे खरे नाही," असे लेखी उत्तर दिलेले आहे. लेखी उत्तरात चौकशी समिती नेमण्यात आल्याचे नमूद केले आहे. खरे म्हणजे तारांकित प्रश्नाला लेखी उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. आपण तुकडाबंदीचा निर्णय घेतलेला आहे. यापूर्वी कोरेगाव तालुक्यात तुकडा बंदीच्या संदर्भात एजंट तयार झाले होते. प्रांत आणि इतर सर्व मंडळींनी केवळ कोरेगाव पट्ट्यात नव्हे तर आजुबाजूच्या परिसरात अशा प्रकारच्या मंजुऱ्या दिलेल्या आहेत आणि त्याची विक्री देखील झालेली आहे. दुसरे म्हणजे आपण विहीर, कुपनलिका इत्यादीसाठी शिथीलता दिलेली आहे.

15-07-2025 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) ०-6
GRB/KTG प्रथम श्री.खर्चे 12:30

ता.प्र.क्र.२९६३ .....

श्री.शशिकांत शिंदे.....

विहीर, कुपनलिका कोठे असावी, किती अंतरावर असावी याचे नियम आहेत. परंतु एका गुंठ्यात ४ विहिरी आहेत. एक-दोन गुंठ्यात बोअरवेल, रस्ता, विहीर इत्यादीसाठी परवानगी दिलेली आहे. प्रत्यक्षात पाहणी केल्यानंतर तेथे विहीर नाही आणि बोअरवेल सुद्धा नाही. परंतु मंजुरी देण्यासाठी पळवाट शोधण्यात आलेली आहे. यामध्ये जे कोणी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे. तारांकित प्रश्न दिल्यानंतर चौकशी समिती नियुक्त केलेली आहे. म्हणजे टाळाटाळ होत आहे. यामध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ? यामध्ये एजंट आहेत. प्रांत कार्यालयात बसून संगनमताने जमीन खरेदी, विक्रीचे व्यवहार झालेले आहेत. यामध्ये एजंटगिरी झालेली आहे. जे संगनमताने खरेदी, विक्री करतात त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात येणार आहेत काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जे चुकीच्या पद्धतीने झालेले आहे त्याचे आदेश रद्द करण्यात येणार आहेत काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, कोरेगाव भागात तुकडाबंदी कायद्याचा पूर्णपणे भंग झालेला आहे, ही गोष्ट बरोबर आहे. अधिकार नसताना कायद्याला गुंडाळून जेवढा कायद्याचा भंग करता येईल तेवढा भंग झालेला आहे. अनेक कुपनलिकांसाठी तुकडाबंदी कायद्यानुसार मंजुऱ्या दिलेल्या आहेत. हे छोटे लोक आहेत. खरे म्हणजे जमिनीचे तुकडे करुन त्यांना तेथे घरे बांधावयाची आहेत. मग कुपनलिकेच्या नावाने तुकडा पाडण्यात आले. कारण तुकडाबंदी कायद्यामध्ये जमीन रहिवासी करता येत नव्हती. परंतु आता आपण त्याही पुढे गेलेलो आहोत. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखालील सरकारने तुकडाबंदी कायदा रद्द करण्यात येईल असा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे आता त्यांना नियमानुकूल करावे लागेल. जे तुकडे झालेले आहेत ते नियमानुकूल करावे लागतील. कायदा असताना कायद्याचा धाक नसलेली ही प्रकरणे आहेत. प्रकल्पाची

15-07-2025 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) O - 7
GRB/KTG प्रथम श्री.खर्चे 12:30

ता.प्र.क्रं.२९६३.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

पाटचारी कोणी तोडली, आपण तारांकित प्रश्न दिल्यानंतर ती पाटचारी दुरुस्त करण्यात आली, कुपनलिका झाली. आपला प्रश्न योग्य आहे. आमच्या विभागाकडून चुका झालेल्या आहेत. आता तुकडाबंदी कायदा रद्द झाल्यामुळे आम्ही त्या चुका दुरुस्त करु. यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी भंग केलेला आहे त्यांची नावे माझ्याकडे आहेत. ती यादी खूप मोठी आहे. मी या सर्वांची विभागीय चौकशी करतो आणि विभागीय चौकशी करुन जो दोषी असेल त्याच्यावर आम्ही महिन्याभराच्या आत कारवाई करु.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, आपण तुकडाबंदीचा कायदा केलेला आहे. आम्ही त्याचे स्वागत आहे. आपण नागरी वस्तीसाठी कायदा केलेला आहे. कोरेगाव परिसरातील ग्रामीण भागातील छोट्या गावांमध्ये विक्री झालेली आहे. आम्ही तुकडाबंदी कायद्याचे स्वागत केलेले आहे. आपण धाडसी निर्णय घेतला. त्यासाठी आम्ही आपले अभिनंदन केले.

यानंतर श्री.सांगळे.....

15-07-2025 (असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही) P - 1
MJS/KTG प्रथम श्री.बोरले 12:40

ता.प्र.क्र.२९६३ .....

श्री.शशिकांत शिंदे ...

ग्रामीण भागांमध्ये जेथे आवश्यकता आहे तेथे शासनाने तुकडा बंदीसंबंधी निर्णय घेणे गरजेचे आहे. शासनाकडून अशा प्रकारचा निर्णय घेतला जाणार आहे का ? मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात चौकशी अहवाल आला असून आपण सर्व गोष्टी मान्य केलेल्या असल्याचे सांगितले आहे. सदर प्रकरणी गरिबांवर तसेच ज्यांनी घरे बांधलेली आहेत त्यांच्यावर अन्याय करावा असे मी म्हणणार नाही. परंतु संबंधित एजंटस यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल झाले पाहिजेत. या संदर्भात रॅकेट होते. त्यांनी गरीब लोकांचे पैसे घेतलेले आहेत. सदर प्रकरणी एजंट लोकांची चौकशी करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई केली जाणार आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, प्रश्नाधीन जमिनींचे तुकडे पाडले तेव्हा ते ग्रीन झोन होते. कालांतराने गोरेगावच्या प्रस्तावित डीपीमध्ये यलो झोन प्रस्तावित केला आहे. अद्याप डीपी मंजूर झालेला नाही. या संदर्भात डीपीमध्ये एजंट लोक असतील त्यांनी डीपी टाकून घेतला व लोकांकडून पैसे घेतले. एक बाब खरी आहे की, यामध्ये एजंटचा सहभाग असल्याशिवाय आमच्या अधिकाऱ्यांकरिता याबाबत कार्यवाही करणे सोपे नाही. राज्यात अनेक ठिकाणी असे घडलेले आहे. सदर प्रकरणी विभागीय दोषीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील तसेच कायदा हातामध्ये घेऊन चुकीचे काम करणाऱ्या लोकांवर कारवाई केली जाईल. सदर प्रकरणी समावेश असलेल्या एजंटची पोलिसांमार्फत चौकशी केली जाईल. सदर चौकशीमध्ये आमच्या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्यास त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल.

आश्वासन क्रमांक ९२

जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
पहिला मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दुरध्वनी क्र. (०२२) २२७९३७५४ Email: deske१०-rfd@mah.gov.in

क्र. विपता-२०२५/प्र.क्र.६७/ई-१० दिनांक : २१ एप्रिल, २०२६

विधानमंडळ कामकाज प्राथम्य / कालमर्यादा

प्रति,
कार्यासन अधिकारी (कार्या.-चार),
संसदीय कार्य विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.

21/04/26

विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन-२०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनामध्ये मा.मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या विधानपरिषद आश्वासन क्र.९२ बाबत.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन-२०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशनामध्ये मा.मंत्री (महसूल) यांनी सर्वश्री. ॲड. निरंजन डावखरे व इतर, सन्माननीय विधानपरिषद सदस्य यांच्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.२ बाबत देण्यात आलेल्या आश्वासन क्र.९२ बाबतची माहिती तसेच त्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

(स्मिता पोवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
१) कक्ष अधिकारी (म-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) निवडनस्ती / कार्या.आस्था-१०

AUG-2013 16:26 IAS TRE. CENTRE KOLHAPUR 02312528351 P.01

* Kind Attention Shri Mane

